ગુજરાત રાજ્યના શિક્ષણવિભાગના પત્ર-ક્રમાંક
મશબ/1215/12-22/છ, તા. 1-3-2016– થી મંજૂર

# वाणिज्य व्यवस्था

## आणि

# संचालन

## इयत्ता 11

**प्रतिज्ञापत्र**

भारत माझा देश आहे.
सारे भारतीय माझे बांधव आहेत.
माझ्या देशावर माझे प्रेम आहे. माझ्या देशातल्या
समृद्ध आणि विविधतेने नटलेल्या परंपरांचा मला अभिमान आहे.
त्यां परंपरांचा पाईक होण्याची पात्रता माझ्या अंगी यावी म्हणून मी सदैव प्रयत्न करीन.
मी माझ्या पालकांचा, गुरुजनांचा आणि वडीलधाऱ्या माणसांचा मान ठेवीन आणि प्रत्येकाशी सौजन्याने वागेन.
माझा देश आणि माझे देशबांधव यांच्याशी निष्ठा राखण्याची मी प्रतिज्ञा करीत आहे. त्यांचे कल्याण आणि त्यांची समृद्धी यांतच माझे सौख्य समावले आहे.

રાજ્ય સરકારની વિનામૂલ્યે યોજના હેઠળનું પુસ્તક

गुजराज राज्य शाळा पाठ्यपुस्तक मंडळ
'विद्यायन', सेक्टर 10-ए, गांधीनगर-382010

© गुजरात राज्य शाळा पाठ्यपुस्तक मंडळ, गांधीनगर
या पाठ्यपुस्तकाचे सर्व हक्क गुजरात राज्य शाळा पाठ्यपुस्तक मंडळाच्या आधिन आहेत.
या पाठ्यपुस्तकातील कोणताही भाग, कोणत्याही स्वरूपात गुजरात राज्य शाळा पाठ्यपुस्तक मंडळाच्या नियामकांच्या लेखी परवानगी शिवाय प्रकाशित करता येणार नाही.

**विषय-सल्लागार**
श्री जे. एम. शाह

**लेखन**
डॉ. उर्मिश एस. झवेरी
प्रो. जीतेषचंद्र जे. जानी
डॉ. भरत वी. रामानुज
डॉ. आशिष जे. दवे
डॉ. आर. जी. पटेल
श्री अश्विनभाई आर. पटेल

**अनुवाद**
श्री आर. पी. कदम
श्री एम. एन. करांडे

**समीक्षा**
श्रीमती विजया आर. सुर्वे
श्री अजय पी. पाटील

**भाषाशुद्धी**
श्री रमेश एन. घरटे

**संयोजन**
डॉ. चिराग एन. शाह
(विषय-संयोजक : कॉमर्स)

**निर्माण-संयोजन**
श्री हरेन शाह
(नायब नियामक : शैक्षणिक)

**मुद्रण-आयोजन**
श्री हरेश एस. लीम्बाचीया
(नायब नियामक : उत्पादन)

## प्रस्तावना

राष्ट्रीय अभ्यासक्रमाच्या अनुसंधानात गुजरात राज्य माध्यमिक आणि उच्चतर माध्यमिक शिक्षण बोर्डाने नवीन अभ्यासक्रम तयार केले आहेत. हे अभ्यासक्रम गुजरात सरकारकडून मंजूर करण्यात आले आहेत.

गुजरात सरकारद्वारे मंजुर झालेल्या **इयत्ता 11, वाणिज्य व्यवस्था आणि संचालन** विषयाच्या नव्या अभ्यासक्रमानुसार तयार करण्यात आलेले हे पाठ्यपुस्तक विद्यार्थ्यांसमोर ठेवताना मंडळाला आनंद होत आहे.

हे पाठ्यपुस्तक प्रसिद्ध करण्यापूर्वी त्याच्या हस्तप्रतीची या स्तरावर शिक्षणकार्य करणाऱ्या शिक्षक आणि तज्ज्ञांद्वारे सर्वांगीण समीक्षा करण्यात आलेली आहे. शिक्षक आणि तज्ज्ञांच्या सूचनेनुसार, हस्तप्रतीमध्ये योग्य त्या सुधारणा केल्यानंतरच हे पाठ्यपुस्तक प्रसिद्ध करण्यात आले आहे.

प्रस्तुत पाठ्यपुस्तक रसप्रद, उपयोगी आणि क्षतिरहित बनविण्यासाठी मंडळाने योग्य ती काळजी घेतली आहे. असे असुनही शिक्षणात रस असणाऱ्या व्यक्तिंकडून पुस्तकाची गुणवत्ता वाढविणाऱ्या सूचनांचे मंडळ स्वागतच करील.

**पी. भारती (IAS)**
नियामक
ता. 04-11-2019

कार्यवाहक प्रमुख
गांधीनगर

प्रथम संस्करण : 2016, पुनः मुद्रण : 2017, 2018 , 2020

**प्रकाशक** : गुजरात राज्य शाला पाठ्यपुस्तक मंडल, 'विद्यायन', सेक्टर 10-ए, गांधीनगर की ओर से पी. भारती (IAS), नियामक

**मुद्रक** :

# मूलभूत कर्तव्ये

भारतातील प्रत्येक नागरिकाची कर्तव्ये खालीप्रमाणे आहेत :*

(क) घटनेचे पालन करणे आणि तिचे आदर्श व संस्थाचा, राष्ट्रध्वज व राष्ट्रगीत यांचा आदर करणे;

(ख) ज्यामुळे आपल्याला राष्ट्रीय स्वातंत्र्यलढयास स्फूर्ती मिळाली त्या उदात्त आदर्शाची जोपासना करुन त्यांचे अनुकरण करणे;

(ग) भारताची सार्वभौमता, एकता व एकात्मता उन्नत राखणे व संरक्षण करणे;

(घ) आवाहन केले जाईल तेंव्हा संरक्षण करणे व राष्ट्रीय सेवा बजावणे;

(च) धार्मिक, भाषिक व प्रादेशिक किंवा वर्गीय भेदांच्या पलीकडे जाऊन अखिल भारतीय जनतेमध्ये एकोपा व भ्रातृभाव वाढीला लावणे; स्त्रियांच्या प्रतिष्ठेला उणेपणा आणणाऱ्या प्रथा सोडून देणे;

(छ) आपल्या संमिश्र संस्कृतीच्या वारशाचे मोल जाणून तो जतन करणे;

(ज) अरण्ये, सरोवरे, नद्या व जीवसृष्टी यांसह नैसर्गिक पर्यावराचे रक्षण करणे, त्यात सुधारा करणे, आणि सजीव प्राण्यांविषयी दयाबुद्धी बाळगणे;

(झ) विज्ञाननिष्ठ दृष्टिकोण, मानवतावाद आणि शोधक बुद्धी व सुधारणावाद यांचा विकास करणे;

(ञ) सार्वजनिक संपत्तीचे रक्षण करणे वन्य हिंसाचाराचा निग्रहपूर्वक त्याग करणे;

(ट) राष्ट्र सतत पुरुषार्थ व सिद्धी यांच्या चढत्या श्रेणी गाठत जाईल अशा प्रकारे सर्व व्यक्तिगत व सामुदायिक कार्यक्षेत्रात पराकाष्ठेचे यश संपादन करण्यासाठी झटणे, हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे;

(ठ) आई-वडील किंवा पालकांनी 6 वर्ष ते 14 वर्षापर्यंत वयाच्या स्वत:च्या मुलांना किंवा पाल्यांना शिक्षणाची संधी देणे.

* भारताची घटना : कलम 51-क

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| 1. | धंद्याचे स्वरूप, हेतू आणि कार्यक्षेत्र | 1 |
| 2. | धंदेवाईक सेवा-1 | 12 |
| 3. | धंदेवाईक सेवा-2 | 22 |
| 4. | माहितीसंचार, ई-कॉमर्स आणि आऊटसोर्सिंग | 32 |
| 5. | धंदेवाईक साहसांची स्वरूपे-1 | 44 |
| 6. | धंदेवाईक साहसांची स्वरूपे-2 | 58 |
| 7. | जाहीरक्षेत्र, खाजगीक्षेत्र आणि जागतिक साहस | 74 |
| 8. | धंदेवाईक भांडवलाची प्राप्तीस्थाने | 86 |
| 9. | आंतरिक व्यापार | 100 |
| 10. | आंतरराष्ट्रीय व्यापार | 111 |
| 11. | धंद्याची सामाजिक जबाबदारी | 123 |
| • | प्रोजेक्ट कार्य | 132 |


•

# 1 धंद्याचे स्वरूप, हेतू आणि कार्यक्षेत्र (Nature, Purpose and Scope of Business)

**या प्रकरणात तुम्ही काय शिकणार आहात?**

1.1 आर्थिक प्रवृत्ती
1.2 बिनआर्थिक प्रवृत्ती
1.3 आर्थिक प्रवृत्ती आणि बिनआर्थिक-प्रवृत्ती मधील फरक
1.4 आर्थिक प्रवृत्तीचे प्रकार
1.5 धंदा
- 1.5.1 अर्थ आणि व्याख्या
- 1.5.2 लक्षणे
- 1.5.3 परिस्थितीच्या उद्देश
- 1.5.4 धंदाकीय जोखीम
- 1.5.5 धंदाकीय जोखीमीची कारणे

1.6 व्यवसाय
- 1.6.1 अर्थ
- 1.6.2 लक्षणे

1.7 नोकरी
- 1.7.1 अर्थ
- 1.7.2 लक्षणे
- 1.7.3 धंदा, व्यवसाय आणि नोकरी यांची तुलना

1.8 धंदेकीय प्रवृत्तीचे वर्गीकरण
1.9 व्यापार
- 1.9.1 अर्थ
- 1.9.2 लक्षणे
- 1.9.3 प्रकार

1.10 वाणिज्य
- 1.10.1 अर्थ
- 1.10.2 लक्षणे
- 1.10.3 व्यापार आणि वाणिज्य यातील फरक

1.11 उद्योग
- 1.11.1 अर्थ
- 1.11.2 वर्गीकरण

**प्रस्तावना**

संपूर्ण विश्वात आर्थिक प्रवृत्या व्यापार आणि वाणिज्याला जीवंत ठेवतात. तुमच्या शहरातील अथवा गावातील कुंभार, लोहार, वणकर, चांभार आर्थिक प्रवृत्तीद्वारे आर्थिक लाभ किंवा नाणेकीय मोबदला मिळवित असतात. शहरात लहान-मोठया कारखान्यांमध्ये हजारो कामगार काम करुन रोजगारी मिळवितात. यासर्वच प्रवृत्या आर्थिक प्रवृत्या आहेत. ज्यांचा उद्देश आर्थिक उत्पन्नाचा आहे. धंदा हा नफ्याच्या उद्देशाने करण्यात येणारी आर्थिक प्रवृत्ती आहे. धंद्याव्यतिरिक्त व्यवसाय आणि नोकरी पण आर्थिक प्रवृत्तीचा प्रकार आहे. मानवी गरजांमध्ये सतत वाढ होत आहे. या गरजा पूर्ण करण्यासाठी मानवाला आर्थिक प्रवृत्ती करावी लागते. उदाहरण म्हणून पाहीले तर शेतकरी अन्नाचे उत्पादन करतो. आरोपीच्या वतीने केस लढून वकील फी मिळवितो. कामगार कारखान्यात काम करून पगार मिळवितात. यासर्व प्रवृत्यांमागील उद्देश आर्थिक मोबदला मिळविण्याचा असल्यामुळे या प्रवृत्तींना आर्थिक प्रवृत्ती असे म्हणतात.

समाजातील काही व्यक्ति आर्थिक लाभ किंवा आर्थिक मोबदला मिळविण्याच्या हेतूशिवाय प्रवृत्ती करतात उदा. समाजसेवक समाजसेवेच्या उद्देशाने काम करतात. एखादा डॉक्टर समाजसेवेच्या उद्देशाने प्रेरित होऊन मोफत वैद्यकिय सेवा देतो त्यांना बिनआर्थिक प्रवृत्ती असे, म्हणतात. बिनआर्थिक प्रवृत्तीत आर्थिक लाभ, नाणेकीय मोबदला किंवा आर्थिक उत्पन्नाचा उद्देश नसतो.

## 1.1 आर्थिक प्रवृत्ती (Economic Activity)

आर्थिक लाभ किंवा आर्थिक मोबदल्याच्या अपेक्षेने करण्यात येणारी प्रवृत्ती. म्हणजेच आर्थिक प्रवृत्ती. जीवन जगण्यासाठी मानवाला आर्थिक प्रवृत्ती करावीच लागते, ज्याद्वारे मोबदला मिळवून मानव त्यांच्या गरजा पूर्ण करू शकतो. म्हणून सर्वच आर्थिक प्रवृत्तिंना फळदायी प्रवृत्ती असे म्हणतात. आर्थिक प्रवृत्ती करणारा दुसऱ्याच्या गरजा पूर्ण करून स्वत:साठी आर्थिक लाभ मिळवितो. उदा. शेतकरी अन्नधान्याचे उत्पादन करून, विणकर कापडाचे उत्पादन करून, सुतार फर्निचरचे उत्पादन करून. त्याद्वारे समाजातील विभिन्न वर्गाच्या गरजा पूर्ण करून आर्थिक मोबदला मिळवितात. आजच्या आधुनिक युगात आर्थिक प्रवृत्ती केन्द्रस्थानी आहे.

### 1.2 बिन आर्थिक प्रवृत्ती (Non-Economic Activity)

बिन आर्थिक प्रवृत्तीचा हेतू आर्थिक मोबदला अथवा आर्थिक उत्पन्न मिळविण्याचा नसतो. समाजातील कित्येक व्यक्ति आर्थिक मोबदला किंवा आर्थिक उत्पन्न मिळविण्याच्या हेतूशिवाय प्रवृत्ती करतात. उदा. समाजसेवकाद्वारे होणारी समाजसेवेची प्रवृत्ती, आईद्वारे स्वत:च्या बाळाला संगोपण करण्याची प्रवृत्ती. सामाजिक एकतेसाठी प्रचार करणाऱ्या कार्यकर्त्यांची प्रवृत्ती. भुकंप, सुनामी यासारख्या नैसर्गिक आपत्तीच्या वेळी असरग्रस्त व्यक्तिंना मदत करण्यासाठी कार्य करणाऱ्या स्वयंसेवकांची प्रवृत्ती वगैरेना बिनआर्थिक प्रवृत्ती असे म्हणतात. यासाठीचे प्रेरकबळ, देशसेवा, समाजसेवा, लागणी, प्रेम किंवा मानवाच्या जीवनात येणारे परिवर्तन असते.

### 1.3 आर्थिक प्रवृत्ती आणि बिन आर्थिक प्रवृत्ती यातील फरक

| अनुक्रम नंबर | फरकांचा मुद्दा | आर्थिक प्रवृत्ती | बिन आर्थिक प्रवृत्ती |
|---|---|---|---|
| (1) | हेतू | आर्थिक लाभ मिळविण्याचा हेतू असतो. | सामाजिक सेवा, मानवसेवा, देशसेवेचा हेतू असतो. |
| (2) | अपेक्षा | नफा, पगार, फी आणि महत्तम संपत्ती मिळविण्याची अपेक्षा असते. | देशसेवा, समाजसेवेची अपेक्षा असते. |
| (3) | प्रकार | धंदा, व्यवसाय किंवा नोकरी हे तीन मुख्य प्रकार आहे. | कोणताही प्रकार नाही. |
| (4) | धोके आणि अनिश्चितता | धोके आणि अनिश्चितता असते. | धोके आणि अनिश्चितता असते. |

### 1.4 आर्थिक प्रवृत्तीचे प्रकार

आर्थिक प्रवृत्तीचे मुख्य तीन प्रकार आहे : (1) धंदा (2) व्यवसाय (3) नोकरी

### 1.5 धंदा (Business)

**1.5.1 अर्थ आणि व्याख्या :** धंदा हा इग्रंजी ''Busy'' या इंग्रजी शब्दा वरून घेतलेला आहे. ज्याचा अर्थ ''व्यस्त'' राहणे अथवा सतत प्रवृत्तीमय असणे होय. धंदा, नफा आणि संपत्ती मिळविण्याच्या उद्देशाने करण्यात येतो. धंद्याची संकल्पना नफ्याच्या उद्देशाबरोबर जोडलेली आहे. धंद्यात काहीवेळेस तोटा झाला तरी देखील ती आर्थिक प्रवृत्ती समजली जाते. धंद्याची खरी आणि संक्षिप्त व्याख्या खालीलप्रमाणे आहे.

''धंदा म्हणजे नफ्याच्या हेतूने करण्यात येणारी कोणतीही कायदेशीर आर्थिक प्रवृत्ती.''

**1.5.2 लक्षणे :**

**(1) नफ्याचा हेतू :** धंद्याचा मुख्य हेतू आर्थिक प्रवृत्तीद्वारे नफा मिळविण्याचा असतो. धंद्यात नफा मिळणे बंद झाले तर धंदा बंद होण्याची शक्यता असते. धंद्याचे अस्तित्व टिकवून ठेवण्यासाठी नफा अनिवार्य आहे. वस्तूच्या पडतर (मूळ) किंमतीपेक्षा जास्त किंमतीने वस्तू विकली तर नफा झाला असे म्हटले जाते. धंद्याच्या कार्यक्षमतेला देखील नफ्याच्या मापदंडाने मोजण्यात येते. नफा ही धंद्याची मापपट्टी आहे.

**(2) वस्तू आणि सेवांचा विनिमय :** वस्तू आणि सेवांचे उत्पादन करून किंवा खरेदी करून त्यांची विक्री करण्यात येते म्हणजे वस्तू आणि सेवांचा विनिमय होतो. धंद्यात वस्तू आणि सेवाच्या विनिमयची साखळी असतो. वस्तूमध्ये भौतिक स्वरुपाची वस्तू आणि सेवामध्ये अदृश्य किंवा अभौतिक सेवांचा विनिमय होतो. उदा. इलेक्ट्रीक साधनांचे उत्पादन करणारी कंपनी भौतिक वस्तूचा विनिमय करते. तर विद्युतसेवा पुरविणारी कंपनी सेवेचा विनिमय करते.

**( 3 ) धोके आणि अनिश्चितता :** धंद्यात धोके आणि मोबदल्याची अनिश्चितता असते. आग, अपघात, कर्मचाऱ्यांचा संप, दंगल, लुटपाट, चोरी, ग्राहकाच्या आवडी निवडीतील बदल, मागणीतील घट, लोकांची जीवनशैली, आवड व फॅशन मधील बदल, स्पर्धा, तंत्रज्ञानातील बदल या सारखे मानवनिर्मित अनिश्चितता आहेत. सुनामी, भुकंप, वादळ नैसर्गिक धोके आहेत. हे धोके धंद्याच्या उत्पन्नावर विपरीत परीणाम करतात. विविध प्रकारच्या धोक्यांमुळे धंद्यामध्ये मिळणारा मोबदला अनिश्चित असतो. धंद्याचा उद्देश नफा असतांना देखील धोके आणि अनिश्चिततेे मुळे नुकसान होते.

**( 4 ) तुष्टीगुणांचे सर्जन ( उपयोगितेचे सर्जन ) :** वस्तू किंवा सेवेच्या उपयोगाद्वारे उपभोकत्याला सतोष मिळणे म्हणजे उपयोगिता होय. उपयोगितेची निमिती स्वरुप, स्थळ आणि समय या तीन प्रकारे होते. कच्या मालाचे रुपांतर पक्का मालात करून वापरण्यायोग्य बनविणे म्हणजे स्वरुप उपयोगिता, मालाच्या उत्पादनाच्या स्थळापासून उपभोक्त्या पर्यंत पोहचविणे म्हणजेच स्थळ उपयोगिता होय मालाची आवश्यकता नसेल तेव्हा मालाचा संग्रह करणे व आवश्यकता असेल तेव्हा माल ग्राहकांना पुरविणे त्याला समय उपयोगिता असे म्हणतात.

**( 5 ) प्रवृत्तीचे सातत्य :** धंद्यात नियमित आणि सतत व्यवहार होत असतात. धंदा ही सातत्याने चालणारी आर्थिकप्रवृत्ती आहे. व्यापारी नफ्याच्या उद्देशाने खरेदी-विक्रीची प्रवृत्ती सतत करीत असतात. परंतु जर उत्पादक किंवा व्यापारी स्वत:ला राहण्यासाठी घर बनवितो आणि नंतर ते घर विकून नफा मिळवितो तर त्याला धंदा म्हणता येणार नाही. कारण की त्यांच्यासाठी घर खरेदी करणे व विक्री करणे ही नियमित किंवा सतत प्रवृत्ती नाही.

**( 6 ) नाणांची आवश्यकता :** धंद्यासाठी सुरवाती पासून ते शेवट पर्यंत पैशांची गरज असते. फॅक्टरीमध्ये कच्यामालातून तयार पक्का माल तयार करण्यासाठी व व्यापाऱ्यांना माल खरेदी करण्यासाठी पैश्याची गरज असते.

**( 7 ) आर्थिक प्रवृत्ती :** धंदा हा नफा मिळवीण्याच्या हेतूने पैशाच्या स्वरुपात करण्यात येणाऱ्या आर्थीक प्रवृत्तीचा एक भाग होय.

**1.5.3 परिस्थितीचा उद्देश :** धंद्याचा प्रथम उद्देश नफ्याचा असतांना देखील ग्राहकांमध्ये आलेली जागृती, राज्यांची नियंत्रणे आणि बदलत्या परीस्थीती कारणामुळे धंद्याचे एकापेक्षा जास्त उद्देश स्वीकार्य आहेत. धंद्याचे उद्देश (A) आर्थिक आणि (B) सामाजिक अशा दोन भागात विभागता येतील.

**(A) आर्थिक उद्देश :**

**( 1 ) नफ्याचा हेतू :** धंदा ही आर्थिक प्रवृत्ती असल्यामुळे धंद्यात गुंतविलेल्या भांडवलावर योग्य मोबदला मिळाला पाहिजे. हा मोबदला म्हणजेच नफा. धंद्याच्या फक्त अस्तित्वासाठी नाही परंतु धंद्याच्या विकासासाठी धंद्यात नफा मिळणे अनिवार्य आहे. नफा हा धंद्याच्या प्रेरकबळ, कार्यक्षमतेची मापपट्टी आणि धंद्याचा आत्मा आहे. आज महत्तम नफ्याऐवजी योग्य नफ्याची संकल्पना स्वीकारण्यात आली आहे. योग्य नफा मिळविल्यामुळे धंदेकीय एकम समाजात स्विकृती मिळविल्याने ते स्पर्धेत देखील टिकु शकते.

**( 2 ) महत्तम संपत्तीच्या निर्मितीचा हेतू :** नफ्याचा हेतू धंद्याच्या वार्षिक उत्पन्नाशी संबंधीत असणारी संक्षिप्त कालावधीची संकल्पना आहे. महत्तम संपत्तीच्या निर्मितीचा हेतू दिर्घकाळाचा असतो. दिर्घकाळात धंद्याच्या संपत्तीत वाढ होईल अशा योजना स्वीकारण्यात येतात. मंदीसारख्या परिस्थितीत नफा कमाविण्याचा हेतू न ठेवता धंद्याची संपत्ती टिकवून ठेवणे असा होय. महत्तम संपत्तीच्या निर्मितीचा हेतू धंद्याच्या मालकाच्या आर्थिक लाभाशी जोडलेला असतो.

**( 3 ) अन्य आर्थिक हेतू :** अन्य आर्थिक हेतूमध्ये धंद्याची आर्थिक प्रगती आणि विकास करणे, बाजाराचा विस्तार करणे, उपलब्ध साधनांचा जास्तीत जास्त उपयोग करणे, अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करणे वगैरे आहेत.

**(B) सामाजिक हेतू :** समाजाचा लाभ होईल त्यासाठी धंदा कित्येक सामाजिक हेतूना प्राधान्य देतो. समाजाशिवाय धंद्याचे अस्तित्व शक्य नाही. समाज आहे म्हणून धंदा आहे. म्हणून धंद्याच्या नफा व्यतिरिक्त हेतूंचे महत्त्व स्वीकारले आहे. धंद्याचे सामाजिक हेतू खालीलप्रमाणे आहे.

**(1) सामाजिक जबाबदारीचा हेतू :** ग्राहकांमध्ये आलेली जागृती राज्याची नियंत्रणे, ग्राहकांचे शिक्षण, ग्राहकांच्या संघटना वगैरेच्या कारणाने धंद्याला समाजातील वेगवेगळ्या गटांच्या हिताविषयी जागृत राहण्याची गरज निर्माण झालेली आहे. समाजातील वेगवेगळे गट, किंवा वेगवेगळे वर्ग जसे की मालक, कर्मचारी, ग्राहक, घेणेकरी, सरकार वगैरे धंदेकीय एकमाशी जोडलेले असतात. आणि प्रत्येक गटाचे धंद्याशी असणारे हित वेगवेगळे असते. या वेगवेगळ्या गटांच्या हिताची काळजी धंदाकीय एकमाने राखणे गरजेचे आहे. पर्यावरणाची जपवणूक, कर्मचारी कल्याण कायदा, कारखाना कायदा, ग्राहक सुरक्षा कायदा वगैरेचे धंद्यासाठी पालन करावे लागते.

**(2) रोजगारीची संधी पूर्ण करण्याचा हेतू :** बेकारीचे प्रमाण दिवसेदिवस वाढत जात आहे. रोजगारीच्या नवीन संधी निर्माण होतील या हेतूने कित्येक धंदेकीय एकमाची स्थापना करण्यात येते. उदा. खादीग्राम उद्योग पंचद्वारे रोजगारीच्या संधी वाढतील अशा उद्योगांची पंसती करण्यात येते. बेरोजगारांना रोजगारीच्या संधी मिळतील त्या हेतूने मागासलेल्या विस्तार धंदेकीय एकमांची स्थापना करण्यासाठी पसंत करण्यात येतात.

**(3) गुणवत्ता असणारी वस्तू आणि सेवा पुरविण्याचा हेतू :** समाजातील लोकांना त्यांच्या गरजा पूर्ण होतील आणि सरळतेने वस्तू उपलब्ध होतील याप्रकारे गुणवत्ता युक्त वस्तू आणि सेवा पुरविण्याचा हेतू असतो. स्वयंपाकात उपयोगी मसाले, थंडपेय (शीतपेय) आणि खाद्य पदार्थांचे उत्पादन करणाऱ्या एकमांनी उच्च गुणवत्तेच्या धोरणांचे पालन केले पाहीजे. सामाजिक हेतू असणारे धंदेकीय एकम योग्य भावात वस्तू आणि सेवा पुरविण्यासाठी प्रतिबद्ध असतात. उदा. वस्तूच्या विक्रीनंतर ग्राहकाच्या घरापर्यंत वस्तू पोहचविणे आणि वस्तूची गोठवणुक करणे वगैरै.

**(4) योग्य व्यापारी रीतीरिवाज अवलंबण्याचा हेतू :** वस्तूंचा काळाबजार, वस्तूंचा संग्रह करणे, चुकीच्या जाहीराती वगैरे धंद्यासाठी अयोग्य समजण्यात येतात. आवश्यक असणाऱ्या वस्तूची कृत्रिम दुर्मिळता निर्माण करू नये. ग्राहक आणि समाजाच्या कल्याणासाठी धंदेकीय एकमाने योग्य व्यापारी पद्धतिचा अमल केला पाहिजे.

**(5) अन्य हेतू :** अन्य सामाजिक हेतूमध्ये : (I) धंदेकीय एकमाने समाजात स्वत:ची वेगळी ओळख निर्माण करणे. (II) उत्पादनाच्या क्षेत्रात नवीननवीन संशोधनाचा उपयोग करणे. (III) राष्ट्राच्या आर्थिक विकासात मदतरुप होण्यासाठी सरकारला सहकार देणे. (IV) कर्मचाऱ्यांना विविधरित्या प्रोत्साहन पुरविणे आणि त्याच्या कल्याणासाठी विविध योजना राबविणे.

**1.5.4 धंदाकीय जोखीम :** धंद्यामध्ये नफ्याची अनिश्चितता किवा नुकसान होण्याचा जोखीम असतो. भविष्यातील अनिश्चित घटना नफ्यावर परिमाम करतात म्हणून असे म्हटले जाते की **धंदेकीय धोक्यांसमोरील मोबदला म्हणजेच नफा.** धंद्यात दोन प्रकारचे धोके असतात. (A) नैसर्गिक जोखीम (B) मानवनिर्मित जोखीम.

**(A) नैसर्गिक जोखीम :** नैसर्गिक जोखीम जसे की भुकंप, पुर, वादळ वगैरे, धंद्याच्या विकासाला अडचणरुप असतात. धंद्याच्या मालमत्तोचा नाश करतात किंवा नुकसान पोहचवितात. नैसर्गिक जोखीमीवर धंद्याचे नियंत्रण राहत नसते.

**(B) मानवनिर्मित जोखीम :** मानवनिर्मित जोखीममुळे धंद्याचा विकासाचा ऱ्हास आणि धंद्याला नुकसान सहन करावे लागते. जसे की कर्मचाऱ्यांचा संप, टेक्नोलॉजीमधील बदल, ग्राहकांची रूची आणि मागणीतील बदल, राजकीय अस्थिरता, बाजरातील स्पर्धेचे जोखीम.

**1.5.5 धंदाकीय जोखीमीची कारणे :**

**(1) टेक्नोलॉजीमधील बदल :** टेक्नोलॉजीत झालेल्या नवीन संशोधनामुळे उत्पादन पद्धतीत बदल करावा लागतो. उच्चतम गुणवत्ता असणारे उत्पादन करण्यासाठी नवीन टेक्नोलॉजी उपयोगात घ्यावी लागते. जुन्या यंत्राच्या जागी नवीन यंत्रे बसवावी लागतात.

**(2) वैकल्पीक वस्तूंचा भय :** तंत्रज्ञानातील बदलामुळे ग्राहक वैकल्पिक वस्तूंकडे वळतात उदा. फाउन्टन पेनच्या ऐवजी बालपेन, तांबे पितळाच्या भांडयाच्या जागी स्टिलची भांडी रेडिओ ऐवजी टेलिव्हिजन.

**(3) स्पर्धा :** स्पर्धेमुळे धंद्यात धोके वाढलेले आहेत. ज्याचा प्रत्यक्ष परिणाम धंद्याच्या प्रत्यक्ष नफ्यावर होतो. धंदेकीय एकमाला बाजारात स्वत:चे स्थान टिकवून ठेवण्यासाठी आणि स्पर्धकांचा सामना करण्यासाठी वस्तूंची किंमत कमी करावी लागते. जाहीरातीचा खर्च करावा लागतो. म्हणून नफा कमी होतो.

**( 4 ) कायदा :** प्रदूषण, ग्राहक, कामगार, उद्योग वगैरेसाठी सरकार कायदे तयार करते. परंतु ते कायदे धंद्यासाठी धोके देखील निर्माण करू शकतात उदा. लघुतम वेतन कायदा आणि कारखाना कायदा धंदेकीय एकमाना कित्येक निर्णय घेतांना अटकवितात.

**( 5 ) मागणीची अनिश्चितता :** वस्तूच्या मागणीतील अनिश्चितता धंद्यासाठी धोके निर्माण करते. ग्राहकांची आवड, रूची, वस्तूच्या किंमतीतील बदल, फुगाव्याचा दर वगैरे मागणीला अनिश्चीत बनवतात. ज्याचा परिणाम धंद्याच्या नफ्यावर होतो.

**( 6 ) भौतीक जोखीम :** धंद्यात उपयोगात घेण्यात येणाऱ्या मालमत्तांना होणारे नुकसान भौतीक धोके निर्माण करते. यंत्रे आणि साधने काम करण्याचे बंद होतात. वाहतुक करतांना मालाचे नुकसान होते तेव्हा भौतीक धोके निर्माण होतात.

### 1.6 व्यवसाय (Profession)

**1.6.1 अर्थ :** व्यक्ति स्वत:ची आवड, ज्ञान, प्रशिक्षण आणि व्यावसायिक शिक्षण द्वारे सेवा पुरवुन मोबदल्यात फी मिळवितात त्याला व्यवसाय असे म्हणतात. व्यवसाय करणाऱ्या व्यक्तिला ज्या-त्या व्यावसायिक संघटनेचे सभ्यपद मिळवावे लागते. संघटने द्वारा स्थापित आचार संहीतेचे पालन करावे लागते. उदा. चार्टर्ड अकाउन्टंट म्हणून सेवा देणाऱ्या सी.ए. व्यावसायिक लायकात, मिळवावी लागते. आणि इन्स्टिटयुट ऑफ चार्टर्ड अकाउन्टंट ऑफ इंडीयाचे सभ्यपद मिळवावे लागते. डॉक्टर, वकील, सॉलीसीटर, चार्टर्ड ॲकाउन्टंट वगैरे व्यावसायीक व्यक्ति समजल्या जातात. व्यावसायिक ज्ञानाचा उपयोग नोकरी साठी देखील होऊ शकतो. जसेकी डॉक्टर एखाद्या हॉस्पीटल मध्ये पगाराच्या बदल्यात कार्य स्वीकारत असेल तर तो नोकरी करतो असे म्हटले जाते.

**1.6.2 लक्षणे :**

(1) व्यावसायिक व्यक्तिला व्यवसायासाठी विशिष्ट ज्ञान, चातुर्य आणि व्यावसायीक शिक्षण घ्यावे लागते.

(2) सेवेच्या बदल्यात फी मिळवितात. त्यांच्या फी चे धोरण त्याची आवड, ज्ञान, अनुभवाच्या आधारे वेग-वेगळे असते.

(3) व्यावसायिक व्यक्तिचा प्राथमिक उद्देश सेवेचा असतो.

(4) उत्पन्न मिळविण्यासाठीची स्वतंत्र प्रवृत्ती आहे.

(5) व्यावसायिक प्रवृत्तीचा उत्पादनासाठी संबंध नाही. परंतु विविध व्यक्तिच्या व्यक्तिगत आणि धंदेकीय गरजा संतोषविण्यात येतात. उदा. वकील फी घेऊन असीलासाठी कोर्टात केस लढतो.

(6) ज्या त्या व्यावसायिक संघटनानी नक्की केलेल्या आचारसंहिताचे पालन करणे आवश्यक आहे.

(7) व्यवसायात मिळणारा नाणेकीय मोबदला अनिश्चित असतो.

### 1.7 नोकरी (Employment)

**1.7.1 अर्थ :** रोजगार म्हणजे नोकरी निश्चित पगाराच्या मोबदल्यात अन्य पक्षकारांशी करारानुसार, सोपविलेले कार्य करण्याची आर्थिक प्रवृत्ती. उदा. शाळेतील शिक्षण कार्य करणारे शिक्षक तसेच कर्मचारी.

**1.7.2 नोकरीची लक्षणे :**

(1) नोकरीत शारीरिक किंवा बौद्धीक श्रमाच्या बदल्यात निश्चीत वेळेत निश्चित पगार चुकविण्यात येतो.

(2) नोकरीत निश्चित पगाराव्यतिरिक्त अन्य लाभ मिळतो. उदा. डॉक्टरी भथ्था, पेन्शन.

(3) नोकरीत करारानुसार नोकरी देणाऱ्याच्या ताब्यात राहून सोपविलेले कार्य करावे लागते.

(4) नोकरीत नोकरी मिळविणाचा व्यक्तिची पदवी, कार्याचावेळ निवृत्ती, निवृत्तीनंतरचे लाभ वगैरे निश्चित असतात.

(5) नोकरी ही परावलंबी प्रवृत्ती आहे.

(6) नोकरीत मालक आणि कर्मचारी दोघानांही करारानुसार नियमांचे पालन करणे बंधनकारक आहे.

(7) नोकरी मिळविणाऱ्याला कोणतीही भांडवल गुंतवणूक करावी लागत नाही.

### 1.7.3 धंदा, व्यवसाय आणि नोकरी यांच्यातील तुलना :

| अनु. नंबर | मुद्दा | धंदा | व्यवसाय | नोकरी |
|---|---|---|---|---|
| (1) | कार्याचे स्वरुप | नाण्याच्या मोबदल्यात ग्राहकानां वस्तू किंवा सेवा पुरविण्यात येतात. | फीच्या बदल्यात व्यक्तिगत आणि धंदाकीय रित्या विवेकबुद्धीने सेवा देण्यात येते. | करार आणि नियमानुसार कार्य करावयाचे असते. |
| (2) | पदवी | कोणतीही शैक्षणिक पदवी अनिवार्य नाही. | शैक्षणिक पदवी प्रशिक्षण आणि विशिष्ट ज्ञानाची गरज असते. | कार्याच्या स्वरूपानुसार पदवी गरजेची आहे. |
| (3) | मोबदला | नफा मिळतो. | फी मिळते. | पगार अथवा मोबदला मिळतो. |
| (4) | भांडवल | धंद्याचे स्वरूप आणि प्रकारानुसार भांडवलाची गरज असते. | स्थापनेच्या वेळेत मर्यादित भांडवलाची गरज असते. | कोणत्याही प्रकारच्या भांडवलाची गरज नसते. |
| (5) | धोके | धंद्यात नफ्याची अनिश्चितता आणि नुकसानीचा धोका असतो. | निश्चित रकमेची फी न मिळण्याचा धोका असतो. | नियमित आणि निश्चित पगार मिळत असल्यामुळे धोक्याचे प्रमाण कमी असते. |
| (6) | आचारसंहिता | कायदेकीय नियमांचे पालन करावे लागते. | ज्या त्या संघटने द्वारे नक्की केलेल्या आचारसंहीतेचे नियमाचे पालन करावे लागते. | कराराद्वारे नक्की केलेले नियमांचे पालन करावे लागते. |
| (7) | मालकी हक्काची अदलाबदल | मालकी हक्काची अदलाबदल शक्य आहे. | मालकी हक्काची अदलाबदल शक्य नाही. | मालकी हक्क नसतो. |

## 1.8 धंदाकीय प्रवृत्तीचे वर्गीकरण

धंदाकीय प्रवृत्तीचे वर्गीकरण तीन प्रकारे करण्यात येते : (1) व्यापार (2) वाणिज्य (3) उद्योग

## 1.9 व्यापार (Trade)

**1.9.1 अर्थ :** नफ्याच्या उदेशाने दोन व्यक्तिंमधील वस्तू किंवा सेवेच्या बदल्यात वस्तू किंवा सेवा अथवा नाण्याच्या बदल्यात वस्तू किंवा सेवेंचा विनिमय म्हणजे व्यापार. उदा. तुम्ही दुकानदाराकडून पुस्तक खरीदले तर पुस्तकाच्या खरेदी समोर पैसे चुकवितात. म्हणजेच वस्तूच्या बदल्यात. पैश्यांचा विनिमय समजला जाईल. तुम्ही बसची टीकीट खरेदीकरून प्रवास करतात म्हणजेच पैश्याच्या बदल्यात सेवेचा विनीमय झाला असे समजले जाईल.

**1.9.2 लक्षणे :**

(1) व्यापार ही एक आर्थिक प्रवृत्ती आहे.

(2) व्यापारात दोन पक्षकार असतात-खरेदीदार-विक्रेता

(3) व्यापारासाठी विनिमय अनिवार्य आहे.

(4) व्यापारात वस्तू आणि सेवेच्या मालीकीची अदलाबदल होते.

(5) वस्तूच्या बदल्यात पैसे किंवा वस्तूची चुकवणुक होते.

(6) व्यापार ही सतत चालणारी प्रवृत्ती आहे.

(7) वस्तू किंवा सेवेचे मूल्य नाण्यात नक्की होते.

(8) व्यापार ही कायद्याने मान्य प्रवृत्ती आहे.

**1.9.3 व्यापाराचे प्रकार :**

व्यापाराचे प्रकार दोन : (1) आंतरिक व्यापार (2) आंतरराष्ट्रीय व्यापार

**( 1 ) आंतरीक व्यापार :** देशाच्या सीमेच्या आत, वेगवेगळ्या विस्तारात जो व्यापार होतो त्याला आंतरिक व्यापार असे म्हणतात. उदा. अमदाबादचा व्यापारी काश्मीर हून सफरचंदच्या पेट्या खरीदतो किंवा नागपुरचा व्यापारी राजकोटला नारंगी पाठवितो म्हणजेच आंतरीक व्यापार झाला असे म्हटले जाईल.

वितरणाच्या दृष्टीने आंतरिक व्यापाराचे दोन भाग पाडता येतील : (1) घाऊक व्यापार आणि (2) किरकोळ व्यापार. घाऊक व्यापारी मोठ्या प्रमाणात उत्पादकांकडून मालाची खरेदी करून किरकोळ व्यापाऱ्यांना त्याच्या गरजेनुसार मालाचे वितरण करतो. घाऊक व्यापारी मालाचा उत्पादक आणि किरकोळ व्यापारी यांच्यातील साकळी आहे.

किरकोळ व्यापारात धाऊक व्यापाऱ्यांपासून कमी माल खरेदी करतो आणि ग्राहकांना त्याच्या गरजेनुसार माल पुरवितो.

**( 2 ) आंतरराष्ट्रीय व्यापार :** कोणत्याही दोन देशामध्ये होणाऱ्या व्यापाराला आंतरराष्ट्रीय व्यापार असे म्हणतात. आंतरराष्ट्रीय व्यापार देशाच्या सीमेच्या बाहेर होतो. उदा. जापानची कंपनी भारतातील व्यापाऱ्याला टेलिव्हिजन विकते किंवा भारतातील केसर कैरी यु.एस.ए. मध्ये पाठविण्यात येते.

आंतराष्ट्रीय व्यापारात (1) आयात व्यापार (2) निर्यात व्यापार (3) पुन:निर्यात व्यापाराचा समावेश होतो.

**1.10 वाणिज्य (Commerce)**

**1.10.1 अर्थ :** वाणिज्य म्हणजे व्यापार आणि त्याच्या सहाय्यक सेवा या सेवामध्ये बँकिंग, विमा, वाहन व्यवहार, संदेश व्यवहार, कोठार किंवा गोदाम आणि अभिकर्ता (दलाल) यांचा समावेश होतो. व्यापाऱ्याच्या या सहाय्यक सेवांमुळे व्यापारच्या दृष्टीने विश्व एक बाजार बनले आहे.

**1.10.2 लक्षणे :**

(1) वाणिज्य शब्दात व्यापाराचा समावेश होतो.

(2) वाणिज्य आर्थिक प्रवृत्ती आहे.

(3) व्यापाराला मददरूप होतील अशा सहाय्यक सेवांचा समावेश होतो. उदा. बैंकींग, विमा, वाहन व्यवहार वगैरे.

(4) वस्तूच्या काळ आणि स्थळ उपयोगीतेत वाढ होते.

(5) सहाय्यक सेवामध्ये सातत्यता असते.

(6) व्यापाराच्या सहाय्यक सेवा योग्य किंमतीला मिळाव्यात तर ग्राहकांना व्याजवी किंमतीत वस्तू पुरविणे शक्य होते.

**1.10.3 व्यापार आणि वाणिज्य यातील फरक :**

| अनुक्रम नंबर | फरकाचा मुद्दा | व्यापार | वाणिज्य |
|---|---|---|---|
| 1. | अर्थ | व्यापारात पैशाच्या बदल्यात वस्तू किवा सेवांचा विनिमय होत असतो. | वाणिज्यमध्ये व्यापार उपरांत व्यापाराच्या सहाय्यक सेवांचा समावेश होत असतो. |
| 2. | कार्यक्षेत्र | व्यापाराचे कार्यक्षेत्र मर्यादीत आहे. | वाणिज्याचे कार्यक्षेत्र विशाल आहे. ज्यात व्यापाराचा समावेश होतो. |
| 3. | पक्षकार | व्यापारात दोन्ही पक्षकार एकमे-कांशी परिचित असतात. आणि ऐकमेकांच्या जवळ असतात. | वाणिज्यात दोन्ही पक्षकार ऐकमेकापासून दूर आणि अपरिचित असून सुद्धां सहाय्यक सेवा मिळवू शकतात. |

## 1.11 उद्योग (Industry)

**1.11.1 अर्थ :** मानवी गरजा पूर्ण करण्यासाठी कच्च्यामालावर विवीध प्रक्रीयाद्वारे उत्पादन करून तुष्टीगुणात वाढ करण्याची प्रक्रिया म्हणजे उद्योग उदा. लाकडामधून फर्निचरचे उत्पादन, कापसापासून कापडाचे उत्पादन.

उद्योगाच्या लक्षणात उत्पादन, आर्थिक प्रवृत्ती, कच्चामालाच्या स्वरूपात बदल, विविध वस्तूचे उत्पादन, तुष्टिगुणात वाढ, या व्यतिरीक्त मानवश्रम, नैसर्गीक संपत्ती, आणि यांत्रीक साधनांचा उपयोग याचा देखील समावेश होतो.

**1.11.2 वर्गीकरण :**

(1) प्राथमिक उद्योग (2) गौण उद्योग आणि (3) आनुषंगिक उद्योग.

**( 1 ) प्राथमिक उद्योग (Primary Industry) :** हे उद्योग मुलभुत उद्योग आहेत. समुद्र, जमीन, हवेशी सबंधित आहेत. निसर्गावर अवलंबुन राहुन उत्पादन प्रवृत्ती होते. जमिनीवर शेती, पशुपालन, बदक पालन, कुक्कुट पालन, समुद्राशी सबंधित मत्स्य पालन वगैरे.

**( 2 ) गौण उद्योग (Secondary Industry) :** विविध प्रकारची यंत्रे आणि तंत्रज्ञानाची मदत घेण्यात येते. नैसर्गिक साधन-सपत्तीला वापरण्या योग्य बनवुन ग्राहकापर्यंत पोहचविण्या दरम्यान ज्या प्रक्रिया केल्या जातात त्याना गौण उद्योग म्हणतात. उदा. खतांचा उद्योग, रंग आणि रसायण उद्योग, स्टील उद्योग वगैरे.

**( 3 ) अनुषंगिक उद्योग (Tertiary Industry) :** हे उद्योग विशाल क्षेत्र धारण करतात. या प्रकारचे उद्योग मुलभुत आणि गौण उद्योगाना सहाय्य करण्या व्यतिरीक्त ग्राहकाच्या अगदी जवळपास चालविले जातात. मुलभुत आणि गौण उद्योगानी केलेल्या उत्पादनावर प्रक्रिया करून सदर उत्पादन जास्त वापरण्या योग्य बनवितात. उदा. डेरी उद्योग, शीतपेयाचा उद्योग, बेकरी उद्योग, आनुषंगिक उद्योगात, वाहनव्यवहार, बँक, विमा, कोठार, दलाल, माहीतीसंचार वगैरे सेवाचा देखील समावेश होतो.

शेतीमधून धान्य उदा. गव्हाचे उत्पादन करण्यात येत असेल तर प्राथमिक उद्योग, गव्हामधून पीट (मैदा) तयार करण्याचा उद्योग गौण उद्योग, मैदामधून ब्रेड, पाव, बिस्कीटचे उत्पादन करते म्हणजे अनुषंगिक उद्योग.

## या प्रकरणात तुम्ही काय शिकलात ?

**आर्थिक प्रवृत्ती :** पैश्याचा मोबदला किंवा आर्थिक उत्पन्नाच्या हेतूने करण्यात येणारी प्रवृत्ती.

**बिनआर्थिक प्रवृत्ती :** पैश्यांचा मोबदला किंवा आर्थिक उत्पन्नाच्या हेतूशिवाय करण्यात येणारी प्रवृत्ती.

**आर्थिक प्रवृत्ती आणि बिनआर्थिक प्रवृत्ती मधील फरक :** (1) उद्देश (2) अपेक्षा (3) प्रकार (4) धोके आणि अनिश्चितता.

**आर्थिक प्रवृत्तीचे प्रकार :** (1) धंदा (2) व्यावसाय (3) नोकरी

**धंदा :** नफ्याच्या उद्देशाने करण्यात येणारी कोणतीही कायदेशीर आर्थिक प्रवृत्ती.

**लक्षणे :** (1) नफ्याचा हेतू (2) वस्तू आणि सेवेंचा विनीमय (3) धोके आणि अनिश्चितता (4) तुष्टीगुणाची निर्मिती (5) प्रश्नातील सातत्य (6) पैश्याची गरज (7) आर्थिक प्रवृत्ती

**उद्देश :** (A) आर्थिक उद्देश आणि (B) सामाजिक उद्देश

**(A) आर्थिक उद्देश :** (1) नफ्याचा हेतू (2) महत्तम सपत्तीच्या निर्मितीचा उद्देश (3) अन्य आर्थिक उद्देश

**(B) सामाजिक उद्देश :** (1) सामाजिक जबाबदारीचा हेतू (2) रोजगारीच्या संधी पुरविणे (3) गुणवत्ता असणारी वस्तू आणि सेवा पुरविणे (4) योग्य व्यापारी रीतीरीवाज आवलंबने (5) अन्य हेतू

**धंदेकीय धोके :** नफ्याची अनिश्चीतता किंवा नुकसान होण्याचा धोका.

**धोक्याचे प्रकार दोन :** (A) नैसर्गीक धोके (B) मानवनिर्मित धोके

**धंदाकीय जोखमीची कारणे :** (1) तंत्रज्ञानातील बदल (2) वैकल्पिक उत्पादने (3) स्पर्धा (4) कायदा (5) मागणीची अनिश्चितता (6) भौतीक धोके

**व्यवसाय :** व्यक्ति त्याचे विशीष्ट कौशल्य, ज्ञान, प्रशिक्षण, आणि व्यावसायिक शिक्षणाद्वारे सेवा देवुन फी मिळवितो त्याला व्यवसाय असे म्हणतात. उदा. डॉक्टर, चार्टर्ड अकाउन्टंट.

**लक्षणे :** (1) व्यवसायाचे शिक्षण (2) प्रशिक्षण, (3) सेवेच्या मोबदल्यात फी (5) प्राथमिक उद्देश, सेवेचा, (6) व्यवसायिक संघटनेचे सभ्यपद, (7) आचारसंहीतेचे पालन

**नोकरी :** निश्चित पगाराच्या मोबदल्यात अन्य व्यक्ति बरोबर झालेल्या करारानुसार सोपविलेले कार्य करण्याची आर्थिक प्रवृत्ती शारिरिक किंवा बौद्धिक श्रमाच्या मोबदल्यात निश्चित वेळेत निश्चित पगार मिळतो.

**धंदा, व्यवसाय आणि नोकरी याच्यांतील तुलना :**

(1) कार्याचे स्वरुप (2) पदवी (3) मोबदला (4) भांडवल (5) धोके (6) आचारसंहीता (7) मालकी हक्कातील बदल धंदेकीय प्रवृत्तींचे वर्गीकरण

**धंदेकीय प्रवृत्तींचे वर्गीकरण :** (1) व्यापार (2) वाणिज्य आणि (3) उद्योग.

**व्यापार : पैशांच्या मोबदल्यात वस्तू किंवा सेवेचा विनिमय म्हणजेच व्यापार**

**लक्षणे :** (1) आर्थिक प्रवृत्ती, (2) दोन पक्षकार, (3) विनिमय, (4) मालकीतील बदल, (5) मोबदला, (6) सतत प्रवृत्ती, (7) पैशात मूल्य, (8) कायदेशीर प्रवृत्ती

**व्यापाराचे प्रकार :** (1) आंतरिक व्यापर आणि (2) आंतरराष्ट्रीय व्यापार. आंतरिक व्यापार देशाच्या सरहद्दीच्या आत होतो. दोन देशामध्ये होणारा व्यापार म्हणजे आंतरराष्ट्रीय व्यापार.

**वाणिज्य :** व्यापार आणि व्यापाराच्या सहाय्यक सेवा म्हणजेच वाणिज्य. सहाय्यक सेवांमध्ये बँकिंग, विमा, वाहन व्यवहार, कोठार आणि दलालाची सेवा यांचा समावेश होतो. वाणिज्यात व्यापाराचा समावेश होतो.

**व्यापार आणि वाणिज्यामधील फरक :** (1) अर्थ (2) कार्यक्षेत्र (3) पक्षकार.

**उद्योग :** उद्योग म्हणजे उत्पादन, कच्चा मालांवर विविध प्रक्रियांद्वारे तुष्टिगुणात वाढ करणे ज्यामुळे मानवी गरजा पूर्ण करता येतात.

**उद्योगाचे वर्गीकरण :** (1) प्राथमिक (2) गौण आणि (3) अनुषंगिक

**प्राथमिक उद्योग :** मूलभूत उद्योग, समुद्र जमीन आणि हवेशी संबंधीत आहेत.

**गौण उद्योग :** यंत्र आणि तंत्रज्ञानाच्या मदतीने नैसर्गिक साधनसंपत्तीला वापरण्या योग्य बनून ग्राहकांपर्यंत पोहचविण्याची प्रक्रिया.

**अनुषंगिक उद्योग :** प्राथमिक आणि गौण उद्योगाद्वारे जे उत्पादन मिळते. त्यावर विविध प्रक्रियाद्वारे ग्राहकांसाठी जास्त वापरण्यायोग्य बनविते.

**स्वाध्याय**

**1. खालील प्रश्नांची उत्तरे योग्य विकल्प पसंत करुन लिहा :**

(1) आर्थिक प्रवृत्तीचा उद्देश कोणता असतो ?

(A) सेवा (B) नाणेकीय मोबदला (C) प्रेम (D) लागणी

(2) धंद्याचे अस्तित्व चालु ठेवण्यासाठी काय अनिवार्य आहे ?

(A) बिनआर्थिक प्रवृत्ती (B) देशसेवा (C) नफा (D) पुन:निर्यात

(3) धंद्याच्या कार्यक्षमतेचा मापदंड कोणता आहे ?

(A) नफा (B) संचालन (C) उत्पादन (D) विक्री

(4) कच्च्या मालामधून पक्कया मालाचे उत्पादन झाले म्हणजे कोणत्या तुष्टीगुणाची निर्मिती होते ?

(A) स्थळ (B) काल (C) आर्थिक (D) स्वरुप

(5) धंद्याचा महत्तम सपत्तिच्या निर्मितीचा हेतू कोणाच्या आर्थिक लाभा बरोबर जोडलेला आहे ?

(A) संचालक (B) कर्मचारी (C) मालक (D) ग्राहक

(6) नोकरीच्या मोबदल्यात काय मिळते ?

(A) पगार (B) फी (C) नफा (D) भांडवल

(7) व्यापार ही कोणती प्रवृत्ती आहे ?

(A) आर्थिक (B) बिनआर्थिक (C) धार्मिक (D) सामाजिक

(8) नैसर्गिक सपत्तीच्या तुष्टीगुणात वाढ करून उत्पादन करणे म्हणजे काय ?

(A) व्यापार (B) सहाय्यक सेवा (C) वाणिज्य (D) उद्योग

(9) शेती, पशुपालन, मत्स्य वगैरे उद्योग कोणत्या प्रकारचे आहेत ?

(A) प्राथमिक उद्योग (B) गौण उद्योग (C) अनुषांगिक उद्योग (D) भांडवल प्रधान

(10) सरकारी कर्मचारी त्यांच्या श्रमाच्या मोबदल्यात पगार मिळवतात तिला कोणत्या प्रकारची आर्थिक प्रवृत्ती म्हणता येईल ?

(A) धंदा (B) व्यवसाय (C) नोकरी (D) वाणिज्य

**उत्तरे :** (1) (B) (2) (C) (3) (A) (4) (D) (5) (C) (6) (A) (7) (A) (8) (D) (9) (A) (10) (C)

**2. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे द्या :**

(1) आर्थिक प्रवृत्ती म्हणजे काय ?

(2) मालाला उत्पादन स्थळापासून उपभोक्त्या पर्यंत पोहोचविण्यात येतो त्यात कोणत्या तुष्टीगुणाची निर्मिती झाली असे म्हणता येईल ?

(3) व्यवसाय म्हणजे काय ?

(4) नोकरी म्हणजे काय ?

(5) व्यवसायिक व्यक्तिला काय प्राप्त करावे लागते ?

(6) व्यापार म्हणजे काय ?

(7) प्राथमिक उद्योग कोणाशी संबंधित असतात ?

(8) प्राथमिक उद्योग आणि गौण उद्योगाना कोणते उद्योग मदतरुप बनतात ?

**3. खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे द्या :**

(1) धंद्याला आर्थिक प्रवृत्ती कश्या प्रकारे म्हणता येईल ?

(2) नोकरीचे कोणतेही दोन लक्षणे वर्णवा.

(3) धंद्याच्या सामाजिक जबाबदारीचा उद्देश म्हणजे काय ?

**4. खालील प्रश्नांची मुद्देसूद उत्तरे द्या :**

(1) आर्थिक आणि बिनआर्थिक प्रवृत्ती म्हणजे काय? उदाहरणाद्वारे समजवा.

(2) व्यवसायाचा अर्थ समजावून त्याची लक्षणे समजवा.

(3) व्यापार आणि वाणिज्याचा फरक स्पष्ट करा.

**5. खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे द्या :**

(1) धंदा म्हणजे काय ? धंद्याचे लक्षणे सांगा

(2) धंद्याचा सामाजिक हेतू समजवा.

(3) ''समाजशिवाय धंद्याचे अस्तित्व शक्य नाही.'' - धंद्याच्या सामाजिक उद्देशाच्या संदर्भात विधान समजवा.

(4) धंदेकीय धोके म्हणजे काय ? धंदाकीय धोके निर्माण होण्याची कारणे वर्णवा.

(5) धंदा, व्यवसाय आणि नोकरी यातील फरक समजवा.

(6) उद्योगाचा अर्थ देऊन, त्याचे प्रकार वर्णवा.

**पारिभाषिक शब्द**

| | | |
|---|---|---|
| आर्थिक प्रवृत्ती | : | Economic Activity |
| बिनआर्थिक प्रवृत्ती | : | Non-Economic Activity |
| धंदा | : | Business |
| व्यावसाय | : | Profession |
| नोकरी | : | Employment |
| व्यापार | : | Trade |
| आंतरिक व्यापार | : | Internal Trade |
| आंतरराष्ट्रीय व्यापार | : | International Trade |
| वाणिज्य | : | Commerce |
| व्यवस्था (संघटन) | : | Organisation |
| धंद्याचे संचालन | : | Business Administration |
| उद्योग | : | Industry |
| उपयोगिता | : | Utility |

●

# 2 धंदेवाईक सेवा-1 (Business Services-1)

**या प्रकरणात तुम्ही काय शिकणार आहात ?**

2.1 विमा
- 2.1.1 अर्थ
- 2.1.2 सिद्धांत
- 2.1.3 प्रकार
- 2.1.4 खाजगीकरण
- 2.1.5 विमा नियमन आणि विकास संस्थेचा (IRDA) परीचय

2.2 टपाल सेवा
- 2.2.1 सामान्य टपालपत्र
- 2.2.2 रजिस्टर्ड पोस्ट
- 2.2.3 पार्सल सेवा
- 2.2.4 स्पीड पोस्ट / पार्सल एक्सप्रेस
- 2.2.5 अेक्सप्रेस सेवा
- 2.2.6 बचत सेवा
- 2.2.7 आवर्तक ठेवी
- 2.2.8 मुदत बंद ठेवी
- 2.2.9 राष्ट्रीय बचतपत्रे (N. S. C.)
- 2.2.10 किसान विकासपत्रे (K. V. P.)
- 2.2.11 जाहीर भविष्यनिधी (P. P. F.)
- 2.2.12 पोस्टल विमा
- 2.2.13 मासिक आवक योजना (M. I. S.)
- 2.2.14 मनीऑर्डर
- 2.2.15 अन्य अनुसंगीक सेवा

2.3 कोठार
- 2.3.1 अर्थ
- 2.3.2 प्रकार

2.4 वाहनव्यवहार आणि दळणवळण सेवा
- 2.4.1 अर्थ
- 2.4.2 प्रकार

**प्रस्तावना**

अर्थव्यवस्थेत सेवांचे महत्त्व वाढत चालले आहे. सेवांमुळे सुविधा अथवा अनुकुलतेत वाढ होते. बँकींग, विमा, टपाल, कोठार, वाहनव्यावहार अशा सेवा आहेत. या सेवा फक्त वाणिज्याचा भाग म्हणून व्यापाराला मदतरूप बाबत नाहीच परंतु त्यापेक्षा पुढे जाऊन उद्योगाना, शेती आणि सर्वच धंद्यात मदतरुप बनतात. बँकींग, विमा, टपाल, कोठार आणि वाहनव्यावहार सेवांमध्ये इतकी विविधता आली आहे की त्या आर्थिक प्रवृत्तीची सीमा पार करून गेल्या आहेत. आणि त्या कौटंबिक आणि सामजीक सेवा देखील बनल्या आहेत. आधुनिक युगात या सेवाचे क्षेत्रात विविधता आणि विशिष्टता पाहावयाला मिळते. या संस्था परस्पर अवलंबित आहेत.

**2.1 विमा (Insurance)**

**2.1.1 अर्थ :** विमा म्हणजे दोन पक्षकारांमधील असा लेखित करार की ज्याद्वारा विमा घेणारी व्यक्ति प्रिमियमच्या रकमेचा मोबदल्यात विमा उतरविणाऱ्याकडून असे वचन घेते की जर त्याला (विमा घेणाऱ्याला) नक्कि केलेल्या जोखीममुळे आर्थिक नुकसान झाले तर ते नक्की केलेल्या रकमेच्या मर्यादेत आणि नक्की केलेल्या मोजणीप्रमाणे आर्थिक नुकसान भरपाई करून देण्यात येईल.

विम्याच्या लेखित कराराला विमा पोलिसी म्हणून ओळखण्यात येते. विमा जोखीम दुर करत नाही. परंतु जोखमीमुळे निर्माण होणारे आर्थिक नुकसानीची भरपाई करून देतो.

**2.1.2 विम्याचे सिद्धांत :** विम्याची मुळ कल्पना जरी सामाजिक असली तरी विमा हा दोन पक्षकारामधील करार आहे. हा सामान्य करार नाही. विमा हा विशिष्ट प्रकारचा करार असल्याने त्यास सामान्य कराराच्या सिद्धांताच्या व्यतिरिक्त खालील सिद्धांत पण पाळावे लागतात.

**(1) संपूर्ण विश्वासाचा सिद्धांत (Principle of Utmost Good Faith) :** विमा कराराचा हेतू नफा मिळविण्याचा कधीही होऊ शकत नाही. विमा कराराचा हेतू नुकसानीचा आर्थिक मोबदला मिळविण्याचा असतो विम्याची मूलभूत कल्पना सामाजिक आहे. म्हणून विमा करारातील पक्षकारांनी परस्परावर संपूर्ण भरोसा ठेवायचा असतो. करार करतांना दोनही पक्षकारांनी परस्परांना आवश्यक असेल अशी विमा वस्तूविषयी सर्वच माहीती द्यायची असते. विमा घेतांना माहीती जरी विचारली नसेल तरी देखील जर ती करारांवर परिणाम करणारी असेल तर एका पक्षाने दुसऱ्या पक्षाला दयायची असते. कोणत्याही प्रकारे लपवून केलेला विमा करार हा दगा (धोका) म्हटला जाईल.

याला संपूर्ण विश्वासाचा सिद्धांतांचा भंग समजला जाईल. जेव्हापण विम्याच्या पक्षकारांना माहीती मिळेल की संपूर्ण भरोशाचा सिद्धांताचा भंग झाला आहे. तेव्हा विमाकरार रद्द समजण्यात येतो. आणि विमा घेणाऱ्याला त्याने भरलेल्या प्रिमियमची रक्कम परत मिळू शकत नाही. तसेच जर नुकसान झाले तर मोबदला मिळविण्याचा हक्क देखील राहत नाही.

**( 2 ) नुकसान भरपाईचा सिद्धांत (Principle of Indemnity) :** विमेदारास जर नुकसान झाले तर त्याची भरपाई करण्यासाठी विम्याचा करार होत असतो. विमा कराराचे हृदय म्हणजेच नुकसान भरपाईचा सिद्धांत. विमा घेणाऱ्याला नुकसान झाले तर विमा कंपनी त्याचा किती मोबदला चुकवेल ते नक्की करण्यासाठी या सिद्धांताचा उपयोग होतो. विमा उतरविणारा त्याला झालेल्या नुकसानीचा मोबदलाच मिळवू शकतो. तो नफा करू शकत नाही. म्हणजेच नुकसान झाले असेल तर त्यापेक्षा जास्त रक्कम नुकसान भरपाई म्हणून मिळवु शकत नाही. जिवन विम्याच हा सिद्धांत लागु पडत नाही.

विमा घेणाऱ्याने वस्तूच्या किंमती पेक्षा कमी किंमतीचा विमा उतरविला असेल तर तो गर्भितरित्या स्विकारतो की कमी किंमतीच्या प्रमाणात झालेले नुकसान तो भोगेल.

**उदा. : (A)** एका व्यक्तिने त्याच्या ₹ 5,00,000 च्या वस्तूचा ₹ 3 लाखाचा विमा उतरविला असेल तर आणि संपूर्ण वस्तू नाश पावली असेल तर त्याला जास्तीतजास्त ₹ 3 लाखच नुकसान भरपाई मिळेल.

**(B)** एका वस्तूची किंमत ₹ 5,00,000 आहे. परंतु त्याने ₹ 3 लाखाचा विमा घेतला असेल आणि ती वस्तू अंशत: नुकसान झाली असता ₹ 2 लाखाचे नुकसान झाले तर उतरविलेल्या विमा रकमेच्या प्रमाणात भरपाई ₹ 1,20,000 मिळेल.

**(C)** वस्तूची किंमत ₹ 5 लाख असेल आणि त्याचा विमा ₹ 5 लाखाचा उतरविला असेल आणि वस्तूचा संपूर्ण नाश झालेला असेल तर कंपनी ₹ 5 लाखाचे संपूर्ण नुकसाई भरपाई चुकवेल.

**( 3 ) विमा योग्य हीताचा सिद्धांत (Principle of Insurable Interest) :** विमा योग्य हिताचा सिद्धांत म्हणजे विमा घेणाऱ्या व्यक्तिला विमा वस्तूमध्ये आर्थिक हित असले पाहीजे. उदा. घरमालकाला घरामध्ये आर्थिक हित असते. जेव्हा भाडेकरूला घराच्या बाबतीत आर्थिक हित नसते.

**( 4 ) हक्क बदलण्याचा सिद्धांत (Principle of Sabrogation) :** जेव्हा विमायोग्य वस्तूंचा विमा घेण्यात येतो आणि ती वस्तू नाश पावते, विमा कंपनी त्याची भरपाई करते (चुकवते) तेव्हा नाश झालेल्या वस्तूचा मालकी हक्क विमा कंपनी या असतो. त्याच्यावर मुळ मालकीहक्क राहत नाही. ही गोष्ट जिंदगीच्या (जीवन) विम्याला लागु पडत नाही.

**2.1.3. प्रकार :**

**विम्याचे प्रकार**

- **जीवन विमा**
  - **जीवन विमा**
  - **हयातीचा विमा**
- **सामान्य विमा**
  - **मालाच्या स्थलांतर विमा**
    - सागरी विमा
    - हवाई विमा
    - मार्ग विमा
  - **आगीचा विमा**
  - **अन्य**
    - नफा नुकसान विमा
    - स्वास्थ विमा
    - लुटफाट विमा
    - जनावरांचा विमा
    - समूह विमा
    - वाहनाच्य विमा
    - उधारीचा विमा
    - तिऱ्हाईत पक्षसाठीचा विमा
    - धोकादारी समोर वफादारीचा विमा
    - अकस्मात विमा
    - नैसर्गिक संकटाचा विमा
    - कामगार भरपाई विमा
    - खेळकुद विमा

**( 1 ) जीवन विमा (Life Insurance) :**

**(A) जिंदगीचा विमा ( आजीवन ) (Whole Life Insurance) :** ज्या व्यक्तिचा विमा घेतलेला असेल त्या व्यक्तिचा मृत्यु झाला तर त्याच्या वारसदाराला विमा कंपनी नक्की केलेली रक्कम देण्याचे वचन देते अशा कराराला हयाती नंतरचा (आजीवन) विमा असे म्हणण्यात येते. विमा उतारणारी व्यक्ति नक्की केलेले प्रिमियम नक्की केलेल्या वेळेनुसार आजीवन भरत राहतो.

जीवन अमूल्य आहे तेव्हा त्याची किंमत नक्की होऊ शकत नाही. विमा उतरवणार व्यक्ती स्वत:च्या जीवनाचे जे मूल्य नक्की करतो. ते आणि स्वत:ची प्रिमियम चुकविण्याची क्षमतेच्या आधारे विम्याची रक्कम जमा करत असतो. येथे नुकसान भरपाईचा सिद्धांत अमलात येत नाही. व्यक्तिच्या मृत्युच्या वेळी जर कुठलीही शंकास्पद गोष्ट नसेल तर विमा कंपनी संपूर्ण रकमेची चुकवणी करण्यास बांधलेली असते.

**(B) हयातीचा विमा : (Endowment Insurance)** व्यक्तिने नक्की केलेली कालमर्यादा होईपर्यंत अथवा कालमर्यादाचा आतच त्याचा मृत्यू झाला तर त्याचे वारसदारांना नक्की केलेली रक्कम विमा कंपनी पुरविण्याचे वचन देत असते. अशा कराराला हयातीचा विमा असे म्हणतात. या कराराच्या मोबदल्यात विमेदार व्यक्ति नक्की केलेल्या प्रिमियम, निश्चित कालावधीनुसार भरत असते.

**( 2 ) सामान्य विमा (General Insurance) :** सामान्य विम्याचे तीन प्रकार आहे. (A) मालाच्या स्थंलातरांचा विमा, (B) आगीचा विमा, (C) अन्य सामान्य विमा

**(A) मालाच्या स्थलातरांचा विमा (Goods Transportation Insurance) :** मालाला एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी नेतांना किंवा त्याचे स्थलांतर करताना तो माल पूर्ण किंवा अंशिक नुकसान किंवा नाश पावण्याचा धोका असतो. याबाबतचा जो विमा उतरविण्यात येतो त्यात (a) सागरी विमा (b) हवाई विमा (c) मार्ग विमा अथवा रेल्वे / रस्ता विमा म्हणून ओळखण्यात येते.

**(I) सागरी विमा (Marine Insurance) :** समुद्र मार्गाने माल पाठवणे अतिशय स्वस्त आहे. परंतु विलंबकारी आणि जोखमी पण आहे. 18व्या शतकापुर्वी मोठ्या प्रमाणावरील आंतरराष्ट्रीय व्यापार सागरी मार्गाने होत होता. यामुळे विम्याचा हा प्रकार अत्यंत जुना आणि सर्वव्यापी आहे. लोईडस ऑफ लंडन नावाच्या संस्थेने सागरी विमा क्षेत्राची सुरूवात केली. या संस्थेने 325 वर्षाहुन आधिक काळ आपली विश्वसनियता टिकवून ठेवली.

**(II) हवाई मार्ग (Air Insurance) :** 19व्या शतकाच्या उत्तरार्धात हवाई मार्गाने माल पाठवण्यास सुरूवात झाली. त्यामुळे हवाई मार्ग विम्याची सुरूवात झाली. हवाई वाहन व्यवहार खूपच जलद महाग आणि जोखम कारक आहे. त्यामुळे हवाई वाहन व्यवहार मार्फत मोठी किंमत असणाऱ्या आणि कमी वजन असणाऱ्या वस्तूचेच स्थलांतर होते. सागरी आणि जमीन मार्ग विम्याच्या तुलनेत हवाई विम्याचा प्रिमियम दर जास्त असतो.

**(III) मार्ग विमा अथवा रेल्वे / रस्ता विमा (Rail / Road Insurance) :** मार्ग व्यवहारामध्ये जमीन मार्ग आणि रेल्वे मार्गाचा समावेश होतो. जमीन अथवा रेल्वे मार्गात मालाच्या स्थलांतरात जोखमांचे खास करून चोरी, लुंटफाट, मालाचे स्थलांतरात नुकसान वगैरे समावेश होतो. या जोखमांच्या समोर संरक्षण मिळविण्यासाठी मार्ग विमा घेण्यात येतो.

**(B) आगीचा विमा (Fire Insurance) :** वस्तू तसेच मालमत्तेचा विशिष्ट कारणांनी आग लागून मालाचे पूर्ण अथवा अंशत: नुकसान होते अथवा तो नाश पावतो. तेव्हा नुकसान भरपाई देण्याच्या वचनाच्या मोबदल्या विमा प्रिमियमच्या मोबदल्यात मिळवून देण्याचा करार यालाच आगीचा विमा म्हणतात. आगीच्या विम्यात योग्य हिताच्या सिद्धांताचा आग्रहपूर्वक अमल होत असतो. विमा उतरविण्याच्या वेळी त्याचप्रमाणे वस्तू अथवा मालमत्तेला आगीने नुकसान झाले तर अशाप्रसगी पण विमेदाराचे मालमत्तेत अचुकपणे विमा योग्य हित असलेच पाहीजे.

**(C) अन्य सामान्य विमा (Other General Insurance) :** विमा व्यवसायात विविधता आणण्यासाठी विम्याचे अनेक प्रकार अस्तित्वात आले आहेत. गायकला त्याच्या गळ्यातुन निघणाऱ्या सुर साठी विशिष्ट विमा वाहनाच्या वापराने अन्य लोकांना होणाऱ्या नुकसानीच्या, भरपाईचा त्रयस्थ पक्षकाराचा विमा (Third Party Insurance) कामगाराला होणाऱ्या नुकसान भरपाई विमा, कर्मचारी साठीचा विमा, विद्यार्थीवर्गाला होणाऱ्या सामान्य आणि सामाजिक नुकसान भरपाईचा विमा. कर्मचारीद्वारा होणाऱ्या विश्वासघातसाठी मालकाला होणारे नुकसान भरपाईचा विमा, खेळकुद स्पर्धा, नैसर्गिक किंवा अनैसर्गिक कारणानी योजू शकू किवां बंद राखण्यात येतील तर त्या होणाऱ्या नुकसान भरपाईचा विमा वगैरे असे अनेक प्रकारचे विमा अस्तित्वात आले आहे.

व्यक्तिच्या आरोग्य बाबतचा संभाळ आणि स्वास्थासाठी खूप खर्च करावा लागतो. विमा उतरवणार व्यक्तिला नक्की केलेल्या अटीनुसार विमा कंपनी विमा प्रिमियमच्या बदल्यात आजाराचा खर्च भरपाई म्हणून देते. तेव्हा त्या विमा पोलिसीला स्वास्थ्याचा विमा (Mediclaim Insurance) असे म्हणतात.

**2.1.4 विमाचे खाजगीकरण :** भारतात विम्याची सुरूवात खाजगी क्षेत्राने झाली होती. भारतात ब्रिटिश हुकुमशाहीच्या कारणाने खुप सगळ्या विदेशी विमा कंपनीनी पण भारतात विमा कार्याची सुरूवात केली. अयोग्य व्यापारी नीती आचरण्याच्या आक्षेपामुळे 19 जानेवारी 1956 यादिवशी वटहुकुमाद्वारे जीवनविम्याचे धंद्याचे राष्ट्रीयकरण करण्यात आले. आणि भारतीय जीवनविमा निगम (Life Insurance Corporation of India) ची स्थापना झाली. अशाप्रकारे जीवन विम्याच्या क्षेत्रात जीवन विमा निगमची मक्तेदारी सुरू झाली.

सामान्य विम्याची सुरूवात भारतात ब्रिटिशांद्वारे झाली होती. सामान्य विम्यांवर देखील नियंत्रण ठेवण्यात आले. जे स्वातंत्र्यानंतर देखील चालु राहीले. 1972 मध्ये सामान्य विमा व्यापार (राष्ट्रीयकरण) कायदयाद्वारे 1 जानेवारी 1973 पासून सर्वसामान्य विमा कंपन्याचे राष्ट्रीयकरण करण्यात आले.

विमा क्षेत्रातील कामगिरीची समीक्षा करण्यासाठी एक समिती रचण्यात आली. जिच्या अहवालामुळे भारत सरकारने विदेशी विमा कंपन्याना भारतीय विमा कंपन्याबरोबर सहयोग करून विमा धंदा करण्याची तरतुद केली. आणि 1999 मध्ये विमा नियमन आणि विकास संस्था (IRDA) ची स्थापना केली.

**2.1.5 वीमा नियमन आणि विकास संस्था (IRDA) (Insurance Regulatory and Development Authority (ईरडा) :** विमा नियमन आणि विकास संस्था ही भारतातील सर्वोच्च स्वायत्त कायदेकीय संस्था आहे. जी विमा क्षेत्रातील नियमन आणि विकासाचे कार्य साभांळते. IRDA ॲक्ट 1999 द्वारे खाजगी विमा कंपन्यासाठी विमा क्षेत्राचे द्वार उघडण्यात आले. आणि अशा खाजगी विमा कंपनीमध्ये विदेशी सरळ गुंतवणुक (FDI-Foreign Direct Investment) 26 % पर्यंतच्या मर्यादेत करण्याची मंजुरी देण्यात आली. जी वर्ष 2015 मध्ये वाढवून 49 % पर्यंत भांडवल गुंतवणुक करू शकतात. ईरडाच्या मुख्य उद्देशात (I) विमाधारकांना जास्तीत-जास्त पसंती मिळेल, (II) विमा कंपन्याच्या तंदुरूस्त स्पर्धेद्वारे कमी प्रिमियमने जास्त चांगली सेवा मिळेल, (III) अर्थव्यवस्थेसाठी भांडवल मिळविण्यासाठी, (IV) विमा कपन्यांमध्ये स्वनियंत्रण आणण्यासाठी, (V) तक्रार निवारण तंत्राची व्यवस्था करणे वगैरे.

**2.2 टपाल सेवा**

लेखित माहीती संचारमध्ये टपालसेवा महत्त्वाची आहे. टपालसेवेद्वारे माहीती एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी अतिशय जलद आणि त्रुटीरहीत पोहचविणे जरूरीचे आहे. या धंद्यात खाजगी टपालसेवा (कुरियर सर्विस) अथवा आंगडियाद्वारे अशी सेवा मिळू शकेल आणि भारतसरकारच्या टपाल खात्यांद्वारे पण अशी सेवा व्यक्ति आणि धंदेकीय एकमाना मिळू शकते. 150 पेक्षा जास्त वर्षापासून भारतीय टपालखाते देशात माहीती संचाराची सेवा पुरविणारे महत्त्वाचे खाते आहे. टपालखाते टपालसेवा व्यक्तिरिक्त पण पुष्कळ विविध सेवा जसे की मनिऑर्डर, लहान बचत योजनाद्वारे ठेवी स्विकारणे. टपाल जीवनविमाद्वारे आणि ग्रामीण जीवन विमा स्वरूपात पुरविते. याउपरांत ते कित्येक सेवा जसेकी म्युच्यअल फंडात गुंतवणुक, भारत सरकारच्या विविध योजनेसाठी प्रतिनिधी (अेजन्ट)ची सेवा देतो. निवृत्ती पेन्शन चुकविण्याचे कार्यदेखील साभांळते टपालखात्याला बॅंकिंग सेवेसाठीची परवानगी पण मिळालेली आहे. म्हणून टपालखाते अन्य बॅंकाप्रमाणे स्वत:ची सेवा ग्राहकांना देते. टपालखातेचे 1,50,000 पेक्षा जास्त पोस्ट ऑफिस भारतात आहेत. ज्यामधून अंदाजे 90 % इतकी पोस्ट ऑफिस ग्रामीण विभागात आलेली आहे.

**2.2.1 सामान्य टपाल पत्रे :** जी माहीती पाठवायची असेल ती पत्र किंवा कव्हरच्या स्वरूपात पाठवता येते.

**2.2.2 नोंदलेली टपाल - रजिस्टर्ड पोस्ट :** टपाल खात्यात नोंदवलेली टपाल म्हणजे की रजिस्टर्ड पोस्टची सेवा देते. अशी नोंदविलेली टपाल ज्याला पाठवली असेल त्याला डिलिव्हरी देण्यात येते. यासेवेसाठी सामान्य टपालपेक्षा जास्त किंमत चुकवावी लागते. जर पाठविणाऱ्याला नोंदवलेली टपाल पाठविलेल्या व्यक्तिला मिळाली आहे. त्याचा पुरावा म्हणून सही पाहीजे असेलतर त्याची स्वीकृती (Acknowledgement) मिळविण्यासाठी थोडी जास्तीची रक्कम चुकवावी लागते.

**2.2.3 पार्सल सेवा :** ज्यावस्तूची ने-आण कायदयाद्वारे प्रतिबंधित नसेल अशा सर्वच वस्तू पार्सलद्वारे एका ठिकाणाहुन दुसऱ्या ठिकणी पाठविता येतात. गरजेप्रमाणे अश्या पार्सलांचा, विमा घेण्यात येतो. कोणत्याही पोस्ट ऑफिस मधून पार्सलचे बुकिंग करता येते. सामान्यपणे पार्सल पाठवीणार पार्सल पाठविण्याची फी पोस्ट ऑफिसला चुकवितो.

**व्हेल्यु-पे-एबल पोस्ट (V.P.P.) :** उत्पादक किंवा व्यापारी ग्राहकांना ऑर्डरी प्रमाणे पार्सलमधून टपाल खात्याद्वारे माल पाठवितो. ज्यासाठी माल मिळेल तेव्हा ग्राहक पार्सल सेवेची किंमत तसेच मालाची नक्की केलेली किंमत टपाल खात्याला चुकवितो. टपाल खाते मिळालेली रक्कम उत्पादक किंवा व्यापाऱ्यांना चुकविते.

**2.2.4 स्पीड पोस्ट/पार्सल :** टपाल खाते भारतात नक्की केलेल्या स्थळासाठी जलद गतीने टपाल अथवा पार्सल सेवा निश्चित समयमर्यादेत डिलिव्हरी मिळेल अशी खात्री देऊन स्विकारते. स्पीड पोस्ट / पार्सलसाठी सामान्य टपाल / पार्सल करता जास्त किंमत चुकवावी लागते. गरजेप्रमाणे विमा घेता येतो.

**2.2.5 एक्सप्रेस पार्सल :** एक्सप्रेस पार्सलची सेवा व्यक्ति आणि धंदाकीय एकम या दोघांना प्राप्त होतो. एक्सप्रेस पार्सल नक्की केलेल्या समयमर्यादेत अतिशय जलद गतीने पोहचविले जाते. टपालखाते यासाठी हवाईमार्ग किंवा अन्य सर्वात जलद मिळेल त्यामार्गाने पाठविते. स्पीड पार्सल पेक्षा देखील याची फी जास्त असते.

**2.2.6 बचत सेवा :** टपालखाते बँकेप्रमाणेच बचत दारांना विविध प्रकारच्या सेवा पुरविते बचत खाते 5 वर्षाचे रीकरींग डिपॉझिट, मुदतबंद ठेवी, मासिक आवक योजना, वृद्ध नागरिकासाठी बचत योजना. 15 वर्षीय जाहीर भविष्यनिधी, राष्ट्रीय बचत पत्रे 5 वर्ष किंवा 10 वर्ष मुदतीचे किसान विकास पत्रे, सुकन्या समृद्धी खात्यासारखी सेवा देखील पुरविते.

बँकेप्रमाणेच पोस्ट ऑफिसात देखील बचत खाते खोलता येते. त्यासाठी चेकबुक पण मिळते. आणि आता एटीएम (ATM) कार्डाची सवलत देखील मिळते.

**2.2.7 रिकरींग डिपॉझिट योजना :** या योजनेप्रमाणे खाते खोलणाऱ्याने प्रत्येक महीन्याला आधी नक्की केलेल्या तारखेला किंवा त्याआधी नक्की केलेली रक्कम भरावयाची असते. 5 वर्षानंतर हे खाते परिपक्क झाल्यावर व्याजासहीत ही रक्कम खाते खोलणाऱ्याला परत मिळते 5 वर्षाच्या कालावधीनंतर जर गरज असेल तर दुसऱ्या 5 वर्षासाठी या खात्याची अवधी लांबविता येते.

**2.2.8 टाईम डिपॉझिट :** पोस्ट ऑफिसात मुदतबंद ठेवी प्रमाणेच टाईम डिपॉझिटची सेवा मिळते. टाईम डिपॉझिट 1, 2, 3 किंवा 5 वर्षासाठी ₹ 200 अथवा त्याच्या गुणांकणात पाहीजे तेवढी रक्कम ठेवता येते. व्याजाची मोजणी दर तीन महीन्यानी होते. परंतु व्याजाची चुकवणुक वार्षिक धोरणाने होते. एका पोस्ट ऑफिसमधून दुसऱ्या पोस्ट ऑफीस मध्ये खात्याची अदलाबदल करता येते. असे खाते खोलल्यानंतर ते परीपक्व होईल त्या आधी केव्हाही बंद करता येते.

**2.2.9 राष्ट्रीय बचत पत्रे :** राष्ट्रीय बचतपत्राच्या गुंतवणुक दारांना ज्या-त्या पोस्ट ऑफीसमध्ये नक्की केलेल्या रकमेसाठी खरेदी, करायची असतात. या बचतपत्रांचा कालावधी 5 अथवा 10 वर्षासाठी असतो. टपाल खाते आधीपासून व्याजाच्या दराची माहीती देते. अश्या बचतपत्राचा 5 अथवा 10 वर्ष कालावधी पुर्ण झाल्यावर योग्य ती कार्यवाही केल्यानंतर कोणत्याही पोस्ट ऑफीस मधून परिपक्वतेची रक्कम मिळविता येते.

**2.2.10 किसान विकासपत्र :** किसान विकासपत्रात गुंतवणुक दारांनी गुंतवलेली रक्कम 100 माह (8 वर्ष आणि 4 महीने) नंतर व्याजासहीत डबल चुकविण्यात येते. किसान विकासपत्र निश्चित रकमेसाठी मिळतात. आणि परिपक्व तारखेला आवश्यक ती प्रक्रीया करून कोणत्याही पोस्ट ऑफीसमधून गुंतवलेल्या डबल रक्कम मिळविला येते.

**2.2.11 जाहीर भविष्यनिधी (Public Provident Fund) :** जाहीर भविष्यनिधी द्वारे कोणतीही व्यक्ती खाते खोलु शकते. या खात्याची मुदत 15 वर्षाची असते. या खात्यात वार्षीक कमीत कमी ₹ 500 भरता येतात. हे खाते 15 वर्षानंतर वर्तमान नियमानुसार जास्तीच्या 5 वर्षासाठी पाहीजे तेवढ्या वेळेस वाढविता येते. 15 वर्षाआधी हे खाते बंद करता येत नाही. या खात्यात भरलेली रक्कम उत्पन्न कराच्या मोजणीच्या वेळेस उत्पन्नातून वजा करण्यास पात्र असते. जर खातेदाराचा मृत्यु झाला तर खातेदाराने नोंदविवेल्या वारसदाराला ही रक्कम मिळु शकते.

**2.2.12 पोस्टल विमा :** भारतात स्वतंत्र आधी कल्याण योजना म्हणून पोस्टल विम्याची सुरवात झाली होती. केंद्र आणि राज्य सरकारचे कर्मचारी तसेच अर्धसरकारी संस्थेचे कर्मचाऱ्यांत ही सेवा मिळण्यापात्र आहे. पोस्टल विम्यात जीवन विम्याच्या विविध प्रकारच्या पोलीसी मिळतात. पोस्टल विम्याचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट म्हणजे कमीत कमी प्रीमीयम आणि जास्तीत जास्त बोनस हे आहे.

**2.2.13 मासिक आवक योजना (MIS-Monthly Income Scheme) :** गुंतवणुकदारांना दर महिण्याला व्याजाची रक्कम मिळु शकेल या हेतूसाठी ही योजना उपयोगी आहे. या योजने प्रमाणे व्यक्तीगत किंवा दुसऱ्या व्यक्ती बरोबर, संयुक्त नावाने खाते उघडता येते. असे खाते 5 वर्षाच्या कालावधीसाठी उघडते. गरजेप्रमाणे एका पोस्ट ऑफीस मधून दुसऱ्या पोस्ट ऑफीसमध्ये या खात्याची अदलाबदल करता येते. गरज असेल तर एका वर्षानंतर कित्येक अटीच्या आधीन गुंतवणुकीची रक्कम परत घेता येते.

**2.2.14 मनीऑर्डर :** मनीऑर्डर हे पोस्ट ऑफिस द्वारा एका ठिकाणाहुन दुसऱ्या ठिकाणी पैसे पाठवण्याची व्यवस्था आहे. या सेवेसाठी पोस्ट ऑफिसला कमिशन चुकवावे लागते. ज्या व्यक्तिला पैसे पाठवायचे असतील त्या व्यक्तिची पैसे मिळाले त्याबदल्यात पोहचण्याची सही घेण्यात येते. आणि ती पैसे पाठवणाऱ्याला पोहचवण्यात येते.

टपाल खात्याद्वारे ऑन लाईन टेकनोलोजीच्या उपयोगाने ईन्सन्ट मनीऑर्डर (IMO-Instant Money Order) सुरू करण्यात आली आहे. ज्याद्वारे ₹ 1000 पासून ₹ 50,000 पर्यंतची रक्कम भारतात कोणत्याही ठिकाणी एकाच दिवसात प्राप्त होऊ शकते. पैसे पाठविणार पोस्ट ऑफिसला पैसे तसेच कमिशनची रक्कम चुकविल्या बरोबरच त्याची पावती आणि एक खाजगी नंबर सिलबंध कवरमध्ये देण्यात येतो. पैसे पाठविणार व्यक्ति ज्याला पैसे पाठवू इच्छितो त्याला या खाजगी नंबर देतो. पैसे पाठवणाऱ्याला फोटो असलेले ओळखपत्र आणि खाजगी नंबर पोस्ट ऑफिसमध्ये रूजु केल्यानंतर मनिऑर्डरची रक्कम मिळवू शकतो. टपाल खात्याद्वारा ई-मनीऑर्डर (EMO) सेवा सुरू केलेली आहे. ही सेवा आता कित्येक महत्त्वाच्या पोस्ट ऑफिसमध्येच मिळु शकते. ई-मनिऑर्डरचे पैसे दुसऱ्या दिवशी ज्या त्या व्यक्तिला त्याच्या पत्यावर मिळु शकते. ई-मनिऑर्डर द्वारा ₹ 1 ते ₹ 5000 पाठवु शकता येते. हे पैसे पाठवण्यासाठी टपालखाते वेब सर्विसीझ आणि त्याच्या काम्प्युटर नेटवर्कचा उपयोग करत असतो. ई-मनिऑर्डर ऑनलाईन टेकनोलोजीचा उपयोग करते. त्यासाठी पैसा पाठविणार पोस्ट ऑफिसात प्रत्यक्ष जाऊन किंवा स्वत:च्या कम्प्युटर किंवा मोबाइल द्वारा टपालखात्याचा वेबसाईटवर जाऊन ऑन लाईन बुकिंग साठीचा फार्म भरावा लागतो. ई-मनिऑर्डरच्या फार्ममध्ये तो ज्याला पैसे पाठविणार आहे. त्याचे नाव, पत्ता ज्यात पिनकोड नंबर असणे आवश्यक आहे. 24 तासात हे पैसे त्या व्यक्तिला त्याच्या पत्यावर चुकविण्यात येतात. पैसे घेण्यावेळेस फोटो असलेले ओळखपत्र रूजु करावे लागते. ई-मनिऑर्डरच्या बरोबर गरज असेल तर नक्की केलेल्या संदेशामधून एखादा संदेश पण पैसा पाठविणारा पाठवु शकतो.

**2.2.15 अन्य अनुषंगिक सेवा :** टपालखात्या द्वारा दुसऱ्या पुष्कळ सगळ्या सेवा उपलब्ध आहे. जसे की विदेशी चलनाची खरेदी-विक्री, विदेशी चलनात ट्रावेलर्स चेक, विदेशी चलनात आधीच संग्रहीत रकमचे कार्ड (डेबिट कार्ड) विदेशी चलनात ड्रॉफ्ट, कित्येक म्युच्युअल फंडात गुंतवणुक. भारत सरकारच्या खूप सगळ्या योजनांसाठी अेजन्ट म्हणून सेवा, बँकिंग सेवा, पेन्शनरांना त्यांच्या बचत खात्यात पेन्शनची चुकवणी, रेल्वेचे टिकिट बुकिंग वगैरे सारखी सेवा टपाल खाते देत असते.

टपाल खाते भारत सरकारच्या मालकीचे आहे. त्यामुळे लोकांना टपाल खात्याच्या सेवेत जास्त विश्वास पाहायला मिळतो.

## 2.3 कोठार

उत्पादन झाल्यानंतर उत्पादित मालाची विक्री किंवा वापर लगेचच होत नसतो. त्याचा संग्रह करणे आवश्यक असते. नाशवंत वस्तूला सांभळण्यासाठी कोठाराची गरज पडते. कित्येक वस्तूची मागणी मोसमी असते आणि त्यांचे उत्पादन समग्र वर्ष दरम्यान होत असते. तेव्हा अश्या उत्पादित वस्तूंचा संग्रह करावा लागतो. आणि तेव्हा त्याला मागणी येईल तेव्हा ते मिळु शकतील अशी व्यवस्था कोठाराद्वारे करण्यात येते. कित्येक वेळेस कच्च्या मालाचा उत्पादनसाठी उपयोग होईल त्याआधी त्याचा संग्रह करणे गरजेचे असते. या साठी वाणिज्याचा एक भाग म्हणून कोठाराची सेवा आवश्यक आहे.

**2.3.1 अर्थ :** कोठार ही अशी सेवा आहे की ज्यात वस्तूंचा संग्रह होते. वस्तू त्यांच्या मुळ स्वरूपात राहतील अश्या प्रकारे ठेवण्यात येतात. अश्या संग्रह दरम्यान वस्तूंचा गुणधर्म टिकुन राहील किंवा त्यात कमीत कमी बदल होईल हा मुख्य उद्देश असतो. कोठारामुळे समय तुष्टीगुणाची निर्मिती होते.

**2.3.2 प्रकार :**

**कोठाराचे प्रकार**
- **मालकीच्या दृष्टिने**
  - **खाजगी कोठार**
  - **जाहीर कोठार**
- **जकातीचा दृष्टिने**
  - **जकात भरलेल्या मालाची कोठार**
  - **जकात न भरलेल्या मालाची कोठार**
- **उपयोगाच्या दृष्टीने**
  - **सामान्य कोठार**
  - **विशिष्ट कोठार**

**(A) मालकीच्या दृष्टीने कोठाराचे प्रकार :**

**( 1 ) खाजगी मालकीचे कोठार :** व्यापारी किंवा उत्पादक स्वताच्या मालाचा संग्रह करण्यासाठी आवश्यकतेनुसार स्वत:च्या मालकीचे कोठार ठेवतात त्याला खाजगी मालकीचे कोठार असे म्हणतात.

**( 2 ) जाहीर कोठार :** ज्या कोठारांचा उपयोग स्वत:च्या हेतूसाठी होत नाही. परंतु जाहीर जनतेच्या उपयोगासाठी करण्यात येतो. त्यांना जाहीर कोठार असे म्हणतात.

अशा कोठारांची मालकी देखीत स्वतंत्र व्यक्ति किंवा संस्थेची असते. धंदादारी किंवा अन्य व्यक्ति या कोठाराचा सेवेचा लाभ मिळवित असतात. आणि त्याबदल्यात ते भाडे आणि अन्य खर्च चुकवितात. खासकरून रेल्वेस्टेशन, बंदर, किंवा विमानतळाजवळ अशी जाहीर कोठारे असतात.

आज जाहीर कोठार स्वतंत्र व्यवसाय बनला आहे. जाहीर कोठार मालाचा संग्रह जपवणुक आणि सुरक्षिततेची खात्री देतात. जाहीरकोठार त्यांच्याकडे मिळालेल्या मालाची तपशिलवार माहीती दर्शविणारी पावती (पहोंच) देतात. ही पावती हस्तांतरणीय असते. ज्यामुळे पावतीद्वारे मालाची खरेदी-विक्री करता येते.

**(B) जकातीच्या दृष्टीने कोठाराचे प्रकार :**

**( 1 ) जकात भरलेल्या मालाचे कोठार :** आयात केलेल्या मालावर आयात जकात भरल्यानंतर त्याला निश्चित स्थळी घेवून जाण्यासाठी वाहन व्यवहाराची सेवा उपलब्ध नसेल तेव्हा बंदर, विमानतळ आणि सरहदीच्या विस्तारात मालाचा संग्रह करण्यासठी जाहीर कोठाराची सेवा मिळत असते. अशा कोठारांना जकात भरलेल्या मालाचे कोठार असे म्हणतात.

**( 2 ) जकात न भरलेल्या मालाचे कोठार (Bonded Godown) :** आयात केलेल्या मालावर नक्की केलेल्या दराने जकात भरायची असते. असा आयात केलेला माल की ज्यावर जकात भरलेली नाही. आणि तो माल ज्या कोठारात ठेवण्यात येतो. त्याला जकात न भरलेल्या मालाचे कोठार म्हणून ओळखण्यात येते. ज्या ठिकाणी माल आयात होतो. त्याठिकाणी अशी कोठारे पाहावयास मिळतात. जेव्हा आयातकाराला मालाची पुन्हा निर्यात करावयाची असेल तेव्हा मालाचे वर्गीकरण आणि पुन:पॅकिंग वगैरे सेवा उपलब्ध करून देतात. मालाच्या मुळ स्वरूपात कोणत्याही प्रकारचा बदल करण्यात येत नाही. अशी कोठारे पुन: निर्यातीसाठी आशिर्वाद रूप बनतात.

**(C) उपयोगाच्या दृष्टीने कोठारांचे प्रकार :**

**( 1 ) सामान्य कोठारे :** ज्या मालाचा संग्रह जपवणुक आणि सुरक्षिततेसाठी खास प्रकारच्या सेवेची गरज लागत नाही. असा माल ठेवणाऱ्या कोठारांना सामान्य कोठार असे म्हणतात. या कोठारात जवळ-जवळ सर्वच प्रकारचा आकार, स्वरूप आणि वजन असणारा माल ठेवण्यात येतो. या प्रकारचे कोठार मोठ्या प्रमाणात पाहावयास मिळतात.

**( 2 ) विशिष्ट कोठार :** जर मालाचा संग्रह जपवणुक आणि सुरक्षिततेसाठी खास अथवा विशिष्ट सेवा द्यावी लागते. असा माल ठेवणाऱ्या कोठारांना विशिष्ट कोठार असे म्हणतात. उदा. : फटाके, विषारी रसायने, स्वयंपाकाचा गॅस, पेट्रोल वगैरे वस्तूंचा संग्रह जपवणुक आणि सुरक्षिततेसाठी विशिष्ट कोठारे अनिवार्य आहे. पेट्रोलसाठी जमिनीतील टांकी विषारी रसायनांसाठी खास प्रकारच्या विटा ही त्याची उदाहरणे आहेत. फळ, दुध, भाजीपाला, सारख्या नाशवंत पदार्थासाठी शीतगृह सारखी विशिष्ट कोठारे ठेवण्यात येतात. ही कोठारे खर्चीक आहेत. सुरक्षिततेच्या दृष्टीने अनेक नियमांचे पालन करणे अनिवार्य असते.

**2.4 वाहनव्यवहार आणि दळवळणाची सेवा**

मालाच्या दळवळणासाठी वाहन व्यवहाराचा उपयोग करण्यात येतो. सुरूवातीच्या काळात प्राणी आणि वाहनांचा उपयोग होत होता. त्याबरोबरच जलमार्गपण शोधले गेले. आणि आधुनिक काळात विमानाचा देखील उपयोग सुरू केला आहे.

**2.4.1 अर्थ :** वाहन व्यवहार ही अशी सेवा आहे की ज्यामध्ये प्रवाशी आणि मालसामानाची एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी ने-आण करण्यात येते.

**2.4.2 प्रकार :**

**( 1 ) मानवशक्ती द्वारे संचालीत :** मानव आणि मालसामानाची ने-आण करण्यासाठी मानवशक्ती संचालीत वाहनव्यवहार हा खूपच प्रचलीत आणि पर्यावरणाला अनुकूल आहे. खुप ठिकाणी पायडलरिक्षेच्या उपयोगाने शहरातीत एका विस्तारामधून दुसऱ्या विस्तारात जाता येते. उदा. : कलकत्यात आज देखील पायडलरिक्षेचा उपयोग प्रवाश्यांची ने-आण करण्यासाठी होत आहे. हातलारी द्वारे आज भारतातील जवळ जवळ सर्वच प्रदेशात मालसामुग्री जवळच्या स्थळापर्यंत पोहचविण्यात येते.

**( 2 ) प्राणीशक्ती द्वारे संचालीत :** प्राण्याद्वारे मानव आणि मालसामग्रीची ने-आण कमी (थोड्या) अंतरासाठी होत असते. उदा. घोडागाडी, बैलगाडी वगैरे.

**( 3 ) हवाई मार्ग :** हवाई मार्गाने मानव आणि मालसामानाची अतिशय जलद गतीने लांबच्या अंतरासाठी ने-आण शक्य आहे. थोड्या अंतरासाठी हवाई मार्गाचा उपयोग महाग पडतो. विमानाला आकाशात उडविण्यासाठी आणि उतरविण्यासाठी रन-वेची गरज असते. कमी अंतरासाठी कमी माणसे आणि मालसामानासाठी जेथे रन-वे बनु शकत नसेल अशा दुर्गम विस्तारासाठी हेलीकॉप्टर ही सेवा जास्त योग्य आहे.

**( 4 ) जमीन मार्ग :**

**(A) रेल्वे मार्ग :** रेल्वेद्वारे प्रवासी आणि मालसामुग्रीची वाहतुक होत असते. इन्जीनमध्ये सामान्यपणे इंधन म्हणून डीझेल किंवा विद्युतशक्तीचा उपयोग केला जातो. कित्येक वेळेस ट्रेनमधील सर्व किंवा कित्येक डबे चालकबळ धारण करणारी असतात त्याला मल्टीपल युनीट ट्रेन असे म्हणतात. रेल्वेमध्ये आता इंधन म्हणून केवल, गुरुत्वाकर्षण, चुंबकीय शक्तीचा देखील उपयोग केला जात आहे. भारतात आता कॉम्प्रेस्ड नेचरल गॅस (CNG) चा इंधन म्हणून उपयोग करणाऱ्या इन्जीनांचा उपयोग सुरू झाला आहे. विवीध शहरांना जोडणारी आणि शहरामध्ये दौडणारी ट्रेन वाहनव्यवहारांचा करोडारज्जु समान आहे.

**(B) रस्ता मार्ग :** रस्ता मार्गाने एका मार्गावरून दुसऱ्या मार्गावार जाण्यासाठी मोकळा असतो, स्थळात, दिशेत, गतीत आणि वेळेत सवलती प्रमाणे बदल शक्य आहे. जो अन्य वाहन व्यावहाराच्या प्रकारात सरळ नाही. रस्त्या मार्गाद्वारे घराच्या दारा पर्यंत वाहनाद्वारे सेवा देणे शक्य बनते.

बसद्वारे जास्तीत जास्त व्यक्तीच्या वाहतुकीचे कार्य क्षमतापुर्वक होते. ट्रकद्वारे कमी वजन असणाऱ्या मालाची कमी अंतर असणाऱ्या स्थाळामध्ये ने-आण होत असते. वाहनांच्या सतत वाढत जाणाऱ्या वापरामुळे हवेचे प्रदुषण, आवाजाचे प्रदुषण, ट्राफीक गर्दीची समस्या, आणि पार्कींग सारखे प्रश्न निर्माण होतात. म्हणून पुष्कळ शहरामध्ये - BRTS (Bus Rapid Transit System) चा उपयोग सुरू झाला आहे. अशा बससाठी खास रस्ता राखीव ठेवण्यात येतो. त्यामुळे अतीशय जलद गतीने शहरातील एका ठिकानाहुन दुसऱ्या ठिकाणी जाता येते. दोन बसांमधील अंतर कमी ठेवल्यामुळे सेवेतील सातत्याता टिकुन राहते. आज गुजरातमध्ये अमदाबाद, सुरत आणि राजकोट या शहरात ही सेवा उपलब्ध आहे.

**( 5 ) जलमार्ग :** समुद्र, सरोवर, कॅनल, नदी वगैरे जलमार्गामध्ये नाव, जहाज किंवा अन्य साधनाद्वारे जलमार्गाने वाहनव्यवहार होतो. दोन समुद्रकाठाजवळची स्थळे किंवा त्याठिकाणी पाणी आणि सपाट जमीन असेल त्यासाठी पंख्याने चालणाऱ्या होवरक्राफ्टचा उपयोग होतो. मोठी धरणे बनवुन कॅनल द्वारा पाणी दुरच्या स्थळ पर्यंत. पोहचविण्यात येते. आशा कॅनलचा उपयोग देखील जलमार्ग म्हणून होत असतो. विदेश व्यापार सर्वात जास्त जलमार्गाद्वारेच होते.

जलमार्गाने होणारी वाहतुक दुसऱ्या प्रकारांपेक्षा थोडी हळु असते तरी देखील आधुनिक इन्जीनच्या साहाय्याने फारच मोठ्या प्रमाणात मालसामग्री कार्यक्षम रीत्या पोहचविण्यात येते. एका खंडामधून दुसऱ्या खंडात वाहतुक करण्यासाठी हवाई मार्गापेक्षा जलमार्ग प्रमाणात स्वस्त आहे. परंतु वेळ जास्त लागतो. समुद्रकिनाऱ्या विस्तारात फेरी सेवा फारच लाभदायक ठरते.

**( 6 ) पाईपलाईन द्वारा वाहतुक :** प्रवाही किंवा गॅससारख्या उत्पादनासाठी पाईप लाईनचा उपयोग जास्त कार्यक्षम ठरतो. प्रवाही कचराच्या नीकाल, पाणी, पेट्रोलीयम, नैसर्गीक गॅस वगैरे साठी ही व्यवस्था खूपच उपयोगी आहे.

उदा. हजीरा (गुजरात) पासून मध्यप्रदेश आणि उत्तरप्रदेश मध्ये गॅस परिवाहनासाठी पाईपलाईन टाकण्यात आलेली आहे. भारतात असाम, बिहार, गुजरात, उत्तर प्रदेश, आणि हरियाणा सारख्या राज्यात पाईपलाईन द्वारे क्रुडऑईल आणि पेट्रोलीयम उत्पादनाचे परिवहन होत असते.

**या प्रकरणात तुम्ही काय शिकलात ?**

**( 1 ) वीमा सेवा :**

**अर्थ :** दोन पक्षकारामधील लेखीत करार की ज्या द्वारे वीमा घेणारी व्याक्ती प्रीमीयमच्या मोबदल्यात विमा देण्याऱ्याकडून नक्की केलेल्या धोक्यांच्या कारणाने नुकसान झाले तर नक्की केलेल्या रकमेच्या मर्यादेत आणि नक्की केलेल्या मागणीनुसार आर्थिक नुकसाणीसाठी मोबदला मिळवतात.

**सिद्धांत :** (1) संपूर्ण विश्वासाचा सिद्धांत (2) नुकसान भरपाईचा सिद्धांत (3) विमायोग्य हिताचा सिद्धांत (4) हक्कबदलीचा सिद्धांत.

**प्रकार : ( 1 ) जीवन वीमा :** (A) जीवन विमा (B) हयातीचा विमा.

**( 2 ) सामान्य वीमा :** (A) मालाच्या वाहतुकीचा विमा :

(I) जलमार्गाचा विमा (II) हवाई मार्ग (III) रस्ता मार्ग

(B) आगीचा विमा

(C) अन्य सामान्य विमा.

**विम्याचे खाजगीकरण :**

**विमा नियमन आणि विकास संस्था ( IRDA ) :**

**(2) टपाल सेवा :**

(1) सामान्य टपाल पत्रे (2) नोंदवलेली टपालपत्रे (3) पार्सल सेवा -वेल्यु पे-अेवल पोस्ट, (4) स्पीड पोस्ट/ पार्सल (5) एक्सप्रेस पार्सल (6) बचत सेवा (7) रिकरिंग डिपॉझिट योजना (8) टाईम डिपॉझिट (9) राष्ट्रीय बचतपत्रे (10) किसान विकास पत्र (11) जाहीर भविष्यनिधी (12) पोस्टल विमा (13) मासिक आवक योजना (14) मनीऑर्डर - ईन्स्टन्ट मनीऑर्डर - ई - मनीऑर्डर आणि (15) अन्य आनुषंगिक सेवा.

**(3) सेवा :**

**अर्थ :** कोठारच्या सेवेद्वारा उत्पादनाचा संग्रह अशा रितीने करण्यात येते की ज्यामुळे उत्पादन मुळस्वरूपात एकबंध राहील आणि उत्पादनाचा गुणधर्म सांभळला जाईल अथवा कमीत कमी बदल होईल.

**प्रकार :**

**(1) मालकीच्या दृष्टीने :** (A) खाजगी कोठार आणि (B) जाहीर कोठार.

**(2) जकातीच्या दृष्टीने :** (A) जकात भरलेल्या मालाची कोठार
(B) जकात न भरलेल्या मालाची कोठार (Bonded Godown).

**(3) उपयोगाच्या दृष्टीने :** (A) सामान्य कोठार आणि (B) विशिष्ट कोठार

**(4) वाहनव्यवहार आणि दळणवळणाची सेवा :**

**अर्थ :** वाहन व्यवहार ही अशी सेवा आहे की ज्यामध्ये मानव आणि माल-सामानाची एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी हेरफेर करण्यात येते. (1) मानवबळद्वारा संचालीत (2) पशुबळ द्वारा संचालीत (3) हवाई मार्ग.

**(4) जमीन मार्ग :** (A) रेल्वे मार्ग (B) रस्ता मार्ग (5) जलमार्ग आणि (6) पाईपलाईन मार्ग.

## स्वाध्याय

**1. खालील प्रश्नांचा उत्तराचा खरा विकल्प पसंद करून लिहा :**

(1) खालील पैकी कोणता सिद्धांत विमा कराराच्या सिद्धांतानुसार नाही ?
(A) संपूर्ण विश्वासाचा सिद्धांत (B) नुकसान - भरपाईचा सिद्धांत
(C) वीमायोग्य हिताचा सिद्धांत (D) नफ्याचा सिद्धांत

(2) सामान्य विम्याचा कोणता प्राकर सगळ्यात जुना आणि सर्वव्यापी आहे ?
(A) माल वाहतुकीचा विमा (B) सागरी विमा (C) हवाई विमा (D) रेल्वे / रस्ता विमा

(3) विदेशी विमा कंपन्या भारतीय विमा कंपनीमध्ये सरळ सरळ किती गुंतवणुक करू शकतात ?
(A) 25 % (B) 49 % (C) 74 % (D) 100 %

(4) किसान विकास पत्रात परिपक्व तारखेला किती रक्कम व्याज सहीत चुकविण्यात येते ?
(A) दोन पट (B) तीन पट (C) चार पट (D) पाच पट

(5) खालील पैकी कोणत्या विम्यात जोखमचे तत्व जास्त सामावलेले आहे ?
(A) माल वाहतुकीचा विमा (B) सागरी विमा (C) हवाई विमा (D) रेल्वे / रस्ता विमा

(6) मनीऑर्डरच्या कोणत्या सेवेत टपालीद्वारा पैसे घरी पोहचविण्यात येत नाही ?
(A) सामान्य मनीऑर्डर (B) ईन्स्टन्ट मनीऑर्डर(IMO) (C) ई-मनीऑर्डर (D) खास मनीऑर्डर

**उत्तरे :** (1) (D) (2) (B) (3) ( B) (4) (A) (5) (C) (6) (B)

**2. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे द्या :**

(1) वीमा म्हणजे काय ?
(2) वीमा पॉलिसी म्हणजे काय ?
(3) जीवन विमा म्हणजे काय ?
(4) सामान्य वीमाची व्याख्या द्या.
(5) वाहन व्यवहाराचे अतिशय जलद माध्यम समजवा.
(6) कोठाराचा अर्थ सांगा ?
(7) मल्टिपल युनिट ट्रेन म्हणजे काय ?

**3. खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे द्या :**

(1) विम्याच्या सिद्धातांची यादी द्या.
(2) सामान्य विम्याच्या प्रकारांची यादी बनवा.

(3) हयातीचा विमा नुकसान भरपाईचा सिद्धांत लागू पडत नाही. कशासाठी ?
(4) स्वास्थचा विमा विषयी थोडक्यात समजवा.
(5) जाहीर भविष्यानिधी साठी नोद लिहा.
(6) पाईपलाईन द्वारा वाहतुक कोणत्या उत्पादनासाठी योग्य आहे ?

**4. खालील प्रश्नांची मुद्देसुद उत्तरे लिहा :**
(1) संपूर्ण विश्वासाचा सिद्धांत म्हणजे काय ?
(2) नुकसान भरपाईचा सिद्धांत म्हणजे काय
(3) विमा योग्य हीताचा सिद्धांत स्पष्ट करा.
(4) ''विमा धोके दुर करीत नाही; परंतु धोक्यानमुळे निर्माण होणाऱ्या आर्थिक नुकसानाचा मोबदला देतो.'' – हया विधानाची यथार्थता तपसा.
(5) 'कोठारामुळे समयतुष्टीगुणाची निर्मिती होते.' चर्चा करा.
(6) विशिष्ट कोठार म्हणजे काय ? उदाहरणासह समजवा.

**5. खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे द्या :**
(1) विमा करार हा सामान्य करारापासून कशारीतीने वेगळा आहे ?
(2) जीवनविम्याचे प्रकार सांगुन त्याविषयी थोडक्यात समजवा.
(3) सामान्य विम्याचे प्रकार सांगुन कोणत्याही दोन प्रकाराविषयी नोंद लिहा.
(4) विमा नियमन आणि विकास संस्था विषयी समजवा.
(5) कोठाराचे प्रकार समजावून जकातीच्या दृष्टीने कोठाराच्या प्रकारविषयी माहीती द्या.

## पारिभाषिक शब्द

| | | |
|---|---|---|
| आर्थिक प्रवृत्ती | : | Economic Activity |
| वीमा पोलीसी | : | Insurance Policy |
| वीमा प्रिमियम | : | Insurance Premium |
| जीवन विमा | : | Whole Life Insurance |
| हयातीचा विमा | : | Endowment Insurance |
| तिऱ्हाईत पक्ष | : | Third Party |
| भारतीय जीवन विमा निगम | : | LIC of India - Life Insurance Corporation of India |
| वीमा नियमन आणि विकास संस्था | : | IRDA - Insurance Regulatory and Developmet Authority |
| स्वीकृती | : | Acknowledgement |
| खाजगी कुरीयर सेवा | : | Private Courier Service |
| टपालद्वारा किंमतीची चुकवणी | : | VPP – Value Payable Post |
| सरळ विदेशी गुंतवणुक | : | FDI - Foreign Direct Investment |
| आधिच संग्रहीत रकमेचे कार्ड | : | Debit Card |
| शीघ्र चुकवणीकार यंत्र | : | ATM - Automated Teller Machine |
| हस्तांतरीय | : | Transferable |
| मासिक आवक योजना | : | MIS - Monthly Income Scheme |
| जकात न भरलेल्या मालाचा कोठार | : | Bonded Godown |
| शीतगृहे | : | Cold Storage |
| आयात जकात | : | Custom Duty |
| I. M. O. | : | Instant Money Order |
| E. M. O. | : | Electronic Money Order |
| C. N. G. | : | Compressed Natural Gas |
| B. R. T. S. | : | Bus Rapid Transit System |

●

# 3 धंदेवाईक सेवा-2
# (Business Services-2)

**या प्रकरणात तुम्ही काय शिकणार आहेत ?**

3.1 बँकेचा अर्थ
3.2 कार्य
3.3 बँक खात्याचे प्रकार
  3.3.1 बचत खाते
  3.3.2 चालु खाते
  3.3.3 आवर्तक खाते
  3.3.4 मुदतबंध ठेव खाते
3.4 बँकेच्या सेवा
  3.4.1 ड्राफ्ट तयार करणे
  3.4.2 बँन्कर्स चेक
  3.4.3 आर.टी.जी.एस.
  3.4.4 एन.ई.एफ.टी.
  3.4.5 बँक ओवरड्राफ्ट
  3.4.6 केश क्रेडीट
  3.4.7 लोन
3.5 ई-बँकिंग
  3.5.1 इन्टरनेट, कोरबँकिंग आणि मोबाईल बँकिंग
3.6 बँकिंग संबंधीत सेवा
  3.6.1 ओ.टी.एम.
  3.6.2 क्रेडिट कार्ड
  3.6.3 डेबिट कार्ड

**प्रस्तावना**

आधुनिक काळात वाणिज्याचे महत्त्व वाढत जात आहे. वाणिज्यात व्यापाराची प्रवृत्ती त्या व्यक्तिरीक्त सहाय्यक सेवेमध्ये बँकिंगचा समावेश करण्यात येतो. बँकिंगची सेवा व्यापार व्यतीरीक्त उद्योग, शेती सारख्या अनेक क्षेत्राना उपयोगी बनते.

बँकिंगची सेवा देणारी संस्था बँक म्हटली जाते. जगातील सर्वप्रथम बँक इ.स. 1407 मध्ये जिनोवा मध्ये सुरू झाली होती. इटालीयन शब्द Banco बेंच वरून बँक शब्दाची उत्पत्ती झाली आहे. बँकेच्या प्रवृत्तीचा पुरावा प्राचीन काळात देखील पाहवयास मिळतो. या शब्दाची निर्मिती रोमन साम्राज्यात झाली होती. जेथे पैसे कर्जाने देणारा मासेला (Macella) नावाने ओळखला जातो. बंद वाड्याच्या मध्यभागी Bancu नावाने ओळखणाऱ्या लाब बेंचवर स्वत:ची लहान कामचलाऊ दुकान लावत होते. ज्यावरुन बँको आणि बँक शब्दाची उत्पत्ती झाली.

**3.1 बँकेचा अर्थ :**

(1) रिझर्व बँकेच्या मते, ''मागणी करण्यात येईल तेव्हा त्वरीतच किंवा नक्की केलेल्या समयानंतर परत करण्याच्या अटीवर कर्ज देण्याच्या उद्देशाने बचत एकत्रीत करणाऱ्या संस्थेला बँके असे म्हणतात.''

(2) बँकिंगची सेवा देणाऱ्या संस्थेला बँक म्हटली जाते.

**3.2 कार्य :**

(1) ठेवी स्विकारणे (2) गुंतवणुक करणे किंवा कर्ज देणे. परंतु वर्तमान काळात याकार्या व्यातीरीक्त अन्य कार्य देखील बँक करते. बँकिंग सेवेचा विकास खूपच वाढत आहे. आणि तीच्या सेवेत विविधता पाहायला मिळते. बँकेच्या सर्वत्र कार्यांची यादी बनवीने अडचणीचे आहे. बँकेच्या कार्याला मुख्य कार्य आणि गौण कार्यात विभाजीत करता येईल.

| मुख्य कार्य | गौण कार्य |
|---|---|
| (1) ठेवी स्वीकारणे | (1) ग्राहकांचे नाणेकीय व्यवहार सांभाळणे. |
| (2) कर्ज देणे | (2) परकीयचलनाशी संबंधी व्यवहार करणे. |
| (3) गुंतवणुक करणे | (3) पतपत्र देणे. |
| (4) आंतरबँकिंग व्यवहार करणे | (4) ट्रावलर्स चेक देणे. |
| | (5) ड्राफ्टची सेवा देणे. |
| | (6) बँकेशी जोडलेल्या व्यक्तीच्या पतपात्रते विषई माहीती देणे. |
| | (7) हमीपत्र देणारा दलाल म्हणून सेवा देणे. |
| | (8) अन्य संबंधीत सेवा पुरविणे जसे की ATM, DEMAT, लोकरची सुविधा |

**(A) बँकेची मुख्य कार्य :**

**(1) ठेवी स्वीकारणे :** बँक जाहीर जनतेकडुन शिल्लक असलेली रक्कम ठेवीच्या स्वरूपात स्वीकारते. बँकेत ठेवी ठेवणाऱ्या ठेवीदारांना बँक व्याज देते. बँकेची सर्वात मोठी जवाबदारी ठेविदार/बचत कारणाऱ्या लोकांचा विश्वास टिकवुन ठेवण्याचा आहे. बँक वेगवेगळ्या प्रकारच्या ठेवी स्वीकारते. ज्यावर व्याजाचा दर देखील वेगवेगळा असतो.

बँक प्रामुख्याने चार प्रकारे ठेवी स्वीकारते : (i) बचत खाते (ii) चालु खाते (iii) रिकरींग खाते (iv) मुदतबंद ठेव खाते

**(2) कर्ज देणे :** बँक विविध प्रकारच्या खात्याद्वारे ठेवी स्वीकारते. आणि या ठेवीद्वारे मिळालेले पैसे (रक्कम) कर्ज रूपाने ग्राहकांना देते. बँक ठेवी स्वीकारून बचतदाराना व्याज देते. म्हणून गुंतवणुक दारांना दिल्या जाणाऱ्या. व्याजदरा पेक्षा जास्त दराने गरजु व्यक्तीना कर्ज देते. व्याजाच्या दराच्या तफावतीमधून बँक नफा मिळविते. बँक खालीलप्रमाणे कर्ज देते.

**(a) लोन द्वारे :** बँक दिर्घकाळासाठी किंवा थोड्या अवधीसाठी लोन देत असते. कित्येक प्रकारच्या लोनमध्ये गहाणाची गरज असते जेव्हा कित्येक प्रकारच्या लोनमध्ये गाहणाची गरज नसते. अशी लोन व्यापारी, व्यक्तिगत किंवा उद्योगपतिनां देण्यात येते. त्याच्यासमोर तितकीच रक्कमची जामीनगिरी बँक घेत असते. आजच्या काळात होम लोन, कार लोन, एज्युकेशन लोन. केशक्रेडीट मशीनरी लोन, गोल्ड लोन, पर्सनल लोन सारखेचा लोन पण उपलब्ध आहेत.

**(b) ओवरड्राफ्ट ॲन्ड केशक्रेडिट द्वारे :** चालु खाते धारण करणारा आधीपासून मंजुर केलेल्या मर्यादेत अल्प कालावधीसाठी खात्यात जमा रक्कमे पेक्षा जास्त रक्कम काढत असेल तर त्याला बँकओवरड्राफ्ट असे म्हणतात. ओव्हरड्राफ्टचा कालावधी अल्प असतो. परंतु ओवरड्राफ्टचा कालावधी निश्चित करून देण्यात येतो तेव्हा त्याला केशक्रेडिट या नावाने ओळखण्यात येते.

**(3) गुंतवणुक करणे :** बँकेचे भांडवल आणि मिळालेल्या ठेवीची रक्कम कर्ज आणि गुंतवणुकी साठी उपयोगात घेतली जात नसेल तर बँकेला योग्य मोबदला मिळत नाही. बँकेचे महत्त्वाचे कार्य इतर ठिकाणी रक्कम गुतवीणे हे आहे. ही गुंतवणुक योग्य ठिकाणी आणि सुरक्षितरीत्या करणे अनीवार्य आहे. बँकेला अनामतची रक्कम RBI च्या नियमानुसार ऐकुन ठेविच्या अमुक रक्कम सरकारी जामीनगीरीत गुंतवायची असते. ज्याच्यावर व्याजाचा दर कमी असतो. आर्थिक आणीबाणी अथवा आकस्मिक परिस्थीतीत गुंतवणुकी सुटया करून लगेचच रोकड रक्कम प्राप्त होईल अशी व्यवस्था करून ठेवणे आवश्यक असते. बँका मोठ्या प्रमाणात सरकारी जामीनगिरी किंवा अन्य सद्धरता असणाऱ्या एकमात गुंतवणुक करतात.

**( 4 ) आंतरबँकिंग व्यवहार करणे :** बँकेच्या मुख्य कार्यापैकी एक कार्य बँका-बँका मधील व्यवहाराचे आहे. प्रत्येक बँकेला पुष्कळवेळा खुपच थोड्यावेळासाठी म्हणजे की चोवीस तास किंवा त्यापेक्षापण कमी वेळासाठी पैशांची (नाणेंची) चणचण भासते. अशावेळेस दुसऱ्या कुठल्या बँकेत न वापरलेले अथवा पडून राहीलेले पैसे लगेचच ज्या बँकेला गरज आहे. त्या बँकेला देण्यात येतात. ही व्यवस्था मध्यस्थ बँकेने नियुक्त केलेल्या एजन्सीद्वारा करण्यात येते. याप्रमाणे पैसे देण्याची व पैसे घेण्याची प्रक्रिया, मध्यस्थ बँक मार्फत होत असते. पैसे घेणार व पैसे देणार एकमेकाच्या संपर्कात येत नाही. यारीतीने बँकेच्या समस्यांचे निराकरण होऊन जाते. अशी जी रक्कमची मागणी केली असता त्वरीत पैसे मिळतात. त्याला CALL MONEY च्या नावाने ओळखण्यात येते. याप्रमाणे मिळविलेल्या रक्कमेवर व्याज चुकवावे लागते. या व्याजाचा दर बाजारात पैश्याच्या मागणीच्या आधारे नक्की होतो. मागणी आणि पुरवठयाच्या सिद्धांताप्रमाणे व्याजदर नक्की होत असतो. ज्याला इग्रंजीत CALL MONEY RATE म्हणून ओळखतात.

**(B) बँकेचे गौण कार्य :**

**( 1 ) ग्राहकांचा आर्थिक व्यवहार सांभाळणे :** बँकेत मुख्यत्वे दोन प्रकारचे खातेदार असतात : (A) ठेवी ठेवणारे (B) कर्ज घेणारे. असे ग्राहक बँक मार्फत स्वत:चे आर्थिक व्यवहार करत असतात. बँकेचा ग्राहक अन्य व्यक्तिच्या साक्षीने चेक लिहून देतो. तेव्हा दुसऱ्यांना पैसे चुकविण्याचे कार्य तसेच अन्य व्यक्तिकडून जेव्हा चेक मिळतो तेव्हा त्या चेकचे पैसे वसुल करण्याचे कार्य ग्राहकाच्या वतीने बँक करत असते वर्तमान काळात लाईटबिल भरण्याचे, फोन बिल भरण्याचे, विम्याचे प्रिमियम भरण्याचे, एका खात्यातुन दुसऱ्या खात्यात रुपये ट्रान्सफर करणे यासारखे विविध कार्य बँक ग्राहकामार्फत करत असते.

**( 2 ) परकीय चलनाबाबतचे व्यवहार करणे :** आयात-निर्यातीचा व्यापार आजच्या काळात सक्तीने बँकेद्वाराच करावा लागतो. आयात-निर्यातीच्या व्यवहारासाठी विदेशी परकीयचलनाची गरज पडते. अशा परकीयचलनाची व्यवस्था मध्यस्थ बँकेने परवानगी दिलेती असेल अशा बँक विदेशी व्यापाऱ्याबरोबर जोडलेल्या दस्ताऐवज आणणे-पाठवण्याची सेवा देत असतात.

**( 3 ) पतपत्र :** पतपत्र हे एका बँकेने दुसऱ्या बँकेला उद्देशुन लिहिलेले पत्र आहे. या पत्रात दर्शविलेल्या व्यक्ती निश्चित वेळेत निश्चित रक्कम चुकविलेच अशी खात्री देतो. बँक पतपत्र देतांना ते तयार करण्यापूर्वी ज्याची खात्री द्यावयाची असते. त्या व्यक्ति जवळून आधीच निश्चित रक्कम जमा करवून घेते. अथवा तेवढ्या रकमेसाठी जामीन घेते. ज्या व्यक्तिला खात्री देण्यात आलेली असेल त्या व्यक्तिला पैसे चुकविण्याच्या वेळेस निर्देशित रक्कम चुकविण्यात येते. अशाप्रकारे पतपत्राने होणारा आर्थिक व्यवहार सरळ आणि विश्वसनीय होतो. बँकेला या सेवेतून कमिशनची आवक मिळत असते.

**( 4 ) ट्रावेलर्स चेक देणे :** वर्तमान काळात लोक जास्तीत जास्त प्रवास करत असतात. म्हणून देशात किंवा विदेशात प्रवास दरम्यान पैसे हरवणे किंवा चोरीस जाणे या चिंतेमधून वाचण्यासाठी ट्रावेलर्स चेक काढत असतात. ट्रावेलर्स चेक धारण करणारी व्यक्ती बाहेरगावाला किंवा परदेशात बँकेच्या शाखेत जावून नमुन्याप्रमाणे सही करुन चेकचे पैसे प्राप्त करु शकतो. हे चेक खुपच विश्वसनीय तसेच हस्तांतरणीय असतात. ATM ची सुविधा आल्यामुळे ट्रावेलर्स चेकचा वापर कमी झाला आहे.

**( 5 ) डिमान्ड ड्राफ्टची सेवा :** डिमान्ड ड्राफ्ट म्हणजे कोणत्याही एका बँकेने दुसऱ्या बँकेच्या शाखेवर लिहीलेला चेक आहे. डिमांड ड्राफ्टमध्ये व्यक्तीच्या नावाचा उल्लेख असतो. आणि त्या व्यक्तीला पैसे देण्याचा हुकुम देण्यात येतो. एखादया व्यक्ती किंवा संस्थेला पैसे पाठवायचे असतील तेव्हा ड्राफ्ट एक सुरक्षित माध्यम आहे. जी व्यक्ती किंवा संस्था पाठविण्यास मागत असेल त्यासाठी निश्चित फार्म भरून बँकेला ड्राफ्ट काढण्याची विनंती करण्यात येते. या विनंतीच्या आधारे पैसे मिळवीणाऱ्याचे नाव लिहून त्यास्थळा वरील स्वत:हाच्या शाखेवर किंवा. ज्याच्या बरोबर त्यांची जोडणी आहे त्या बँकेचे शाखेला रक्कम चुकवीण्याचा आदेश देण्यात येतो. पैसे पाठविणारा पाठविण्याचे पैसे त्या व्यतीरीक्त बँकेचे कमीशन देखील देतो. जी बँक असा दस्तावेज स्वत:च्या शहरात वटवता येईल असा देत असेल, तर त्याला पे-ऑर्डर म्हणून ओळखण्यात येते.

**( 6 ) बँकेशी जोडलेल्या ग्राहकांची पत विषयक माहीती देणे :** बँकस्वता:च्या ग्राहकां बरोबर वारंवार आर्थिक व्यवहार करीत असतो. त्यामुळे बँकेला त्यांच्या आर्थिक पात्रतेची माहीती प्राप्त झालेली असते. बँकेला ज्या प्रमाणे लोकांचा विश्वास संपादन करावयाचा असतो त्याचप्रमाणे बाजारात होणाऱ्या पत व्यावहारासाठी देखील एखादी संस्था किंवा पेढी दुसऱ्या पेढी किंवा संस्थेचा विश्वास संपादन करू इच्छीत असेल तेव्हा बँकेद्वारे देण्यात येणारी माहिती जास्त विश्वासनीय मानण्यात येते. यासाठी बँक सद्धरतेचे प्रमाणपत्र (Solvency Certificate) देते.

**( 7 ) खात्रीदेणारा अभिकर्ता ( दलाल ) म्हणून सेवा :** नवी कंपनी जेव्हा भांडवल बाजारात प्रवेश करते आणि शेअर्स द्वारा भांडवल प्राप्त करते तेव्हा एक भय सतत सतावीत असते की धंदा सुरू करण्यासाठी कमीत कमी भांडवलाची रक्कम वेळच्यावेळी भरली गेली नाही तर धंदा सुरू करता येणार नाही. अश्यावेळेस बँक भरण्याची पुर्ण रक्कम किंवा लघुतम भरण्याची रक्कम कमी पडली तर ती रक्कम बँक देईल अशी खात्री देते. आणि जितकी रक्कम कमी भरली जाईल तितकी जामीनगीरी कंपनी कडून बँक खरेदी करते. या सेवेबद्दल बँक कमीशन मीळवीत असते.

**( 8 ) अन्य संबंधीत सेवा पुरविणे :** बँक स्वता:च्या ग्राहकांना ATM, DEMAT तसेच लॉकरची सेवा देखील पुरविते. या व्यातीरीक्त ग्राहकांसाठी डेबीटकार्ड आणि क्रेडीट कार्डची सेवा देखील पुरविते.

**3.3 बँकेच्या खात्याचे प्रकार**

बँकेचे कार्य ठेवी स्वीकारण्याचे आहे. बँक विवीध प्रकारचे खाते खोलतांना तसेच बँकेच्या अन्य सुविधांसाठी बँक मध्यवर्ती बँकेच्या नियमाप्रमाणे KYC (Know Your Customer) साठी फाटो असणारे मान्य ओळखकार्ड आणि पत्याचा (राहण्याचा) पुरावा मागते.

**3.3.1 बचत खाते :** लोकांन द्वारे ठेवण्यात येणाऱ्या ठेवी की ज्यात बचतचे तत्व समावलेले आहे. या खात्यात निश्चीत दराने व्याज चुकविण्यात येते. या खात्यात जितक्या दिवसासाठी तितक्या रक्कम जमा असेल तितक्या दिवसाचे व्याज मिळते. या खात्यात बँक चेकबुक, अे.टी.अेम. कार्ड सारखी सेवा पुरविते. खातेदार स्वता:च्या खात्यात चेक, ड्राफ्ट किंवा रोकड रक्कम जमा करतात. चेक किंवा उपाड चिठ्ठी द्वारे पैसे काढता येतात. बँक खातेदारानां या खात्यात न्युनतम रक्कम शिल्लक ठेवणे सक्तीचे करते. सामान्यपणे बचत खात्यातुन उपाडण्यासाठी महिन्यातुन होणाऱ्या व्यवहारांच्या संख्येवर मर्यादा ठेवते. हे खाते व्यक्ती किंवा व्यक्तीच्या समूहाद्वारे संयुक्तरीत्या उघडता येते. ज्यात वारसदारांची नेमणुक करता येते. या खात्याद्वारे बँकेला मोठ्या प्रमाणात ठेवी मिळतात.

**3.3.2 चालु खाते :** व्यक्ती किंवा धंद्याकीय एकमाचे नावाने हे खाते उघडता येते. या खात्यावर सामान्यपणे कोणतेही व्याज देण्यात येत नाही. परंतु बँक बँकचार्जीस वसुल करते. या खात्यात कर्जाची सुविधा देखील देता येते. या खात्यात पैसे ठेवण्यासाठी किंवा काढण्यासाठी व्यवहारांच्या संख्येवर मर्यादा ठेवण्यात येत नाही. सामान्यपणे हे खाते धंदादारी व्यक्ती उघडते.

**3.3.3 रिकरींग खाते :** बचतीच्या उद्देशाने खोलण्यात येणारे खाते की ज्यात दर महिन्याला निश्चित वेळेस निश्चीत रक्कम जमा करणे सक्तीचे असते. या खात्यावर व्याजाचा दर बचत खात्यापेक्षा जास्त आणि मुदत बंद ठेव खाात्याच्या प्रमाणात (Fixed Deposit) कमी असतो. निश्चित कालावधी पुर्ण झाल्यावर बँक व्याजासह रक्कम परत करते.

**3.3.4 मुदत बंद ठेव खाते :** बँकेसाठी निश्चित कालावधी साठी ठेवीची रक्कम वापरता येईल असा स्त्रोत म्हणजेच मुदत बंद ठेव. बँक आणि ठेवीदारांनी आधीच नक्की केलेल्या मुदती पर्यंत. पैसे काढु शकत नाही. जर परीपक्व मुदतीच्या आधी रक्कम काढण्यात आली तर व्याजदर कमी केला जातो. मुदत पुर्ण झाल्यावर व्याजासह रक्कम बँक परत करेल अशी लेखीत हमी देते. निश्चीत कालावधी पर्यंत रक्कम काढता येत नसल्यामुळे बचत खाते आणि रीकरींग खात्याच्या तुलनेत व्याजाचा दर जास्त असतो.

**3.4 बँकेच्या विवीध सेवा**

बँकेची मुख्य कार्य गुंतवणुक करणे/कर्ज देणे आणि ठेवी स्वीकारणे. या व्यातीरीक्त बँक अनेक कार्य जसेकी ग्राहकांचे नाणेकीय व्यवहार सांभळणे, पतपत्र देणे, ट्रावलर्स चेक देणे, ड्राफ्ट इस्यू करणे, RTGS, NEFT, बँक ओव्हर ड्राफ्ट, लोन, क्रेडीट कार्ड, डेबीट कार्ड, कोर बँकिंग बरोबर संबंधीत असेल असे कार्य देखील करते.

**3.4.1 ड्राफ्ट वगैरेची सेवा देणे :** ड्राफ्ट म्हणजे कोणत्याही एका बँकेने दुसऱ्या बँकेच्या शाखेवर लिहलेला धनादेश आहे. ड्राफ्टमध्ये ज्या व्यक्तिचे नाव असते. त्याला पैसे चुकविण्याचा हुकूम असतो. ग्राहकांकडून पुरती रक्कम मिळाल्या नंतर बँक ड्राफ्टमध्ये निर्देश केलेल्या व्यक्तीला नक्की रक्कम चुकविण्याची खात्री देते.

एखादी व्यक्ती जेव्हा दुसऱ्या व्यक्तिला पैसे पाठवू इच्छित असेल तेव्हा तो बँकेत जाऊन पैसे आणि ड्राफ्टच्या कमिशनची रक्कम भरून ज्याला पैसे पाठवायचे आहेत त्याच्या नावाचा ड्राफ्ट काढून देण्याची विनंती करतो. पैसे पाठवणार ज्याला पैसे पाठवायचे आहे. त्याच्या नावाचा ड्राफ्ट काढून देण्याची विनंती करतो. पैसे पाठवणार ज्याला पैसे पाठवायचे आहे. त्याच्या नावाचा ड्राफ्ट बँकेला काढून देण्याचे सांगतो. बँक त्याच्या विनंतीनुसार पैसे घेणाऱ्याचे नाव लिहुन तो पैसे ज्याठिकाणी घेणार आहे. त्यास्थळी आपली जी शाखा असेल किंवा ज्या बँकेबरोबर समज (समन्वय) साधली गेली असेल त्या बँकेला पैसे चुकविण्याचा

हुकूम करते. ड्राफ्ट A/c Payee असल्याने ज्याच्या नावाने लिहीलेला असेल त्याच्याच खात्यात जमा होते. अशा ड्राफ्ट चेकप्रमाणे रिटर्न होण्याची शक्यता नसते.

**3.4.2 बँकर्स चेक (Pay Order) :** बँक ड्राफ्टसारखी कित्येक सेवा देते. ज्यामध्ये एक बँकर्स चेक ही सेवा आहे. बँकेने स्वीकारलेल्या रकमेच्या बदल्यात जो चेक देतो. त्याला पे-ऑर्डर असे म्हणतात. बँकद्वारा इस्यु करण्यात आलेली अशी Pay-Order त्याच शहरात किंवा गावात वटविता येते. इतर शहर किंवा गावात वटविता येत नाही.

**3.4.3 रीयल टाईम ग्रोस सेटलमेन्ट : RTGS (Real Time Gross Settlement) :**

RTGS चा सभासद बँकेमधून पैसे भारतातील अन्य कोणत्याही RTGS चा सभ्य असणाऱ्या बँकेत पाठविण्याच्या पद्धतीला RTGS असे म्हणतात.

RTGS चे सभ्यपद धारण करणाऱ्या सर्वच बँक शाखाची ओळख IFSC कोड द्वारे होत असते. जो अकरा आंकडयांचा आल्फा न्युमेरीक स्वरूपात असतो. IFSC कोड IDRBT (Institute for Development and Research on Banking Technology) हैद्राबाद द्वारा फाळवीण्यात येतो. रीयल टाईम ग्रास सेटलमेन्ट ही भारतातील कोणत्याही बँकेतुन भारतातील अन्य बँकेत पैसे पाठविण्याची पद्धत आहे. या पद्धतीत रीयल टाईम त्याच वेळेस तसेच ग्रास सेटलमेन्ट म्हणजे व्यवहारा प्रमाणे जमा किंवा उधार होते त्याला RTGS असे म्हणतात.

RTGS मध्ये भारतातील एका बँकेच्या खातेदाराची रक्कम भारतातील अन्य कोणत्याही बँकेच्या खातेदाराच्या खात्यात जमा करण्यात येते. या पैशांचा रोकड व्यवहार करण्यात येत नाही. म्हणून ग्राहक आणि लाभार्थी दोघांचे बँकेत खाते असणे आवश्यक आहे. दोन्ही बँकाकडे IFSC (Indian Financial System Code) कोड असणे जरुरीचे आहे. RBI द्वारे RTGS पद्धतीत दोन लाख किंवा त्यापेक्षा जास्त रक्कम जमा करण्याची सेवा दिली जाते. यापध्दती ज्यादिवशी रक्कम जमा करण्याची सुचना ग्राहकाकडुन देण्यात येते त्याचदिवशी रक्कम ग्राहकाच्या खात्यात उधार करून त्याने सांगितलेल्या व्यक्तिच्या खात्यात जमा करण्यात येते.

RTGS मध्ये दोन लाखापेक्षा जास्त रकमेची फेरबदली करण्यात येते. या पद्धतीत पैसे पाठवणाऱ्या ग्राहकाकडून कमिशन घेण्यात येते. परंतु Inward RTGS म्हणजेच पैसे मिळविणाऱ्या लाभार्थ्याकडून कोणत्याही प्रकारचे कमिशन घेण्यात येत नाही.

**3.4.4 नॅशनल इलेक्ट्रानिक फंड ट्रान्सफर : NEFT (National Electronic Fund Transfer) :**

NEFT ची मेबंरशिप असणाऱ्या बँकेतुन फंड भारतदेशातील अन्य NEFT ची मेबंरशिप धारण करणाऱ्या बँकेत ट्रान्सफर करण्याच्या पद्धतीला NEFT असे म्हणतात.

RTGS प्रमाणेच ही पण नाणाकीय चुकविण्याचा एक प्रकार आहे. याप्रकारची व्यवस्था पण ऑनलाईन करण्यात येते. यासाठी IFSC कोड देण्यात येतो. याप्रकारच्या व्यवहारामध्ये फंड ट्रान्सफर करण्याच्या रकमेची कोणतीही मर्यादा नाही. याप्रकारच्या व्यवहारामध्ये जास्तीत-जास्त रक्कम ₹ 2 लाख ट्रान्सफर करण्याची प्रक्रीया Batch प्रमाणे होते. RBI द्वारे प्रत्येक तासाला Batch मध्ये याप्रकारच्या व्यवहारामध्ये परतफंड होते. या प्रकारच्या व्यवहारात जमा रक्कम मिळविण्याची प्रक्रिया त्या दिवसापासून जास्तीत-जास्त 48 तासात होत असते.

येथे व्यवहार DNS (Different Net Settlement) पद्धतीने बैच प्रमाणे सेटल होत असते. बेचच्या एका मेसजमध्ये जास्तीत-जास्त 10 व्यवहार असतात.

**IFSC CODE :** NEFT चे सभ्यपद धारण करणाऱ्या सर्व बँकाच्या शाखेची ओळख IFSC कोडने होत असते. जो आकरा आकड्यांचा आल्फा न्युमेरिक स्वरूपाचा असतो. यापध्दती पैसे पाठविणाऱ्या ग्राहकांकडून कमिशन घेण्यात येते. परंतु Inward NEFT म्हणजेच पैसे मिळाविणाऱ्या लाभार्थ्याकडून कोणत्याही प्रकारचे कमिशन घेण्यात येत नाही.

**₹ 50,000/- कॅशने NEFT करण्याविषयी :** ₹ 50,000 किंवा त्यापेक्षा कमी रक्कम कॅशने NEFT करता येते. तसेच वॉक ईन कस्टमरला देखील NEFT चा लाभ सर्वच शाखामधून मिळू शकतो.

**3.4.5 बँक ऑवरड्राफ्ट (Bank Overdraft) :** ज्या व्यापाऱ्याचे बँकेत चालु खाते असेल या चालु खात्यात असणाऱ्या जमा रकमेपेक्षा जास्त रकम काढण्याची सवलत देण्यात येते. त्याला बँक ओवरड्राफ्ट असे म्हणतात. व्यापारी स्वत:च्या किंवा अन्य जामीनगिरीवर ओवरड्राफ्ट मिळू शकतो. याप्रकारे मंजुर झालेल्या ओवरड्राफ्टच्या महत्तम रकमेमधून काढण्यात आलेल्या रकमेवर व्याज चुकवायचे असते.

**3.4.6 केश क्रेडीट (Cash Credit) :** व्यापाऱ्याता धंद्याच्या हेतूसाठी तसेच धंद्याच्या विकसासाठी धंद्यात असलेला मालाचा स्टॉक आणि घेणी रक्कम लक्षात घेवून कर्ज देण्यात येते. त्याला कॅश क्रेडिट असे म्हणतात. याप्रकारच्या कर्जात मालाचा स्टॉक बँकेकडे गहाण असतो. धंदेदारी एकम जितक्या प्रमाणात जितक्या कालावधीसाठी यापैशाचा उपयोग करेल तेवढ्या प्रमाणात नक्की केलेल्या दराने व्याज चुकवावे लागते.

**3.4.7 लोन ( कर्ज ) :** बँकेचे मुख्यकार्य ठेवी स्वीकारणे आणि कर्ज देणे हे आहे. बँक कमी व्याजदराने ठेवी स्विकारून जास्त व्याज दराने कर्ज देते. बँक व्यापाऱ्यांना वेगवेगळ्या पद्धतीने कर्ज देते. याप्रकारे व्यापारी किंवा ग्राहकाच्या विविध गरजा जशा की घराची खरेदी, फर्निचरची खरेदी, घराचे रिपेरींगे काम करणे, वाहन खरेदी किंवा धंद्याच्या विकासासाठी बँक कर्ज देत असते. हे कर्ज दिर्घकाळासाठी असेल आणि एकाचवेळेस देण्यात येत असेल तर त्याला लोन म्हणून ओळखण्यात येते. अशाप्रकारे दिलेल्या लोनचे पैसे परत यावे म्हणून स्थावर मालमत्ता जामीन म्हणून ठेवण्यात येते. अशा लोनची चुकवणुक लोन देतांना नक्की केलेल्या अटीनुसार करायचे असते.

**3.5 ई-बँकिंग**

**अर्थ :** ई-बँकिंग म्हणजे इलेक्ट्रानिक बँकिंग या व्यवस्थेमध्ये बँकेचे व्यवहार भौतिक स्वरूपा ऐवजी इलेक्ट्रानिक स्वरूपात होत असतात या बँकिंग प्रक्रियेचा विकास तीन प्रकारे पाहायवास मिळतो.

**( 1 ) परंपरागत प्रक्रिया :** बँकेचे कार्य परंपरागत प्रक्रियेने होत असल्यामुळे त्यात खातेदाराच्या खात्याची नोंद ठेवण्यासाठी लेजर ठेवण्यात येते. याशिवाय वाऊचर साभांळणे नमुन्याची सही चेक करणे वगैरे कार्य कोणत्याही यंत्राशिवाय करण्यात येते.

**( 2 ) नेटवर्कद्वारे कम्प्युटरशी जोडणे :** बँकेच्या कार्याची परंपरागत पद्धतीने होणाऱ्या प्रक्रियेमध्ये बँकेच्या एका शाखेतील कम्प्युटराना नेटवर्कने जोडण्यात येते. या कम्प्युटर्समधून एक कम्प्युटर सर्वर म्हणून ओळखण्यात येते. अशाप्रकारे एका शाखेतील सर्व कम्प्युटरची जोडणी करणे शक्य बनते. परिणाम स्वरूप बँकेची कार्य सरळ आणि जलदगतीने करणे शक्य झाले.

**( 3 ) इंटरनेटचा उपयोग :** बँकेतील कोम्प्युटर्सला इंटरनेटने जोडण्यात आल्यामुळे बँकिंग प्रक्रिया अतिशय सरळ आणि जलद झाली.

**3.5.1 इंटरनेट, कोर बँकिंग आणि मोबाईल बँकींग :**

बँकेचे, व्यवहार इंटरनेटद्वारे होतात. या प्रकारच्या व्यवस्थेसाठी बँकेने इ-कार्नर किंवा इ-गॅलरी सारखी व्यवस्था देखील सुरू केलेली आहे. या प्रकारच्या व्यवहारात बँक Unique Code (Password) ग्राहकांना देते या प्रकारात दोन पद्धतीने व्यवहार होत असतात : (1) नाणेकीय व्यवहार (Financial Transaction) आणि (2) बिननाणेकीय व्यवहार (Non-Financial Transaction).

**( 1 ) नाणेकीय व्यवहार :** या प्रकारच्या व्यवहारात बँक खातेदार स्वता:च्या खात्यामधून दुसऱ्या बँकेच्या खातेदाराच्या खात्यात रक्कम जमा करण्याच्या व्यवहाराला नाणेकीय व्यवहार असे म्हणतात. ज्यात टेलीफोन बील चुकवीणे, कर भरणे, अन्य प्रकारच्या चुकवणुकीचा समावेश होतो.

**( 2 ) बिननाणेकीय व्यवहार :** या प्रकारच्या व्यवहारात नाणेकीय व्यवहार होत नाहीत. परतु खातेदाराच्या बँकेतुन स्वता:चे स्टेटमेन्ट मिळविणे, चेकबुक रिकवेस्ट, PIN बदलणे, स्टॉप पेमेंट रिकवेस्ट, सारखे बिननाणेकीय व्यवहार करतात. इंटरनेटच्या उपयोगामुळे बँकेच्या कार्यात खालीलप्रमाणे सरळता शक्य बनली.

(1) कोर बँकिंग (2) ई-बँकिंग (3) मोबाईल बँकिंग

**( 1 ) कोर बँकिंगचा अर्थ :** कोर बँकिंगमध्ये CORE म्हणजे Centralized Online Real-time Exchange. बँकेच्या या व्यवस्थेत एकाच बँकेची सर्व जगातील सर्व शाखा जोडल्या जाऊ शकतात. बँकेच्या केंद्रीय सर्वरमध्ये त्या बँकेच्या सर्व शाखांच्या सर्व खातेदारांच्या खात्याची माहीती उपलब्ध असते. बँकेच्या कोणत्याही खातेदाराच्या व्यवहाराची नोंद रीयल टाईममध्ये केंद्रीय सर्वरमध्ये होते. केंद्रीय सर्वरमध्ये झालेला व्यवहारातील बदलाची नोंद बँकेतील सर्वच शाखामध्ये पाहता येते. कोणत्याही शाखेतील खातेदार त्याच्या खात्यातील व्यवहार या बँकेच्या कोणत्याही शाखेमधून करू शकतो. तो कोणत्याही शाखेमधून स्वता:च्या खातामधील रक्कम काढू शकतो, जमा करू शकतो, आणि अन्य व्यवहार देखील करू शकतो. आश्या प्रकारे खातेदार शाखेचा नाही परंतु बँकेचे खातेदार बनतो. ही प्रक्रीया एकाच बँकेच्या वेगवेगळ्या शाखेमधून, होऊ शकते. या प्रक्रीये मुळे बँक आणि ग्राहक दोघांच्या कार्याच्यावेळेत आणि खर्चात घट होते.

**( 2 ) ई-बँकिंग (Electronic Banking) :** वर्तमान काळात सर्वच बँका आणि त्यांच्या शाखा इंटरनेटच्या माध्यमाने एकाच सर्वर बरोबर जोडलेल्या असतात. त्यासाठी व्यक्तीचे खाते कोणत्याही शहरातील शाखेत असेल आणि तो अन्य स्थळाहुन किंवा अन्य शाखेमधून पैसे काढण्याची इच्छा किंवा पैसे भरण्याची इच्छा असेल तर ते करू शकतो. बँकानी विविध ठिकाणी त्याचे ई-कार्नर (E-Corner) बनविलेले असतात. ज्या द्वारे मशीनच्या मदतीने ए.टी.एम. कार्डद्वार स्वताच्या खात्यात पैसे काढू शकतो किंवा जमा करू शकतो. त्याच्या खात्यात असलेली शिल्लक जाणू शकतो. या प्रकारे व्यवहार होत असल्यामुळे बँक सर्वर बरोबर खातेदाराचा मोबाईल नंबर देखील कनेक्ट करून ठेवते त्यामुळे खात्यात रक्कम जमा झाली किंवा काढली तर त्याचा संदेश (मॅसेज) येऊन जातो. या व्यवस्थेमुळे व्यक्तीचे कार्य सरळ आणि जलद झाले आहे.

**( 3 ) मोबाईल-बँकिंग (Mobile Banking) :** मोबाईल बँकिंग ही अशी सेवा आहे. की ज्याद्वारा कोणत्याही बँकेत व्यक्तीगत रीत्या पोहचल्या शिवाय इलेक्ट्रानिक साधनांच्या मदतीने म्हणजे की इंटरनेटच्या सेवा जोडलेल्या मोबाईलच्या मदतीने जगतल्या कोणत्याही जागेवर आर्थिक व्यवहार होऊ शकतो. जसे की खात्यात असलेली जमा रक्कम किंवा बेलेन्स कळू शकतो. लाईट बील, टेलिफोन बिल, गॅस बिल तसेच करवेरा किंवा अन्य चुकवणी मोबाईल-बँकिंग द्वारे होऊ शकते. एका खात्यातुन दुसऱ्याच्या खात्यात रक्कम ट्रान्सफर करता येते. याप्रकारची सेवा मिळविण्यासाठी बँकला अर्ज करावा लागतो. त्यानंतर बँक Mobile Banking साठी Login ID आणि पासवर्ड देतो. याव्यवस्थेत सुरक्षितता ठेवणे फार जरूरी असते.

### 3.6 बँकसंबंधीत सेवा

**3.6.1 ATM :** यासेवेचे नाव Automated Teller Machine आहे. बँकेत खाते असणाऱ्या व्यक्तिला याप्रकारची सुविधा बँक देते. ग्राहक जरूर असेल तेव्हा स्वत:च्या खात्यातुन बँकेने नक्कि केलेली न्युनतमहुन जास्त आणि स्वत:च्या खात्यात जमा असेल त्यापेक्षा कमी रक्कम काढू शकते. त्याची मर्यादा पण नक्कि केलेले असते. याप्रकारच्या व्यवहारासाठी बँक ग्राहकाला ATM कार्ड देते. ज्यात ग्राहकला सिक्रेट पीन पण देण्यात येते. बँकेची अशी सुविधा असणाऱ्या शाखात दुसऱ्या बँकात हे कार्ड स्वीकारू शकेल तशी यंत्रे ठेवण्यात आलेली असतात. वर्तमान काळात अन्य बँकेच्या अशा यंत्रामधून पण पैसे काढता येवू शकतात. परंतु त्यासाठी थोडी जास्तीची रक्कम चुकवावी लागते.

**3.6.2 क्रेडीट कार्ड (Credit Card) :** विसाव्या शतकात बँकेने हे कार्ड मोठ्या पायावर सुरू केलेल आहे. खातेदार किंवा अन्य दुसरी व्यक्ति बँकेला अर्ज करून कार्डची मागणी करतो. बँक व्यक्तिच्या पतचा पद्धशिर अभ्यास करते. अभ्यासाच्या आधारे व्यक्तिगत किती रकमेपर्यंतचे कर्ज चुकविण्याची क्षमता आहे. ते नक्की करण्यात येते. त्या व्यक्तिला बँकेने नक्की केलेल्या पतच्या किंमतीचे क्रेडिट कार्ड देण्यात येते.

हे कार्ड धारण करणारी व्यक्ती वस्तूची खरेदी करताना कार्डमार्फत खातेदाराच्या खात्यात पैसे उधार आणि विक्रेतेच्या खात्यात पैसे जमा होते. निश्चित कालावधीनंतर हिशोब बँक पाठवून देते. कार्डधारकाने देखील निश्चित कालावधीत बँकेत निश्चित रक्कम भरायची असते.

**3.6.3 डेबिट कार्ड (Debit Card) :** डेबिटकार्डा द्वारे व्यवहार करण्याची व्यवस्था ज्या ठिकाणी असेल तेथे या कार्डाचा उपयोग करता येतो. डेबिट कार्डधारक स्वत:च्या खरेदीची चुकवणुक या कार्डाद्वारे करतो. यासाठी वस्तूची खरेदी करून दुकानदाराला हे कार्ड देण्यात येते. जितक्या रकमेची खरेदी करण्यात आली असेल. तितकी रक्कम कार्डधारकाच्या खात्यातुन उधार करण्यात येते. हे कार्डधारक स्वत:च्या खात्यात जितकी रक्कम जमा असेल तितकीच रक्कम वापरू शकतात.

**या प्रकरणात तुम्ही काय शिकलात ?**

**बँकेचा अर्थ :** रिझर्व बँकेच्या मते मागण्यात येईल तेव्हा लगेचच किंवा निर्धारीत मुदतीच्या शेवटी परत करण्याच्या अटीवर कर्ज देण्याच्या उद्देशाने बचती एकत्रीत करणाऱ्या संस्थेला बँक असे म्हणतात.

**बँकेची कार्य :** (1) मुख्य कार्य ठेवी स्वीकारणे, कर्ज देणे, गुंतवणुक करणे, आंतर बँकिंग व्यवहार करणे. (2) गौण कार्य, ग्राहकांचे आर्थिक व्यवहार सांभाळणे, परकीय चलनाशी संबंधीत व्यवहार करणे, पतपत्रे देणे, ट्रावेलर्स चेक देणे, ड्राफ्टची सेवा पुरविणे, बँकेशी निगडीत असलेल्या व्यक्तीच्या पतपात्रतेची माहीती देणे, खात्री देणारा दलाल म्हणून सेवा देणे या व्यतिरिक्त ATM, DEMAT, लॉकरची सेवा अशा विवीध सेवा पुरविणे.

**बँकेच्या खात्यांचे प्रकार :** (1) बचत खाते (2) चालु खाते (3) रीकरींग खाते आणि (4) मुदत बंद ठेव खाते या सारखे विवीध प्रकारचे खाते असतात.

**बँकेच्या सेवा :** बँक गुंतवणुक / कर्ज देणे, आणि ठेवी स्वीकारणे व्यतिरिक्त ग्राहकांच्या सेवेसाठी ड्राफ्ट इस्यु करणे RTGS, NEFT, बँक ओवरड्राफ्ट, कॅश क्रेडिट आणि लोन वगैर सारखी बँकिंगशी संबंधीत असेल अशी कार्य करत असते.

**ई-बँकिंग :** ई-बँकिंगमध्ये इन्टरनेट, कोरबँकिंग आणि मोबाईल बँकिंग सारख्या सुविधांचा समावेश होतो.

(1) ई-बँकिंगमध्ये बँकचा व्यवहार भौतिक स्वरूपाचा बदल्यात इलेक्ट्रानिक स्वरूपात होतो. याप्रकारच्या बैंक व्यवहार इन्टरनेट द्वारा किंवा मोबाईल बँकिंग द्वारा पण होत असतो. ज्यामध्ये नाणाकीय आणि बिननाणेकीय व्यवहाराचा समावेश होतो. (2) कोर बँकिंगमध्ये CORE म्हणजे Centralised Online Real-Time Exchange. बँकेच्या या व्यवस्थेमध्ये एकच बँकची संपूर्ण जगात असलेल्या तमाम शाखाशी जोडलेली असते. या व्यवस्थाच्यामुळे खातेदार ज्या शाखेचा सभ्य असेल त्या शाखा उपरांत तो बँकेच्या कोणत्याही शाखेत आपला व्यवहार करू शकतो.

**बँकशी संबंधित सेवा :** बँक ग्राहकाच्या सुविधासाठी ग्राहकांना ATM, क्रेडिट कार्ड आणि डेबिट कार्ड सारख्या बँकिंग संबंधित सेवा देत असते.

## स्वाध्याय

**1. खालील प्रश्नांची उत्तरे खरा विकल्प पसंत करून लिहा :**

(1) कोणत्या प्रकारच्या खात्यात जमा रक्कमेवर व्याज देण्यात येत नाही.

(A) बचत खाते (B) चालु खाते (C) रिकेरींग खाते (D) मुदत बंद ठेवी खाते

(2) या प्रकारच्या खात्यात निश्चित वेळेस निश्चित रक्कम जमा करणे सक्तीचे असते.

(A) बचत खाते (B) चालु खाते (C) रिकेरींग खाते (D) मुदत बंद ठेवी खाते

(3) ठेवीच्या कोणत्या खात्यावर बँक सर्वात जास्त व्याज देते.

(A) चालु खाते (B) मुदत बंद ठेवी खाते (C) रिकेरींग खाते (D) बचत खाते

(4) भारताच्या मध्यवर्ती बँकेचे नाव काय आहे ?

(A) स्टेट बँक ऑफ इंडिया (B) सेन्ट्रल बँक ऑफ इंडिया

(C) रिझर्व बँक ऑफ इंडिया (D) बँक ऑफ इंडिया

(5) ओवरड्राफ्टची सवलव निश्चित कालावधीसाठी करण्यात येते तेव्हा ते कोणत्या नावाने ओळखले जाते.

(A) पे-आर्डर (B) केश क्रेडिट (C) डिमांड ड्राफ्ट (D) ओवरड्राफ्ट

(6) बँक स्वत:चे देणे चुकविण्यासाठी जे चेक देते त्याला काय म्हणतात ?

(A) ट्रावेलर्स चेक (B) पे-आर्डर (C) डिमांड ड्राफ्ट (D) केश क्रेडिट

(7) प्रवासामध्ये रोकड रक्कम घेवुन जाण्यासमोर बँकेच्या कोणत्या सेवेचा लाभ घेण्यात येतो ?

(A) डिमांड ड्राफ्ट (B) चेक (C) पे-आर्डर (D) ट्रावेलर्स चेक

(8) RTGS मध्ये कमीत कमी किती रकमेची फेरबदली होऊ शकते ?

(A) कितीपण (B) 2 लाख (C) 5 लाख (D) 50,000

(9) या प्रकारच्या व्यवहारात मध्यवर्ती बँक Batch प्रमाणे व्यवहार करते.

(A) NEFT (B) RTGS (C) CORE Banking (D) Call Money

(10) बँका-बँकामधील परस्पर व्यवहार करून त्यांच्यामध्ये तत्काळ निर्माण होणाऱ्या नाणेकीय समस्याचे निवारण कोणाद्वारे होते.

(A) कॉलमनी (B) पे-आर्डर (C) ओवरड्राफ्ट (D) कॅशक्रेडिट

(11) NEFT मध्ये जास्तीत जास्त किती रक्कम फेरबदली होवू शकते ?

(A) कितीही (B) 2 लाख (C) 5 लाख (D) 50,000

(12) बँकेकडून ग्राहकाला त्याच्या पतच्या आधारे कोणते कार्ड देण्यात येते?

(A) डेबिट कार्ड (B) क्रेडिट कार्ड (C) पतपत्र (D) डिमांड ड्राफ्ट

**उत्तरे :** (1) (B) (2) (C) (3) (B) (4) (C) (5) (B) (6) (B) (7) (D) (8) (B) (9) (A) (10) (A) (11) (B) (12) (B)

**2. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे द्या :**

(1) बँकेचा अर्थ सांगा ?

(2) कोणत्या प्रकारचे खाते मात्र धंदाकीय एकमाच्या नावानेच उघडण्यात येते ?

(3) कोणत्या प्रकारच्या खात्यात एका महीन्यात पैसे काढण्याची संख्या मर्यादीत करण्यात येते ?

(4) NEFT मध्ये किती रक्कम किंवा त्यापेक्षा कमी रक्कमेचा रोख व्यवहार करू शकतो ?

(5) NEFT मध्ये पैश्यांची फेरबदलीला किती वेळ लागतो?

(6) कोणत्या प्रकारच्या कार्ड द्वारा खात्यात रक्कम जमा असेल तितकीच रक्कम वापरू शकतो ?

**3. खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे द्या :**

(1) ओवरड्राफ्ट म्हणजे काय?

(2) कॅशक्रेडिट म्हणजे काय ?

(3) ट्रॅव्हलरचा चेक समजवा.

(4) ई-बँकिंगमध्ये होणाऱ्या बिनआर्थिक (बिननाणेकीय) व्यवहाराचे दोन उदाहरण द्या.

(5) समजवा : (a) क्रेडिट कार्ड (b) डेबीट कार्ड (c) ATM

**4. खालील प्रश्नांची मुद्देशीर उत्तरे द्या :**

(1) थोडक्यात टीपा लिहा :

(a) कॉल मनी (b) कोर-बँकिंग (c) RTGS (d) NEFT (e) M-Banking

(2) खातेदार ज्या त्या बँकेचा शखेचा नाही परंतु बँकेचे खातेदार आहे - हे विधान समजवा.

**5. खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे द्या :**

(1) बँकेचे कार्य समजवा.

(2) बँक खात्याचे प्रकार समजवा.

## पारिभाषिक शब्द

| | | |
|---|---|---|
| भारतीय मध्यवर्ती बँक | : | RBI - Reserve Bank of India |
| शीघ्र चुकवणीकार यंत्र | : | ATM - Automated Teller Machine |
| तुमच्या ग्राहकाला ओळखा | : | KYC Know Your Customer |
| DEMAT | : | Dematerialized |
| RTGS | : | Real Time Gross Settlement |
| NEFT | : | National Electronic Fund Transfer |
| IFSC | : | Indian Financial System Code |
| IDRBT | : | Institute for Development and Research on Banking Technology |
| DNS | : | Different Net Settlement |
| CORE | : | Centralised Online Real time Exchange |
| PIN | : | Personal Identification Number |

●

# 4 माहितीसंचार, ई-कॉमर्स आणि आऊटसोर्सिंग (Communication, E-Commerce and Outsourcing)

**याप्रकरणात तुम्ही काय शिकाल ?**

4.1 माहितीसंचाराचा अर्थ आणि व्याख्या
- 4.1.1 अर्थ
- 4.1.2 व्याख्या

4.2 इन्टरनेटच्या अर्थ

4.3 ई-कॉमर्स
- 4.3.1 अर्थ
- 4.3.2 कार्यक्षेत्र
- 4.3.3 ई-कॉमर्सच्या सफल अमलबजावणीची साधने
- 4.3.4 ऑनलाईन व्यवहार
- 4.3.5 चुकवणीची प्रक्रिया
- 4.3.6 व्यवहाराची सलामती आणि सुरक्षा
- 4.3.7 आऊटसोर्सिंग
- 4.3.8 B.P.O.ची संकल्पना गरज आणि कार्यक्षेत्र
- 4.3.9 K.P.O.ची संकल्पना गरज आणि कार्यक्षेत्र

**प्रस्तावना**

वर्तमान परिस्थितीत धंद्यात स्पर्धेचे प्रमाण खुप वाढले आहे. या स्पर्धेच्या युगात धंद्याच्या विकासासाठी मानवसंशाधनासारखे घटक महत्त्वाचे बनले आहेत. स्पर्धेत टिकून राहाण्यासाठी उच्च गुणवत्ता असणाऱ्या वस्तू, वस्तूची कमी पडतर किंमत मालाची जलद ने-आण तसेच ग्राहकांना जास्तीत जास्त चांगल्या सेवा वगैरे बाबी धंदाकीय एकमासाठी महत्त्वाच्या आहे. माहितीसंचाराच्या साधनाद्वारे माहिती संचाराची प्रक्रिया धंदेकीय एकमासाठी अत्यंत आवश्यक बनली आहे. धंदेकीय एकमाचे अन्य एकम तसेच ग्राहकाबरोबरच्या व्यवहारासाठी ई-कॉमर्सची व्यवस्था असित्वात आली आहे. इतकेच नाही परंतु धंद्यातील आंतरीक कार्य बाह्य स्रोतद्वारा सरळतेने होऊ शकेल त्यासाठी आऊटसोर्सिंग देखील धंद्याची गरज बनली आहे.

**4.1 माहितीसंचाराचा अर्थ आणि व्याख्या**

**4.1.1 अर्थ :** माहितीसंचार म्हणजे प्रत्यायन प्रत्यायनासाठी इंग्रजीमध्ये Communication शब्दाचा उपयोग होतो Communication शब्द लॅटीन भाषेतील दोन शब्द Communis आणि 'Communicare' वरून घेण्यात आला आहे. ज्याचा अर्थ To Share Common असा होतो. प्रत्यायनाच्या अर्थात कालांतराने पुष्कळ परीवर्तन आले आहे. ज्यामुळे आज प्रत्यायना चा अर्थ विशाल झाला आहे.

आदिमानव संकेत आणि हावभावाने अशाब्दीक प्रत्यायन करत होते. त्यानंतर बोलण्याच्या स्वरूपात भाषेचे उपयोग माहितीसंचारमध्ये होऊ लागला. विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या विकासामुळे भाषा आणि संज्ञेच्या उपयोगाने प्रसारणच या विवीध माध्यमाद्वारे माहीतीसंचार जलद आणि सरळ बनले आहे.

माहितीसंचार ही द्विमार्गी प्रक्रीया आहे. माहितीसंचार मध्ये माहीतीला एका स्रोताकडुन घेवुन दुसऱ्याला पोहचविण्याची प्रक्रीया आहे. या प्रकीयेत माहीती पाठविणाऱ्या द्वारे माहीतीला ज्या त्या स्वरुपात एकत्रीत करून योग्य माध्यम किंवा मार्गाद्वारे पाठविण्यात येते. माहीती मिळवीणारा संदेशाचे अर्थघटन करून त्याचा प्रतीसाद देतो. अशाप्रकारे माहिती संचारमध्ये माहीती, सकल्पना, संवेदना, भावना, किंवा सुचनाचे दोन किंवा त्यापेक्षा जास्त व्यक्तीमधील आदान-प्रदान.

माहितीसंचारमध्ये जेव्हा संदेश शब्दाद्वारा म्हणजेच भाषेच्या उपयोगा द्वारा रजु होतात तेव्हा ते शाब्दीक माहीती संचार बनते. शाब्दीक माहीतीसंचारमध्ये माहिती लेखीत किंवा तोडी असु शकते. शाब्दीक माहितीसंचार मध्ये शब्दाची योग्य पसंती आणि वाक्यातील त्याचे स्थान देखील खुपच महत्त्वाचे आहे. म्हणून वाक्यापासून मिळणाऱ्या संदेशाला निश्चित अर्थ मिळतो. संदेशाची रचना करतांना Keep it Short and Sweet हा सिद्धांत अनुसरावा लागतो. संदेश संक्षीप्त आणि सरळ असला पाहीजे.

माहीतीसंचारमध्ये शब्दरहीत माहीती पाठविण्यात आणि मिळविण्यात येते. तेव्हा ते अशाब्दीक माहितीसंचार होते. या प्रकारच्या माहीतीसंचारमध्ये माहितीची देवाण-घेवाण इशारे शारीरीक अभिव्यक्ती, शारीरीक मुद्रा, चेहऱ्याचे हावभाव, डोळ्यांचे इशारे आणि कलात्मक पद्धतीने म्हणजे की वाद्य, गायन, नृत्य, शिल्पकाम, चित्रे, नकाशा, तोफांची सलामी सायरन वगैर द्वारे होते.

**4.1.2 माहितीसंचारची व्याख्या :**

- विचार अभीप्राय किंवा माहितीला वक्तव्य, लिखान, किंवा संज्ञा द्वारे संदेशाची देवाण-घेवान होणे म्हणजेच माहिती संचार.
- माहितीसंचार म्हणजे लोकांमध्ये होणारी अशी प्रक्रीया आहे की ज्यात माहिती पाठविणाऱ्याचे ज्ञान, विचार, संकल्पना, समजदारी, संवेदना, भावना, किंवा वळणा विषईच्या माहितीचे योग्य संकेता द्वारे योग्य माध्यमातुन होणारे प्रसारण आहे.
- माहिती मिळणाऱ्याला प्रभावीत करते, त्याच्या वागणुकीत परिवर्तन होते, त्याच्या बरोबर संबंध निर्माण करते आणि टिकवुन ठेवते.
- माहितीसंचार म्हणजे आपले विचार दुसऱ्याच्या डोक्यात दाखल करण्याची प्रक्रीया.

**माहितीसंचाराची प्रक्रिया :**

**माहिती :** आधारसामुग्री (Data) वर प्रक्रीया केल्यानंतर मिळणाऱ्या निष्कर्षाला माहिती असे म्हणतात. उदाहरण म्हणून जर एका वस्तूचे पाच स्थळावरून भाव घेण्यात आले तर भाव हा Data आहे. परंतु त्यात सर्वात कमी भाव, सर्वात जास्त भाव सारखा तपशील ही माहिती आहे.

**प्रक्रिया :** या माहितीसंचारमध्ये माहितीच्या देवाण-घेवाणसाठी प्रक्रीयाचे टप्पे खालीलप्रमाणे.

**( 1 ) संदेश निर्मिती :** माहितीच्या अदान-प्रदान प्रक्रीयेत संदेशाची रचना करण्यात येते. संदेश तोंडी, लेखीत शाब्दीक किंवा अशाब्दीक असतात. उदा. राजकोटहुन रात्री 8 वाजल्यानंतर बडोदयाला जायचे आहे. यासाठी माहितीसंचारच्या प्रक्रीयेचे टप्पे खालीलप्रमाणे.

**माहितीसंचारच्या प्रक्रीयेचे टप्पे**

| टप्पा-1 | | टप्प्याची समजुती | उदाहरण : **राजकोटहुन रात्री 8-00 वाजल्या नंतर बडोदयाला जाण्यासाठी बस किती वाजता मिळेल. अश्या प्रश्नाची माहीतीसंचार प्रक्रीया** |
|---|---|---|---|
| ( 1 ) | **संदेशाची निर्मिती** | माहितीच्या अदान-प्रदान प्रक्रीयेत संदेशाची रचना करण्यात येते. संदेश तोंडी, लेखीत शब्दीक किंवा अशाब्दीक असतात. | राजकोटहुन रात्री 8-00 वाजल्यानंतर बडोदयाला जायला बस किती वाजता मिळेल ? अश्या प्रश्नाची रचना करण्यात येते. |
| ( 2 ) | **माध्यमाची निवड** | संदेशाची रचना केल्यानंतर संदेश पाठविण्यासाठी प्रत्यक्षात किंवा माहितीसंचारच्या साधनां पैकी कोणतेही एक अथवा एकापेक्षा जास्त माध्यमांची पसती करण्यात येते. | संदेश पाठविण्यासाठी टेलीफोन या माध्यमाची पसंती करण्यात येते. |
| ( 3 ) | **संदेश पाठविणे** | संदेशाची रचना आणि माध्यमाची पसंती केल्यानंतर संदेश पाठविण्यात येतो. | टेलीफोन द्वारे राजकोट हुन 8-00 वाजल्यानंतर बडोदयाला जाण्यासाठी बस केव्हा मिळेल असे. |
| ( 4 ) | **संदेश स्वीकारणे** | संदेश पाठविणारा संदेश पाठवितो तेव्हा संदेश मिळविणारा संदेशाचा स्वीकार करतो. | टेलीफोन द्वारे राजकोट 8-00 वाजल्यानंतर बडोदयालया जाण्यासाठी बस केव्हा मिळेल असे विचरण्यात येते. |
| ( 5 ) | **संदेशाचे अर्थघटन** | संदेश पाठविणारा संदेशात अशा भाषेचा आणि शब्दाचा उपयोग करतो ज्यामुळे संदेश स्वीकारणारा त्याचे योग्य अर्थघटन करू शकतो. | संदेश पाठविणारा राजकोटहुन 8-00 वाजल्यानंतर बडोदयाला जायला बस केव्हा-मिळेल असे विचारतो तेव्हा संदेश स्वीकारणारा रात्री 8-00 वाजल्यानंतर बडोदयाला जाण्यासाठी बस मिळेल असे समजु शकतो. |
| ( 6 ) | **संदेशाचे प्रत्युत्तर** | संदेश स्वीकारनारा संदेशाचे योग्य अर्थघटन करून त्याला प्रत्युत्तर देतो. | संदेश स्वीकरणारा राजकोटहुन रात्री 8-00 वाजल्यानंतर बडोदयाला जाणारी बस केव्हा मिळेल त्याचे प्रतीउत्तर देईल. |

**4.2 इन्टरनेटचा अर्थ**

इन्टरनेट हा शब्द इन्टरकनेक्शन आणि नेटवर्क चा दोन शब्दावरून आलेला आहे. इन्टरनेटचा अर्थ इन्टर म्हणजे आंतरिक आणि नेट म्हणजे जाळे अशा प्रकारे इन्टरनेट म्हणजे आंतरिक जाळे. इन्टरनेट हे विश्वातील सर्वात मोठी कॉम्प्युटर संचालीत पद्धत आहे. जीचे दुसरे नावे जसे की धनेट, इन्फारमेशन सुपर हाइवे, सायबर स्पेस वगैरे आहेत.

कॉम्प्युटरच्या समूहाला माहिती आणि संसाधनांच्या संयुक्त उपयोगाच्या उद्देशाने एकमेकांशी जोडण्यात आले तर त्याला नेटवर्क असे म्हणतात. यासाठी ते हार्डवेर आणि सोफ्टवेरने जोडलेले असले पाहीजेत. अशाप्रकारे दोन किंवा दोना पेक्षा जास्त कॉम्प्युटर्स मधील आंतरगत जोडणी धारण करणाऱ्या तंत्राला नेटवर्क असे म्हणतात. हे कॉम्प्युटर्स एखादया ईमारतीत एका रुममध्ये जवळ जवळ असतील. विस्तृत जागेत पसरलेल्या वेग वेगळ्या ऑफीसात असतील, दुरदुरच्या स्थळी देखील असू शकतात. आशाप्रकारे नेटवर्कचा विस्तार जवळ जवळच्या कॉम्प्युटर्स पासून विश्वातील विस्ताराला सामावुन घेतो. कॉम्प्युटर्सच्या नेटवर्कचे नेटवर्क म्हणजे इन्टरनेट. इन्टरनेटची मालकी कोणीच धारण करत नाही. कित्येक अशा संस्था आहेत की ज्या नेटवर्कच्या विविध भागाचे व्यवस्थापणात मदत करतात. कॉम्प्युटर नेटवर्कचे मुख्य चार प्रकार आहेत ज्यात.

(1) LAN (Local Area Network) म्हणजे एका निश्चीत स्थळावरील कॉम्प्युटर्स एकमेकांशी वायरने किंवा वायरी शिवाय जोडलेले असतात.

(2) CAN (Campus Area Network) म्हणजे की कॅम्पसमधील कॉम्प्युटर्स एकमेकांशी जोडलेले असतात.

(3) MAN (Metropolitation Area Network) म्हणजे की एका शहरातील कॉम्प्युटर्स एकमेकांशी जोडलेले असतात.

(4) WAN (Wide Area Network) म्हणजे कोणतीही भौतीक सीमा नसेल अशा प्रकारे वैश्वीकरीत्या कोम्प्युटर्स एकदुसऱ्याशी जोडलेले असतात. अशाप्रकारे या वेगवेगळ्या प्रकारच्या नेटवर्कला इन्टरनेट असे म्हणतात. वाईड एरिया नेटवर्कला दोन विभागात विभागण्यात येते :

(1) एन्टरप्राईझ वेन (2) ग्लोबल वेन

**(1) एन्टरप्राईझ वेन :** एकच मोठ्या संस्थेच्या विशाल रीत्या पसरलेल्या कॉम्प्युटर्सचे नेटवर्क आहे. जे विविध स्थळांच्या स्थीर कोम्प्युटर्सच्या नेटवर्कचे नेटवर्क आहे. जे संस्थेसाठी उभे करण्यात आलेले नेटवर्क आहे. अशा नेटवर्कला इन्ट्रोनेट म्हणून ओळखण्यात येते. उदाहरण म्हणून भारतीय रेल्वे संपुर्ण देशातील त्यांचा ऑफीसातील कॉम्प्युटर्सला या पद्धतीने जोडले आहे.

**(2) ग्लोबल वेन :** हे विशाल नेटवर्क आहे. या नेटवर्कला भौगोलिक सीमा नाहीत. ते विविध देश आणि खंडामध्ये पसरलेले आहे. ते वेगवेगळ्या संस्थेच्या नेटवर्कचे सामुहीक नेटवर्क आहे. त्याला WWW (World Wide Web) असे म्हणतात.

वर्तमान कालावधीत इन्टरनेटची सेवा देणाऱ्या संस्थांनी टेलीफोनची आवश्यकता दुर करून स्वता:ची वेगळी संदेशव्यावहाराची व्यावस्था उभी केली आहे. अनेक प्रख्यात संस्थानी अनेक कॉम्प्युटर्सला परस्पर जोडुन त्याचे जाळे बनवुन या प्रकारे जोडलेल्या कॉम्प्युटर्स बरोबर माहीतीची देवाण-घेवाण करता येते. अशा प्रकारे इन्टरनेट म्हणजे कोणत्याही एका मध्यस्थ संस्थे द्वारे टेलीफोनच्या मदतीने (केबलच्या उपयोगाने) किंवा मदतीशीवाय संदेशव्यवहाराच्या उपग्रहाच्या मदतीने संदेश व्यवहारासाठी तयार केलेले कॉम्प्युटर्सचे जाळे.

इन्टरनेट द्वारे शब्द (Text), चित्र (Picture), दृश्य-श्राव्य (Audio Visual), तसेच दृश्य (Visual) तसेच श्राव्य (Audio), अंक (Numeric) वगैरे स्वरूपात असलेल्या माहीतीचे अदाण-प्रदान करता येते.

इन्टरनेट द्वारे तीन प्रकारचे मुख्य कार्य होतात :

**(1) अन्य व्यक्ती बरोबर संपर्क :** इन्टरनेट द्वारे आज ई-मेल च्या मदतीने जगातल्या कोणत्याही स्थळी असलेल्या व्यक्तीला जलदगतीने आणि सरळतेने संदेशाची देवाण-घेवाण करता येते. इन्टरनेट द्वारे विश्वभरातील उपभोक्ते सर्वच एकाच रूम मध्ये बसले आहेत अशा पद्धतीने गोष्टी करू शकतात.

**(2) माहितीची प्राप्ती :** इन्टरनेट द्वारे विश्वभरातील कॉम्प्युटर्स नेटवर्क द्वारे जोडले जातात म्हणून कोणत्याही क्षेत्रातील कोणत्याही विषयाची माहिती आपल्याला सरळतेने आणि जलदगतीने प्राप्त होऊ शकते.

**(3) अन्य कॉम्प्युटर सीस्टम बरोबर जोडाणी :** इन्टरनेटच्या प्रसारण माध्यमाचा उपयोग करून अन्य कॉम्प्युटर सीस्टीम बरोबर जोडणी मिळवीता येते. उदा. (a) बँकिंग सेवा ऑनलाईन प्राप्त झाल्या आहेत. (b) रेल्वेची टीकीट कोणत्याही स्थळाहुन मिळवीता येते. (c) गुजरात माध्यमीक आणि उच्चतर माध्यमिक बोर्ड द्वारे घेणाऱ्या परीक्षेमध्ये परीक्षा केन्द्राच्या निरीक्षणाचे कार्य इन्टरनेटच्या मदतीने करता येते.

**इन्टरनेटवर माहीती शोधणे :** इन्टरनेटवर आवश्यकती माहीती सरळतेने प्राप्त होते. ही माहीती शोधण्यासाठी प्रक्रीयाचे टप्पे खालील प्रमाणे.

**टप्पा 1 :** ब्राऊझरची पसंती

• इन्टरनेटवर इंटर झाल्यावर कोणत्याही इन्टरनेट ब्राऊझर खोलणे. उदा. FireFox

• आकृती 4.1 मध्ये तुम्हाला इन्टरनेट ब्राऊझर FireFox चे होमपेज उघडलेले दिसत आहे.




**आकृती 4.1**

**टप्पा 2 :** सर्च इन्जीनची पसंती.

• ब्राऊझरमध्ये सर्चबार वर सर्च इंजीनच्या वेबसाईटचे नाव लीहील्याने ज्या-त्या सर्च इंजीनचे होमपेज उघडेल. उदा. www.google.co.in लीहील्याने आकृती 4.2 मध्ये दर्शवील्याप्रमाणे google सर्च इन्जीनचे India चे होमपेज उघडेल.




**आकृती 4.2**

**टप्पा 3 :** आवश्यक माहीती सर्चबारमध्ये इंटर करते


• या सर्च इंजीनच्या होम पेजच्या सर्चबारमध्ये ज्या विषयाची माहीती हवी असेल ती माहीती सर्च टेक्सट बॉक्स मध्ये इंटर करावी. उदा. Lion विषईची माहीती. Lion टाईप करावे. तसे केल्यामुळे आकृती 4.3 प्रमाणे स्क्रीनवर दिसेल.




**आकृती 4.3**

**टप्पा 4 :** वेबसाईट पसंद करते.

• आकृती 4.3 मध्ये दर्शवीलेल्या पेजच्या सर्च बटनवर क्लीक केल्याने Lion विषई माहीती दर्शविणारी वेबसाईटची यादी दिसेल. जी आकृती 4.4 मध्ये दर्शवलेली आहे.





**आकृती 4.4**

**टप्पा 5 :** आवश्यक माहीती प्राप्त करते.

• Lion विषईच्या वेबसाईटच्या यादीमधून योग्य वेबसाईटवर क्लीक केल्याने जी-ती वेबसाईट उघडेल आणि वेबसाईट वर उपलब्ध असेल ती माहीती पाहवावयास मिळेल.

जर Lion च्या विवीध प्रकारच्या प्रतीमा पाहवयाच्या असतील तर स्क्रीन वर इमेजेश वर क्लीक केल्याने Lion च्या विवीध प्रतीमा आकृती 4.5 प्रमाणे पाहवयास मिळतील.




**आकृती 4.5**

या प्रकारे इन्टरनेटवर कोणत्याही क्षेत्रातील कोणतीही माहीती, टेक्स्ट/ईमेजेश किंवा विडियो सारख्या स्वरूपात विविध वेबसाईटसमधून प्राप्त होवुं शकते.

### 4.3 ई-कॉमर्स

**4.3.1 अर्थ :** ई-कॉमर्स (E-commerce) म्हणजे इलेक्ट्रानीक कॉमर्स. ज्यात इलेक्ट्रानीक उपकरणे तसेच माध्यमांचा उपयोग करून करण्यात येणारा व्यापार. या ई-कॉमर्स मध्ये व्यापाराच्या प्रक्रीया जसेकी खरेदी, विक्री, जाहीरात अन्य उत्पादना बरोबर तुलना, पैशाची फेरबदली वगैरे ईलेक्ट्रानीक उपकरणाद्वारे होत असते. यासाठी इन्टरनेट कॉम्प्युटर नेटवर्क, ई-मेल सेवा, बँक क्रेडीट कार्ड, डेबीट कार्ड सारख्या माध्यमाचा उपयोग करण्यात येतो.

ई-कॉमर्स मुळे धंदेकीय एकमान द्वारे खरेदी-विक्री मालाची डीलीवरी तसेच पैश्याची चुकवणुक वगैरे कार्य सरळ बनले आहेत. परिणाम स्वरुपे उत्पादन खर्च आणि विक्री वितरण खर्च कमी झाला आहे. ग्राहकांना खरेदी करण्यासाठी लागणाऱ्या वेळेत आणि खर्चात घट झाली आहे. असे ई-कॉमर्सचे विवीध फायदे आहेत.

ई-कॉमर्स मुळे परंपरागत व्यावसायाच्या पद्धतीच्या तुलनेत खरेदी-विक्रीची समग्र प्रक्रीया खुपच सरळ आणि जलद बनली आहे. ई-कॉमर्सच्या मदतीने कोणत्याही वेळेस आणि कोणत्याही ठिकानाहुन व्यवसाय करता येतो. इन्टरनेटच्या कारणामुळे बाजार प्रक्रीया, वितरण, फोन, टपाल, छापकाम सारख्या अनेक प्रवृत्तीच्या खर्चात घट झाली आहे. ई-कॉमर्समुळे मालाच्या खरेदी विक्रीसाठी लाब अंतरावर जावे लागत नाही. परीणामाने प्रवासाच्या वेळेत आणि खर्चात घट होते. ई-कॉमर्स चागल्या प्रकारच्या आणि अतिशय जलद ग्राहक सेवा पुरविते. इन्टरनेट द्वारे माहीती संचाराची प्रक्रीया जलद झाली आहे. ग्राहकां बरोबर सरळ संवाद होत असल्यामुळे उत्पादनाची किंमत, मालाची गुणवत्ता, तसेच अन्य प्रश्नाचे. निराकरण सरळतेने मिळविता येते. वस्तूसंबंधी सेवा आणि अडचणीचे निवारण अतीशय जलदगतीने शक्य झाले आहे.

**4.3.2 कार्यक्षेत्र :** ई-कॉमर्समध्ये समाविष्ट पक्ष आणि त्याद्वारे पुरविण्यात देणाऱ्या प्रवृत्या आणि सेवाच्या आधारे ई-कॉमर्सच्या सेवेचे कार्यक्षेत्र खालील प्रमाणे आहे.

(1) धंदा ते ग्राहक : B2C : (Business to Customer)

(2) धंदा ते धंदा : B2B : (Business to Business)

(3) ग्राहक ते ग्राहक : C2C : (Customer to Customer)

(4) ग्राहक ते धंदा : C2B : (Customer to Business)

**(1) धंदा ते ग्राहक : B2C : (Business to Customer) :** यात एका बाजुला व्यापारी आणि दुसऱ्या बाजुला ग्राहक असतो. इन्टरनेट द्वारे वेबसाईटच्या उपयोगाने जो व्यापारी ग्राहकांना त्यांच्या उत्पादन आणि सेवांची विक्री करतो. त्यांचा या प्रकारा मध्ये समावेश होतो. ग्राहक कोणत्याही स्थळाहुन कोणत्याही वेळेस पसंतीच्या वस्तू खरेदी करण्याची ऑर्डर देवु शकतो. विक्रेता स्वता:ची वस्तू कोणत्याही मध्यस्था शिवाय सरळ ग्राहकांना विक्री करतो. खरेदीदार हा स्वतंत्र ग्राहक आहे. ऑनलाईन खरेदी या व्यापाराचे उत्तम उदाहरण आहे. या प्रक्रीयेत खरेदी-विक्री जलद आणि सरळतेने होत असल्यामुळे ही पद्धत खुपच प्रचलीत आहे. वस्तूंची किरकोळ विक्री व्यातीरीक्त B2C मध्ये ऑनलाईन बँकिंग, परिवहन सेवा सारख्या अनेक सेवेचे समावेश करण्यात आला आहे.

**(2) धंदा ते धंदा : B2B : (Business to Business) :** या प्रकारात समावलेले दोन्ही पक्ष धंदादारी एकम किंवा व्यावसायीक असतात. आजच्या स्पर्धायुक्त युगात धंदेदारी एकमाला एक दुसऱ्यावर आवलंबुन राहवे लागते. B2B व्यापार या अवलंबनाला जास्त सरळ आणि परिणामकारक बनवीतो. स्वता: पुरवठादार, वितरक किंवा मध्यस्थांन बरोबर ई-संबंधाची स्थापना करतो. सामील झालेल्या व्यावसायीकां मध्ये जास्त पारदर्शकतेच्या कारणाने जास्त कार्यक्षमता प्राप्त करता येते. B2B च्या मदतीने व्यापाऱ्यांची सामान्य व्यावसायीक प्रवृत्ती जशा की पुरवठाचे व्यावस्थापन, मालाच्या साठ्याच्या यादीचे व्यवस्थापन, चुकवणुकीचे व्यवस्थापण, वगैरेच्या कार्यक्षमतेत वाढ होते.

**(3) ग्राहक ते ग्राहक : C2C : (Customer to Customer) :** या प्रकारच्या व्यावस्थेत ग्राहकांची ग्राहकासाठीची व्यापारी प्रवृत्ती जोडलेली आहे. वेबसाईटवर इन्टरनेटच्या उपयोग करनारे विक्रेते आमी खरेदीदार दोन्ही ग्राहक बनतात. कोणाच्याही मध्यस्थी शिवाय ग्राहकांना खरेदी-विक्रीची Online सुवीधा प्राप्त होते. या प्रकारचे उत्तर उदाहरण लीलावाची साईट (E-Auction) आहे. जर ग्राहकाला एखादी वस्तूविकायची असेल तर ती वस्तू तो लीलावाच्या साईटवर यादी स्वरूपात ठेवतो. आणि व्यक्ती त्याची किंमत सागतात. जास्त किंमत देणारा वस्तू खरेदी करतो. या व्यातीरीक्त olx.com, quicker.com मध्ये विक्रेता ग्राहक स्वता:च्या वस्तूची माहीती आणि विक्रीकिंमत जाहीर करतो. आणि खरीददार त्याच्या बरोबर वाटाघाटी केल्यानंतर खरेदी-विक्रीची प्रक्रीया होते.

**(4) ग्राहकते धंदा : C2B : (Customer to Business) :** या प्रकारच्या ई-कॉमर्स मध्ये ग्राहकाला परवडेल त्यापद्धतीने अथवा निश्चीत उत्पादन किंवा सेवेसाठी ग्राहक चुकवु शकेल त्या किंमतीला व्यापक श्रेणीत उत्पादन आणि सेवेंची पसंती मिळते. या प्रकारच्या सेवा किंवा उत्पादन करणारे धंदाकीय एकम उत्पादन किंवा सेवेसाठी स्वता:च्या अटी आणि किंमत सागतात. ही पद्धत भावताल मधील कालवधी कमी करते तसेच ग्राहक आणि धंदेकीय एकमाची परीवर्तनशीलता वाढवते. या पद्धतीत ग्राहकाद्वारे परतफेड नक्की करण्यात येते. ई-कॉमर्सची या व्यातीरीक्त देखील कित्येक अन्य व्यवस्था आहे. ज्यात सरकारला एक स्वायत्त अस्तीत्व मानले तर खालीलप्रमाणे व्यवस्था अस्तीत्वात येते.

(1) सरकार ते व्यावसाय (2) सरकार ते नागरीक (3) सरकार ते सरकार

**4.3.3 ई-कॉमर्सच्या सफळ आमंलबजावणीसाठी आवश्यक साधणे :** कोणताही धंदा सुरू करण्यासाठी सुरवातीला भांडवल, मानवसंसाधन आणि यंत्राची गरज असते. जेव्हा ई-कॉमर्समध्ये वरील साधनां अतिरिक्त संसाधनांची गरज असते ज्यात.

**(1) वेबसाईट :** वेबसाईट तयार करणे, तीचे संचालन करणे. तिची जपवणुक करणे आणि विकास करणे. वेबसाईट मध्ये वेब म्हणजे WWW (World Wide Web) जेव्हा साईट म्हणजे स्थळ. साध्या भाषेत वेबसाईट हे World Wide Web वरील पेढीचा पत्ता आहे. याशीवय वेबसाईटला कोणताही भौतीक किंवा भौगोलीक पत्ता नाही. परंतु ते पेढी द्वारे पुरविण्यात येणारी सर्वसामुग्रीचे ऑनलाईन उपलब्ध असेल असे संकलीत स्वरूप आहे.

**(2) इन्टरनेटशी जोडलेले कॉम्प्युटर :** ई-कॉमर्स मध्ये जे व्यापारी किंवा ग्राहक खरेदी-विक्री किंवा अन्य धंदाकीय प्रवृत्तीमध्ये जोडले जावेत त्यासाठी त्यांचे कोम्प्युटर्स इन्टरनेटच्या नेटवर्कने जोडलेले असले पाहीजेत.

**(3) क्रेडिट कार्ड किंवा डेबिट कार्ड :** ई-कॉमर्समध्ये खरेदी-विक्री करणारे व्यापारी एकदुसऱ्याच्या परिचीत नसतात म्हणून दोघां मध्ये पैश्यांच्या देवाण-घेवाणीचा प्रश्न निर्माण होतो. खरेदी करणारा खरेदीकरण्या पुर्वी पैसे चुकवीतांना जोखम अनुभवतो. जेव्हा विक्रेता पैसे मिळण्याच्या आधी माल देतांना जोखम अनुभवतो. ही समस्या क्रेडीट/डेबिट कार्ड दुर करते. याकार्डा द्वारे चुकवणुक अशा प्रकारे होते. की पैसे चुकवीण्याचा आदेश दिल्यानंतर सात दिवसाच्या पर्यंत चुकवणुक थांबविता येते. अशा प्रकारे हे कार्ड देखील ई-कॉमर्सच्या व्यवहारातील महत्त्वाचे साधण आहे.

**4.3.4 ऑनलाईन व्यवहार :**

**(1) खरेदी/विक्रीपुर्वीचा टप्पा :** ज्यात जाहीरात आणि माहिती प्राप्तीचा समावेश होतो.

**(2) खरेदी/विक्रीच्या अटी :** ज्यात किंमत निर्धारण आणि अटीचा समावेश होतो.

**(3) माल/पैशाची चुकवणी :** पहील्या आणि दुसऱ्या टप्प्यात माहितीचा प्रवाह जोडलेला आहे. जेव्हा या टप्प्यात वस्तू आणि पैशाच्या देवाण-घेवाणीचा समावेश होतो. इन्टरनेटच्या माध्यमा द्वारे ऑनलाईन, व्यवहार करण्यात आला तर प्रक्रीया जलद आणि कमी, खर्चात होते. ही संपुर्ण प्रक्रीया ग्राहकाच्या दृष्टीकोनातुन वर्णवण्यात आली आहे.

**(i) नोंदणी :** ऑनलाईन व्यवहारात खरेदी करण्याच्या आधी ग्राहकाने नोंदणी फार्म भरून नोंदणी करणे आवश्यक आहे. नोंदणी करणे म्हणजे विक्रेत्याकडे ऑनलाईन खाते उघडणे. ऑनलाईन व्यावहारात रजीस्ट्रेशन म्हणजे Sign Up करणे. ज्यासाठी ई-कॉमर्समध्ये खाते उघडणाऱ्याचे नाव पत्ता, फोन नंबर सारखी माहिती दयायची असते. या विषईचे व्यावहार करण्यासाठी पासवर्ड देखील देण्यात येतो. खात्याशी संबंधीत माहिती या पासवर्ड द्वारे सुरक्षीत करण्यात येते. त्यामुळे ज्या त्या खात्यात अन्य व्यक्ती प्रवेशु (लॉक-ईन) शकत नाही.

**(ii) ऑर्डर देणे :** ऑनलाईन खरेदी करतांना विविध वस्तू पसंत करून शॉपींग कार्ट मध्ये ठेवता येतात. (शॉपींग कार्ट हे ऑनलाईन खरेदी करतांना खरेदीनार द्वारा पसंद केलेल्या वस्तूची यादी आहे) या शॉपिंग कार्ट मध्ये खरेदीची यादी तयार केल्यानंतर त्याचा पुढील विकल्पात जाऊन पैसे चुकवीण्याचा विकल्प पसंत करता येतो.

**(iii) पैश्याची चुकवणी :** ऑनलाईन खरेदीमध्ये पैश्याची चुकवणी विविध प्रकारे होऊ शकते. जसेकी कॅश ऑनडीलीवरी चेक, नेटबँकिंग ट्रान्सफर, क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड, किंवा डिजीटल कॅश वगैरे.

**4.3.5 पैसे चुकविण्याची प्रक्रीया :** ऑनलाईन खरेदीमध्ये पैशाची चुकवणी विविध प्रकारे होऊ शकते.

**(i) कॅश ऑन डिलीवरी (COD) :** पैसे चुकवीण्याच्या या पद्धतीत ग्राहकाने खरेदी केलेल्या वस्तू त्याने मागवीलेल्या पत्यावर मिळतील तेव्हा त्याचे पैसे चुकवायचे असतात.

**(ii) चेक :** ऑनलाईन व्यापारी ग्राहकांनकडून चेक मिळविण्याची व्यवस्था देखील करू शकतो. वस्तूची खरेदी करणारी व्यक्ती विक्रेत्याला चेक देतो. वस्तू विकणारा व्यापारी या चेकचे पैसे त्याच्या खात्यात जमा झाल्यानंतर वस्तू पाठवितो.

**(iii) नेट बँकिंग ट्रान्सफर :** वर्तमान समयातील बँका इन्टरनेटच्या माध्यमा द्वारे पैशाची चुकविणी किंवा अदलाबदल करण्याची सुविधा देखील ग्राहकांना पुरवितात. याप्रक्रीयेत खरेदीदार चुकविण्याची होणारी रक्कम स्वताच्या बँकखात्यामधून ऑनलाईन विक्रेत्या व्यापाऱ्याच्या खात्यात ट्रान्सफर करतो. हे पैसे ट्रान्सफर झाल्यावर माल पाठविण्यात येतो.

**(iv) क्रेडिट कार्ड / आणि डेबिट कार्ड :** या प्रकारच्या कार्डाना प्लास्टीकचे पैसे म्हणून देखील ओळखण्यात येतात. हे कार्डस ऑनलाईन नाणेकीय व्यवहारांसाठी मोठ्या प्रमाणात उपयोगात घेण्यात येत आहेत. क्रेडिट कार्ड देणारी बँक कार्ड धारकला पतीवर खरेदी करण्याची सुविधा देते. कार्डधारकाने ऑनलाइन व्यापाऱ्याला चुकविण्याची रक्कम संबंधीत बँक चुकवून देते. नंतर नक्की केलेल्या कालावधीत कार्डधारक ही रक्कम बँकेला चुकवितो. कार्डधारकाला हप्त्यानी किंवा त्याच्या सवलती प्रमाणे निर्धारीत कालावधीत पैसे चुकविण्याची स्वतंत्रता असते.

डेबिटकार्ड धारण करणाऱ्या व्याक्तीला त्याच्या बँक खात्यात जमा रक्कमे इतकी ऑनलाईन खरेदी करण्याची सुविधा मिळते. डेबिटकार्डा मार्फत ऑनलाईन व्यवहार होत असतात तेव्हा लगेचच कार्डधारकाच्या बँक खात्यामधून तितकी रक्कम चुकवीली जाते.

**(v) डिजिटल कॅश :** हे एक प्रकारचे ईलेक्ट्रानिक चलन आहे. जे फक्त सायबर स्पेस (इन्टरनेट विश्व) मध्ये अस्तीत्व धारण करते. या प्रकारच्या चलणाचे कोणतेच भौतीक अस्तित्व किंवा स्वरूप नसते. परंतु बँक ग्राहकाच्या वास्तविक चलणाला

ईलेक्ट्रानीक स्वरूपात वापरण्याची सुवीधा पुरवीते. ग्राहकाला बँकेच्या गरजे प्रमाणे डिजिटल केश इतकी वास्तविक रक्कम चुकवायची असते. त्यानंतर ई-कॅशचे फार्म साभाळणारी बँक ग्राहकाला एक विशिष्ट साफ्टवेर पाठविते. ज्याद्वारे ग्राहकाच्या खात्यामधून डिजिटल केश मिळविता येते. ऑनलाईन खरेदीसाठी हे डिजिटल भांडवल वापरता येते.

**4.3.6 व्यवहारांचे रक्षण आणि सुरक्षा :** परंपरागत नाणेकीय व्यावहारांच्या तुलनेत ऑनलाईन व्यवहारात पुष्कळ धोके आहेत. ज्यांच्या परिणामाने व्यवहार करणाऱ्या व्यक्तीच्या आर्थिक प्रतीष्ठेत आणि मानसीक रीत्या नुकसान होऊ शकते. ई-कॉमर्स मध्ये सुरक्षेची बाब खुपच महत्त्वाची आहे. हे धोके तीन प्रकारचे असतात. (1) व्यवहारातील धोके (2) माहितीतील धोके (3) बौद्धीक संपत्ती आणि गुप्त माहीतीचे धोके.

**( 1 ) व्यवहाराच्या धोक्यासाठी सुरक्षा :** ऑनलाईन व्यवहारात ग्राहकाने ऑर्डर दिलेली नाही असे विक्रेता कळवितो. तर कधी ग्राहक स्वता: ऑर्डर दिली नाही असे कळवितो. या व्यतीरीक्त माल योग्यस्थळी पोहचला नाही अथवा योग्य गुणवत्तावाला नाही अश्या तक्रारी पाहवयास मिळतात हे धोके निवारण्यासाठी खात्याच्या नोंदणीच्या वेळेस योग्य ओळख आणि पत्त्याचा तपास करून तसेच ग्राहकाने सुस्थापीत विक्रीच्या वेबसाईट वरुनच खरेदी केली पाहीजे.

**( 2 ) माहिती संग्रहाच्या धोक्यासाठी सुरक्षा :** माहितीच्या संदर्भात अनेक धोके आहेत. खुबच महत्त्वाची माहिती स्वार्थाच्या उद्देशाने किंवा आनंदाच्या उद्देशाने चोरी किंवा बदलली जाते. तुम्ही वायरस किंवा हॅकींग या शब्दाशी परिचीत असाल. वायरस हा एक कॉम्प्युटर प्रोग्राम आहे. वायरस कॉम्प्युटर सीस्टममध्ये स्वताची नक्कल उभी करतो. आणि माहितीला नुकसान पोहचवितो. वायरस स्क्रीन परिणाम करतो. कॉम्प्युटरच्या कार्यात अडचणी निर्माण करतो. निर्धारीत माहितीच्या फाईलला नुकसान किंवा संपुर्ण सिस्टमला नुसकान पोह वीतो. हे धोके निवारण्यासाठी अॅन्टी-वायरस सोफ्टवेरचा उपयोग केला जातो.

**( 3 ) बौद्धीक सपत्ती आणि गुप्त माहितीच्या धोक्यासाठी सुरक्षा :** इन्टरनेट हा खुल्ला मंच आहे. एकावेळेस कोणतीही माहिती इन्टरनेटवर ठेवली गेली म्हणजे ती जाहीर होवुन जाते. ऑनलाईन व्यवहार करतांना दिली जाणारी माहीती जसीकी ईमेल, पत्ता, फोन नंबर, बँक खात्यांचा नंबर, पासवर्ड त्या व्यतीरीक्त धंद्याची कित्येक माहीती गुप्त ठेवणे जरुरीचे असते. या प्रकारच्या माहितीचा दुरउपयोग होण्याची पुरेपुर शक्यता असते. अमुक काळानंतर उपभोक्त्याने आपला पासवर्ड बदलत राहयला पाहीजे.

**4.3.7 आऊटसोर्सिंग :** धंदेकीय एकमाद्वारे कोणतेही कार्य, किरकोळ काम किंवा प्रक्रिया जेव्हा एखादया निश्चीत कालावधीसाठी वेगळ्या ग्रुपला कराराने सोपविण्यात येते. त्याला आऊटसोर्सिंग असे म्हणतात. धंदेकीय एकम स्वता:ची मुख्य प्रवृत्तीवर जास्त व योग्य प्रमाणात लक्ष केंद्रीत करू शकेल. यासाठी आऊटसोर्सिंग जरुरीचे आहे. त्यासाठी कंपनी गौण कार्याचे आऊटसोर्सिंग करते. आऊटसोर्सिंग कंपनीमध्ये किंवा कंपनीच्या बाहेर देखील करता येते.

**4.3.8 धंदेकीय प्रक्रीया/बाह्यस्त्रोत : BPO (Business Process Outsourcing) :**

**BPO ची संकल्पना :** BPO म्हणजे कंपनीचे विशीष्टकार्य किंवा प्रक्रीया पुर्ण करण्यासाठी बाहेरील कंपनी किंवा समुहाची करार आधारीत सेवा मिळवीणे. उदा. कॉलसेन्टर्स, किंवा डेटा ऐन्ट्रीचे कार्य ज्या कंपन्या आऊटसोर्सिंग करण्यासाठी इच्छुक असतील त्याचे मुख्य कार्य/हेतू खर्चावार नियंत्रण ठेवण्याचा असतो. आऊटसोर्सिंग प्रचलीत होण्याचे कार्य हे आहे की एकाच प्रकारच्या कार्यासाठी आवश्यक मानवशक्ती कित्येक देशात कमी दराने उपलब्ध होत असते. म्हणूनच भारत, चीन या सारख्या विशाल लोकसंख्या असणाऱ्या देशांना BPO साठी प्रथम पसंती मिळते.

**BPO ची आवश्यकता :** BPO कंपनीच्या कार्पोरेट कक्षेच्या कर्मचाऱ्यांना दैनदीन गौणकार्याच्या जबाबदारी मधून मुक्त करते. म्हणून हे कर्मचारी, उत्पादक कार्यात विशेष लक्ष देवू शकतात तसेच ग्राहकावर विशेष ध्यान केंद्रीत करु शकतात.

**( 1 ) खर्चात घट :** धंदादारी एकम बिलीग, खरेदी, डेटाएन्ट्री मार्केटिंग सर्वेक्षण सारखे फ्रन्ट ऑफीस सारखे कार्यांचे आऊटसोर्सिंग करून त्याचे खर्च कमी करु शकतात.

**( 2 ) कंपनीच्या मुख्य व्यावसायावर लक्ष :** धंदेदारी एकमानी रोजच्या कार्याचे आऊटसोर्सिंग केल्यामुळे संचालक मुख्य व्यवसायावर लक्ष केंद्रीत करु शकतात.

**( 3 ) कार्यकुशलतेचा लाभ :** धंदेदारी एकम कर्मचाऱ्यांची भरतीकरुन त्यांना प्रशिक्षीत करण्या ऐवजी आऊटसोर्सिंग करुन, गुणवत्तायुक्त कार्य करु शकतात.

**( 4 ) परिवर्तनशील मागतीला पोहचुन वळण्यासाठी :** BPO कंपन्या ग्राहकांच्या सतत बदलत असणाऱ्या मागणीला पोहचुन वळण्यासाठी विवीध सुविधा पुरवीतात.

**( 5 ) नफ्यात वाढ :** व्यापारी एकमाच्या केद्रस्थानी नसेल अशा कार्याचे आऊटसोर्सिंग करुन कंपनीच्या महत्त्वाच्या घटकावर विशेष ध्यान केंद्रीत करु शकतात. जसे की विक्रीत वाढ, नवीन उत्पादने विकासणे, व्यापाराचा विस्तार वाढविणे तसेच ग्राहकांच्या सेवा आणि संतोषामध्ये वाढ करते. परिणाम स्वरुप धंदेदारी एकमाच्या नफ्यात वृद्धी होते.

**BPO चे कार्यक्षेत्र :**

**( 1 ) बँक ऑफिस आऊटसोर्सिंग :** बिलीग, खरेदी, डेटाअेन्ट्री सारखे व्यापारातील आंतरीक कार्य करीत असतात.

**( 2 ) फ्रंट ऑफीस आऊटसोर्सिंग :** मार्केटींग किंवा तांत्रीक सहाय्य सारख्या ग्राहक संबंधी सेवाचा समावेश होतो.

**4.3.9 ज्ञान प्रक्रीया बाह्यस्त्रोत KPO (Knowledge Process Outsourcing) :**

**KPO ची संकल्पना :** KPO म्हणजे ज्ञानासंबंधीत प्रक्रीया आऊटसोर्सिंग मध्ये BPO मध्ये कार्यासंबंधीत प्रक्रीयावर लक्ष केद्रीत केले जाते जेव्हा KPO ची संकल्पना मुख्यत्वे ज्ञानाशी संबंधीत प्रक्रीयेवर लक्ष केंद्रीत करते. KPO मध्ये अशा प्रक्रीयांचा समावेश होतो की ज्यात उच्च गुणवत्तेचे ज्ञान आणि कुशलता अपेक्षीत असते. जी कंपनीच्या विकासाला जबाबदार असते.

**KPO ची आवश्यकता :**

**( 1 ) सर्वोत्तम कैशल्याची प्राप्ती :** KPO ची सेवा देणारी संस्था प्रशिक्षण आणि मानवशक्तीचा वापरामुळे उच्च कौशल्य धारण करते त्याचा लाभ धंदेदारी एकमाला कमी खर्चात मिळतो. KPO श्रेष्ठ तंत्रज्ञान, मानवसंसाधन आणि पद्धतीत जास्त गुंतवणुक करुन उत्तम परिणाम देतात. कार्याचा अनुभव असल्यामुळे त्यांना उच्च गुणवत्तेची निपुनता प्राप्त होते. कौशल्याची ही निपुनता धंदेदारी एकमाला कमी खर्चात जास्त लाभ देतात.

**( 2 ) स्त्रोताचा महत्त्म उपयोग :** प्रत्येक धंदेकीय, एकमात प्राप्त स्त्रोत मर्यादीत असतात. आउटसोर्सच्या कारणामुळे एकमांचे मानवसंसाधन मुक्त बनतात. त्याचा महत्तम उपयोग ग्राहकलक्षी प्रवृत्तीत करता येतो.

**( 3 ) कठीन समस्याचे निराकरण :** कित्येक कठीन समस्या की ज्यात उच्च गुणवत्तेच्या तांत्रीक ज्ञानाची गरज असते. अशा समस्याचे निराकरण आऊटसोर्सिंग द्वारे सरळतेने करता येते.

**( 4 ) मुख्य कार्यवर विशेष लक्ष :** आऊटसोर्सिंगच्या मदतीमुळे धंदेकीय एकम स्वत:च्या मुख्य कार्यावर विशेष लक्ष केद्रीत करु शकतो. जसेकी एक शाळा कॉम्प्युटर शिक्षण, कॅन्टीन सुवीधा, स्टेशनरी सुवीधा सारखे कार्य आऊटसोर्स द्वारा करतील तर मुख्य शैक्षणिक कार्यावर जास्त लक्ष देवु शकतात.

**( 5 ) पैश्याचा महत्तम उपयोग :** धंदेकीय एकमात कित्येक कार्यांचे आऊटसोर्सिंग करण्यात येत असेल तर कंपनीचे भांडवल अशा कार्यात गुतवीण्याची गरज राहत नाही. परिणामस्वरुप धंदेकीय एकम विकासासाठी अशा भांडवलाचा महत्तम उपयोग करु शकते.

**( 6 ) खर्चात घट :** आऊटसोर्सिंग प्रचलीत होण्याचे मुख्य कारणांमधून एक कारण म्हणजे खर्चात घट हे आहे. कंपनीच्या बाजार संशोधन, संशोधन विकास अशा कार्याचे आऊटसोर्सिंग केल्यामुळे धंधेकीय एकमाच्या खर्चात घट होते.

**( 7 ) धोक्यामध्ये घट :** वर्तमान परिस्थीतीत बाजार, स्पर्धा, सरकारी नीतीनियम आणि विवीध तंत्रज्ञानात खुपच अमुलाग्र परिवर्तन येत असते. धंदेकीय एकमांनी केलेली गुंतवणुक कालांतराने उपयोगात घेता येत नाही. आऊटसोर्सिंग मुळे या धोक्यामध्ये घट झाली आहे.

**KPO चे कार्यक्षेत्र :** KPO चे कार्यक्षेत्र खालीलप्रमाणे आहे :

(1) व्यापार आणि बाजार संशोधन (2) कायदेकीय सेवा (3) मेडीकल सेवा (4) प्रशिक्षण आणि मार्गदर्शन (5) संशोधन आणि विकास (6) कॉम्प्युटर प्रोग्रामींग (7) अेनिमेशन आणि डिझाईन

**या प्रकरणात तुम्ही काय शिकलात ?**

**माहीती संचाराचा अर्थ :** माहीती संचारमध्ये माहीती, संकल्पना संवेदना, लागणी आणि सुचनांचे दोन किंवा त्यापेक्षा जास्त व्यक्तीमधील आदान-प्रदान.

**व्याख्या :** माहीती संचार म्हणजे विचार अभिप्राय, किंवा माहितीचे वक्तव्य, लिखाण किंवा संज्ञा द्वारे संदेशाची देवाण घेवाण होणे.

**इन्टरनेटचा अर्थ :** इन्टरनेटमध्ये इन्टर म्हणजे आंतरीक आणि नेट म्हणजे जाळे अशाप्रकारे इन्टरनेट म्हणजे आंतरीक जाळे इन्टरनेट म्हणजे कॉम्प्युटरच्या समुहाला माहीती आणि संशोधनाच्या संयुक्त उपयोगासाठी एकमेकांची जोडण्यात येतात त्याला नेटवर्क असे म्हणतात अशा कॉम्प्युटर्सच्या नेटवर्कचे नेटवर्क म्हणजे इन्टरनेट.

**ई-कॉमर्सचा अर्थ :** ई-कॉमर्समध्ये सामावण्यात आलेले पक्ष आणि पुरविण्यात येणाऱ्या प्रवृत्या आणि सेवेंच्या आधारे ई-कॉमर्सच्या कार्यक्षेत्रात (1) धंदा ते ग्राहक (2) धंदा ते धंदा (3) ग्राहक ते ग्राहक (4) ग्राहक ते धंदा यांचा समावेश होतो.

**ई-कॉमर्सच्या सफळ आमंलबजावणी साठीचे आवश्यक साधणे :** ई-कॉमर्स द्वारे व्यापार करण्यासाठी (1) वेबसाईट, (2) इंन्टरनेटची जोडलेले कॉम्प्युटर, (3) क्रेडिटकार्ड किंवा डेबिटकार्ड सारख्या चुकवणीच्या साधनांनची गरज असते.

**ऑनलाईन व्यवहार :** ऑनलाईन व्यावहारामध्ये खरेदी-वीक्रीच्या पुर्वीचा टप्पाची प्रक्रिया झाल्यानंतर खरेदी किंवा विक्रीच्या टप्याची प्रक्रीया करण्यात येते. त्यानंतर माल आणि पैश्याच्या चुकवणीची प्रक्रीया करण्याय येते.

**पैसे चुकवीण्याची प्रक्रिया :** ऑनलाईन खरेदीमध्ये कॅश ऑन डीलीवरी, चेक, नेट-बॅंकिंग ट्रान्सफर, क्रेडीट कार्ड अथवा डेबिट कार्ड द्वारे पैसे चुकवीण्यात येतात.

**व्यवहाराचे रक्षण आणि सुरक्षा :** ऑनलाईन व्यवहारमध्ये खालील प्रमाणे तीन प्रकारचे धोके असतात.

**(1) व्यवहाराचा धोका :** ज्यात मालाचा ऑर्डर दिलेला नाही, माल योग्य ठिकाणी पोहचला नाही, अथवा माल योग्य गुणवत्तावाला नाही अशा तक्रारी पाहवयाला मिळतात. अशा धोक्यातसाठी खात्याच्या नोदणीच्या वेळेस योग्य ओळख, पत्त्याची तपास तसेच ग्राहकाने देखील विश्वसनीय वेबसाईट वरून खरेदी केली पाहीजे.

**(2) माहिती संग्रहाचा धोका :** ऑनलाईन व्यवहारात वायरस द्वारे व्यवहाराच्या माहितीला नुकसान पोहचवीली जाते. या धोक्या पासून रक्षण मिळविण्यासाठी ॲन्टीवायरस सोफ्ट.

**(3) बौद्धीक संपत्ती आणि गुप्ततेचा धोका :** ऑनलाईन व्यावहारामध्ये ई-मेल, पत्ता, फोन नबर, बॅंक खाते नबर, पासवर्ड वगैरे माहीती गुप्त ठेवणे जरुरीचे असते. या माहितीची गुप्तता सांभळली जात नसेल तर त्याच्या दुरुपयोग होण्याची पुर्ण शक्यता असते. या धोक्यांसमोर रक्षण मिळवीण्यासाठी पासवर्ड बदलत राहीला पाहीजे.

**आऊटसोर्सिंग :** धंदेकीय एकमान द्वारे स्वताचे "मुख्य कार्य" किंवा "गौण कार्य" बाहेरच्या एखाद्या अेजन्सीद्वारे कंपनीमध्ये किंवा कंपनीच्या बाहेर करत असतील तर त्या कार्याला आऊटसोर्सिंग असे म्हणतात.

**BPO ची सकल्पना :** धंदेकीय एकमांना विशीष्ट कार्य किंवा प्रक्रीया पुर्ण करण्यासाठी बाहेरील कंपनी किंवा समुहा द्वारे करार आधारीत सेवा मिळविणे म्हणजे धंदेकीय प्रक्रीया बाह्यस्रोत.

**BPO ची आवश्यकता :** धंदेकीय एकम खर्चात कपात करण्यासाठी कंपनीच्या मुख्य व्यवसायावर लक्ष देण्यासाठी, बाहेरील कार्य कुशलतेचा लाभ मिळविण्यासाठी तसेच सतत बदलत असणाऱ्या परीवर्तनशील मागणीला पोहचुन वळण्यासाठी तसेच नफ्यात वाढ करण्यासाठी धंदेकीय प्रक्रीयामध्ये बाह्यस्रोतची आवश्यकता असते.

**BPO चे कार्यक्षेत्र :** BPO च्या कार्यक्षेत्रात बॅंक ऑफीस, आऊटसोर्सिंग तसेच फ्रंट ऑफीस आऊटसोर्सिंग सारख्या सेवेचा समावेश होतो.

**KPO ची संकल्पना :** धंदेकीय एकमांच्या बौद्धीक कार्यांसाठी प्रक्रीयापुर्ण करण्यासाठी बाहेरील कंपनी किंवा समुहाची करार आधारीत सेवा मिळवीणे म्हणजे ज्ञान प्रक्रिया बाह्यस्रोत. अशा प्रकारे KPO म्हणजे ज्ञानासंबंधीत प्रक्रीयाचे आऊटसोर्सिंग ज्यात उच्च कक्षेचे ज्ञान आणि कुशलतेचे आऊटसोर्सिंग करण्यात येते.

**KPO ची आवश्यकता :** धंदेकीय एकम सर्वोत्तम कौशल्य प्राप्त करण्यासाठी, स्रोताचा जास्त उपयोगासाठी, जटील समस्याचे निराकरण करण्यासाठी, मुख्य कार्यवर विशेष लक्ष केद्रीत करण्यासाठी, पैश्याचा महत्तम उपयोगासाठी, खर्चात घट करण्यासाठी, धोक्याचे प्रमाण कमी करण्यासाठी KPO ज्ञान प्रक्रिया बाह्यस्रोताची गरज असते.

**KPO चे कार्यक्षेत्र :** KPO च्या कार्यक्षेत्रात व्यापार आणि बाजार संशोधन, कायदेकीय सेवा, मेडिकल सेवा, प्रशिक्षण आणि मार्गदर्शन, संशोधन आणि विकास कॉम्प्युटर प्रोग्रामींग तसेच ॲनीमेशन आणि डिझाईन सारख्या सेवेचा समावेश होतो.

## स्वाध्याय

**1. खालील प्रश्नाची उत्तरे योग्य विकल्प पसंद करुन लिहा :**

(1) कोणत्या प्रक्रीये द्वारे उत्पादनाच्या किंमतीसाठी लीलाव करुन खरेदी-विक्रीची सुविधा पुरवीण्यात येते ?

(A) धंदा ते ग्राहक (B) धंदा ते धंदा (C) ग्राहक ते ग्राहक (D) ग्राहक ते धंदा

(2) रेल्वेची टीकीट देशभरात कोणत्याही स्थळावरुन मिळविता येते त्याला कोणत्या प्रकारचे नेटवर्क म्हणतात ?

(A) एन्टरप्राईझ वेन (B) LAN (C) MAN (D) CAN

(3) धंदेकारी एकम स्वताचे कार्य बाहेरच्या संस्थांना सोपाविते त्याला काय म्हणतात ?

(A) ई-कॉमर्स (B) आऊटसोर्सिंग (C) ई-मेल (D) नेट-बॅंकिंग

(4) दुसऱ्या व्यक्तिच्या मनात आवश्यक ती समझ निर्माण करण्यासाठीच्या समग्र प्रक्रीयेला काय म्हणतात ?

(A) संदेश (B) माहितीसंचार (C) ई-मेल (D) ई-कॉमर्स

(5) इन्टरनेटच्या माध्यम द्वारे कॉम्प्युटरच्या मदतीने कॉम्प्युटरच्या पडदयावर संदेश टाईप करून त्याची देवाण-घेवाण करण्याच्या प्रवृत्तीला काय म्हणतात ?

(A) ई-कॉमर्स (B) फॅक्स (C) इन्ट्रानेट (D) ई-मेल

(6) विजाणुयंत्र आणि माध्यमाच्या मदतीने होणाऱ्या वाणिज्याच्या विनिमय आणि वितरणाला काय म्हणतात ?

(A) ईन्ट्रानेट (B) ई-कॉमर्स (C) ई-मेल (D) इन्टरनेट

(7) माहितीचा सुपर हाय-वे म्हणून कोणाला ओळखण्यात येते ?

(A) इन्टरनेट सेवा (B) बँकींग सेवा (C) ई-कॉमर्स (D) आऊटसोर्सिंग

**उत्तरे :** (1) (C) (2) (A) (3) (B) (4) (A) (5) (D) (6) (B) (7) (A)

**2. खालील प्रश्नाची एका वाक्यात उत्तरे द्या :**

(1) माहिती संचारचा अर्थ सांगा ?

(2) एन्टरप्राईस वेन म्हणजे काय?

(3) कॉम्प्युटर्स नेटवर्क म्हणजे काय ?

(4) www पूर्ण रूप सांगा ?

(5) हेकिंग म्हणजे काय ?

**3. खालील प्रश्नाची थोडक्यात उत्तरे लिहा :**

(1) इन्टरनेटचा अर्थ द्या.

(2) ई-कॉमर्सचा अर्थ द्या.

(3) आउट सोर्सिंगचा अर्थ सांगा ?

(4) धंदेकीय प्रक्रियेत बाह्यस्त्रोत (BPO) ची आवश्यकत वर्णवा.

(5) ज्ञानप्रक्रियेत बाह्यस्त्रोत (KPO) चा अर्थ लिहा.

**4. खालील प्रश्नाची मुद्देसूद उत्तरे लीहा :**

(1) माहितीसंचार प्रक्रियेचे टप्पे समजवा.

(2) कॉम्प्युटर नेटवर्कचे मुख्य चार प्रकार समजवा.

(3) इन्टरनेटचे मुख्य तीन प्रकारचे कार्य समजवा.

(4) ई-कॉमर्सच्या सफल अंमलबजावणी आवश्यक साधणे वर्णवा.

(5) संक्षीप्त नोंद लिहा : (a) डिजीटल कॅश (b) व्यवहारचे रक्षण आणि सुरक्षा

**5. खालील प्रश्नाची सविस्तर उत्तरे लिहा :**

(1) इन्टरनेटवर माहिती शोधण्याच्या प्रक्रीयेचे टप्पे समजवा.

(2) ई-कॉमर्स सेवेची कार्यक्षेत्र समजवा.

(3) ऑनलाईन व्यवहाराच्या प्रक्रीयेचे टप्पे समजवा.

**पारिभाषीक शब्द**

| | | |
|---|---|---|
| प्रत्यायन-माहीतीसंचार | : | Communication |
| आंतरजाळे | : | Internet |
| LAN - | : | Local Area Network |
| CAN | : | Campus Area Network |
| MAN | : | Metropolitation Area Network |
| WAN | : | Wide Area Network |
| WWW | : | World Wide Web |
| COD | : | Cash On Delivery |
| BPO | : | Business Process Outsourcing |
| KPO | : | Knowledge Process Outsourcing |

●

# 5

# धंदेवाईक साहसांची स्वरूपे-1
# (Forms of Business Organisation-1)

**या प्रकरणात तुम्ही काय शिकाल ?**

5.1 वैयक्तिक मालकी
- 5.1.1 अर्थ
- 5.1.2 लक्षणे
- 5.1.3 फायदे
- 5.1.4 मर्यादा

5.2 हिंदू अविभक्त कुटुंब (HUF) द्वारे चालणारे धंदे
- 5.2.1 अर्थ
- 5.2.2 लक्षणे

5.3 भागीदारी
- 5.3.1 अर्थ
- 5.3.2 लक्षणे
- 5.3.3 फायदे
- 5.3.4 मर्यादा
- 5.3.5 भागीदारांचे प्रकार
- 5.3.6 भागीदारी पेढीचे प्रकार
- 5.3.7 भागीदारी पेढीची नोंदणी
- 5.3.8 भागीदारी करारपत्र

**प्रस्तावना**

काळाच्या बरोबरच मानवाच्या गरजा वाढल्या आणि त्याच्यांत विविधता आलेली आहे. मानव स्वत:च्या सर्व गरजा पूरविण्यात स्वत:च असमर्थ झाला आहे. त्याला दुसऱ्याच्या मदतीची गरज पडत असते. अशाप्रकारे विनिमयद्वारा व्यापाराची सुरूवात झाली. त्यानंतर समाजात एक असा वर्ग अस्तित्वात आला जो समाजाच्या वेगवेगळ्या मानवाच्या गरजा पूर्ण करण्यासाठी वस्तू, सेवा आणि पैश्यांची देवान-घेवान करण्यासाठी स्वत:चा वेळ आणि शक्तीचा उपयोग करू लागला. या वर्ग म्हणजे व्यापारी वर्ग होय. खरेदी आणि विक्रीच्या प्रवृत्तीसाठी त्याने एक वेगळी व्यवस्था केली. अशारीतीने धंदाकीय व्यवस्थामध्ये विविध स्वरुप जसे की वैयक्तिक मालकी, भागीदारी, हिंदू अविभक्त कुटूंब (HUF) द्वारे चालणारे धंदे, सरकारी मंडळी आणि जॉइन्ट स्टॉक कंपनी अशी स्वरुपे क्रमश: असित्वात येत गेले.

**5.1 वैयक्तिक मालकी (Sole Proprietorship)**

धंदाकीय व्यवस्थेच्या दुसऱ्या स्वरुप पेक्षा वैयक्तिक मालकीचे स्वरुप सगळ्यात जुने आणि सरळ आहे. हे स्वरुप व्यापार धंद्याच्या उगमकाळापासूनच अस्तित्वात आलेले आहे. जलदरीतीने बदलणाऱ्या विश्वव्यापार-धंद्याचे स्वरुप अस्तित्वात आले आणि त्यांचा विकास पण झाला. पण तरीही ही प्राचीन आणि सरळ प्रथा आजही टिकून राहीली आहे.

**5.1.1 अर्थ :** वैयक्तिक मालकी हे एक अशाप्रकारचे स्वरुप आहे की ज्याची मालकी, संचालन आणि अंकुश एकच व्यक्तिचा असतो. तीच व्यक्ती भांडवल गुंतवणुक करून धंद्याची सुरूवात करते, धंद्याचा विकास करतो. आणि धंद्याचे कार्य जसेकी खरेदी आणि विक्री स्वत:च करतो. आणि त्याचा परिणाम जसा की नफा-नुकसान पण स्वत:च भोगतो.

लुईस हेन्रीच्या मते, ''वैयक्तिक मालकी (एकाकी व्यापार) हे व्यापार व्यवस्थेचे असे स्वरूप आहे, त्याच्या टॉपवर किंवा उच्च पदावर एकच व्यक्ती असते. जो जबाबदार आहे. धंद्याचे कार्य बघतो आणि एकटाच निष्फळताचा धोका भोगत असतो.'' या व्याख्यावरून असे समजुन येते की, एकाकी व्यापार किंवा वैयक्तिक मालकी एकटाच पूर्णपणे जबाबदार आहे. संपूर्ण व्यवहार त्याच्या देखरेखेवर चालत असतो. आणि व्यापारात तोटा आला किंवा नादारी आली तरी त्याचे जोखम त्याचे त्याला स्वत:ला भोगावे लागते.

**5.1.2 लक्षणे :**

**( 1 ) स्थापनेची सरळता :** वैयक्तिक मालकीची स्थापना विधी खूप सरळ आहे. कायद्याच्या कुठल्याही लांबलचक अथवा गुंतागुतीची विधी नाही. कायदेशीर व्यापार कुठलीही व्यक्ति कोणत्याही ठिकाणी सुरू करु शकते.

**( 2 ) भांडवल :** वैयक्तिक मालकीत मालक स्वत:च भांडवल गुंतवणुक करतो. जर त्याला त्याचे भांडवल कमी वाटले तर तो पैसे उधार घेवून पण धंद्यात गुंतवणुक करतो. हे उधार घेतलेले पैसे परत करण्याची जबाबदारी मालकाचीच असते.

**(3) व्यवस्थापन :** वैयक्तिक मालक स्वत:च धंद्याचा व्यवस्थापक असतो. सामान्यरीते मालक स्वत:च खरेदी, विक्री, उधारी, हिशोबी कामकाज तसेच अन्य व्यवस्था सांभाळतो. तो स्वत:च धंद्याचा मालक आहे आणि स्वत:च संचालक आहे. गरज पडेल तर कुटुंबातील सभासद/नातेवाईक किंवा पगारदार व्यक्तिची मदत घेता येते.

**(4) कार्याची स्वतंत्रता आणि त्वरीत निर्णय :** वैयक्तिक मालक धंदाविषयी मुक्त वातावरण अनुभवत असतो. धंदाकीय कार्य स्वत:च्या हुशारीने आणि आवडीने संपूर्ण स्वतंत्रपणाने करत असतो. आणि स्वत:च मालक असल्याने जलद आणि सरळतेने निर्णय घेवु शकतो.

**(5) जबाबदारी :** वैयक्तिक मालकीत देणे (कर्ज) चुकविण्याची जबाबदारी अमर्यादीत असते. अमर्यादीत जबाबदारी म्हणजे पेढीचे देणे चुकविण्यासाठी मालकाच्या खाजगी मालमत्तेवर दावा करु शकतात. दुसऱ्या रीतीने असे म्हणता येईल की मालकाला धंद्यात नुकसानी (खोट) आली, धंद्यात कर्ज वाढले आणि धंद्याची मालमत्ता ते कर्ज चुकविण्यासाठी पुरेसे नसेल तर धंद्याचा मालीक स्वत:च्या खाजगी मालमत्तामधून जास्तीचे कर्ज चुकविण्याची जबाबदारी पार पाडतो.

**(6) रहस्याची जपणुक :** वैयक्तिक मालकीचा व्यापारी स्वत:च्या धंद्याचा एकमात्र मालक असल्याने रहस्याची गुप्तता राखली जाते.

**(7) व्यक्तिगत संपर्क :** वैयक्तिक मालकीच्या व्यापाराचे कार्यक्षेत्र मर्यादीत असल्याने ग्राहकांबरोबर व्यक्तिगत संपर्क साधता येतो. ग्राहकाची बदलत जाणारी आवड-निवड, गरजा, फॅशन, मागणी वगैरेवर लक्ष ठेवून ग्राहकाला जास्त संतोष किंवा समाधान देता येते.

**(8) मालकी आणि संचालनचे ऐक्य :** वैयक्तिक मालकीत जो मालक असतो तोच संचालक असतो. त्यामुळे मालक आणि संचालनाचे ऐक्य असते. दुसऱ्या कित्येक धंदेदारी संस्थामध्ये मालक आणि संचालन वेगवेगळे असतात.

**5.1.3 वैयक्तिक मालकीचे फायदे :**

**(1) सरळ स्थापना विधी :** वैयक्तिक मालकीची स्थापनाविधी सरळ आहे. याप्रथेमध्ये कोणत्याही प्रकारचा दस्तावेज तयार करण्याचा नसतो. कायदयाची कोणतीही जटील व गुंतागुतीची प्रक्रिया नसते. त्यामुळे कमी भांडवल असणारे. अशिक्षित किंवा सामान्य कौशल्य असणारी व्यक्ति पण धंदा सुरु करु शकतो.

**(2) कमी भांडवल :** कमी भांडवल हे वैयक्तिक मालकीचे महत्त्वाचे लक्षण आणि विशिष्ट लाभ आहे. वैयक्तिक मालक कमी भांडवलाने व्यापारा करु शकतो. जास्त पैश्याची गरज पडली तर तो मालक उधारीने पैसे घेवून धंदा सुरु करु शकतो.

**(3) रहस्याची जपणुक :** धंद्याच्या सफळतेचे रहस्य गुप्त ठेवणे हे व्यापारीसाठी लाभदायी असते. वैयक्तिक मालकीच्या स्वरुपात एकच व्यक्ति सर्वसत्ताधिश असल्याने तो व्यापाराचा सौदा, हिशोब तसेच धंद्याच्या सफळतेची किल्ली गुप्त ठेवतो. व्यापाराच्या अन्य स्वरुपापेक्षा या स्वरुपात रहस्याची जपणुक जास्त चांगल्यारीतीने होत असते.

**(4) त्वरीत निर्णय :** वैयक्तिक मालकीमध्ये व्यक्तिगत मालक धंदा विषयक बाबतचा सर्वोपरी निर्णायक असल्याने स्वत:च्या धंद्याच्या बाबतीत महत्त्वाचे निर्णय त्वरीत घेवु शकतो. बाजाराचा कल आणि बदलणाऱ्या परिस्थितीनुसार त्वरीत निर्णय घेत असतो.

**(5) व्यक्तिगत संपर्क :** वैयक्तिक मालकीच्या धंद्यात धंद्याची मालक आणि संचालन यामध्ये ऐक्य पाहावयास मिळते. मालक स्वत:च धंद्याचे सुत्र आपल्या हातात ठेवतो त्यामुळे ग्राहक, कर्मचारी, तसेच घेणेकरी बरोबर तो व्यक्तिगत आणि प्रत्यक्ष संपर्क साधतो. बदलणारे व्यापारी वळन फॅशन तसेच ग्राहकाची रूची अनुसार उत्पादन आणि वितरण व्यवस्थेत जरुरी फेरफार करुन स्वत:चा व्यापार सांभाळत असतो.

**(6) परिवर्तनशीलता :** वैयक्तिक मालकीच्या बदलणाऱ्या परिस्थिती बरोबर मालक स्वत:च्या व्यापारात जरुरी फेरफार खुपच सरळतेने करु शकतो. त्वरीत निर्णय आणि सतत जागृत असल्याने धंद्यात परिवर्ततनशीलता करता येते.

**(7) करवेराचे कमी प्रमाण :** वैयक्तिक मालकीच्या धंद्याचा नफा हो धंद्याचा मालकाचा असतो. म्हणजे त्याला व्यक्तिला भरण्यात येणारा करवेराचा दर लागु पडतो. सामान्यपणे वैयक्तिक मालकीच्या धंद्याचे स्वरुप (आकार) लहान असल्याने आवक पण कमी असते. त्यामुळे करवेराचा बोजा कमी असतो.

**(8) कमी कायदाकीय नियंत्रणे :** व्यापारी व्यवस्थाच्या अन्य स्वरुपाच्या प्रमाणात वैयक्तिक मालकीच्या व्यापारात (धंद्यात) कमी कायदेकीय नियंत्रणे असतात. भांडवलात कमी-जास्त करण्यासाठी कोणाच्याही संमतीची आवश्यकता नाही. धंद्याचे क्षेत्र सिमित असल्यामुळे कायदेकीय नियंत्रणे कमी असतात.

**5.1.4 मर्यादा :**

**(1) मर्यादीत भांडवल :** कमी भांडवलाने व्यापार होवू शकतो त्याबाबात हा त्याचा विशिष्ट लाभ आहे. त्याचप्रमाणे ती मर्यादाही असु शकतो. औद्योगिक क्रांतीनंतर व्यापारी एकमचे क्षेत्र विस्तृत बनत चालले आहे. त्यासाठी जरूरी भांडवल मिळविण्याचे कार्य मालकासाठी शक्य नाही. मोठ्याप्रमाणावर कच्चा मालाची खरेदी करणे, महाकाय यंत्रे खरीदी करणे. आणि मालाचा संग्रह करणे. पुष्कळवेळेला वैयक्तिक मालाकीचे स्वरूप या क्षमता स्वीकारू शकत नाही.

**(2) अमर्यादीत जवाबदारी :** व्यक्तिगत मालकाची जवाबदारी अमर्यादीत आहे त्यामुळे तो स्वत:च्या जवाबदारीतुन मुक्त होवू शकत नाही. जर धंद्याची मालमत्ता आणि घेण्याकरता धंद्यात कर्ज वाढले तर तो स्वत:ची खाजगी मालमत्ता विकून पण धंद्याचे देणे (कर्ज) चुकवितो. अशा रीतीने धंद्याचे जोखम मालकाला स्वत:लाच भोगावे लागते.

**(3) मर्यादीत आयुष्य :** धंद्याचा मालकाचा मृत्यु झाला, नादार जाहीर झाला किंवा मानसिक आजार झाला तर अशा परिस्थितीत धंद्याचा पण अंत येवू शकतो. त्याच्या वारसदारामंध्ये धंदा चालवण्याची क्षमता असेल किंवा धंद्यात रूची असेलच असे नाही त्यामुळे धंदा बंद पडतो. थोडक्यात या धंद्याचे आयुष्य फारच कमी आहे.

**(4) मर्यादीत कार्यशक्ती :** वैयक्तिक मालकीत पेढीची निती नक्की करण्यात मालक जवाबदार असतो. प्रत्येक व्यक्तिची काम करण्याची मर्यादा असते. मालक स्वत:च संचालक असल्याने कितीही हुशार असेल तरीही कित्येक मर्यादा त्याला अडचणरूप बनतात. आधुनिक युगात धंद्यासाठी विविध प्रकारच्या ज्ञानाची आवश्यता असते. वैयक्तिक मालकीत अन्य धंदाकीय व्यक्तिबरोबर विचारांची देवाण-घेवाण करण्याची क्षमता नसल्याने त्याचा विकास मर्यादीत राहतो.

**(5) चुकीचे निर्णय :** वैयक्तिक मालकीमध्ये मालक स्वत:च धंद्याचे सर्व निर्णय घेत असतो. त्याला दुसऱ्यांचे अनुभव, विशिष्ट ज्ञान किंवा बुद्धीचा लाभ मिळत नाही. त्यामुळे व्यापारी कितीही निष्णात आणि कार्यकुशळ असेल तरीपण त्याचे व्यक्तिगत निर्णय केंव्हा तरी घाईगर्दीने, चुकीचे आणि अयोग्य निर्णयाने धंद्यात फार मोठे नुकसान साबित होऊ शकते.

**(6) मोठ्या धंद्यासाठी प्रतिकुल :** वैयक्तिक मालकीत मर्यादीत भांडवलामुळे व्यापार सिमित राहतो. अमर्यादीत जवाबदारीमुळे व्यापारी मोठे साहस करण्यास तयार नसतात. लहानप्रमाणात खरेदी-विक्री होत असल्याने मोठ्या प्रमाणातील खरेदी विक्रीचा लाभ मिळत नाही.

## 5.2 हिंदू अविभक्त कुटुंब (HUF) द्वारे चालणारे धंदे (Hindu Undivided Family)

**5.2.1 अर्थ :** हिंदू कायदानुसार धंदा हा वारसागत आहे. वारसागत मिळालेला धंदा चालवणाऱ्या हिंदू अविभक्त हिंदू कुटुंबाला हिंदू अविभक्त कुटुंबाची पेढी म्हणयात येते. कुटुंबातील सर्वच व्यक्ति त्याचे सभासद मानले जातात. अशा पेढीचा वहीवट कुटुंबातील मोठ्याच्या हातात असतो. ज्याला कर्ता म्हणयात येते. जर वयात सगळ्यात मोठी व्यक्ति (प्रमुख) वहीवट करण्यास तयार नसेल तर त्या नंतरच्या व्यक्तिला वहीवट सोपण्यात येते. अशा प्रकारच्या पेढीचे अस्तित्व भारत आणि नेपाळमध्ये पाहायला मिळते.

**5.2.2 लक्षणे :**

**(1) कायदाद्वारे अस्तित्व :** हिंदू अविभक्त कुटुंबाची पेढी हिंदू कायदाद्वारे अस्तित्वात आलेली आहे.

**(2) संचालन :** या पेढीचे संचालन कुटुंबाच्या वडील व्यक्तिच्या हातात असते. ज्याला ''कर्ता'' या नावाने ओळखण्यात येतो.

**( 3 ) स्वतंत्र कार्यक्षेत्र :** धंद्याचे संचालन कर्ता स्वतंत्र रीतीने करत असतो. अन्य सभासदांना त्याच्यात दखलगिरी करण्याचा हक्क नाही. पण सभासद ''कर्ता'' किंवा प्रमुखाला मदत करू शकतात. कर्त्याच्या निर्णयाच्या योग्यतेसमोर दुसरे सभासद आक्षेप पण घेवू शकत नाही.

**( 4 ) सदस्यत्व :** हिंदू अविभक्त कुटुंबाच्या पेढीत सदस्यत्व जन्माने प्राप्त होत असते. कुटुंबात जन्म घेणाऱ्या बालकाला त्याच्या जन्माबरोबर सभ्यपद प्राप्त होते.

**( 5 ) आर्थिक नियंत्रण :** धंद्याच्या सर्वच आर्थिक बाबतीत कर्ताचा हस्तक्षेप असल्याने पेढीवर कर्त्याचे आर्थिक नियंत्रण असते. संयुक्त मालमत्तेची जपणूक करण्याचे कार्य पण कर्ता करत असतो.

**( 6 ) जबाबदारी :** धंद्याचे कार्यक्षेत्र कर्ता सांभाळतो त्यामुळे कर्त्याची जबाबदारी अमर्यादीत असते. अन्य सभासदांची जबाबदारी मात्र मर्यादीत असते.

**( 7 ) आयुष्य :** कुटुंब प्रमुख किंवा कर्ता किंवा कुटुंबातील अन्य सभासदाच्या मृत्यू झाल्यानंतर पण धंदा चालु राहतो. कर्त्याच्या मृत्युनंतर घरात जो वडील मनुष्य असेल तो कर्ता बनतो.

**( 8 ) भांडवल मिळवण्यात अडचणी :** धंद्याच्या सफळतेचा आधार कर्त्याच्या कार्यक्षमतेवर असतो. भांडवल मिळविण्यासाठी कुटुंबाच्या सभासदवर आधार ठेवावा लागतो. त्यामुळे जास्त भांडवल मिळविण्यात अडचणी निर्माण होतात.

**( 9 ) नादारी :** पेढी नादार झाली तर मात्र पुक्तवयाच्या सभासदांना नादार जाहीर करु शकतात. लहान वयाच्या सभासदाना (सगीर) नाही. कर्जाची रक्कम चुकविण्यासाठी पेढीच्या प्रत्येक सभासदाचा हिस्सा वापरता येतो. कर्ताची जबाबदारी अमर्यादीत असते.

### 5.3 भागीदारी

जस जसे व्यापार आणि वाणिज्याचे क्षेत्र विस्तृत होत गेले तसतसे वैयक्तिक मालकीची मर्यादा जास्त स्पष्ट होत गेली. मोठ्या प्रमाणातील व्यापारासाठी जास्त भांडवल, कार्यदक्ष वहीवटी शक्ती आणि जोखम स्विकारण्याची यासारख्या मर्यादा दुर करण्यासाठी भागीदारी पेढी अस्तित्वात आली.

**5.3.1 अर्थ :** भागीदारी ही एक अशी धंदाकीय व्यवस्था आहे की ज्यामध्ये धंद्याची मालकी एका पेक्षा जास्त व्यक्तिची असते. आणि त्याचप्रमाणे संचालनपण सगळे अथवा सगळ्याच्या वतीने एक किंवा एकापेक्षा जास्त भागीदार करत असतात. याप्रमाणे चालवण्यात येणाऱ्या धंद्याचा परिणाम सगळ्यांनाच भोगावे लागतात.

1932 च्या भारतीय भागीदारी कायदा प्रमाणे ''भागीदारी ही अशा व्यक्तिच्या मधील संबंध आहे की ज्यामध्ये सर्वाच्यामार्फत किंवा सर्वाच्यावतीने एकद्वारे चालवण्यात येणाऱ्या धंद्याचा नफा वाटून घेण्यास सर्वसंमंत असतात.''

**5.3.2 लक्षणे :**

**( 1 ) करार आधारीत संबंध :** भागीदारी हा कराराद्वारे अस्तित्वात येणारा संबंध आहे. हा करार लेखीत किंवा मौखीक स्वरुपाचा पण असु शकतो. भागीदारांच्या वर्तनातुन जो सामजस्य निर्माण होते. त्यातुन पण भागीदारी अस्तित्वात येवु शकते. करार लेखीत असणे हीतावह आहे.

**( 2 ) स्थापना विधी :** भागीदारी संस्थेचा स्थापना विधी खुपच सरळ आहे. कायधाच्या कोणत्याही जटील किंवा गुंतागुतीच्या प्रक्रियेतुन जावे लागत नाही.

**( 3 ) नोंदणी :** भागीदारी पेढीची नोंदणी करणे सक्तिचे नसते. परंतु हितावह आहे. अशी नोंदणी भागीदारी पेढीचे नोंदणी अधिकारी (Registrar of Forms) कडे भागीदारी करार रूजु करून करण्यात येते.

**( 4 ) भागीदारांची संख्या :** भागीदारी पेढीमध्ये भागीदारांची संख्या कमीत-कमी दोन सभ्य असते. कंपनी फायदा 2013 च्या कलम 464 नुसार.... ''भागीदारी संस्थेत भागीदारांची संख्या 100 पेक्षा जास्त नाही, सरकारने नक्की केल्या प्रमाणे नियमा प्रमाणे राहिल. संध्या कंपनीच्या किरकोळ नियमा प्रमाणे (Miscellaneous Rule) 10 ( वर्ष 2014) प्रमाणे सरकारने भागीदारीची महत्तम मर्यादा संख्या 50 नक्की केलेली आहे.

**( 5 ) उद्देश :** भागीदारी पेढीचा मुख्य उद्देश कायदेशीर धंदाकीय प्रवृत्ती करुन नफा मिळविण्याचा असतो. नफ्याच्या हेतूशिवायची प्रवृत्ती भागीदारी नाही. उदा. सामाजिक सेवा किंवा धार्मिक कार्य करण्याची प्रवृत्ती कायदेशीर असुन सुद्धा त्यातून नफा मिळु शकत नाही. म्हणून नफ्याचा उद्देश नसल्याने भागीदारी नाही.

**( 6 ) भांडवल :** सामान्यपणे सर्वच भागीदार भांडवल आणतात. तरीपण भांडवल आणणे हे सगळ्याच भागीदारासाठी सक्तीचे नाही. करारात दर्शविल्याप्रमाणे भागीदार भांडवल आणत असतो.

**( 7 ) संचालन :** भागीदारी पेढीमध्ये धंद्याचे संचालन, सगळेच भागीदार संयुक्तपणे करु शकतात. सगळ्याच भागीदारांना धंद्याच्या निर्णयात भाग घेण्याचा अधिकार आहे. करारात दर्शविल्याप्रमाणे कोणीही एक किंवा एकापेक्षा जास्त भागीदार संचालन करु शकतात.

**( 8 ) अमर्यादित जबाबदारी :** वैयक्तिक मालकीसारखी कर्जाच्या चुकवणी बाबत भागीदाराची जबाबदारी अमर्यादीत असते. गरज पडेल तेव्हा स्वत:ची मालमत्ता विकून पण पेढीचे कर्ज चुकवावे लागते. भारतीय भागीदारी कायदयानुसार भागीदारी पेढीच्या कर्जासाठी भागीदार व्यक्तिगत आणि संयुक्तरीत्या जबाबदार आहे. म्हणून जर कोणताही एक भागीदार पेढीचे कर्ज स्वत:च्या खाजगी मालमत्तेतून भरपाई न करू शकेल तर बाकीच्या भागीदारांच्या स्वत:च्या खाजगी मालमत्तेतून भरपाई करावी लागते.

**( 9 ) मालकी हक्कात बदल :** भागीदारी पेढीत मालकीची फेरबदली सरळ नाही. सगळ्याच भागीदारांच्या संमती शिवाय कोणताही भागीदार स्वत:चा भागाची मालकी दुसऱ्याला देता येत नाही. जर एखाधा भागीदाराने संमतीशिवाय आपल्या भागाची फेरबदली केली तर त्यामुळे कुठलाही भागीदार समग्र भागीदारी पेढीचे विसर्जन करू शकतो.

**( 10 ) कायदेकीय स्थान :** 1932 च्या भारतीय भागीदारी कायदयात भागीदारांचे हक्क, कर्तव्य, नियम, पेढीची नोंदणी आणि अन्य तरतुदी दर्शविल्या आहेत.

**( 11 ) पेढीचे आयुष्य :** भागीदारी संस्थेचे आयुष्य मर्यादीत आहे. भागीदार आणि भागीदारी पेढीचे अलग अस्तित्व आहे. त्याकारणाने कोणताही एक भागीदार वेडा झाला, मृत्यु झाला, किंवा तो नादार जाहीर झाला तर त्या भागीदारीचा अंत होतो. बाकीचे भागीदार सर्व संमतीने संबंधीत भागीदाराच्या हिस्साची वाटणी मधल्या-मध्ये अथवा नव्या भागीदाराच्या प्रवेशद्वारे करू शकतात. अशा पद्धतीने भागीदारीचा अंत होतो. परंतु पुष्कळवेळा भागीदारी पेढीचे विसर्जन होत नाही.

**5.3.3 भागीदारीचे फायदे :**

**( 1 ) सरळ आणि कमी खर्चीक स्थापना विधी :** भागीदारी पेढीची स्थापना विधी सरळ आणि कमी खर्चीक आहे. स्थापनेच्या विधीसाठी कोणत्याही खास कायदयाच्या विधीतून पसार व्हावे लागत नाही कायदयानुसार भागीदारी पेढीची नोंदणी करणे सक्तिचे नाही. परंतु स्वैच्छिक आहे, हितावह आहे.

**( 2 ) कार्यक्षम संचालन :** वैयक्तिक मालकी पेक्षा भागीदारी पेढीमध्ये एका पेक्षा जास्त व्यक्ति असल्यामुळे त्याच्या विशिष्ट ज्ञानाचा त्यांच्या बुद्धीचा, त्यांच्या रूचीचा आणि त्यांच्या अनुभवाचा लाभ पेढीला मिळतो. धंद्याचे संचालन भागीदाराच्या हातातच असल्यामुळे ते व्यक्तिगत रस आणि काळजी घेतात. भागीदारांचे कर्मचारीवर प्रत्यक्ष नियंत्रण असल्याने पेढीचे कार्यक्षम संचालन होते.

**( 3 ) अधिक पत :** प्रत्येक भागादीराची जबाबदारी अमर्यादीत असल्याने व्यापारी पेढीला उधार माल विक्रीकरण्यास किंवा कर्जदेण्यास अचकत नाहीत. घेणेकरी त्यांचे घेणे कोणत्याही भागीदाराकडून त्याच्या खाजगीं मालमत्तामधून वसुल करू शकतात. त्यामुळे वैयक्तिक मालकीच्या प्रमाणात भागीदाराच्या धंद्यासाठी पत प्राप्तीची शक्यता जास्त असते.

**( 4 ) अधिक भांडवल :** भागीदारी पेढीमध्ये दोन किंवा त्यापेक्षा जास्त भागीदार असल्याने भांडवल जास्त मिळू शकते. भविष्यात धंद्याचा विकास होईल तेव्हा जास्त भांडवलाची गरज पडेल तेव्हा नव्या भागीदाराला प्रवेश देऊन जास्तीचे भांडवल मिळविता येते.

**( 5 ) श्रमविभाजनाचा लाभ :** पेढीच्या वेगवेगळ्या भागीदाराची कौशल्य तसेच त्यांच्या शक्तीचा लाभ मिळविता येतो. प्रत्येक भागीदाराला त्याच्या शक्तीनुसांर आणि अभिरूचीनुसार काम सोपवण्यात येते. यातुनच श्रमविभाजनाचा लाभ मिळविता येतो.

**( 6 ) योग्य निर्णय :** भागीदारी पेढीत कोणत्याही बाबतीतला निर्णय घेण्याअगोदर त्याच्यावर चर्चा-विचारणा होती. प्रत्येक भागीदाराचे मत विचारात घेतले जाते. त्यांनतरच धंद्याच्या हीतासाठी सर्वसंमतीने निर्णय घेतले जातात. या निर्णयप्रक्रीयेत सर्व भागीदारांचे वेगवेगळ्या क्षेत्रांचे अनुभव आणि ज्ञान याचा फायदा मिळतो. त्यामुळे घाई-घाईने खोटे निर्णय घेतले जाण्याचे टळते.

**( 7 ) परिवर्तनशीलता :** भागीदारी ऐच्छिक करार आहे. या करारात जरूरीप्रमाणे फेरफार करणे शक्य असते. बदलत्या परिस्थितीनुसार भागीदारी पेढीच्या संचालनात आणि त्याच्या आराखडयात पण जरूरी फेरफार करण्यात येतात.

**( 8 ) लघुमतीच्या हीतांचे रक्षण :** सामान्यपणे भागीदारीच्या धंद्यात कोणतेही कार्य सगळ्या भागीदारांच्या संमतीनी होत असते. पेढीच्या निर्णयात कोणताही एका भागीदाराची असंमती असेल तर ते कार्य होवू शकत नाही. कोणताही भागीदार पेढीच्या विसर्जनाची मागणी करु शकतो. अशाप्रकारे लघुमतीच्या हिताचे रक्षण होते.

**( 9 ) ग्राहकांशी संपर्क :** वैयक्तिक मालकी प्रमाणे भागीदारीमध्ये पण ग्राहक व कर्मचारी याच्यांशी प्रत्यक्ष संपर्क असतो. म्हणून त्यांच्या गरजेप्रमाणे फेरफार करु शकतात.

**( 10 ) आर्थिक सत्तेचे विकेन्द्रीकरण :** भागीदारी पेढीमध्ये दोन किंवा दोनापेक्षा जास्त भागीदार असल्याने आर्थिक सत्ता सगळ्याच भागीदारामध्ये वाटली जाते.

**( 11 ) कमी करवेरा :** भागीदारी पेढीचा नफा प्रत्येक भागीदाराला कराराप्रमाणे वाटला जातो. त्यामुळे करवेराचा बोजा फार कमी असतो.

**5.3.4 मर्यादा (Limitations) :**

**( 1 ) मर्यादित भांडवल :** आधुनिक उद्योग-धंद्याच्या विकास आणि विशाल आकारमान लक्षात घेता भागीदारीद्वारे भांडवल एकत्र करण्याची शक्ती मर्यादित आहे. भागीदारी पेढीद्वारा मोठ्या प्रमाणातिल धंद्याचे प्रमाणे कमी असतो. आणि संशोधनासारखी कार्य पण मर्यादीत भांडवल असल्याने करु शकत नाही.

**( 2 ) अमर्यादीत जबाबदारी :** भागीदारी पेढीच्या प्रत्येक भागीदाराची जबाबदारी अमर्यादीत असते. कोणत्याही एका भागीदाराने पेढीच्या वतीने केलेत्या कार्यासाठी सर्वच भागीदार जबाबदार ठरतात. पेढीचे कर्ज चुकविण्यासाठी मालमत्ता पुरेशी नसेल तर अशा परिस्थितीत भागीदाराला स्वत:ची खाजगी मालमत्ता विकून पण पेढीचे कर्ज भरावे लागते.

**( 3 ) विसंवादाची शक्यता :** भागीदारीमध्ये मतभेद आणि विसंवादाची शक्यता असते. भागीदाारीत जोपर्यंत संप आणि सुलेह असेल तोपर्यंत संचालन व्यवस्थित पद्धतीने होते. भागीदारामध्ये जेव्हा विवाद आणि कुसंप निर्माण होतो. तेव्हा विसंवादाची शक्यता निर्माण होते.

**( 4 ) रहस्याच्या जपणुकीत अडचण :** भागीदारीमध्ये कोणताही अगत्याचा र्निणय, धंदाकीय निर्णय सर्वच भागीदारा बरोबर चर्चा-विचारणा शिवाय घेता येत नाही. भागीदाराबरोबर चर्चा-विचारणामुळे धंद्याच्या रहस्याची असरकारक जपणुक शक्य नाही.

**( 5 ) हिस्सा फेरबदलीत अडचण :** भागीदारी पेढीत भागीदार स्वत:चा हिस्सा (भाग) दुसऱ्या व्यक्तिला सहजतेने फेरबदल करु शकत नाही. फेरबदली करावयाची असेल तर सर्वसंमतीची जरुरी असते.

**( 6 ) निर्णयात विलंब :** कायदेशीर दृष्टीने प्रत्येक भागादीर पेढीच्या संचालनात भाग होत असतो. भागीदारामध्ये आतल्या-आत कुसंप आणि विवादाच्या कारणाने निर्णय घेण्यात विलंब होतो. त्यामुळे संचालन कमजोर पडते. आंतरिक वैमन्यस्यामुळे पुष्कळ भागीदारी पेढी काळाअगोदरच विसर्जन होतात.

**( 7 ) मर्यादीत आयुष्य :** कोणत्याही भागीदाराची नादारी, मानसिक अस्थिरता किंवा मृत्युच्या कारणामुळे कायदेकीय रीतीने भागीदारीचा अंत होतो.

**5.3.5 भागीदाराचा प्रकार :**

**( 1 ) सक्रिय भागीदार (Active Partner) :** भारतीय भागीदारी कायदयानुसार जी व्यक्ति भागीदार बनतो पेढीच्या संचालनात सक्रीय रस घेवून कार्य करतो. त्याला सक्रिय भागीदार म्हणतात. असा भागीदार भांडवल गुंतवितो आणि नफा-नुकसान सहन करतो. पेढीच्या कार्यासाठी तो अन्य भागीदारांचा प्रतिनिधी एजन्ट समजला जातो.

**( 2 ) निष्क्रिय भागीदार (Sleeping Partner) :** जो भागीदार भागीदारी कराराद्वारे पेढीचा भागीदार बनतो, नफा-नुकसान सहन करतो. परंतु पेढीच्या संचालनात सक्रिय रीते भाग घेत नाही. त्याला निष्क्रिय किंवा सुषुप्त भागीदार पण म्हणतात. असा भागीदार निष्क्रिय असुन सुद्धा दुसऱ्या भागीदाराप्रमाणे पेढीमध्ये त्याची जबाबदारी अमर्यादीत असते.

**( 3 ) नावाचा भागीदार (Nominal Partner) :** नव्या स्थापलेल्या पेढीचा विकास जलदगतीने करण्यासाठी तसेच स्पर्धेत टिकून राहण्यासाठी एखादी प्रतिष्ठित व्यक्ति स्वत:च्या नावाचा पेढीला उपयोग करु देईल तर त्याला नावाचा भागीदार असे म्हणतात. नावाचा भागीदार पेढीत भांडवल गुंतवित नाही. तो आपले नाव भागीदार म्हणून उपयोग करण्याची संमती संस्थेला देतो. त्यामुळे पेढीच्या पतमध्ये वाढ होते. परंतु त्याची जबाबदारी दुसऱ्या भागीदारासारखीच अमर्यादीत असते.

**( 4 ) मात्र नफ्याचा भागीदार (Partner in Profit only) :** जेव्हा एखाधा व्यक्तीचा खास कौशल्य किंवा ज्ञान तसेच अनुभवाचा लाभ घेण्यासाठी त्याला पेढीचा भागीदार बनविण्यात येतो. तेव्हा त्याला नफ्याचा भागीदार असे म्हणतात. नफ्याचा भागीदार पेढीच्या संस्थेत भांडवल गुंतवेल किंवा नाही गुंतविणार तरीपण त्याला नफ्याचा लाभ देण्यात येतो. पेढीच्या नुकसानीत त्याचा काही भाग नसतो.

**( 5 ) मानलेला भागीदार (Partner by Estopple or Holding Out) :** ज्या व्यक्तिने भागीदारी करार केलेला नसेल. पेढीमध्ये भांडवल गुंतविले नसेल, तसेच नफ्यात भाग पण मिळवित नसेल. परंतु त्याच्या वर्तनाच्या आधारे त्रयस्थ व्यक्ति ज्याला भागीदार म्हणून मानत असतो. त्याला मानलेला भागीदार म्हणतात. संचालन किंवा नफ्यात भाग न घेता तरीपण त्रयस्थ व्यक्ति पतला लक्षात घेवून पेढीबरोबर व्यवहार करत असल्याने त्याची जबाबदारी अमर्यादीत असते.

**( 6 ) अज्ञान भागीदार (Minor Partner) :** भारतीय भागीदारी कायदयातील कलमानुसार मात्र फक्त पुक्तवयाची व्यक्तीच करारासाठी समर्थ आहे. त्यामुळे पुक्तवयाची व्यक्ती भागीदार बनू शकते. सगीर व्यक्ती नाही.

जर एखादा भागीदाराचा मृत्यु झाला तर तो त्याच्या अज्ञान बालकाला यारीतीने भागीदार बनवतो. अज्ञान भागीदाराला पेढीचे कर्ज चुकविण्याची व्यक्तिगत जबाबदारी नसते. अज्ञान भागीदाराची खाजगी मालमत्ता हिसकावु शकत नाही. जेव्हा तो सज्ञान वयाचा झाला तेव्हा त्याची इच्छा असेल तर दुसऱ्या भागीदारासारखा सामान्य भागीदार बनु शकतो.

**5.3.6 भागीदारी पेढीचा प्रकार (Types of Partnership) :**

**प्रकार**

- **(A) मुदत अनुसार**
  - (1) ऐच्छिक भागीदारी पेढी
  - (2) मुदती भागीदारी
  - (3) निश्चित कार्यासाठी भागीदारी पेढी
- **(B) जबाबदारी अनुसार**
  - (1) मर्यादीत जबाबदारी असणारी भागीदारी पेढी
  - (2) अमर्यादीत जबाबदारी असणारी भागीदारी पेढी
- **(C) नोंदणी अनुसार**
  - (1) नोंदविलेली भागीदारी पेढी
  - (2) न नोंदविलेली भागीदारी पेढी

**(A) मुदत अनुसार :**

**( 1 ) इच्छानुसार भागीदारी पेढी ( ऐच्छिक भागीदारी ) :** या प्रकारच्या भागीदारीत संस्थेचे आयुष्य भागीदाराच्या इच्छेवर आधारीत असते. त्याला कालमर्यादेचे बंधन नसते. जोपर्यंत परस्पर भागीदारांमध्ये समजुती, सुमेळ आणि विश्वास असेल व संप असेल तोपर्यंत संस्था चालते. जर एखादा भागीदार पेढीचे विसर्जन करु इच्छित असेल तर तो कायद्याच्या निश्चित समय मर्यादेच्या आधी नोटीस देवून पेढीचे विसर्जन करु शकतो.

**( 2 ) मुदती भागीदारी पेढी :** जेव्हा भागीदारी करारात भागीदारीची मुदत आधीच नक्की करण्यात आलेली असते. तेव्हा त्याला मुदती भागीदारी पेढी असे म्हणतात. मुदत पुर्ण झाल्यावर आपोआप पेढीचे विसर्जन होते. तरीपण पेढीचे सर्वच भागीदार जर सर्वसंमत असतील तर मुदत वाढविता येते.

**( 3 ) निश्चित कार्यासाठीची भागीदारी पेढी :** कुठलेही निश्चित कार्य करण्यासाठी जर भागीदारी पेढीची रचना करण्यात आली असेल तर त्याला निश्चित कार्यासाठीची भागीदारी असे म्हणतात. नक्कि केलेले कार्य अथवा करार पूर्ण झाल्यानंतर अशा पेढीचा आपोआप अंत होतो. उदा. पुल, रोड, नहेर वगैरे बांधकाम साठीची भागीदारी.

**(B) जबाबदारीनुसार भागीदारी पेढीचे प्रकार :**

**( 1 ) मर्यादित जबाबदारी असणारी पेढी :** भागीदारी पेढीचा हा एक विशिष्ट प्रकार आहे. पेढीच्या मात्र एक भागीदाराशिवाय बाकीच्या भागीदारांची जबाबदारी मर्यादीत ठेवता येते.

**( 2 ) अमर्यादित जबाबदारी असणारी पेढी :** या प्रकारच्या भागीदारी पेढीच्या प्रकारात प्रत्येक भागीदाराची जबाबदारी अमर्यादित असते. जर पेढीचे कर्ज पेढीच्या मालमत्तेपेक्षा जास्त झाले तर प्रत्येक भागीदाराला आपली खाजगी मालमत्ता विकून पण संस्थेच्या कर्जाची भरपाई करावी लागते.

**(C) नोंदणी अनुसार :**

**( 1 ) नोंदवलेली भागीदारी पेढी :** भागीदारी पेढीचा जो रजिस्टार असतो. त्याच्या रजिस्टरमध्ये भागीदारी पेढीची नोंदणी करविली असेल तर अशा भागीदारी पेढीला नोंदवलेली भागीदारी पेढी म्हणतात. भागीदारी पेढीची नोंदणी करायची असेल तर पेढीचे घेणे वसुल करण्यासाठी त्रयस्थ पक्षासमोर कायदयाद्वारे कार्यवाही करता येते. भागीदारी पेढीची नोंदणी करणे सक्तिचे नाही; परंतु हितावह आहे.

**( 2 ) न नोंदवलेली भागीदारी पेढी :** ज्या भागीदार पेढीची नोंदणी पेढीच्या रजिस्टारकडून करण्यात आली नसेल. त्याला न नोंदविलेली भागीदारी पेढी असे म्हणतात. अशा पेढी स्वत:ची घेणी वसुली कायदयाद्वारे सरळतेने करु शकत नाही.

**5.3.7 भागीदारी पेढीची नोंदणी (Registration of a Partnership Firm) :** 1932 च्या कायदयाप्रमाणे भागीदारी पेढीची नोंदणी करणे शक्य आहे. पेढीची नोंदणी करणे सक्तिचे नाही. परंतु नोंदणी न केल्यामुळे कितीतरी गैरलाभ होवू शकतात त्यामुळे पेढीची नोंदणी करण्यात येते.

पेढी ज्या राज्यात स्थापन केली आहे. त्या राज्याचा रजिस्टार हा राज्य सरकारचा नेमलेला नोंदणी अधिकारी आहे. नोंदणी करण्यासाठी नक्की केलेल्या पत्रात जरूरी तपशील भरून. सगळ्याच भागीदारांची सही करुन, जरुरी फी बरोबरचेपत्रक रजिस्टारला पाठवण्यात येते.

**( I ) नोंदणी पत्रकात समाविष्ट होणारे तपशील :**

(1) पेढीचे नाव आणि पत्ता

(2) पेढीची पत

(3) भागीदारांचे नाव, पत्ते आणि टेलिफोन नंबर

(4) प्रत्येक भागीदाराच्या प्रवेशाची तारीख

(5) भागीदारांच्या नफा आणि नुकसानचे प्रमाण

(6) भागीदाराच्या भांडवलाबाबत तपशीलवार माहिती

(7) पेढीची मुदत

वरील सर्व तपशिलांना लक्षात घेवून रजिस्टार पेढीची नोंदणी रजिस्टारमध्ये करतो. आणि त्याचे प्रमाणपत्र देतो.

**( II ) पेढीच्या नोंदणीमुळे होणारे फायदे :**

(1) स्वत:ची घेणी वसुलीसाठी पेढी त्रयस्थ व्यक्तिसमोर दावा मांडु शकते.

(2) पेढीचा कोणतापण भागीदार दुसऱ्या भागीदारावर किंवा पेढीवर दावा मांडू शकतो.

(3) भागीदार स्वत:चे आधिकार आणि हिस्सासाठी कायदयाकडे न्याय मागू शकतो.

(4) निवृत्त होणारा भागीदार जाहीर जनतेला नोटिस देवून स्वत:च्या जबाबदारीतुन मुक्त होऊ शकतो.

(5) पेढीची नोंदणी केल्याने जाहीर जनतेला पेढीच्या अस्तित्वाची समज येते.

**5.3.8 भागीदारीचे करारपत्र (Partnership Deed) :** भागीदारी हा परस्पराच्या समजुती मधून निर्माण होणारा संबंध आहे. हा करार लेखीत किंवा मौखीक असु शकतो. करार लेखीत स्वरूपाचा असणे इच्छिनीय आहे. लेखी कराराने भागीदारीची अटी (शरती) स्पष्ट होतात. लेखी करारपत्र हे भागीदारीची घटना आहे. भागीदारी करारपत्र कायदयाच्या निष्णांताच्या मदतीने तयार केले पाहीजे.

**करारापत्रामध्ये समाविष्ट होणारे तपशील :**

- पेढीचे नाव आणि पत्ता
- भागीदाराचे नाव, पत्ता, वय, प्रकार आणि टेलिफोन नंबर
- पेढीचे ध्येय आणि धंद्याचा प्रकार
- पेढी सुरू करण्याची तारीख आणि मुदत
- भागीदाराचे भांडवल तसेच भांडवलावर व्याज दयायचे असेल तर त्या विषयीचा तपशील
- भागीदारांची व्यक्तिगत उचल उचलवर व्याज, आणि उपलची
- भागीदाराने पेढीला दिलेल्या लोनवरील व्याजाचा दर
- नफा-नुकसानीच्या वाटणीचे प्रमाण
- भागीदारामध्ये कार्याच्या वाटणीचे प्रमाण
- भागीदाराला पगार, कमिशन किंवा अन्य सवलती विषयी माहिती
- भागीदारी पेढीचा हिशोब आणि पुस्तक (नोटेबुक) ठेवण्याची तरतुद
- बँकेत पेढीचे खाते खोलण्याचे आणि त्याची देवाण-घेवाण विषयी सत्ताची तरतुद
- पाघडीच्या मूल्यांकनाची पद्धत
- मतभेद आणि भांडणाचा निकाला वेळेस कायदयाची व्यवस्था
- महत्त्वाचा दस्तावेजांवर सही करण्याची सत्ता
- नव्या भागीदारांचा प्रवेश आणि जुन्या भागीदाराची निवृत्ती विषयी तरतुद
- भागीदारांचे अधिकार आणि कर्तव्य
- अज्ञान भागीदाराला दाखल करण्याची तरतुद
- पेढीच्या विसर्जनवेळी हिशोबा संपवण्याची तरतुद

लेखीत करारानाम्यात वरीलप्रमाणे तपशील दर्शविले जातात. कररनाम्याच्या (करारपत्राच्या) गैरहाजरीत भागीदारी कायदयाच्या तरतुदी आपोआप अमलात येतात.

**वैयक्तिक मालकी आणि भागीदारी पेढी यांच्यातील फरक :**

| अनुक्रम नं. | फरकाचे मुद्दे | वैयक्तिक मालकी | भागीदारी पेढी |
|---|---|---|---|
| (1) | अर्थ | जेव्हा एकच व्यक्ति धंद्याच्या स्थापनेचा विचार करतो, भांडवलाची व्यवस्था करतो. आणि नफा नुकसान स्वत:च भोगतो त्याला वैयक्तिक मालकी असे म्हणतात. | भागीदारी ही अशी व्यक्तिमधील संबंध आहे की जे सगळयाच्या द्वारा सगळयाच्या वतीने कोणा एका कडून चालवण्यात येणाऱ्या धंद्याचा नफा वाटून घेण्यात सर्वसंमत असतात. |
| (2) | सभासद संख्या | एकच व्यक्ति असते. | कंपनी फायदा 2013 च्या कलम 464 नुसार.... ''भागीदारी संस्थेत भागीदारांची संख्या 100 पेक्षा जास्त नाही, सरकारने नक्की केल्या प्रमाणे नियमा प्रमाणे राहिल. संध्या कंपनीच्या किरकोळ नियमा प्रमाणे (Miscellaneous Rule) 10 ( वर्ष 2014) प्रमाणे सरकारने भागीदारीची महत्तम मर्यादा संख्या 50 नक्की केलेली आहे. |
| (3) | भांडवल | सगळेच भांडवल मालक पुरवितो. | भागीदारी कराराप्रमाणे भागीदार भांडवल पुरवितात. |
| (4) | स्थापना | कायदेशीर धंद्याची स्थापना कोणतीही व्यक्ति करु शकतो. | स्थापना लेखीत किंवा मौखीक कराराद्वारे होते. |
| (5) | निर्णय | वैयक्तिक मालकीत एकच व्यक्ति मालक असल्याने त्वरीत निर्णय घेतले जातात. | भागीदारी पेढीत एकापेक्षा जास्त भागीदार असल्याने निर्णय घेण्यात विलंब होतो. |
| (6) | नफा-नुकसान | नफा-नुकसान मालकालाच सहन करावा लागतो. | नफा-नुकसान कराराप्रमाणे भागीदारामध्ये वाटला जातो. |
| (7) | नोंदणी | नोंदणीविषयी काही तरतुदी नाही. | भागीदारी पेढीची कायदेशीर नोंदणी करता येते, पण ती सक्तिची नाही. |
| (8) | रहस्याची जपणुक | एकच व्यक्ति मालक असल्याने रहस्याची जपणुक होते. | एका पेक्षा जास्त भागीदार असल्याने रहस्याची जपणुक कमी प्रमाणात होते. |
| (9) | हीस्साची फेरबदली | मालकांच्या इच्छेप्रमाणे फेरबदली होते. | दुसऱ्या भागीदाराची संमती असेल तरच भागीदार आपल्या भागाची फेरबदली करु शकतो. |
| (10) | जोखम (धोका) | धंद्यातील धोका मालकाचा सहन करावा लागतो. | पेढीचे धोके भागीदांरामध्ये वाटले जातात. |

## या प्रकरणात तुम्ही काय शिकलात ?

**( 1 ) वैयक्तिक मालकी :**

**अर्थ :** एकच व्यक्ति धंद्याच्या स्थापनेच्या विचार करतो, भांडवलाची व्यवस्था करतो आणि नफा-नुकसान स्वत:च भोगतो त्याला वैयक्तिक मालकी असे म्हणतात.

**लक्षणे :** स्थापनेची सरळता, भांडवल, व्यवस्थाशक्ती, कार्य स्वतंत्रता आणि त्वरीत निर्णय, जबाबदारी, रहस्याची जपणुक, खाजगी संपर्क, मालक आणि संचालनाचे ऐक्य.

**फायदे :** सरळ स्थापना विधी, कमी भांडवल, रहस्याची जपणुक, त्वरीत निर्णय, व्यक्तिगत संपर्क, परिवर्तनशीलता, करवेराचा कमी बोज.

**मर्यादा :** मर्यादीत भांडवल, कमी आयुष्य, मर्यादीत कार्यशक्ती निर्णयामध्ये चुकींची शक्यता तसेच मोठ्या प्रमाणातल्या व्यापाराच्या लाभाचा अभाव.

**( 2 ) हिंदू अविभक्त कुटुंबद्वारा चालणारे धंदे :**

**अर्थ :** हिंदू कायदयाप्रमाणे वारसागत मिळालेला धंदा चालवणाऱ्या अविभक्त कुंटुंबाला हिंदू अविभक्त कुटुंबाची पेढी म्हणतात.

**लक्षणे :** हिंदू कायदयाद्वारे अस्तित्व, वडील किंवा कुटुंब प्रमुख संचालन करतो. त्याला कर्ता असे म्हणतात. कार्यक्षेत्र स्वतंत्र असते जन्मापासून सभ्यपद मिळते. कर्ताचे नाणाकीय नियंत्रण असते. कर्ताची जबाबदारी अमर्यादीत आणि बाकीच्या सभासदाची जबाबदारी मर्यादीत असते. जास्त भांडवल मिळविण्याची समस्या निर्माण होते, फक्त पुक्तवयाच्या किंवा सज्ञान व्यक्तिला नादार जाहीर करण्यात येते.

**( 3 ) भागीदारी :**

**अर्थ :** भागीदारी ही अशा व्यक्तिमधील संबंध आहे की ते सगळ्याद्वारे किंवा सगळयाच्या वतीने एकाद्वारे चालवणाऱ्या जाणाऱ्या धंद्यातुन होणारा नफा वाटून घेण्यास सहमत होतात.

**लक्षणे :** कराररजन्य संबंध आहे. स्थापनाविधी सरळ आहे. सभासद संख्या जास्तीत नफा करण्याचा उद्देश, कराराप्रमाणे भागीदार भांडवल पुरवितात, संचालन कोणी एक किंवा दोना पेक्षा जास्त, किंवा सगळेच भागीदार कराराप्रमाणे करतात. पेढीचे कर्ज चुकविण्यासाठी पेढीची मालमत्ता पुरेशी नसेल तर स्वत:च्या खाजगी मालमत्तेतुन पेढीचे कर्ज चुकवावे लागते. सगळ्याच भागीदाराच्या संमतीने भागाची हीस्साची फेरबदली करु शकतात. पेढीचे आयुष्य मर्यादीत असते.

**फायदे :** सरळ आणि कमी खर्चाळ स्थापना विधी, संचालन कार्यक्षम असते. पेढीच्या पतपत्रातेत वाढ, वैयक्तिक मालकीपेक्षा जास्त भांडवल पुरविता येते. श्रमविभाजनाचा लाभ, चुकीच्या निर्णयांची शक्यता कमी असते, परिवर्तनशीलता, लघुमतीच्या हीतांचे रक्षण, ग्राहकांबरोबर प्रत्यक्ष संबंध असतो. दोनापेक्षा जास्त भागीदार असल्याने आर्थिक सत्तेचे विकेन्द्रीकरण होते. पेढीचा नफा वाटला गेल्याने आवकवेराचा बोज कमी असतो.

**मर्यादा :** मर्यादीत भांडवल, अज्ञान भागीदार शिवायच्या भागीदारांची जबाबदारी अमर्यादीत असते. मतभेद किंवा मनभेद सारख्या विसंवादाची शक्यता असते. रहस्या जपणुकीत अडचण येते. सगळ्याच भागीदाराच्या संमती शिवाय भागाची फेरबदली होत नाही. निर्णय त्वरीत घेतले जात नाही. अन्य धंदाकीय स्वरुपापेक्षा भागीदारी पेढीचे आयुष्य कमी असते.

**भागीदारीचे प्रकार :** सक्रिय भागीदार पेढीच्या संचालनात सक्रिय भाग घेत असतो. निष्क्रिय भागीदार पेढीच्या संचालनात भाग घेत नाही. स्वत:च्या नावाचा पेढीला उपयोग करुन देतो त्याला नावाचा भागीदार म्हणतात, स्वत:ची खास आवड-ज्ञान तसेच अनुभवाचा लाभ देतो तो फक्त नफ्याचा भागीदार, नुकसानात त्याचा भाग नसतो. मानलेला भागीदार स्वत:चे वर्तनामुळे त्रयस्थ व्यक्ति ज्याला भागीदार मानते. अशा भागीदार भांडवल, संचालन किंवा नफा-नुकसानात भाग घेत नाही. अज्ञान भागीदार जर कोणताही भागीदाराचा मृत्यु झाला तर त्याला अज्ञान बाळकाला यारीतीने भागीदारी बनवण्यात येते.

**भागीदारी पेढीचे प्रकार :**

**(A) मुदत अनुसार :** ऐच्छिक भागीदारी-पेढीचे आयुष्य भागीदाराच्या इच्छेवर अवलंबुन असते. मुदती भागीदारी- मुदत आधीच नक्कि करावी लागते. मुदत पूर्ण झाल्यानंतर भागीदारीचे विसर्जन होते. निश्चित कार्यसाठीची भागीदारी- निश्चित कारणासाठी पेढी रचण्यात येते. कार्य पूर्ण झाल्यावर विसर्जन होते.

**(B) जबाबदारी अनुसार :** मर्यादीत जबाबदारीची पेढी स्वत: उभ्या केलेल्या भांडवल गुंतवणुकी पुरती जबाबदारी मर्यादीत असते. अमर्यादीत जबाबदारी असणारी पेढी-पेढीचे कर्ज चुकविण्यासाठी स्वत:ची खाजगी मालमत्तापण विकावी लागते.

**(C) नोंदणी अनुसार :** नोंदवलेली भागीदारी-भागीदारी कायदयाप्रमाणे रजिस्टारकडे नोंदलेली असते. न नोंदवलेली भागीदारी-रजिस्टार कडून नोंदणी न केलेली असेल अशी पेढी.

**भागीदारी पेढीची नोंदणी :** 1932 च्या कायदयाद्वारे भागीदारी पेढीची नोंदणी करणे सक्तिचे नाही. परंतु नोंदणी न केल्याने कित्येक गैरलाभ होण्याची शक्यता असते. त्यामुळे पेढीची नोंदणी करणे हीतावह असते.

**नोंदणीपत्रकात समावीष्ट होणारे तपशील :** पेढिचे नाव, पत्ता भागीदाराचे नाव, पत्ता, फोन नंबर, प्रवेशाची तारीख, नफा-नुकसानचे प्रमाण, पेढीची मुदत आणि भांडवलाविषयी तपशीलवार माहिती.

**भागीदारीचे करारापत्र :** भागीदारी हा कराराने निर्माण होणारा संबंध आहे. करार लेखीत किंवा मौखिक असु शकतो. लेखीत करारात समाविष्ट होणारे तपशील खालीलप्रमाणे आहे :

पेढीचे नाव, पत्ता, भागीदाराचे नाव, पत्ता आणि टेलिफोन नंबर, वय, पेढीचे ध्येय आणि धंद्याचा प्रकार पेढी सुरु करण्याची तारीख तसेच मुदत, भागीदाराचे भांडवल तसेच त्याच्या उचलवर चुकविण्याचे व्याज, भागीदार पेढीला दिलेल्या लोनवर व्याजाचा दर कार्याची वाटणी, हीशोब, आणि पुस्तके ठेवण्याची तरतुद, मतभेद भांडणाच्या निकालासाठी कायदेकीय व्यवस्था, महत्त्वाच्या दस्तावेजावर सही करण्याची सत्ता, भागीदाराचा प्रवेश आणि निवृत्तीविषयीची तरतूद भागीदाराचे कर्तव्य आणि आधिकार, सगीर भागीदाराला प्रवेश देण्याची तरतुद, पेढीच्या विसर्जनावेळेस हिशोबाच्या चुकवणीची तरतुद वगैरे.

**स्वाध्याय**

**1. खालील प्रश्नांच्या उत्तराचा खरा विकल्प पसंद करुन लिहा :**

(1) धंदाकिय साहसाचे सगळ्यात प्राचिन आणि सरळ स्वरुप कोणते आहे ?

(A) वैयक्तिक मालकी (B) भागीदारी (C) सरकारी मंडळी (D) कंपनी

(2) कोणत्या स्वरुपामध्ये मालक, स्थापक आणि संचालन एकच असतो ?

(A) संयुक्त साहस (B) सरकारी कंपनी (C) सहकारी कंपनी (D) वैयक्तिक मालकी

(3) हिंदू अविभक्त कुटुंबच्या पेढीचे संचालन कोणाद्वारे होते ?

(A) मालक (B) कर्ता (C) मॅनेजर (D) भागीदार

(4) हिंदू अविभक्त कुटुंबच्या पेढीत सभासद पद कशापद्धतीने मिळते ?

(A) कराराने (B) जन्माने (C) भांडवल गुंतविल्याने (D) संचालन केल्याने

(5) भारतीय भागीदारी कायदा केव्हा अस्तित्वात आला ?

(A) 1932 (B) 1956 (C) 1960 (D) 2013

(6) भागीदारी पेढीत कमीत-कमी किती सभासद असतात ?

(A) 2 (B) 3 (C) 5 (D) 7

(7) भागीदारी पेढीत सध्या जास्तीत जास्त किती भागीदार असतात ?

(A) 20 (B) 30 (C) 15 (D) 50

(8) भागीदारी कायदयानुसार भागीदारी पेढीची नोंदणी करणे...

(A) सक्तिचे आहे (B) सक्तिचे नाही (C) हितावह नाही (D) पेढीच्या हीतात नाही

(9) धंदा करण्यासाठी कालमर्यादा बरोबर रचण्यात आलेली भागीदारी म्हणजे...

(A) मर्यादीत जबाबदारी असणारी पेढी (B) ऐच्छिक भागीदारी पेढी

(C) निष्क्रिय भागीदारी पेढी (D) मुदती भागीदारी पेढी

(10) ज्या पेढीचे आयुष्य भागीदाराच्या इच्छावर आधारीत असेल अशा भागीदारी पेढी म्हणजे...

(A) मुदती भागीदारी (B) ऐच्छिक भागीदारी (C) नावाची भागीदारी (D) निष्क्रिय भागीदारी

**उत्तरे :** (1) (A) (2) (D) (3) (B) (4) (B) (5) (A) (6) (A) (7) (D) (8) (B) (9) (D) (10) (B)

**2. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे द्या :**

(1) वैयक्तिक मालकी कोणाला म्हणतात ?

(2) वैयक्तिक मालकीत मालकाची जबाबदारी कशी असते ?

(3) कर्ता कोणाला म्हणतात ?

(4) हिंदू अविभक्त कुटुंबाच्या पेढीत कर्त्याची जबाबदारी कशी असते ?

(5) भागीदारी पेढीमध्ये निर्णय कोणत्या पद्धतीने घेतले जातात ?

(6) भागीदारी पेढीचे संचालन कोण करतो ?

**3. खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे द्या :**

(1) वैयक्तिक मालकीत अमर्यादीत जबाबदारी मालकाला कशारीतीने हानिकारक ठरते ?

(2) वैयक्तिक मालकीत रहस्याची जपणुक कशी शक्य असते ?

(3) अमर्यादीत जबाबदारी म्हणजे काय ?

(4) 1932 च्या भागीदारी कायदयानुसार भागीदारीची व्याख्या लिहा

(5) अज्ञान व्यक्ति (सगीर व्यक्ति) भागीदार केव्हा बनतो ?

(6) मानलेला भागीदार कोणाला म्हणतात ?

(7) नावाचा भागीदार कोणाला म्हणतात ?

(8) भागीदारी करारपत्र म्हणजे काय ?

**4. खालील प्रश्नांची मुद्देसुद उत्तरे द्या :**

(1) वैयक्तिक मालकीचा अर्थ सांगून तीची लक्षणे समजवा.

(2) भागीदारी पेढीचा अर्थ देऊन लक्षणांची यादी लिहा.

(3) 'वैयक्तिक मालकी ही धंद्याची तालीमशाळा आहे' - समजवा.

(4) 'प्रत्येक भागीदार दुसऱ्या भागीदाराचा एजन्ट आहे' - हे विधान समजवा.

(5) वैयक्तिक मालकी आणि भागीदारी पेढीच्यामधील फरक स्पष्ट करा.

(6) भागीदारी पेढीच्या नोंदणीचे फायदे सांगा.

**5. खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे द्या :**

(1) हिन्दु अविभक्त कुटुंबाचा अर्थ सांगून, त्याची लक्षणे स्पष्ट करा.

(2) वैयक्तिक मालकीचे फायदे आणि मर्यादा समजवा.

(3) भागीदारी पेढीच्या मर्यादा समजवा.

(4) भागीदारी करारपत्रात समाविष्ट होणारे तपशील समजवा.

**पारिभाषिक शब्द**

| | | |
|---|---|---|
| हिंदू अविभक्त कुटुंब | : | HUF - Hindu Undived Family |
| वैयक्तिक मालकी | : | Sole Proprietorship |
| भागीदारी | : | Partnership |
| भागीदारी पेढी | : | Partnership Firm |
| सक्रिय भागीदार | : | Active Partner |
| निष्क्रिय भागीदार | : | Sleeping Partner |
| नावाचा भागीदार | : | Nominal Partner |
| मानलेला भागीदार | : | Partner by Estopple or Holding Out |
| मात्र नफ्याचा भागीदार | : | Partner in Profit only |
| अज्ञान (सगीर) भागीदार | : | Minor Partner |
| मर्यादीत जबाबदारी असणारा भागीदार | : | Partner with Limited Liability |

●

# 6 धंदेवाईक साहसांची स्वरुपे-2 (Forms of Business Organisation-2)


**या प्रकरणात तुम्ही काय शिकाल ?**

**(I) सहकारी मंडळी**
6.1 अर्थ
 6.1.1 लक्षणे
 6.1.2 फायदे
 6.1.3 मर्यादा
**(II) संयुक्त भागाची कंपनी**
6.2 कंपनीचा अर्थ व्याख्या
 6.2.1 लक्षणे
 6.2.2 फायदे
 6.2.3 मर्यादा
 6.2.4 प्रकार :
  (A) खास कायदायद्वारे अस्तित्वात आलेला कंपनी
  (B) सभासदांच्या दृष्टीने
  (C) वर्चस्वाच्या दृष्टीने
  (D) नोंदणीच्या स्थापनाच्या दृष्टीने
 6.2.5 कंपनीची स्थापना विधी
6.3 भागीदारी पेढी आणि कंपनी मधील फरक
6.4 खाजगी कंपनी आणि जाहीर कंपनीमधील फरक
6.5 सहकारी मंडळी आणि कंपनीमधील फरक


**प्रस्तावना**

वैयक्तिक मालकी, भागीदारी आणि कंपनी हे तिन्ही धंदेकीय व्यवस्थाची स्वरुपे असुन सुद्धा त्यांचा प्राथमिक हेतू नफ्याचा आहे. नफा मिळविण्यासाठी हे तिन्ही स्वरुपे ग्राहकांचे अनेकपद्धतीने शोषण करीत असतात. उदा. कमी गुणवत्ता असणारी वस्तू देऊन ग्राहकाकडून जास्त पैसा वसुल करतात. वस्तूमध्ये काळाबाजार करतात वगैरे. सहकारी मंडळी धंदाकीय व्यवस्थाचे स्वरुप असुन सुद्धा त्यांचा विशिष्ट लक्षणाच्या कारणांमुळे दुसऱ्या धंदाकीय व्यवस्थाच्या स्वरुपांपेक्षा वेगळे पडते. ''विना सहकार नाही उद्धार'' हे सूत्र त्यांनी अमलात आणले आहे. ''प्रत्येक सर्वांसाठी आणि सर्व प्रत्येकांसाठी'' (Each for all and all for each) या हेतूने सहकारी मंडळी अस्तित्वात आली आहे.

## (I) सहकारी मंडळी (Co-Operative Society)

### 6.1 सहकारी मंडळीचा अर्थ

सहकारी मंडळी ही स्वैच्छिक धंदाकीय व्यवस्थांचे स्वरुप आहे. ज्यामध्ये परस्पर समान हीत असणाऱ्या व्यक्ति आपल्या इच्छेने त्यात भाग घेतात. व्यक्ति स्वत:चे निश्चित हेतू पार पाडण्यासाठी सहकारी मंडळीची रचना करतात. **सहकारी मंडळीचा उद्देश सभासदांमधील परस्पर सहकार साधून सभासदाच्या आर्थिक हिताचे संवर्धन करणे हा आहे. सहकारी मंडळीची सोप्या शब्दात व्याख्या खालीलप्रमाणे देता येईल.**

सहकारी मंडळी अशा धंदाकीय व्यवस्थांचे स्वरुप आहे. ज्यामध्ये व्यक्ति स्वत:च्या आर्थिक हिताच्या संवर्धनासाठी समानतेच्या पायावर स्वैच्छिकपणे जोडले जातात.

#### 6.1.1 लक्षणे :

**( 1 ) स्वैच्छिक मंडळ :** स्वैच्छिक रीते जोडलेल्या व्यक्तिचे मंडळ आहे. व्यक्ति समानतेच्या पायावर मंडळात जोडले जातात.

**( 2 ) सरळ स्थापना विधी :** कंपनीपेक्षा सहकारी मंडळीची स्थापनाविधी सरळ आहे. कमीत-कमी दहा व्यक्ति सघंटीत होऊन सहकारी मंडळीच्या कायदयानुसार सहकारी मंडळीच्या रजिस्टार समक्ष मंडळीची नोंदणी करु शकतात. नोंदणी होताच मंडळीला कायदेशिर स्वतंत्र व्यक्तित्व प्राप्त होते.

**( 3 ) सभासदांची समानता :** सहकारी मंडळीत सभासदांना समान हक्क आणि समान अधीकार मिळतात. भांडवल गुंतवणुक किंवा अन्य काही कारणांनी सभासदामध्ये भेदभाव ठेवला जात नाही.

**( 4 ) स्वतंत्र ( वेगळे ) व्यक्तित्व :** सहकारी मंडळीची नोंदणी होताच तिलातिच्या सभासदापासून वेगळे कायदेशीर व्यक्तित्व प्राप्त होते सभासदाची प्राप्ती किंवा सभासदाच्या सुरुवातीपासून तिच्या अस्तित्वावर काही परिणाम होत नाही.

**( 5 ) लोकशाही कार्यपद्धती :** सभासदांनी निवडून दिलेल्या प्रतिनिधी मंडळीचे संचालन करतात. कंपनीत शेअरप्रमाणे मताधिकारी असतो. परंतु सहकारी मंडळीत सभासदाप्रमाणे मताधिकार असतो. सहकारी मंडळीत भांडवलाला नाही. पण 'मानवा'ला महत्त्व दिले जाते कार्यपद्धतीची समितीसाठी निवडणुकीत कोणीही सभासद उमेदवारी करु शकतो. कार्यपद्धतीत भाग घेतो कंपनी स्वरुपापेक्षा मंडळीत खरोखरच लोकशाही पद्धतीने कारभार चालतो. **त्यामुळे सहकारी मंडळीला लोकशाहीची तालीमशाळा असे म्हणतात.**

**( 6 ) सेवेचा मुख्य उद्देश :** सहकारी मंडळीचा मुख्य उद्देश सभासदांना सेवा देण्याचा असतो. येथे नफ्याचा उद्देश गौण असतो. सभासदांचा आर्थिक उत्कर्ष साधण्याचा असतो. सभासदाचे जीवनमान उंचावेल आणि ते स्वनिर्भर होईल त्यासाठीचे प्रयत्न सहकारी मंडळी करत असते. उदा. ग्राहकाचा सहकारी मंडळीचा उद्देश सभासदांना योग्य गुणवत्ता असणारी वस्तू व्याजवी किंमतीत देण्याचा असतो.

**( 7 ) नफ्याची योग्य वाटणी :** संस्थेचा हेतू जरी नफ्याचा नसला तरी. ''उत्पन्नात वाढ'' झाली तर असा नफा सभासदामध्ये कायदयाने निश्चित केलेल्या डिव्हिडन्डच्या स्वरुपात वाटण्यात येतो. बाकी उरलेला नफा सभासदांच्या किंवा समाजाच्या कल्याणासाठी वापरला जातो.

**( 8 ) शेअरची कमी किंमत :** सहकारी मंडळीच्या शेअरची किंमत कमी असल्याने गरीब किंवा कमी आवक असणारी व्यक्तिपण शेअर खरेदी करुन सदस्यत्व मिळवू शकतो. कित्येकवेळेस शेअरची किंमत एक बरोबरच भरण्याच्या बदल्यात हप्ताने भरण्याची सवलतपण सभासदांना देण्यात येते.

**( 9 ) प्रति सदस्य मताधिकार :** मंडळीत सभासद पाहीजे तितक्या संख्येत शेअर घेतो, तरीपण त्याला फक्त एकच मत देण्याचा अधिकार असतो, मताधिकारासाठी शेअर्सची संख्या महत्त्वाची नाही. प्रतिसदस्य एक मताच्या सिद्धातानुसार प्रतिनिधी निवडला जातो. सभासदांमध्ये समानता, मानवता आणि तसेच त्यांच्या बुद्धीत वाढ होण्यासाठी मंडळी परिषद, तालीम वर्ग (प्रशिक्षण वर्गा)चे आयोजन करते.

**( 10 ) राजकारण आणि धर्म यांतुन अलिप्त :** सहकारी मंडळीत धर्म, जात आणि जातीय भेदभाव शिवाय प्रत्येकासाठी सभासद पद मोकळे आहे (दिले जाते) धर्म किंवा राजकारण यांच्या सिद्धांताप्रमाणे सहकारी मंडळी असु शकत नाही. त्यामुळे सहकारी मंडळी राजकारण आणि धर्म यांच्यापासून अलिप्त असते.

**( 11 ) अनियंत्रीत सभासद संख्या :** जास्तीत जास्त व्यक्ति मिळुन मंडळीचा सभासद, बनुन त्यांच्या आर्थिक हिताचे संवर्धन करतात. त्या उद्देशाने सभासदावर नियंत्रण नाही.

**6.1.2 फायदे :**

**( 1 ) सरळ स्थापना विधी :** सहकारी मंडळीच्या स्थापनेसाठी लांबलचक कायदयाच्या विधीची गरज नाही. फक्त दहा व्यक्ति स्वैच्छिक रीते एकत्र येवून सहकारी मंडळीच्या रजिस्टारकडे नोंदणी करु शकतो.

**( 2 ) कायमी अस्तित्व :** सहकारी मंडळीच्या कायदयानुसार तिची नोंदणी झाल्याबरोबर तिला सभासदांपेक्षा वेगळे अस्तित्व प्राप्त होते. सभासदाचा मृत्यू, नादारी किंवा सभासदाच्या राजिनामा देण्यामुळे कंपनीच्या अस्तित्वावर परिणाम होत नाही. याअर्थाने म्हणजेच मंडळीला दिर्घ आयुष्य असते.

**( 3 ) मुक्त सभासदपद :** समान हित असणाऱ्या व्यक्तिसाठी सभासद पद मोकळे असते. धर्म, जाती किंवा आर्थिक स्थिती सभासदत्व मिळविण्यासाठी अडचणरूप बनत नाही.

**( 4 ) सभासंदाची मर्यादीत जबाबदारी :** मंडळीच्या सभासदाची जबाबदारी त्यांनी मंडळीच्या खरीदलेल्या शेअरपुर्तीच मर्यादीत असते.

**( 5 ) सरकारी पाठबळ :** मंडळीला सभासदाच्या आणि समाजच्या कल्याणासाठीचे कार्य करण्यासाठी सरकारेद्वारे आर्थिक सहाय्य देण्यात येते. अशी सहाय्य लोन, अनुदान सबसीडी स्वरुपात असते.

**( 6 ) लोकशाही कार्यपद्धती :** मंडळीच्या सभासदांना व्यक्तिदिठ एकच मत देण्याचा अधिकार असतो. निर्णय बहुमतीने घेतला जातो. प्रत्येक सभासदाला निवडणुकीत उभे राहण्याचा, मत देण्याचा, चर्चेत भाग घेण्याचा आणि स्वत:चा प्रतिनिधी निवडण्याचा अधिकार असतो. सभासदाद्वारे निवडलेल्या कार्यकारी समिती लोकशाही पद्धतीने कारभार करते.

**( 7 ) काटकसर युक्तसंचालन :** सहकारी मंडळीत काटकसरचा सिद्धांत प्रामुख्याने पाहायला मिळतो. संचालनात सभासदांची मानदसेवा मिळते. संचालन काटकसरने चालते आणि जाहीरात खर्च करावा लागत नाही.

**( 8 ) निश्चित ग्राहकवर्ग :** मोठ्या प्रमाणात सभासदच ग्राहक असतो. सभासद निश्चित असतात आणि त्याना वस्तूची विक्री होते.

**( 9 ) व्यापारी संस्थासमोरील सदृढ स्पर्धक :** व्यापारी संस्था कित्येकवेळेस जास्त नफा मिळविण्याच्या लालचमध्ये भेळसेळ, फसवणूक, काळाबाजार वगैरेना खतपाणी घालतात. सहकारी मंडळी सभासदाचा आर्थिक उत्कर्ष, सामाजिक आणि न्यायाची खात्री देतात. शिवाय व्यापारी संस्थाद्वारे आचरण्यात येणाऱ्या गैररीतीतुन सहकारी मंडळी मुक्त असल्यामुळे व्यापारी संस्थेद्वारे सदृढ स्पर्धक म्हणून उभे राहू शकतात.

**( 10 ) समाज कल्याणाची प्रवृत्ती :** सहकारी मंडळी त्यांच्या नफा आणि जमाविलेल्या निधीतून समाजासाठी कल्याणकारी प्रवृत्ती करीत असते. कमीत पैश्यात किंवा विनामूल्ये आरोग्य तपासणी कॅम्प योजतात. दवाखाना, शाळा, बागबगीच्यांची व्यवस्था करणे. आणि सेवा करणे, त्यांची जपणुक करणे.

**( 11 ) लोकशाहीची तालीमशाळा :** मंडळीच्या संचालनात लोकशाहीला प्राधान्य असते. भांडवलापेक्षा माणसाला (व्यक्तिना) महत्त्व देण्यात येते. सभासदाचे महत्त्व सांभाळले जात असल्यामुळे लोकशाहीचे जीवंत उदाहरणे दिसते. यामुळे सहकारी मंडळी लोकशाही व्यवस्थेच्या आदर्श सिद्धांताचे शिक्षण देणारी तालीमशाळा आहे.

**( 12 ) सभासदांचा आर्थिक उत्कर्ष आणि विकास :** सहकारी मंडळी त्यांच्या सभासदांच्या आर्थिक विकासाला महत्त्वाचे योगदान देते. उदा. ग्राहकाची सहकारी मंडळी सभासदांना दैनदीन जीवनात वापरल्या जाणाऱ्या वस्तू योग्य गुणवत्ता आणि व्याजवी भावाने पुरी पाडतात. मध्यस्थीद्वारे ग्राहकाचे होणारे आर्थिक शोषण थाबंवितात. याचप्रमाणे उत्पादकांची सरकारी मंडळी सभासदांना कच्चामाल, साधने, अवजारे वगैरे व्याजवी भावात देतात. लहान उत्पादक सरळतेने उत्पादन करुन आर्थिक उन्नती करु शकतात. साखर, दुध, चामडी, कापूस सारखा क्षेत्रात सहकारी मंडळीनी खूप विकास केला आहे.

**6.1.3 मर्यादा :**

**( 1 ) भांडवलाची मर्यादा :** जास्त भांडवल एकत्र करण्याचे अवघड असते. शेअरची कमी किंमत, सभासद आर्थिकदृष्टीने गरीब वर्गातुन आणि सभ्यदिठ मताधिकार असल्याने. जास्त शेअर खरेदी करण्याचे आकर्षण कमी असल्याने भांडवलाची मर्यादा येते.

**( 2 ) बिन कार्यक्षमता :** सभासदांनी निवडुन दिलेले प्रतिनिधी मानव सेवा देतात. मानवसेवाच्या कारणाने मंडळीच्या संचालनात आणि कार्यभारा प्रत्येक ते जास्त अभिरूची आवड दाखवतील असे नाही. त्याशिवाय त्यांच्याकडे विशिष्ट ज्ञान, धंद्याकीय अनुभव आणि वेळेचा अभाव असु शकतो तरीपण मंडळीच्या कारभारात बिनकार्यक्षमता दिसुन येते. समुहगट आणि खाजगी हीतामुळे गैरवहीवट (गैरकारभार) होऊ शकतो.

**( 3 ) राजकीय हस्तक्षेप :** विविध राजकीय पक्ष मंडळीवर स्वत:चे वर्चस्व निर्माण करण्यासाठी प्रत्यक्ष किवा परोक्ष पद्धतीने प्रयत्न करीत असतात मंडळी राजकीय परिणामाच्या दबावाने काम करतात तेव्हा धंदाकीय स्वतंत्र जोखममध्ये येते. परिणामी लोकशाहीचे मूल्य धोक्यात येतात.

**( 4 ) सभासदांमध्ये मतभेद :** मंडळीच्या सभासदामध्ये प्रामाणिकपणाचा अभाव असतो. सभासदांमध्ये परस्पर कुसंप, संघर्ष स्वार्थप्रवृत्ती, गटबाजी निर्माण होते. तेव्हा सहकारी संस्थेत असहकाराचे वातावरण निर्माण होते. या सगळ्या परिणामामुळे सहकारी मंडळी समान हित असणाऱ्या व्यक्तिचे सघंटन असुन सुद्धा सहकाराचा लाभ मिळत नाही.

**(II) संयुक्त भागाची कंपनी (Joint Stock Company)**

औद्योगिक क्रांती नंतर यंत्रद्वारे मागणीच्या अपेक्षेने मोठ्याप्रमाणात उत्पादन होऊ लागले. मोठ्याप्रमाणात भांडवलाच्या गरजेप्रमाणेच जोखमचे प्रमाण वाढले. अशा परिस्थितीत धंदाकीय व्यवस्थाचे स्वरुप जसेकी वैयक्तिक मालकी किंवा भागीदारी पेढी सारखे अनुकुल राहीले नाही. वैयक्तिक मालकी आणि भागीदारी पेढीच्या मुख्य मर्यादामध्ये अमर्यादीत जबाबदारी, भांडवलाची मर्यादा, अल्प आयुष्य वगैरे होत्या. मोठ्या प्रमाणवर धंदाकीय प्रवृत्ती करण्यासाठी मोठ्या प्रमाणात भांडवलाची गरजेप्रमाणेच भांडवलाची सलामती, जबाबदारी आणि जोखमची वारणी, कार्यदक्ष संचालन वगैरे अनेक प्रश्नांना उकेल (उत्तर) रुपे नवी धंदाकीय व्यवस्थाचा उद्‌भव झाला. जिला संयुक्त भागाची कंपनी (Joint Stock Company) असे म्हणतात. ज्याला आपण थोडक्यात कंपनी म्हणून ओळखु. कंपनी स्वरूपाचा विकासाने व्यापार-उद्योगाल जलद वेग मिळाला आहे. त्यामुळे कंपनीला आर्थिक विकासाचा इन्जीन म्हणून ओळखण्यात येते. भारतात कंपनीवरच्या नियंत्रणासाठी 1956 चा कंपनी कायदा 01-04-2014 पासून 2013 चा कंपनी कायदा अमलामध्ये आला आहे.

**6.2 कंपनीचा अर्थ आणि व्याख्या**

कंपनी ही समान हेतूसाठी कायदयाने अस्तित्वात आलेली कृत्रिम व्यक्ति आहे. कायदयाच्या दृष्टीने कंपनी ही कृत्रिम, अदृश्य आणि अमुर्त व्यक्ति आहे. (Company is an artificial, invisible and intangible person in eyes of law.) 2013 च्या कंपनीधारात सांगीतल्या प्रमाणे, ''कंपनी म्हणजे या कायदयाखाली अथवा आधीच कोणत्याही कायदयाखाली स्थापलेली कंपनी.'' या व्याख्येवरुन स्पष्ट होते की कंपनी ही कायदयाचे सर्जन आहे.

**6.2.1 लक्षणे :**

**( 1 ) कायदेशीर व्यक्तित्व :** कंपनीची नोंदणी झाल्यावर कंपनीला एक वेगळे कायदेकीय व्यक्तित्व प्राप्त होते. कंपनी स्वत:च्या नावाने कायदेकीय दावा मांडु शकते. करार करु शकते. आणि कंपनीसमोर कायदेशीर कार्यवाही करु शकते.

**( 2 ) कायमी अस्तित्व :** कायदाने कंपनीला अलग व्यक्तित्व प्राप्त होते. कंपनीला त्याच्या सभासदापासुन वेगळे अस्तित्व असल्याने सभासदाचा मृत्यु नादारी सारख्या प्रसंगाने कंपनीच्या अस्तित्वावर परिमाम होत नाही. कंपनी बुडली तरच कंपनीचा अंत होतो.

**( 3 ) भांडवलाचे लहान भागात विभाजन :** कंपनीचे भांडवल लहान-लहान भागात वाटण्यात आलेले असते. या प्रत्येक भागाला (हीस्साला) शेअर असे म्हणतात. शेअर बाहेर पाडून कंपनी मोठ्या पायावर भांडवल एकत्र करते. शेअर खरीदनार व्यक्ति शेअरहोल्डर म्हटली जाते.

**( 4 ) शेअर्सची फेरबदली :** कंपनी आणि कायदयाच्या तरतुदीच्या चौकीटीत राहून शेअरहोल्डर कंपनीचा शेअर विकू शकतो आणि खरेदी करू शकतो. शेअरची फेरबदली हे कंपनीचे महत्त्वाचे लक्षण आहे.

**( 5 ) सामान्य मोहर (Common Seal) :** करार, शेअर प्रमाणपत्र दस्ताऐवज आणि रोजरोजच्या व्यवहारात कंपनीची संमती दर्शविण्यासाठी सामान्य मोहर लावण्यात येते.

**( 6 ) संचालन :** कंपनी कृत्रिम व्यक्ति असल्याने कंपनीचे आवेदनपत्र (Memorandum of Association) आणि नियमनपत्र (Articles of Association) ला आधीन राहून संचालक मंडळ (Board of Directors) कंपनीचे संचालन करत असते. शेअरहोल्डर त्यांच्यातलाच प्रतिनिधी निवडतात. त्याला संचालक (Director) असे म्हणतात. संचालक सामुहीक पद्धतीने संचालक मंडळ म्हणून ओळखते जाते. जे कंपनीचे संचालन साभांळतात. अशारीतीने कंपनीत मालक आणि संचालक दोन्ही वेगळे असतात.

**( 7 ) सभासदाचे अस्तित्व :** कंपनीत संचालन आणि मालक वेगळे असतांना देखील कंपनीला वेगळे कायदेकीय कृत्रिम व्यक्तित्व प्राप्त होत असल्याने कोणताही सभासद कंपनीच्या वतीने करार करू शकत नाही. किंवा सभासदाच्या कृत्याने कंपनी बंधनकारक होत नाही. परंतु सभासद कंपनीबरोबर करार करु शकतात.

**( 8 ) सभासद संख्या :** खाजगी कंपनीत कमीत कमी 2 आणि जास्तीत जास्त सभासदांची संख्या 200 असते. जाहीर कंपनीत कमीत कमी 7 सभासद परंतु जास्तीत जास्त सभासदांवर कोणतेही नियंत्रण नसते.

**( 9 ) सभासदांची जबाबदारी :** सभासदाची जबाबदारी मर्यादीत किंवा अमर्यादीत असु शकते. शेअरने मर्यादीत जबाबदारी असणारी कंपनीच्या सभासदाची जबाबदारी त्यांनी धारण केलेल्या शेअरच्या रक्कमे पुरतीच मर्यादीत असते. वास्तविक अमर्यादीत जबाबदारी असणाऱ्या कंपन्या खुप कमी प्रमाणात पाहायला मिळतात. सभासदांची जबाबदारी मर्यादीत आहे किंवा अमर्यादीत ते कंपनीच्या आवेदनपत्राद्वारे कळविण्यात येते.

**( 10 ) मुलभूत अधिकार :** कायदयाने कंपनीला वेगळे कायदेशीर अस्तित्व प्राप्त होते. परंतु कंपनी देशातली नागरिक नाही. त्यामुळे नागरिकाला प्राप्त असे मुलभूत अधिकार कंपनीला मिळत नाही.

**( 11 ) प्रति शेअर मताधिकार :** कंपनीचे सभासद त्यांच्याकडे जितक्या संख्येत शेअर असतील तितके मत देऊ शकतात. शेअरची सरळ फेरबदली आणि शेअर प्रमाणे मत ही या कंपनीची प्राथमिक लक्षणे आहेत.

**6.2.2 फायदे :**

**( 1 ) जास्त भांडवलाची प्राप्ती :** कंपनी त्याच्या भाडंवलाचे लहान लहान हिस्यात म्हणजे की शेअरमध्ये वाटणी करते. शेअर प्रमाणे मताधिकार असल्याने जास्त शेअर खरेदी करण्याचे आकर्षण असते. परिणामाने कंपनी विशाल प्रमाणात भांडवल एकत्र करु शकते.

**( 2 ) शेअर्सच्या फेरबदलीत सरळता :** मान्य शेअरबाजारात शेअरची खरेदी-विक्री सरळतेने होत असल्याने कंपनीचे सभासद आपल्या इच्छा प्रमाणे शेअर विकून पैसे मिळवितात. आणि गरजेप्रमाणे शेअर खरेदी करतात. खाजगी कंपनीच्या शेअरच्या फेरबदलीवर नियंत्रण असते.

**( 3 ) सभासदांची मर्यादीत जबाबदारी :** शेअरच्या मर्यादीत जबाबदारी असणारी कंपनीच्या सभासदाची जबाबदारी त्यांच्या खरेदी केलेल्या शेअरच्या मुळकिंमती पुरताच मर्यादीत असते. कंपनी नादार झाली किंवा कंपनीचे विसर्जन झाले. तर अशा परिस्थितीत त्यांना मुळकिंमतपेक्षा जास्त पैसे चुकवायचे नसतात.

**( 4 ) स्वतंत्र व्यक्तित्व आणि दिर्घ आयुष्य :** कायदयाद्वारे कंपनीला त्याच्या सभासदापेक्षा स्वतंत्र व्यक्तित्व आणि अस्तित्व प्राप्त होत असल्याने कंपनीला दिर्घ आयुष्य मिळते. सभासदाचा मृत्यु, नादारी मानसिक आजार झाला असेल तर अशा परिस्थितित किंवा सभासद द्वारा शेअरची फेरबदलीने कंपनीच्या अस्तित्वाला काही फरक पडत नाही.

**( 5 ) मोठ्या आकारमानाचा लाभ :** कंपनीसाठी मोठ्याप्रमाणावर खरेदी-विक्री आणि उत्पादन शक्य झाले आहे. विशाल भांडवल निधी आधुनीक यंत्रे, निष्णांताची सेवा, संशोधन वगैरेच्या कारणाने कमी खर्चात मोठ्या पायावरील उत्पादनाचे लाभ मिळवीता येतात. **म्हणून कंपनीला आर्थिक विकासाचे इंजीन म्हणून ओळखण्यात येते.**

**( 6 ) कार्यक्षम संचालन :** निष्णांताची सेवा आणि कार्यकुशल संचालकाच्या कारणाने. कंपनीचे संचालन व्यवसायलक्षी आणि कार्यक्षम बनते.

**( 7 ) लोकशाही संचालन :** सभासदानी निवडलेले प्रतीनीधी म्हणजेच संचालकान द्वारे कंपनीचे संचालन लोकशाही पद्धतीने होत असते. महत्त्वाचे निर्णय सभासदाच्या सामान्यसभेत बहुमतीने घेण्यात येतात.

**( 8 ) समाज आणि राष्ट्राला लाभ :** जाहीर जनता त्यांच्या बचतीचे कंपनीचे शेअर, डिबेंचर, जाहीर ठेवी मध्ये गुंतवणुक करतात. बचतीला प्रोत्साहन मिळते. गुंतवणुकीवर त्यांना डिवींडड आणि व्याजाचे उत्पन्न मिळते. मोठ्या पायावरील उत्पादनाचे लाभ समाजातील लोकांना देखील मिळतो. रोजगारीच्या संधीत वाढ होते. कित्येक कंपन्या नफ्याचा काही भाग, कला, बगीचे, शाळा, कॉलेजा खेळाचे मैदाने वगैरे साठी खर्च करतात. कर्मचाऱ्यांना देखील स्वइच्छेने विविध सवलती पुरवितात. कंपन्या कराच्या स्वरुपात करोडो रुपये सरकारला चुकवितात. ही रक्कम देशाच्या विकासाठी वापरली जाते.

**6.2.3 मर्यादा (Limitations) :**

**( 1 ) लाबी आणि खर्चीक स्थापनाविधी :** वैयक्तीक मालकी आणि भागीदारीच्या तुलनेत कंपनीची स्थापनाविधी दीर्घ, जटील आणि खर्चीक आहे. कंपनीला तोचे नोंदणी प्रमाणपत्र मिळवीण्यासाठी आवेदनपत्र आणि नियमनपत्रा सारखे दस्तावेज तयार करुन कंपनी रजीस्ट्रार समोर रजु करावे लागतात. या साठी निष्णांताची सेवा घ्यावी लागते. निष्णांताना त्याच्या सेवेसाठी जास्त फी त्याशीवाय कंपनी रजिस्ट्रारला नोंदणी साठीची फी चुकवावी लागते.

**( 2 ) कायदेकीय नियत्रणे :** कंपनी कायदयाद्वारे अस्तीत्वात येते कंपनीला तिच्या हयाती दरम्यान कायदयाच्या तरतुदीचे पालन करावे लागते. नियमीतपणे पत्रक, अहवाल आणि हिशोब कंपनी रजिस्ट्रारला पाठवायचे असतात. सेबी-SEBI (Securities and Exchange Board of India) च्या कित्येक तरतुदीचे पालन करावे लागते.

**( 3 ) वहीवटी खर्चात वाढ :** निष्णाताची जास्त फी, विशीष्ट आधीकाऱ्यांना आकर्षक पगार, संशोधनासाठी केला जाणारा खर्च वगैरेमुळे कंपनीच्या वहीवटी खर्चात वाढ होते.

**( 4 ) हुकुमशाही व्यवस्था :** सभासदाना कायदायद्वारे पुष्कळ हक्क देण्यात आले असताना देखील ते कंपनीची मात्र नावा पुरतीच सत्ता भोगतात. प्रतीशेअर मतआधीकार असल्यामुळे कित्येक व्यक्ती समूह तयार करुन संचालनावर ताबा मिळवितात. आणि स्वत:च्या इच्छेप्रमाणे संचालन करतात. कंपनीचे पैसे, मालमत्ता आणि खाजगी माहिती स्वत:च्या व्यक्तीगत हितासाठी आणि स्वार्थासाठी उपयोग करतात.

**( 5 ) रहस्याची जपवणुक करणे अवघड :** कंपनीला तिचे वार्षिक हिशोब सक्तीने ऑडीट करुन सभासदाना तसेच कंपनी रजिस्ट्रारला पाठवावे लागतात. कायदयानुसार दुसऱ्या कित्येक गोष्टी जसेकी डिबेंचर, बोनस शेअरशी संबंधित बाबी प्रसिद्ध करावी लागतात. त्यामुळे रहस्याची जपवणूक करणे अवघड बनते.

**( 6 ) नीतीविषयक निर्णयात विलंब :** नितीविषयक निर्णय घेण्यासाठी सभासदाची संमती घ्यावी लागते. यासाठी सभासदाची सभा बोलवावी लागेत. ही सभा बोलविण्यआधी सभासदाना निश्चीत दिवसा आधी सभेची नोटीस दयावी लागते. सभेत ठराव पास करावा लागतो या सर्वांसाठी मोठ्या प्रमाणात वेळ द्यावी लागतो त्यामुळे निर्णय घेण्यात विलंब होतो.

**( 7 ) परिवर्तनशीलतेचा अभाव :** व्यक्तीगत मालकी आणि भागीदारी पेक्षा कंपनी स्वरुपात परिवर्तनशीलतेचे तत्व कमी प्रमाणात आहे. महत्त्वाचे बदल करण्यासाठी सामान्य सभेत ठराव पास करावा लागतो. कित्येक परिस्थीतीत केंद्र सरकार आणि कोर्टाची परवानगी मिळवावी लागते.

**( 8 ) सट्टेबाजीला उत्तेजना :** संचालकांना कंपनीची खाजगी माहिती माहीत असल्यामुळे शेअर बाजारात कृत्रीम बदल करुन सट्टेबाजीला उत्तेजना देतात. शेअरमध्ये होणारी सट्टेबाजी लहान गुंतवणुक दाराच्या आर्थिक हिताला नुकसान पोहचवीते.

**( 9 ) समजाला गैरफायदे :** कर्मचाऱ्यांची हडताळ, मालकाद्वारे ताळेबंदीचा भोग समजाला भोगावा लागतो. मानवपेक्षा भांडवलाला जास्त महत्त्व असल्यामुळे मक्तेदारीचे दुष्परीणाम पाहवयास मिळतात त्यामुळे समाजात उत्पन्न आणि संपत्तीत असमानता पाहवयाला मिळते.

**6.2.4 कंपनीचे प्रकार :**

**कंपनीचे प्रकार**

- (A) खास कायदयाद्वारे अस्तीत्वात येणारी कंपनी
- (B) सभासदाच्या संख्येच्या दृष्टीने
  - (I) जाहीर कंपनी
    - (1) शेअर भांडवलाने मर्यादीत जबाबदारी असणारी कंपनी
    - (2) खात्रीने मर्यादीत जबाबदारी असणारी कंपनी
    - (3) अमर्यादीत जबाबदारी असणारी कंपनी
  - (II) खाजगी कंपनी
    - (1) शेअर भांडवलाने मर्यादीत जबाबदारी असणारी कंपनी
    - (2) खात्रीने मर्यादीत जबाबदारी असणारी कंपनी
    - (3) अमर्यादीत जबाबदारी असणारी कंपनी
  - (III) एक व्यक्तीची कंपनी
- (C) वर्चस्वाच्या दृष्टीने
  - (I) सरकारी कंपनी
  - (II) शासक कंपनी
  - (III) गौण कंपनी
- (D) नोंदणीच्या स्थानाच्या दृष्टीने
  - (I) भारतीय कंपनी
  - (II) विदेशी कंपनी

**(A) खास कायदयाने निर्माण झालेली कंपनी (Statutory Company) :** संसद किंवा विधानसभेत खास कायदायद्वारे अस्तीत्वात येणारी कंपनी. उदा. रिझर्व बँक ऑफ इंडीया, जीवन विमा महामंडळ

**(B) सभासदाच्या संख्येच्या दृष्टीने (From the View Point of Number of Member) :**

**(I) जाहीर कंपनी (Public Company) :** कंपनी कायदयानुसार जी कंपनी खाजगी कंपनी नाही ती कंपनी जाहीर कंपनी असते. यात कमीत कमी सात सभासद आवश्यक आहेत जास्तीत जास्त सभासद संख्येवर कोणतेही नियंत्रण नाही. ही कंपनी तीचे शेअर आणि डिबेंचर खरेदी करण्यासाठी जाहीर जनतेला आमंत्रीत करु शकते. जिच्या शेअरच्या फेरबदलीवर नियंत्रण नसते. जाहीर कंपनीच्या सभासदाच्या जबाबदारीच्या दृष्टीने तीन प्रकार आहेत.

**(1) शेअर भांडवलाने मर्यादीत जबाबदारी असणारी कंपनी :** कंपनीच्या सभासदाची जबाबदारी त्यांनी खरीदी केलेल्या शेअरच्या दर्शविलेली किमती इतकी मर्यादीत असते. या कंपनीला तिच्या नावाच्या शेवटी 'लिमिटेड' (Limited) हा शब्द लिहावा लागतो.

**(2) खात्रीने मर्यादीत जबाबदारी असणारी कंपनी :** कंपनीच्या सभासदाची जबाबदारी त्यांनी दिलेल्या खात्रीच्या रक्कमे इतकी मर्यादीत असते. कंपनीच्या विसर्जनाच्या परीस्थीतीत सभासदाना दिलेल्या खात्रीची रक्कम चुकवावी लागते.

**(3) अमर्यादीत जबाबदारी असणारी कंपनी :** या प्रकारच्या कंपनीच्या सभासदाची जबाबदारी अमर्यादीत असते. कंपनीच्या मालमत्तेपेक्षा देणे वाढत असेल तर सभासद व्यक्तीगत रीत्या जबाबदार असतात. कंपनीच्या विसर्जनाच्या परीस्थितीत सभासदाना त्यांच्या खाजगी मालमत्तेमधून हिस्सा द्यावा लागतो.

**(II) खाजगी कंपनी (Private Company) :** खाजगी कंपनी म्हणजे अशी कंपनी की जीच्या सभासदांची संख्या कमीत-कमी 2 आणि जास्तीत जास्त 200 पर्यंत मर्यादीत असतात. खाजगी कंपनीच्या शेअरच्या फेरबदलीवर नियंत्रण असते. जाहीर जनतेला तिचे शेअर किंवा डिबेन्चर खरेदी करण्याचे आमंत्रण देत नाही. खाजगी कंपनीच्या सभासदाचा जबाबदारीच्या दृष्टीने तीन प्रकार आहेत.

**(1) मर्यादीत जबाबदारी असणारी कंपनी :** सभासदाची जबाबदारी त्यांनी खरेदी केलेल्या शेअरच्या दार्शनिक किंमती पुरताच मर्यादीत असते मर्यादीत जबाबदारी असणारी खाजगी कंपनीला त्यांच्या नावाच्या शेवटी ''प्राइवेट लिमिटेड'' (Private Limited) शब्द लावावा लागतो.

**(2) खात्रीने मर्यादीत जबाबदारी असणारी कंपनी :** कंपनीच्या सभासदाची जबाबदारी त्यांनी दिलेल्या खात्रीच्या रक्कमपुरतीच मर्यादीत असते कंपनीच्या विर्सजनाच्या वेळी खात्रीने दिलेली रक्कम चुकविण्याची जबाबदारी शेअर होल्डर्सची असते. कंपनीला तिच्या नावाच्या शेवटी 'प्राईवेट' शब्द लिहावा लागतो.

**(3) अमर्यादीत जबाबदारी असणारी कंपनी :** कंपनीच्या सभासदाची जबाबदारी अमर्यादीत असते. कंपनीच्या मालमत्ता पेक्षा कर्ज वाढले तर सभासद व्यक्तिगतरीत्या जबाबदार असतात. कंपनीच्या विसर्जनच्या वेळी सभासदाला आपली खाजगी मालमत्तातून हिस्सा दयावा लागतो. या कंपनीना त्याच्या नावात 'प्राइवेट' शब्द लिहावा लागतो.

**(III) एक व्यक्तिची कंपनी (One Person Company) :** एक व्यक्तीची कंपनी म्हणजे अशी कंपनी की जिच्यामध्ये एक व्यक्ती सभासद म्हणून असतो. एक व्यक्तीची (खाजगी) कंपनी, कंपनीत संचालक असतात त्याप्रकारे एका सभासदा बरोबर करार करण्यात येतात. एका व्यक्तीच्या कंपनीत अशा व्यक्तीची लेखीत संमती आवश्यक आहे. त्या व्यतीरीक्त कंपनीच्या नोंदणीच्या वेळेस आवेदनपत्र आणि नियमनपत्र कंपनी रजिस्ट्रार समोर रूजू करावे लागतात. एका व्यक्तीच्या कंपनीच्या स्थापनेची तरतुद 1956 च्या कंपनी कायदयात नव्हती. परंतु 2013 च्या कंपनी कायदयाप्रमाणे खाजगी कंपनी एका व्यक्तीची कंपनी असू शकते.

**(C) वर्चस्वाच्या दृष्टीने (From the View Point of Domination) :**

**(I) सरकारी कंपनी (Government Company) :** ज्या कंपनीची भरपाई झालेल्या भांडवलाच्या कमीत-कमी 51% टक्के भांडवल (1) केन्द्र सरकार अथवा (2) राज्य अथवा (3) एकापेक्षा जास्त राज्य सरकार अथवा (4) केन्द्र सरकार आणि एक किंवा एकापेक्षा जास्त राज्य सरकाराबरोबर मिळून काम करते त्याला सरकारी कंपनी म्हणतात. उदा. अशोक हॉटेल्स लिमिटेड, भारत हेवी इलेक्ट्रीक लिमिटेड (BHEL), महानगर टेलिफोन निगम लिमिटेड (MTNL).

**(II) शासक कंपनी (Holding Company) :** जी कंपनी अन्य कंपन्यांचे 50% हुन जास्त शेअर्स धारण करीत असेल आणि अशा कंपन्यांचे बहुमती डायरेक्टर्स किंवा संचालक नेमण्याचा आधिकार ती प्राप्त करीत असेल तर अशा कंपनीला शासक कंपनी असे म्हणतात.

**(III) गौण कंपनी (Subsidiary Company) :** गौण कंपनी म्हणजे अशी कंपनी की (1) ज्या कंपनीचे 50% हुन आधिक शेअर्स शासक कंपनीजवळ असतील आणि (2) तिचे सर्व संचालकांची नेमणुक करण्याचा आधिकार शासक कंपनीकडे असतील तर ती गौण कंपनी समजली जाते.

**(D) नोंदणीच्या स्थापनाच्या दृष्टीने (From the View Point of Place of Registration) :**

**(I) भारतीय कंपनी (Indian Company) :** कंपनीची नोंदणी भारतात, भारतीय कंपनी कायदयानुसार किंवा पार्लमेन्ट (संसद)च्या खास कायदयाद्वारे झाली असेल अशा कंपनीला भारतीय कंपनी असे म्हणतात. भारतीय कंपनी जाहीर कंपनी, खाजगी कंपनी किंवा सरकारी कंपनी असु शकतात.

**(II) विदेशी कंपनी (Foreign Company) :** ज्या कंपनीची नोंदणी भारताबाहेर झाली असेल, जीचे रजिस्टर्ड ऑफिस भारतात नसेल आणि जिचे धंद्याचे स्थळ भारतात असेल अशा कंपनीला विदेशी कंपनी असे म्हणतात.

### 6.2.5 कंपनीची स्थापना विधी

**कंपनीची स्थापना विधी**

↓

| (A) प्रवर्तन | (B) नोंदणी प्रमाणपत्र मिळविण्याचा विधी |
|---|---|
| ↓ | ↓ |
| (1) कंपनीच्या प्रवर्तनाचा विचार | (1) आवेदन पत्र |
| (2) प्राथमिक आणि तपशीलवार खात्री | (2) नियमन पत्र |
| (3) साधनांचे एकत्रीकरण | (3) संचालकाची यादी |
| (4) पैशांची व्यवस्था करणे | (4) संचालकाची लेखीत संमती |
| | (5) अन्य कंपनीत हीता विषयीची जाहीरात |
| | (6) कायदा पालनाच्या जाहीरातीचे निवेदन |

**(A) प्रवर्तन (Promotion) :** कंपनीला अस्तित्वात आणण्याचा विचार आणि त्यासाठीची पुर्वतयारी म्हणजे प्रवर्तन. कंपनीच्या प्रवर्तनाचा विचार करुन तो अमलात आणणाऱ्या व्यक्तिला प्रवर्तक (Promotor) म्हणतात. या टप्प्यात प्रवर्तकाला खालील मुद्यांचा विचार करावा लागतो.

**(1) कंपनीच्या प्रवर्तनाचा विचार :** प्रवर्तकाला कंपनी प्रवर्तन करण्याचा विचार त्याच्या डोक्यात उद्‌भवतो. एखादया संशोधनाला अमलात आणणे किंवा नवी वस्तू बाजारात उपलब्ध करणाऱ्या कंपनीची स्थापना करण्याचा विचार करत असतो. प्रवर्तन म्हणजे प्रवर्तकाचे मानस संतान (Promotion is the brain child of the promotor.).

**(2) प्राथमिक आणि तपशिलवार खात्री :** प्रवर्तकाला कंपनीच्या स्थापनेचा विचार आला म्हणजे तिच्या अंमल करण्यासाठी धंदाकीय व्यवहारीकदृष्टा खात्री करावी लागते. धंद्यासाठी स्थान पसंदगी, नफाकारकता याविषयी तपास करावा लागतो.

प्राथमिक तपासाच्या अंती तपशिलवार, विश्लेषणात्मक तपासाची खात्री करावी लागते. कच्चा माल, यंत्रे, मागणी, साधनसामग्री वाहन-व्यवहाराची सुविधा वगैरे गोष्टीची विस्तृत माहिती मिळवावी लागते.

**(3) साधनांचे एकत्रीकरण :** प्रवर्तनाला अमलात आणण्यासाठी प्रवर्तकाला जमीन, कच्चा, माल, यंत्रे, सेवा वगैरे मिळविण्यासाठी करार करावा लागतो.

**(4) पैशांची व्यवस्था करणे :** साधने आणि मालमत्ता एकत्रित करण्यासाठी भांडवल कोठून आणि कशापद्धतीने गोळा करायचे त्याचा विचार करावा लागतो. नवी कंपनी शेअरद्वारे भांडवल मिळवते.

**(B) नोंदणीचे प्रमाणपत्र मिळविण्याची विधी :** कंपनीला अस्तित्वात आणण्यासाठी कंपनी रजिस्टारकडून नोंदणीपत्र मिळवावे लागते. हे प्रमाणपत्र मिळविण्यासाठी खालील करारपत्र तयार करुन कंपनी रजिस्टार (Registrar of Companies) समक्ष रूजु करावे लागतात.

**(1) आवेदनपत्र :** आवेदनपत्र कंपनीचा मूलभूत दस्तावेज आहे. ज्याप्रमाणे कुठल्याही देशाची स्वत:ची घटना असते. त्याप्रमाणे आवेदनपत्र ही कंपनीची घटना असते. ज्यावर कंपनीची इमारत बांधण्यात येते. आवेदनपत्रात खालील कलमांची तरतुदी करणे सक्तिचे असते.

**(a) नावाची कलम :** शेअरने मर्यादीत जबाबदारी असणाऱ्या कंपन्याना आपल्या नावाच्या शेवटी 'लिमिटेड' आणि मर्यादीत जबाबदारी असणाऱ्या खाजगी कंपन्याना 'प्राइवेट लिमिटेड' शब्द लिहावे लागतात भारतात नोंदविलेली अन्य कंपनी सारखे नाव तसेच राष्ट्रहिताला नुकसान करेल असे नाव ठेवू शकत नाही.

**(b) रजिस्टर्ड ऑफिसच्यापत्त्याची कलम :** कंपनी रजिस्टार आणि जाहीर जनता कंपनीबरोबर पत्रव्यवहार करू शकतात. कंपनी स्थापनेच्या कायदयानुसार निर्धारीत वेळेत कंपनीने आपल्या रजिस्टर्ड ऑफिसचा पत्ता दर्शविला पाहीजे.

**(c) ध्येय अथवा हेतूचे कलम :** आवेदनपत्राची ही सर्वात महत्त्वाची कलम आहे. कंपनी कोणत्या उद्देशासाठी कोणता धंदा करेल ते या कलमात दर्शवावे लागते. ज्या उद्देशासाठी कंपनीची स्थापना करण्यात आली असेल त्या शिवायच्या उद्देशासाठी कंपनी कार्य करु शकत नाही.

**(d) जबाबदारीची कलम :** कंपनी सभासदाची जबाबदारी मर्यादीत, अमर्यादीत किंवा घटनेने मर्यादीत आहे. त्याचा उल्लेख या कलमात करते.

एकच व्यक्तिची कंपनीच्या हिस्स्यात मुळ व्यक्तिचा मृत्यू किंवा करार करण्यात आलेल्या असमर्थतेमुळे व्यक्ति म्हणून कोणाचे नाव दाखल करण्यात येईल त्याचा उल्लेख या कलमात करण्यात आलेला असतो.

**(e) भांडवलाचे कलम :** कंपनीचे अधिकृत भांडवल आणि त्याचे विभाजन निश्चित रकमेच्या किती शेअरमध्ये करण्यात येते याची माहीती भांडवलाच्या कलमात देण्यात आलेली असते.

**(f) स्थापनेचे कलम :** जाहीर कंपनी असेल तर कमीत-कमी 7 आणि खाजगी कंपनी असेल तर कमीत कमी 2 सभासद त्यांच्या सहीने कंपनी स्थापना करू शकतात व त्याप्रमाणे स्थापना केली आहे तसे निवेदन कलमाद्वारे करण्यात येते.

**( 2 ) नियमनपत्र :** कंपनीच्या आंतरीक कारभारचे नियम नक्की करणारा करारपत्र म्हणजे नियमन पत्र होय. आवेदनपत्राच्या नक्की केलेल्या सीमारेषेत राहून नियमन पत्रात कंपनीचा कारभार चालवण्यासाठी नियमावली तयार करण्यात येते. त्यात सभासदाचा आधिकार शेअर हफ्ता, शेअरजप्ती, संचालक मंडळाची सत्ता वगैरे नियमांचा समावेश होतो. आवेदनपत्राने आणि नियमनपत्राने नोंदणी झाल्याने दोन्ही दस्ताऐवज जाहीर दस्ताऐवज होऊ शकतात.

**( 3 ) संचालकांची यादी :** संचालक म्हणून काम करण्यासाठी तयार असतील अशा व्यक्तीची यादी त्याची नावे, पत्ता, वय, व्यवसाय राष्ट्रीयता यासर्व गोष्टींची यादी रजिस्टराकडे नोंदवावी लागते. कंपनीच्या संचालकात कमीत-कमी एक व्यक्ति महीला संचालक असणे गरजेचे असते.

**( 4 ) संचालकांची लेखीत संमती :** ज्याचे नाव संचालक म्हणून दर्शविण्यात आले असेल तो संचालक म्हणून काम करण्यास तयार आहे. अशी त्याला लेखीत संमतीपत्र रजिस्टराकडे नोंदवावे लागते.

**( 5 ) अन्य कंपनीत हित आणि त्याविषयीची जाहीरात :** कंपनीचे संचालक, मॅनेजर, सक्रेटरी किंवा भरणा भरणारे जर दुसऱ्या कंपनीबरोबर हितसंबंध त्यांचे असतील तर त्याविषयीचे निवेदन त्याना नोंदावे लागते.

**( 6 ) कायदा पालनाच्या जाहीरातीचे निवेदन :** कंपनीने वरील सर्व तरतुदीचे पालन केले आहे. आणि सर्व दस्तऐवज कंपनी रजिस्टारकडे नोंदविले आहेत याची. जाहीरात करणारे निवेदन तयार करुन ते निवेदन कंपनी रजिस्टारकडे नोंदवावे लागते.

वरील दस्ताऐवजां बरोबर जरूरी नोंदणी फी भरण्यात येते. कंपनी रजिस्टार दस्ताऐवजांची तपासणी केल्यानंतर जर दस्ताऐवज संतोषकारक वाटले तर तो त्याची नोंदणी कंपनीच्या पुस्तकात करतो. या विधी पूर्ण झाल्यानंतर रजिस्टार ''नोंदणीचे प्रमाणपत्र'' देतो. नोंदणीच्या प्रमाणपत्रामध्ये जी तारीख देण्यात आली असेल त्या तारखेपासून कंपनीची सुरुवात झाली असे म्हटले जाते.

कंपनी रजिस्टार कंपनी नोंदणी चे प्रमाणपत्राच्या बरोबर कंपनी ओळख नंबर (Corporate Identification Number) जो कंपनीची ओळख बनते आणि त्याचा समावेश नोंदणीच्या प्रमाणपत्रात करण्यात येतो. कंपनीने रूजु केलेले मुळ दस्ताऐवज आणि माहीती पत्रके, कंपनीचे विसर्जन जोपर्यंत होत नाही. तोपर्यंत कंपनीच्या रजिस्टार ऑफिसमध्ये सांभाळण्यात येते.

खाजगी कंपनी या सगळ्या विधी पूर्ण केल्यानंतर धंदा सुरु करु शकतात. जेव्हा जाहीर कंपनीला विज्ञानपत्र बाहेर पाडून लघुतम भरण्याच्या अटी पुर्ण केल्यानंतर शेअरची वाटणी करू शकतात.

## 6.3 भागीदारी पेढी आणि कंपनी यांच्यातील फरक

| अनुक्रम नंबर | फरकांचे मुद्दे | भागीदारी पेढी | कंपनी |
|---|---|---|---|
| (1) | स्थापना विधी | सरळ आणि नोंदणी मर्जीप्रमाणे होते. कायदेशीर व्यक्तित्व नसते. | लांबलचक आणि गुंतागुतीची आहे. नोंदणी सक्तिची आहे. वेगळे कायदेशीर व्यक्तित्व असते. |
| (2) | सभासद संख्या | कमीत कमी 2 कंपनी फायदा 2013 च्या कलम 464 नुसार.... ''भागीदारी संस्थेत भागीदारांची संख्या 100 पेक्षा जास्त नाही, सरकारने नक्की केल्या प्रमाणे नियमा प्रमणे राहिल. संध्या कंपनीच्या किरकोळ नियमा प्रमाणे (Miscellaneous Rule) 10 ( वर्ष 2014) प्रमाणे सरकारने भागीदारीची महत्तम मर्यादा संख्या 50 नक्की केलेली आहे. | जाहीर कंपनीत कमीत-कमी 7 सभासद आणि जास्तीत जास्त अमर्यादीत. खाजगी कंपनीत कमीत कमी 2 जास्तीत जास्त 200. |
| (3) | भांडवल | भांडवल कमी प्रमाणात. | शेअर भांडवल बाहेर पडते तेव्हा मोठ्या-प्रमाणात भांडवल मिळू शकते. |
| (4) | हिस्सा किंवा भागाची फेरबदली | अन्य भागीदारांच्या संमती शिवाय भागीदार स्वत:चा हिस्सा किंवा हीताची फेरबदली करू शकत नाही. | सभासद आणि शेअरची फेरबदली सरळ आणि मुक्तरीते करु शकतात. परंतु खाजगी कंपनीत शेअरची फेरबदलीवर नियंत्रण असते. |
| (5) | जबाबदारी | भागीदारी पेढीच्या भागीदारांची जबाबदारी अमर्यादीत असते. | मर्यादीत जबाबदारी असणारी कंपनीच्या कर्जासाठी शेअरहोल्डर व्यक्तिगतरीते जबाबदार नसतात. |
| (6) | संचालन | पेढीचे संचालन भागीदार स्वत:च करतो. | शेअर होल्डरद्वारे निवडलेल्या संचालक कंपनीचे संचालन करतात. |
| (7) | आयुष्य | एखादया, भागीदारांचा मृत्यू झाला, किंवा नादार झाला, किंवा त्याला मानसिक आजार झाला तर भागीदारीचे विसर्जन होते. थोडक्यात भागीदारीचे आयुष्य अल्प असते. | सभासदाचा मृत्यू, नादारी, किंवा मानसिक आजार अशा परिस्थिती कंपनीच्या अस्तित्वाचा अंत येत नाही. थोडक्यात कंपनीचे आयुष्य दिर्घ आहे. |
| (8) | रहस्याची जपवणुक | धंद्यात रहस्याची जपवणुक होते. | धंद्यात रहस्याची जपवणुकीत अडथळे येतात. |
| (9) | व्यक्तिगत संपर्क | पेढीच्या कर्मचाऱ्यांबरोबर आणि ग्राहकां-बरोबर आणि भागीदार सरळतेने संपर्क करु शकतात. | कंपनीत व्यक्तिगत संपर्काचा अभाव आहे. |
| (10) | परिवर्तनशीलता | परिवर्तनशील आहे. | परिवर्तनशाली नाही. |
| (11) | विसर्जन | करारानुसार अथवा कायदयाने नक्की केलेल्या परिस्थितीत किंवा भागीदारची जेव्हा इच्छा असेल तेव्हा भागीदारीचे विसर्जन होते. | कंपनीचे विसर्जन कायदयाचे पालन करुनच करता येते. |

**6.4 खाजगी कंपनी आणि जाहीर कंपनी याच्यातील फरक**

| अनुक्रम नंबर | फरकाचे मुद्दे | खाजगी कंपनी | जाहीर कंपनी |
|---|---|---|---|
| (1) | सभासद संख्या | सभासद संख्या कमीत कमी 2 व्यक्ती आणि सभासदसंख्या 200 पेक्षा वाढु नये | सभासद संख्या कमीत कमी 7 व्यक्ती आणि जास्तीच्या संख्येवर नियंत्रण नाही. |
| (2) | शेअरची फेरबदली | शेअरच्या फेरबदलीवर खाजगी कंपनी त्याच्या नियमनपत्राद्वारे नियंत्रण ठेवते. | शेअरची फेरबदली मुक्तपणाने होते. |
| (3) | जाहीर जनतेला आमंत्रण | जाहीर जनतेला शेअर किंवा डिबेन्चर खरेदी करण्याचे आमंत्रण देत नाही. विज्ञापनपत्र बाहेर पाडू शकत नाही. | विज्ञानपत्र बाहेरपाडून जाहीर जनतेला शेअर किंवा डिबेन्चर खरेदी करण्याचे आमंत्रण देतात. |
| (4) | एका व्यक्तिची कंपनी | खाजगी कंपनी एका व्यक्तिची कंपनी (One-man Company) असू शकते. एका व्यक्तिची कंपनी डिरेक्टर (संचालक) असेल तथा एकमात्र सभासदाबरोबर करार करू शकतो. | जाहीर कंपनी एक व्यक्तिची कंपनी नसते आणि जाहीर कंपनी असा करार करु शकत नाही. |
| (5) | संचालकाची संख्या | कमीत कमी 2 संचालक पाहीजे. | कमीत कमी 3 संचालक पाहिजे ज्यात एक महिला संचालक अनिवार्य आहे. |
| (6) | कंपनीचे नाव | मर्यादीत जबाबदारी असणारी खाजगी कंपनी असेल तर नावाच्या शेवटी 'प्राईवेट लिमिटेड' हा शब्द आणि अमर्यादित जबाबदारी असणारी खाजगी कंपनी असेलतर 'प्राइवेट' शब्द लिहावा लागतो. | मर्यादीत जबाबदारी असणारी जाहीर कंपनी असेल तर नावाच्या शेवटी 'लिमिटेड' शब्द लिहीवा लागतो. |
| (7) | नियमनपत्र | नियमनपत्र तयार करुन कंपनी रजिस्टार समक्ष नोंदणी करणे सक्तिचे आहे. | नियमनपत्र तयार केलेल नसेल तर अशा परिस्थितीत कंपनीच्या परिशिष्ट-1 मध्ये नमुद केलेल नमुने (Model) आर्टिकल्स आर्टिकल्स आपोआपच लागु पडतात. |
| (8) | लघुतम भांडवलाच्या भरपाईची तरतुद | खाजगी कंपनीसाठी लघुतम भांडवलाचा भरपाईची तरतुद असत नाही. | जाहीर कंपनीला लघुतम भांडवलाच्या भरपाईच्या तरतुदीचे पालन करावे लागते. |
| (9) | नवे शेअर | नवे शेअर बाहेर पाडण्यात आले तर कंपनीच्या वर्तमान सभासदा व्यतीरीक्त अन्य व्यक्तीना शेअर देता येतात. | नवे शेअर बाहेर पाडण्यात येतात तेव्हा पहीली संधी कंपनीच्या वर्तमान सभासदांना दयावी लागते. |

**6.5 सहकारी मंडळी आणि कंपनी यांच्यातील फरक :**

| अनुक्रम नंबर | फरकाचे मुद्दे | सहकारी मंडळी | कंपनी |
|---|---|---|---|
| (1) | अर्थ | स्वत:च्या आर्थिक स्थितित सुधारणा करण्यासाठी समानतेच्या हितासाठी स्वैच्छिक रीते संघटीत झालेल्या व्यक्तिचे मंडळ आहे. | कायदेशीर धंदा करुन नफा मिळविण्यासाठी एकत्रित झालेल्या व्यक्तिच्या मर्जीचे मंडळ आहे. |
| (2) | हेतू | मुख्य हेतू सभासदाची सेवा आर्थिक विकास आणि सद्धरतेचा आहे. नफ्याचा उद्देश गौण असतो. | मुख्य हेतू नफ्याचा असतो. |
| (3) | सभासद संख्या | कमीत-कमी 10 सभासद आणि जास्त सभासदाविषयी काही तरतुदी नाही. | जाहीर कंपनीत कमीत-कमी 7 आणि जास्तीत जास्त कितीही सभासद असु शकतात. खाजगी कंपनीत कमीत कमी 2 आणि जास्तीत जास्त 200 पर्यंत सभासदसंख्या असु शकते. |
| (4) | स्थापना विधी | स्थापना विधी कंपनीपेक्षा सरळ आहे. | स्थापना विधी लांबी आणि गुंतागुतीची जटील आहे. |
| (5) | व्यवस्थापन | व्यवस्थापण लोकशाही पद्धतीने होते. सभ्यदिठ एक मत देण्याचा आधिकार असतो. सभासद कितीही शेअर घेतले तरीही एक मत देऊ शकतात. | मात्र सिद्धातातंच लोकशाही व्यवस्थापण आहे. शेअरदिठ मत असल्याने लोकशाहीची कल्पना भ्रामक बनते. |
| (6) | शेअर | एक सारख्या अधिकार असणारे आणि एकच प्रकारचे शेअर बाहेर पाडू शकतात. | इक्विटी शेअर प्रमाणेच प्रेफरन्स शेअर बाहेर पाडू शकतात. |
| (7) | शेअरची फेरबदली आणि सभासद पदांचा अंत | शेअरची फेरबदली होत नाही मंडळीला शेअर परत करुन सभासद पदाचा अंत आणण्यात येतो. | शेअरची फेरबदली होऊ शकते. |
| (8) | शेअर भांडवलावर परिणाम | मंडळीचा सभासद मंडळीला शेअर परत करुन भांडवल परत मिळवित असल्याने भांडवल निधीमध्ये घट होण्याची शक्यता असते. | सभासदाद्वारे शेअरच्या खरेदी-विक्रीने भांडवल निधीमध्ये फेरफार होत नाही. |
| (9) | नफ्याचा उपयोग | नफ्याचा उपयोग कायदयाच्या तरतुदीच्या आधीन असल्याने सभासदांना डिविडन्ड देऊन सभासदांना लाभ होतो. | नफ्याचा कित्येक भाग सभासदांना डिविडन्ड म्हणून वाटण्यात येतो. |

## या प्रकरणात तुम्ही काय शिकलात ?

**(I) सहकारी मंडळी :**

**सहकारी मंडळीचा अर्थ :** सहकारी मंडळी अशी धंदाकीय व्यवस्थाचे स्वरुप आहे की ज्यामध्ये व्यक्ति स्वत:च्या आर्थिक हिताच्या संवर्धनासाठी समानतेच्या पायावर स्वैच्छिकरीत्या जोडल्या जातात.

**लक्षणे :** (1) स्वैच्छिक मंडळ (2) सरळ स्थापना विधी (3) सभासदाची समानता (4) स्वतंत्र व्यक्तित्व (5) लोकशाही व्यवस्थापन (6) सेवा मुख्य हेतू (7) नफ्याची योग्य वाटणी (8) शेअरची कमी किंमत (9) प्रतिशेअर मताधिकार (10) राजकारण आणि धर्मकारण यांच्यापासून अलिप्त संस्था (11) अनियंत्रीत सभासद संख्या

**फायदे :** (1) सरळ स्थापनाविधी (2) कायमी अस्तित्व (3) मुक्त सभासद (4) सभासदांची मर्यादीत जबाबदारी (5) सरकारी पाठबळ (6) लोकशाही कार्यपद्धती (7) काटकसरयुक्त संचालन (8) निश्चित ग्राहकवर्ग (9) व्यापारी संस्थासमोरील सदृढ स्पर्धक (10) समाज कल्याणकारी प्रवृत्ती (11) लोकशाहीची तालीमशाळा (12) सभासदांचा आर्थिक उत्कर्ष आणि विकास.

**मर्यादा :** (1) भांडवलाची मर्यादा (2) बिन कार्यक्षमता (3) राजकीय हस्तक्षेप (4) सभासदामध्ये मतभेद

**(II) संयुक्त भागाची कंपनी**

**अर्थ :** कायदयाने अस्तित्वात येणारी कृत्रिम व्यक्ती आहे. कायदयाच्या दृष्टीने ती कृत्रिम, अदृश्य आणि अमूर्त व्यक्ति आहे.

**लक्षणे :** (1) कायदेशीर व्यक्तित्व (2) कायमी अस्तित्व (3) भांडवलाचे लहान लहान हिस्स्यात विभाजन (4) शेअरर्सची फेरबदली (5) सामान्य मोहर (6) संचालन (7) सभासदांचे अस्तित्व (8) सभासद संख्या (9) सभासदांची जबाबदारी (10) मूलभूत आधिकार (11) प्रति शेअर मताधिकार

**फायदे :** (1) जास्त भांडवलाची प्राप्ती (2) शेअरची सरळ फेरबदली (3) सभासदांची मर्यादीत जबाबदारी (4) स्वतंत्र व्यक्तित्व आणि दिर्घ आयुष्य (5) मोठ्या आकारमानाचा लाभ (6) कार्यक्षम संचालन (7) लोकशाही संचालन (8) समाज आणि राष्ट्राचे हीत

**मर्यादा :** (1) लांबलचक आणि खर्चाळ स्थापना विधी (2) कायदेकीय नियंत्रण (3) व्यवस्थापणाच्या खर्चात वाढ (4) हुकमशाही वहीवट (5) रहस्याची जपवणुकीत अडचण (6) नितिविषयक निर्णयात विलंब (7) कमी परिवर्तनशीलता (8) सट्टाखोरीला उत्तेजन (9) समाजाला गैरफायदा

**प्रकार :**

**(A) खास कायदयाद्वारे अस्तित्वात आलेली कंपनी :**

**(B) सभासद संख्येच्या दृष्टीने :** (1) जाहीर कंपनी (2) खाजगी कंपनी (3) एका व्यक्तिची कंपनी

**(C) वर्चस्वाच्या दृष्टीने :** (1) सरकारी कंपनी (2) शासक कंपनी आणि (3) गौण कंपनी

**(D) नोंदणीच्या स्थानेच्या दृष्टीने :** (1) भारतीय कंपनी आणि (2) विदेशी कंपनी

**कंपनीची स्थापना विधी :**

**(A) प्रवर्तन :** (1) कंपनीच्या प्रवर्तनाचा विचार (2) प्राथामिक आणि तपशिलवार तपासणी (3) साधनांचे एकत्रीकरण (4) पैशांची व्यवस्था

**(B) नोंदणीचे प्रमाणपत्र मिळविण्याची विधी :** (1) आवेदनपत्र (2) नियमनपत्र (3) संचालकाची यादी (4) संचालकांची लेखीत संमती (5) अन्य कंपनीत हित या विषयीची जाहीरात (6) कायदापालनच्या तरतुदीचे निवेदन

**भागीदारी पेढी आणि कंपनी यामधील तफावत :** (1) स्थापना विधी (2) सभासद संख्या (3) भांडवल

(4) हिस्सा किंवा हिताची फेरबदली (5) जबाबदारी (6) संचालन (7) आयुष्य (8) रहस्याची जपणूक (9) परिवर्तनशीलता (10) व्यक्तिगत संपर्क (11) विसर्जन

**खाजगी कंपनी आणि जाहीर कंपनी यामघील फरक :** (1) सभासद संख्या (2) शेरची फेरबदली (3) जाहीर जनतेला आमंत्रण (4) एका व्यक्तिची कंपनी (5) संचालकांची संख्या (6) कंपनीचे नाव (7) नियमन पत्र (8) लघुतम भांडवलाच्या भरपाईची तुरतुद (9) नवे शेअर.

**सहकारी मंडळी आणि कंपनी यामधील फरक :** (1) अर्थ (2) उद्देश (3) सभासद संख्या (4) स्थापना विधी (5) वहीवट (6) शेअर (7) शेअरची फेरबदली आणि सभासद पदाचा अंत (8) शेअर भांडवलावर परिणाम (9) नफ्याचा उपयोग.

## स्वाध्याय

**1. खालील प्रश्नांच्या उत्तरांचा खरा विकल्प पसंद करुन लिहा :**

(1) सहकारी मंडळीमध्ये सभासद .......... .

(A) प्रतिशेअर मत देऊ शकतो (B) प्रति सभासद मत देऊ शकतो

(C) भांडवलाच्या प्रमाणात मत देऊ शकतो (D) कार्यदक्षता प्रमाणे मत देऊ शकतो

(2) सहकारी मंडळीला कशाची तालीम शाळा म्हणण्यात येते ?

(A) सेवेची (B) समृद्धीची (C) सरमुखत्यारशाहीची (D) लोकशाहीची

(3) सहकारी मंडळी .......... .

(A) भांडवलदारांची संस्था आहे (B) सभासदाची सेवा हा हेतू असणारी

(C) नफ्याचा उद्देश असणारी (D) सट्टाखोरीला उत्तेजन देणारी

(4) सहकारी मंडळीची स्थापनेसाठी कमीत-कमी व्यक्ति असणे जरुरी आहे ?

(A) 10 (B) 20 (C) 30 (D) 50

(5) सभासदांच्या आर्थिक उत्कर्षासाठी सेवेला प्राधान्य देते .......... .

(A) वैयक्तिक मालकी (B) खाजगी कंपनी (C) जाहीर कंपनी (D) सहकारी मंडळी

(6) सहकारी मंडळी डिविडन्ड .......... .

(A) चूकवू शकत नाही (B) कितीही प्रमाणात चुकवू शकतात

(C) कायदयानुसार चुकवावे लागते (D) राज्य आणि केन्द्र सरकारच्या मंजुरीने चुकवू शकते

(7) आर्थिक विकासाचे इंजीन कोणाला म्हटले जाते ?

(A) वैयक्तिक मालकी (B) भागीदारी पेढी (C) सहकारी कंपनी (D) कंपनी

(8) भारतात आताच कोणता कंपनीकायदा अमलात आला आहे ?

(A) 1912 (B) 1932 (C) 1956 (D) 2013

(9) कंपनी तिच्या कार्याची संमती कोणाच्याद्वारे व्यक्त करते ?

(A) नावाद्वारे (B) सामान्य मोहरद्वारे (C) आवेदनपत्राद्वारे (D) कृत्रिम व्यक्तित्वाद्वारे

(10) कंपनी तिच्या सभासदाच्या जबाबदारीचे प्रकार कोणत्या दस्ताऐवजात दर्शविते ?

(A) आवेदनपत्र (B) नियमनपत्र (C) सभासदपत्र (D) करारपत्र

(11) कंपनी स्वरुपाचे महत्त्वाचे लक्षण कोणते आहे ?

(A) विशाल (मोठ्या) प्रमाणात भांडवल (B) कायदेशीर व्यक्तित्व

(C) कायमी अस्तित्व (D) शेअरची सरळ फेरबदली

**उत्तरे :** (1) (B) (2) (D) (3) (B) (4) (A) (5) (D) (6) (C) (7) (D) (8) (D) (9) (B) (10) (A) (11) (D).

**2. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे दया :**

(1) सहकारी मंडळीचा अर्थ सांगा ?

(2) सहकारी मंडळीत व्यक्ती कशासाठी एकत्र जोडल्या जातात ?

(3) सहकारी मंडळीला मुख्य उद्देश काय आहे ?

(4) सहकारी मंडळीला कायदेशीर स्वतंत्र अस्तित्व केव्हा मिळते ?

(5) कोणत्या प्रकारची सहकारी मंडळी त्यांच्या सभासदाना दैनंदिन जीवनातील वस्तू व्याजवी किंमतीत देतात ?

(6) सहकारी मंडळीत प्रति शेअर एक मत म्हणजे काय ?

(7) कंपनीला आर्थिक विकासाचे इंजिन का म्हटले जाते ?

(8) जाहीर आणि खाजगी कंपनीत कमीत-कमी किती सभासद असले पाहीजेत ?

(9) कंपनीच्या सभासदांची मर्यादीत जबाबदारी म्हणजे काय ?

(10) एका व्यक्तिची कंपनी म्हणजे काय ?

(11) SEBI चे पूर्णरुप दया

**3. खालील प्रश्नांची उत्तरे थोडक्यात द्या :**

(1) सहकारी मंडळीला लोकशाहीची तालीमशाळा का म्हटले जाते ?

(2) सहकारी मंडळीत असहकार कोणत्या परिस्थितीत निर्माण होऊ शकते ?

(3) सहकारी मंडळी नफ्याची वाटणी कशा पद्धतीने करते ?

(4) कंपनी स्वरूपात मालकी आणि संचालन कसे वेगळे पडतात ?

(5) कंपनीचे कोणतेही तीन लक्षणे समजवा ?

(6) कंपनीमुळे समाज आणि राष्ट्राला कोणते लाभ मिळतात ?

(7) कंपनीत प्रति शेअर (शेअरदिठ) मत म्हणजे काय ?

**4. खालील प्रश्नांची मुद्देसुद उत्तरे द्या :**

(1) सहकारी मंडळीचे फायदे समजवा.

(2) सहकारी मंडळी नफ्याची वाटणी कशापद्धतीने करते ?

(3) सहकारी मंडळीला लोकशाहीची तालीमशाळा का म्हटले जाते ?

**5. खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे द्या :**

(1) सांगून तिची लक्षणे समजवा.

(2) कंपनीचा अर्थ सांगून कंपनीचे लक्षणे समजवा

(3) कंपनीचे फायदा आणि मर्यादा स्पष्ट करा.

(4) नोंदणीचे प्रमाण पत्र मिण्विण्याची विधी समजवा ?

(5) फरक स्पष्ट करा : (a) सहकारी मंडळी आणि कंपनी (b) खाजगी कंपनी आणि जाहीर कंपनी.

## पारिभाषिक शब्द

| | | |
|---|---|---|
| सहकार | : | Co-Operation |
| स्वैच्छिक मंडळ | : | Voluntary Association |
| कायमी अस्तित्व | : | Perpetual Existence |
| अलग कायदेशिर व्यक्तित्व | : | Seperate Legal Entity |
| सामान्य मोहर | : | Common Seal |
| कृत्रिम व्यक्ति | : | Artificial Person |
| कायद्याचे सर्जन | : | Creation of Law |
| व्यक्तिदिठ (प्रतिव्यक्ति) मत | : | One Man One Vote |
| मुक्त सभासद | : | Open Membership |
| खर्चापेक्षा आवकची वाढ | : | Excess of Income over Expenditure |
| सेवेचा उद्देश | : | Service Motive |
| मर्यादीत जबाबदारी | : | Limited Liability |
| कार्यक्षम लोकशाही | : | Democratic Management |
| खाजगी कंपनी | : | Private Company |
| जाहीर कंपनी | : | Public Company |
| एक व्यक्तिची कंपनी | : | One Person Company |
| सरकारी कंपनी | : | Government Company |
| भारतीय कंपनी | : | Indian Company |
| विदेशी कंपनी | : | Foreign Company |

•

# 7 जाहीरक्षेत्र, खाजगीक्षेत्र आणि जागतिक साहस (Public Sector, Private Sector and Global Enterprises)

**या प्रकरणात तुम्ही काय शिकणार ?**


7.1 जाहीरक्षेत्र

7.1.1 अर्थ

7.1.2 लक्षणे

7.1.3 जाहीर क्षेत्रांची स्वरुपे

(I) विभागीय संचालन

(II) जाहीर निगम

(III) सरकारी कंपनी

7.1.4 जाहीर साहसांच्या स्वरुपाची तुलना

7.1.5 जाहीर साहसाची बदलत जाणारी भूमिका

7.2 खाजगी क्षेत्र

7.2.1 अर्थ

7.2.2 लक्षणे

7.2.3 जाहीरक्षेत्र आणि खाजगी क्षेत्रातील फरक

7.3 जागतीक साहस (वैश्विक)

7.3.1 अर्थ

7.3.2 लक्षणे

7.4 संयुक्त साहस

7.4.1 अर्थ

7.4.2 लक्षणे

7.5 जाहीर-खाजगी भागीदारी

7.5.1 विचार

7.6 जाहीर उपयोगिता

7.6.1 विचार


**प्रस्तावना**

स्वातंत्र्यानंतर आपल्या देशाने मिश्र अर्थव्यवस्थेचा स्वीकार केला त्यामुळे आपल्या अर्थव्यवस्थेत जाहीर क्षेत्र आणि खाजगी क्षेत्राचा समन्वय पाहावयास मिळतो. खाजगी क्षेत्रात धंद्याची मालकी व्यक्तीची अथवा एकापेक्षा जास्त व्यक्तींचे असते. धंदाकीय व्यवस्थेचे विविध स्वरुपे जसे की वैयक्तिक मालकी, भागीदारी, सहकारी मंडळी आणि जॉईन्ट स्टॉक कंपनीचे वर्चस्व पहावयास मिळत असते. ज्या एकमाची मालकी, संचालन आणि नियंत्रण सरकार हस्तक असेल त्या एकमांना जाहीरक्षेत्रांचे एकम म्हणतात. अशा एकमांची अंशत: अथवा संपूर्ण मालकी केन्द्र सरकार किंवा राज्य सरकारची असते. ते कोणताही सरकारी विभाग अथवा त्याचा भाग असू शकतो अथवा सरकार द्वारे विशेष कायदा पसार करून त्यांची स्थापना करण्यात येते. सरकार अशा जाहीरक्षेत्रांच्या एकमांद्वारे आर्थिक प्रवृत्तीत सहभागी होते. 1956 च्या औद्योगिक नितीमध्ये जाहीर क्षेत्रांसाठी काही विशेष उद्देश नक्की केले आहे. आणि त्याद्वारे औद्योगिककरण आणि विकासाला वेग देण्याचे स्वीकारण्यात आले आहे. जाहीर क्षेत्रांला विशेष महत्त्व देण्यात आले तरी त्याच बरोबर खाजगीक्षेत्र आणि जाहीरक्षेत्रांचा एक दुसऱ्यावरचा आधार सुद्धा स्वीकारण्यात आला. 1991 च्या औद्योगिक नीतीत पूर्वीच्या औद्योगिक नीतीपेक्षा खूप परिवर्तन पहावयास मिळाले. जाहीर क्षेत्रात सरकारने स्वत:ची गुंतवणूक खाजगी क्षेत्राला आवश्यकतेनुसार विकण्याची सुरुवात केली आणि खाजगी क्षेत्राला जास्त स्वायत्ता देण्याचे स्वीकारले.

## 7.1 जाहीर क्षेत्र

**7.1.1 अर्थ :** ज्या एकमांची मालकी, संचालन आणि नियंत्रण सरकार हस्तक असेल त्यांना जाहीर क्षेत्रांचे साहस (कंपनी) म्हणतात.

**7.1.2 लक्षणे :**

**(1) मुळभूत उद्योगांची स्थापना :** जाहीर उद्योग स्थापण्याचा उद्देश जलद औद्योगिकीकरणासाठी मूळभूत सुविधा निर्माण करणे होय. त्यासाठी खूप मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करणे आवश्यक स्वातंत्र्या-नंतरच्या काळात खूप मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक करणे खाजगी उद्योगांसाठी अडचण होते. मूलभूत उद्योगात खूप मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक आवश्यक असते. आणि त्यातून

मिळणारा नफा सुरुवातीच्या वर्षात कमी असतो त्यासाठी खाजगी उद्योग मूलभूत उद्योग स्थापन करण्यास कमी रूची दाखवित असतात. सरकार अशा उद्योगामध्ये गुंतवणूक करून जलद औद्योगिक विकास शक्य बनवित असते.

**( 2 ) हुकूमशाहीची समाप्ती :** जेव्हा औद्योगिक एकमांची मालकी सरकारची असेल तेव्हा खाजगी क्षेत्रांची हुकूमशाही समाप्त होते.

**( 3 ) संतुलित प्रादेशिक औद्योगिक विकास :** अविकसीत प्रदेशात खाजगी क्षेत्रांचे गुंतवणूकदार भांडवल गुंतविण्यासाठी आकर्षित होत नाही. तिथे सरकार भांडवल गुंतवणूक करून संतुलित प्रादेशिक औद्योगिक विकास करू शकत असते. उदा. रूरकेला, भिलाई, बोकारो वगेरे सारख्या. औद्योगिक अविकसित प्रदेशात सरकारने लोखंडाच्या कारखान्यांमध्ये भांडवल गुंतवणूक करून औद्योगिक विकास केलेला आहे.

**( 4 ) समाज कल्याणाचा उद्देश :** सामान्यपणे खाजगीक्षेत्रांचा उद्देश जास्त नफा कमविण्याचा असतो. तर जाहीरक्षेत्रांचा उद्देश नफ्या बरोबर समाजकल्याणचा सुद्धा असतो. समाजातील सर्वच वर्गांना कोणत्याही प्रकारच्या भेदभावाशिवाय जाहीर उद्योग सेवा पुरवितात. औद्योगिकरणाला वेग देण्यासाठी मूलभूत उद्योगात जाहीर उद्योग मोठया प्रमाणावर काम करीत असतात आणि औद्योगीकरणाला गती देऊन संपूर्ण समाजाचे कल्याण करीत असतात.

**( 5 ) नफ्याचे धोरण कमी :** जाहीर क्षेत्र खूपच कमी नफ्याच्या धोरणाने स्वत:ची सेवा पुरवितात. सुरूवातीच्या काळात तर जाहीरक्षेत्र नुकसान करीत असते तरी सुध्दा सरकार चालवित होती परंतु 1991च्या या नितीमध्ये परिवर्तन आले आहे आणि त्यानुसार जाहीर क्षेत्र सुद्धा सामान्य नफा करेल ते अपेक्षीत आहे.

**( 6 ) राष्ट्रहिताची जपणूक :** जाहीर क्षेत्र राष्ट्रीय हितासांठी जास्त योग्य ठरते आहे. उदा. संरक्षण क्षेत्राच्या साधनांचे उत्पादन सरकार द्वारा करण्यांत येत असते.

**( 7 ) रोजगाराच्या संधी :** भारतासारख्या विकसनशील आणि जास्त लोकसंख्या असणाऱ्या देशात रोजगारीच्या संधीची निर्मिती अतिशय महत्त्वाची आहे. जाहीर क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक झाल्याने संलग्न एकमांचा सुद्धा विकास होत असतो. त्यामुळे रोजगाराच्या संधीची निर्मिती होते.

**( 8 ) देशाच्या आर्थिक विकासात वाढ :** कोणत्याही देशासाठी आर्थिक विकास अत्यंत आवश्यक असतो. जाहीर क्षेत्र उद्योगांसाठी आवश्यक मूलभूत सुविधांची निर्मिती करीत असते. त्यामुळे नवीन उद्योगांचा विकास शक्य बनतो. अशाप्रकारे देशाचा आर्थिक विकास सतत वाढत असतो.

**( 9 ) सामाजिक आणि आर्थिक न्याय :** जाहीर क्षेत्रांचे संचालन सरकार हस्तक असते त्यासाठी सरकारच्या नीतीचे पालन करणे अनिवार्य बनते. समाजाच्या कमजोर वर्गाला विनामूल्य अथवा कमी दराने सेवा, नोकरीची सुरक्षा, नोकरीच्या अटी, कामगार कायदयाचे संपूर्ण पालन, महिलांना प्राधान्य, सारख्या अनेक बाबतीत सकारात्मक दृष्टीकोन पाहावयास मिळत असते. त्यामुळे जाहीरक्षेत्र चांगल्यारीतीने सामाजिक न्याय देऊ शकते.

**( 10 ) आदर्श वेतन आणि सुविधा :** जेव्हा जाहीरक्षेत्र सरकारी मालकीचे असल्याने सरकार सोबत जुळलेले असल्याने कर्मचाऱ्यांना चांगले पगार धोरण मिळू शकते. कर्मचाऱ्याना खाजगी क्षेत्रांपेक्षा जास्त चांगली सुविधा मिळत असते तसे पहायवास मिळते सामान्यपणे आदर्श मालक बनवण्यासाठी सरकार प्रयत्नशील असते.

**7.1.3 जाहीरक्षेत्रांचे स्वरुप :**

(I) विभागीय संचालन (II) जाहीर निगम (III) सरकारी कंपनी

**( I ) विभागीय संचालन ( सरकारी विभाग ) :**

सरकार नेहमी स्वत:चे कामकाज वेगवेगळ्या विभागाद्वारे सांभाळत असते. अशा कोणत्याही सरकारी विभागाद्वारा जेव्हा जाहीरक्षेत्रांचे संचालन होत असते. त्याला विभागीय संचालन म्हणतात. जाहिरक्षेत्रांच्या एकमांचे संचालन सरकारी अधिकाऱ्याद्वारे होत असते आणि सर्व कर्मचारी सरकारी कर्मचारी मानले जातात. सरकारी विभाग केन्द्र अथवा राज्यसरकार द्वारे संचालीत असतात. आणि त्यांना केन्द्र अथवा राज्य सरकारच्या निती-नियम लागू पडतात. उदा. पोस्ट विभाग, रेल्वे वगैरे.

**लक्षणे :**

**( 1 ) भांडवलाची विभागणी :** विभागीय संचालनात उद्योगांना भांडवलाची विभागणी संबंधित सरकारी अंदाज पत्रकातून होत असते. सरकारी विभागाची आवक ही सरकारी तिजोरीत जमा होत असते.

**( 2 ) हिशोबाची जपवणूक :** सरकारी विभागांच्या हिशोबाची जपवणूक ज्या-त्या विभागाद्वारे करण्यात येते आणि त्यांचे ऑडिट नियंत्रक आणि महालेखा परिक्षक (CAG-Comptroller and Auditor General) द्वारा करण्यात येत असते.

**( 3 ) कर्मचाऱ्याची नियुक्ती :** विभागीय संचालनाचे कर्मचारी सरकारी कर्मचारी मानले जातात. त्यामुळे त्यांची भरती, नियुक्ती आणि त्यांच्या सेवेच्या अटी अन्य सरकारी कर्मचाऱ्या सारख्याच असतात.

**( 4 ) सरकारी संचालन आणि नियंत्रण :** सरकारी विभागाचे संचालन आणि नियंत्रण ज्या-त्या विभागांच्या प्रधानांच्या (प्रमुख) सरळ नियंत्रणा खालील सनदी अधिकाऱ्याद्वारे करण्यात येत असते.

**( 5 ) उत्तरदायित्व :** ज्या-त्या सरकारी विभागांच्या कार्याची जबाबदारी विभाग सांभाळणाऱ्या प्रधानाची असते आणि प्रधानाचे प्रत्यक्ष उत्तरदायित्व संसद अथवा विधानसभा विषयी असते.

**( II ) जाहीर निगम (Public Corporation) :**

लोकसभा अथवा विधान सभेच्या विशेष कायद्यायाद्वारे अस्तित्वात आलेल्या एकमाला जाहीर निगम म्हणतात. या कायदयात निगमांची सत्ता-कर्तव्य, अधिकार, जबाबदारी, कर्मचाऱ्याची नोकरीसाठीचे नियम आणि सरकारी विभागासोबत कायदाकीय संबंधाची तरतूद करण्यात आली असते. उदा. भारतीय जीवन वीमा निगम, इंडियन एर लाईन्स, फुड कोर्पोरेशन ऑफ इन्डिया, गुजरात राज्य पाठ्यपुस्तक मंडळ वगैरे.

**लक्षणे :**

**( 1 ) स्थापना :** जाहीर निगमांची स्थापना आणि संचालन लोकसभा अथवा विधानसभेत पसार केलेल्या विशेष कायदयाद्वारे होत असते. या कायदयात जाहीर निगमचा उद्देश, अधिकार, जबाबदारी आणि विशेष सुविधा विषयी माहीती देण्यात येते.

**( 2 ) मालकी :** जाहीर निगमची मालकी केन्द्र अथवा राज्यसरकार अथवा संयुक्त रीतीने असते. जाहीर निगमची आर्थिक जबाबदारी आणि नफ्याची विभागणी सरकार हस्तक असते. जर नुकसान झाले तर स्वाभाविक रितीने सरकाराला सहन करावे लागते.

**( 3 ) सरकारद्वारा भांडवल :** जाहीर निगमला सरकार द्वारे भांडवल पुरविण्यात येते. ते सरकार आणि जाहीर जनतेकडून उधारीचे भांडवल सुद्धा आवश्यक असल्यास मिळवु शकते.

**( 4 ) स्वतंत्र्य अस्तित्व :** जााहीर निगमला कायदाकीय रीतीने स्वतंत्र व्यक्तीत्व धारण असते. त्यामुळे कंपनी म्हणून चे सर्वच लाभ मिळवु शकत असते.

**( 5 ) संचालनात स्वातंत्र्य :** निगमची मालकी सरकारची असते. मालकी सरकारची असून सुद्धा निगमला संपुर्ण स्वातंत्र्यता असते. प्रधान दैनंदिन कार्यात दखल देत नाही. निर्णय घेणे आणि त्याच्या अमल करण्यासाठी निगमाला स्वातंत्र्य असते.

**( 6 ) कर्मचारी नियम :** जाहीर निगमाच्या कर्मचाऱ्याना सरकारी कर्मचाऱ्याचे नियम लागू पडत नाही. जाहीर निगमाच्या कर्मचाऱ्याना नोकरीचे नियम ज्या-त्या निगमच्या कायदयात असतात. त्यानुसार कर्मचाऱ्यांना कर्तव्य निभावयाची असतात. बऱ्याच वेळा सरकारच्या अधिकाऱ्यांना जाहीर निगमाच्या संचालनासाठी प्रतिनियुक्ती (Deputation) वर ठेवण्यात येत असते.

**( 7 ) संचालक मंडळाद्वारे संचालन :** जाहीर निगमाचा वहीवट संचालक मंडळ सांभाळत असतात. संचालक मंडळाची नियुक्ती सरकार करीत असते आणि जाहीर जीवनात व्यस्त व्यक्ति, यशस्वी धंदेवाईक, व्यवसायात तंज्ञ असेल अशा व्यक्तिची नियुक्ती करण्यात येते. संचालक मंडळ नीती बनविण्याचे कार्य करीत असतात. तर मुख्य व्यवस्थापन त्यांच्या अमलांचे आणि नीति प्रमाणे दैनंदिन वहीवटीचे काम सांभाळत असतो.

**( 8 ) लोकसभा-विधानसभेला जबाबदार :** निगमाच्या कार्यवाहीचा अहवाल लोकसभा-विधानसभा समक्ष ठेवण्यात येत असते त्यासाठी निगम ग्राहकांच्या अथवा जाहीर जनतेला नुकसान करुन जास्त नफा कमविण्याची वृत्ती ठेवून शकत नाही. यामुळे लोकसभा आणि विधान सभेचे नियंत्रण राहत असते.

**( III ) सरकारी कंपनी (Government Company) :**

सरकारी कंपनीची स्थापना आणि संचालन भारतीय कंपनी कायदयानुसार करण्यात येत असते. अशा कंपनीचा उद्देश पुर्णपणे धंदाकीय असतो आणि खाजगी क्षेत्रांच्या कंपन्यासोबत स्पर्धा करताना सुद्धा पहावयास मिळते. भारतीय कंपनी कायदयानुसार सरकारी कंपनी ही अशी कंपनी आहे की ज्यामध्ये सरकारच्या भांडवलाचे प्रमाण कमीत-कमी 51 % असते. सरकारचे भांडवल म्हणजे केन्द्र सरकार राज्यसरकार अथवा एकापेक्षा जास्त राज्य सरकारचे भांडवल असते. त्यासाठी कंपनीच्या संचालनात सरकार स्वत:चे प्रभुत्व करु शकत असते. सरकारी कंपनीत शेअर्स राष्ट्रपतीच्या नावाने धारण करण्यात येतात. सरकार बहुमती शेअरधारक असल्याने कंपनीच्या संचालनावर सरकारी नियंत्रण असते. त्यासाठी अशा कंपन्यांना सरकारी कंपनी म्हणून ओळखण्यात येतात.

**लक्षणे :**

**( 1 ) स्थापना :** भारतीय कंपनी कायदयाच्या तरतूदीप्रमाणे सरकारी कंपनीची स्थापना होत असते.

**( 2 ) स्वतंत्र अस्तित्व :** कंपनी स्वत: स्वतंत्र कायदाकीय व्यक्ती म्हणून अस्तित्व धारण करीत असते त्यासाठी कोणत्याही व्यक्ती समोर स्वत:च्या नावाने दावा करु शकत असते किंवा अन्य कोणताही व्यक्ती कंपनी समोर दावा करु शकत असतो. कंपनी स्वत:च्या नावाने अन्य व्यक्ती सोबत करार करु शकत असते आणि मालमत्ता स्वत:च्या नावाने धारण करु शकत असते.

**( 3 ) भांडवल :** सरकारी कंपनीत कमीतकमी 51% भांडवल सरकारचे असते.

**( 4 ) वहीवट :** अन्य कोणत्याही कंपनी सारखाच सरकारी कंपनीचा वहीवट कंपनी कायदयाच्या तुरतूदी प्रमाणे होत असतो.

**( 5 ) कर्मचाऱ्याची नियुक्ती :** सरकारी कंपनीत कर्मचाऱ्याची नियुक्ती कंपनीने स्वत:हा नक्की केलेल्या नितीनियमा प्रमाणे होत असते.

**( 6 ) सभासदांची नियुक्ती :** सरकारी कंपनीच्या संचालक मंडळाच्या सर्वच सभासदांची नियुक्ती सरकार करीत असते.

**( 7 ) ऑडिटरची नियुक्ती :** सरकारी कंपनीला कंपनीकायदयाप्रमाणे हिशोब ठेवणे आणि ऑडिटच्या नियम आणि प्रक्रियेतुन मुक्ती मिळत असते. परंतु ऑडिटरची नियुक्ती सरकार करीत असते. वार्षिक अहवाल लोकसभेत तसेच विधानसभेत सादर करण्यात येत असतो.

**( 8 ) भांडवल मिळविण्याची व्यवस्था :** सरकारी कंपनी आवश्यक भांडवल सरकारला आणि खाजगी शेअरधारकांना दिलेल्या शेअरद्वारे मिळवित असते. आवश्यकतेप्रमाणे जाहीर जनतेकडून सुद्धा भांडवल मिळविते.

**( 9 ) नितिविषयक निर्णय :** सरकारी कंपनीचे नितिविषयक निर्णय संबंधित विभागाच्या प्रधानाद्वारे घेण्यात येतात.

**7.1.4 जाहीर साहसांच्या ( उद्योग ) स्थापना तुलना :**

| अनु. नं. | मुद्दा/विषय | विभागीय संचालन | जाहीर निगम | सरकारी कंपनी |
|---|---|---|---|---|
| (1) | स्थापना | सरकारी विभागाद्वारे होत असते. | लोकसभा अथवा विधान-सभेच्या विशेष कायदयाने होत असते. | सरकारद्वारे कंपनीकायदयाच्या तरतूदी प्रमाणे होत असते. |
| (2) | कायदाकीयरीतीने अस्तित्व | सरकारद्वारे वेगळे अस्तित्व मिळत नाही. | कायदाकीय तरतूदी प्रमाणे स्वतंत्र अस्तित्व मिळत असते. | कायदाकीय तरतूदी प्रमाणे स्वतंत्र अस्तित्व मिळत असते. |
| (3) | कोणत्या क्षेत्रांसाठी अनुकूल ? | संरक्षण आणि जाहीर सेवेच्या क्षेत्रांसाठी अनुकूल असते. | औद्योगिक साहस किंवा जाहीर सेवेच्या क्षेत्रांसाठी अनुकूल असते. | औद्योगिक धंदाकीय साहस अथवा विदेशी सहभाग असणऱ्या क्षेत्रांसाठी अनुकूल असते. |
| (4) | भांडवल प्राप्ती | सरकारी अंदाजपत्राच्या तरतूदीनुसार भांडवल प्राप्त होत असते. | सरकार द्वारे भांडवल गुंतवणूक होत असते. | कमीत कमी 51% भांडवल सरकारी गुंतवणूकीने प्राप्त होते असते. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| (5) | कार्यशील भांडवल | सरकारी अंदाजपत्रकाच्या तरतूदीनुसार मिळत असते. | आवश्यकते प्रमाणे तरतूद स्वत:हा करु शकतात. | आवश्यकते प्रमाणे तरतूद स्वत:हा करु शकतात. |
| (6) | जबाबदारी | संबंधीत सरकारी विभागाच्या प्रधानांची जबाबदारी असते. | सैद्धांतिक रीतीने लोकसभा अथवा विधानसभेला जबाबदार असतात. | सैद्धांतिक रीतीने लोकसभा अथवा विधानसभेला जबाबदार असतात. |
| (7) | संचालनात स्वातंत्र्य | स्वातंत्र्य मिळत नाही. | स्वातंत्र्य मिळत असते. | स्वातंत्र्य मिळत असते. |
| (8) | कर्मचारी | कर्मचारी सरकारी कर्मचारी मानले जातात त्यासाठी भरती मध्ये सरकारी नियमांचे पालन जरुरी असते. | कर्मचारी सरकारी मानत नाही त्यासाठी भरती नक्की केलेल्या नियमाद्वारे होत असते. | कर्मचारी सरकारी मानत नाही त्यासाठी भरती नक्की केलेल्या नियमाद्वारे होत असते. |
| (9) | संचालन | भारतीय सनदी सेवेच्या अधिकाऱ्या द्वारे संचालन होत असते. | संचालक मंडळाद्वारे मुख्य व्यवस्थाकांच्या मदतीने संचालन होत असते. संचालक आणि मॅनेजिंग डायरेक्टरची नियुक्ति सरकार करीत असते. | संचालक मंडळात सरकार शिवाय बाहेरच्या तज्ञ व्यक्तिचा सुद्धा समावेश असतो. |
| (10) | नियंत्रण | संबंधीत सरकारी विभागाच्या प्रधानाचे सरळ नियंत्रण असते. | लोकसभा अथवा विधान सभेचे सरळ नियंत्रण असते. | संबंधीत मंत्रालयाद्वारा सरकारी नियंत्रण असते. |

**7.1.5 जाहीर क्षेत्रांची बदलत जाणारी भूमिका :** देशाच्या स्वातंत्र्यानंतर जाहीरक्षेत्र अर्थव्यवस्थेच्या काही उद्देशाने सिद्ध करण्यासाठी महत्त्वाची भूमिका निभावणार हे अपेक्षीत होते. जाहीरक्षेत्र अर्थव्यवस्थेच्या विकासासाठी मुलभूत सुविधांची निर्मिती आणि चावीरुप उद्योगाचा विकास करणार. खाजगी क्षेत्र जिथे अपेक्षीत नफा मिळणार नाही तेथे मोठ्या प्रमाणात भांडवल गुंतवणूक करण्यात तयार होत नव्हते. म्हणून सरकारने जाहीर क्षेत्रांच्या विकासा द्वारे मुलभूत सुविधांची निर्मिती करण्याचे सुरु केले आणि अर्थव्यवस्थेत आवश्यक मालसामान आणि सेवांचे उत्पादन जाहीर क्षेत्रांद्वारे सुरु केले. पंचवार्षिक योजनेत सुद्धा जाहीर क्षेत्राला खूप महत्त्व देण्यात आले होते.

1991 नंतरच्या वर्षात आर्थिक नीतीमध्ये खाजगीकरण, उदारीकरण आणि जागतीकीकरण अमलात आले. त्यापरिणामाने जाहीरक्षेत्राच्या भुमिकेत बदल झाला. खाजगी कंपन्यासोबत जाहीरक्षेत्रांची स्पर्धा होऊ लागली. नफ्याला जास्त महत्त्व देण्यात आले. सतत नुकसान करणाऱ्या जाहीरक्षेत्रात मुलभूत बदल सुरु झाले आणि काही जाहीर क्षेत्र बंद करण्यात आली. बऱ्याच जाहीरक्षेत्रांच्या इक्विटी भांडवलात जाहीर जनतेला भाग देण्यात आला अथवा खाजगी उद्योगांना ते विकण्यात आले. सरकार द्वारा विविध समित्यांची नियुक्ती करुन बिनकार्यक्षम जाहीरक्षेत्राला जास्त कार्यक्षम बनविण्यात आले 1950 पासून 1990 पर्यतचा काळ जाहीर क्षेत्रासाठी महत्त्वाचा ठरला आहे.

**7.2 खाजगी क्षेत्र**

खाजगी क्षेत्र हे अर्थव्यवस्थेचे सर्वात जुने स्वरुप आहे. धंदाकीय प्रवृत्तीची सुरुवातच या क्षेत्राने झाली होती. पूर्विच्या काळात धंदाकीय प्रवृत्ती खाजगी क्षेत्रांपासूनच संचालीत झाली होती. खाजगी क्षेत्रांच्या काही मर्यादा आणि काळाच्या विशिष्ट आवश्यकतेमुळे जाहीरक्षेत्र अस्तित्वात आले. खाजगीक्षेत्र आज सुद्धा देशाच्या अर्थव्यवस्थेत महत्त्वाचा घटक आहे. देशांची आर्थिक प्रगती मोठ्या प्रमाणात खाजगी क्षेत्रांची आभारी आहे. राष्ट्रीय आवक मध्ये खाजगीक्षेत्रांचा महत्त्वाचा भाग आहे. खाजगीक्षेत्रांचे अस्तित्व शतकापासून चालत आहे. काळ आणि परिस्थितीमुळे त्यात सतत परिवर्तन होत असते. खाजगीक्षेत्रांचा व्याप वाढेल त्यासाठी सकारात्मक वळण सरकारने स्वीकारले आहे आणि त्यासाठी सतत निर्णय घेण्यात येत आहेत.

**7.2.1 अर्थ :** धंद्याचे संचालन कुठल्याही एका व्यक्ती अथवा व्यक्तिच्या समूहाद्वारे नफ्याच्या उद्देशासाठी करण्यात येते त्यास खाजगीक्षेत्र म्हणतात. खाजगीक्षेत्रात वैयक्तिक मालकी, भागीदारी, हिंदु अविभक्त कुटुंब, सहकारी मंडळी आणि संयुक्त भागाची कंपनीचा समावेश होतो.

**7.2.2 लक्षणे :**

**( 1 ) सर्वात जुने स्वरुप :** खाजगीक्षेत्र हे धंदाकीय एकमांचे सर्वात जुने स्वरुप आहे. धंदाकीय प्रवृत्तीची सुरुवातच या स्वरुपापासून झाली होती आणि आज सुद्धा खाजगीक्षेत्र अस्तित्वात आहे.

**( 2 ) अर्थव्यवस्थेत मोठा भाग :** भारतीय अर्थव्यवस्थेत सर्वात मोठा भाग खाजगी क्षेत्रांचा आहे. खाजगी क्षेत्राशिवाय अर्थव्यवस्थेची कल्पना करणे कठीन आहे.

**( 3 ) आवश्यकते प्रमाणे बदल :** खाजगीक्षेत्र सुरुवाती पासूनच परिवर्तनशील आहे. काळ आणि परिस्थितीनुसार धंदाकीय क्षेत्रांच्या स्वरुपात बदल होत राहीला आहे.

**( 4 ) नफ्याला प्राथमिकता आणि सामाजिक जबाबदारीचा स्वीकार :** खाजगी क्षेत्रांचा मुख्य उद्देश नफ्याचा सुद्धा असतो. नफ्यांच्या उद्देशा बरोबर सामाजिक जबाबदारीचा उद्देश सुद्धा खाजगीक्षेत्र स्वीकारत असते. याशिवाय पर्यावरण रक्षण, महिला सशक्तीकरण, साक्षरता वगैरे सारखे सामाजिक प्रवाह खाजगीक्षेत्रांने स्वीकारले आहेत. अशाप्रकारे नफ्याला प्राथमिकता देवून सुद्धा सामाजिक जबाबदारीचा स्वीकार केला आहे.

**( 5 ) जगातील सर्वच देशात अस्तित्व :** खाजगी क्षेत्र एक अथवा दुसऱ्या स्वरुपात जगात सर्वच देशात पाहावयास मिळत असतो. निश्चितपणे त्यांना लागणारे कायदे प्रत्येक देशात वेगळे असू शकतात परंतु सर्वच देशांनी खाजगीक्षेत्रांचे अस्तित्व स्वीकारले आहे.

**( 6 ) बहुराष्ट्रीय कंपन्यामध्ये समावेश :** एकापेक्षा जास्त देशात धंदाकीय प्रवृत्ती करणाऱ्या धंदाकीय एकमाला बहुराष्ट्रीय कंपनी म्हणून ओळखण्यात येत असते. 19व्या शतकात बहुराष्ट्रीय कंपन्यांना जगात वर्चस्व वाढविण्याची सुरुवात केली होती. बऱ्याच कंपन्या एकापेक्षा जास्त देशात उत्पादन आणि विक्री करण्याचे सुरु केले त्यामुळे संपूर्ण जगातील लोकांच्या जीवनशैलीत प्रगती झाली आहे.

**( 7 ) रोजगारीची निर्मिती :** आज सुद्धा संपुर्ण जगात सर्वात जास्त रोजगारांची संधी खाजगीक्षेत्र पुरविते. आर्थिक प्रवत्तीच्या विकासामुळे जास्त लोकांना रोजगारी मिळत असते. त्यामुळे लोकांची आवक वाढते आणि त्याच्या जीवनशैलीची प्रगती होते.

**7.2.3 जाहीरक्षेत्र आणि खाजगीक्षेत्रा मधील फरक :**

| अनु. नंबर | फरकांचे मुद्दे | जाहीर क्षेत्र | खाजगी क्षेत्र |
|---|---|---|---|
| (1) | मालक | जाहीरक्षेत्रात मालकी केन्द्र अथवा राज्य राज्य संयुक्त रीतीने दोन्ही सरकारची असते. | खाजगी क्षेत्रात मालकी व्यक्तीची अथवा व्यक्तिच्या समूहाची असते. |
| (2) | नियंत्रण | जाहीरक्षेत्राची मालकीच सरकारची असल्याने सरकारी नियंत्रण सरळतने ठेवू शकतात. | खाजगी क्षेत्रावर सरकार विविध कायदयाद्वारे नीतीविषयक नियंत्रण ठेवू शकतात. |
| (3) | मुख्य उद्देश | जाहीर क्षेत्रांचा मुख्य उद्देश लोक कल्याणचा असतो. | खाजगी क्षेत्राचा मुख्य उद्देश सामान्यरीतीने नफ्याचा असतो. |
| (4) | नफाखोरी | जाहीर क्षेत्रांवर सरकारी नियंत्रण असल्याने नफाखोरी करता येत नाही. | खाजगी क्षेत्रात नफाखोरी करताना पहायवास मिळत असते. |
| (5) | स्वरुपे | सरकारी विभाग, जाहीर निगम आणि सरकारी कंपनी जाहीर क्षेत्रांचे उदाहरण आहे. | वैयक्तिक मालकी, भागीदारी हिंदू अविभक्त कुटुंब, सहकारी मंडळी, संयुक्त भागांची कंपनी खाजगी क्षेत्रांचे उदाहरण आहेत. |

**7.3 जागतीक ( वैश्विक ) साहस (Global Enterprise)**

**7.3.1 अर्थ :** जेव्हा कोणताही धंदाकीय एकम स्वत:ची प्रवृत्ती राष्ट्रीय सीमांच्या बाहेर पसरवते तेव्हा त्यास जागतीक साहस म्हणतात.

**धंदाकीय साहस**

- स्थानिक साहस
- जागतीक (वैश्विक) साहस
  - आंतरराष्ट्रीय साहस
  - बहुराष्ट्रीय साहस
  - ट्रान्सनॅशनल साहस

**( 1 ) स्थानिक साहस :** जे साहस स्वत:ची धंद्याकीय प्रवृत्ती, राजकीय सीमे पूरती मर्यादीत ठेवतात त्याला स्थानिक साहस म्हणतात. सामान्यरीतीने सुरुवातीस सर्वच साहस स्वत:च्या धंदाकीय प्रवृत्तीसाठी कोणताही निश्चित प्रदेशाच्या वातावरणचा अभ्यास करीत असतात आणि त्यानुसार स्वत:च्या बाजार व्यूह रचनेची निर्मिती करीत असतात.

**( 2 ) वैश्विक साहस :**

(i) धंदाकीय एकम राष्ट्रीय सीमेच्या बाहेर म्हणजे एकापेक्षा जास्त देशात स्वत:ची प्रवृत्ती विस्तारते तेव्हा त्यास आंतरराष्ट्रीय साहस म्हणून ओळखण्यात येते.

(ii) स्थानिक बाजाराच्या अनुभवाचा उपयोग करुन स्वत:च्या धंदाकीय प्रवृत्तीचे पंख विदेशातील बाजारापर्यंत पसरवितात. ते विदेशाच्या बाजारात स्वत:च्या शाखेद्वारा स्थानिक बाजाराच्या व्यूहरचनेचा सुद्धा उपयोग करताना पाहावयास मिळत असते. अशा साहसांना बहुराष्ट्रीय साहस म्हणतात.

(iii) ट्रान्सनॅशनल साहस संपूर्ण जगात उत्पादन, विक्री, गुंतवणूक आणि अन्य धंदाकीय प्रवृत्ती करीत असतात. या असे संकलित साहस आहे की जे संपूर्ण जगाच्या साधन-संपत्तीचा उपयोग करुन विश्व बाजारातून नफा मिळवित असतो.

**7.3.2 लक्षणे :**

**( 1 ) एकापेक्षा जास्त देशात धंदा :** जागतीक साहस आंतरराष्ट्रीय धोरणाने खूपच मोठ्या पायावर कार्यरत असतो. तो जगाच्या एकापेक्षा जास्त देशात धंदा करीत असतो. स्वत:च्या धंदाकीय प्रवृत्ती वेगवेगळ्या देशात एकासोबत वेगवेगळ्या पद्धतीने पहावयास मिळते असते.

**( 2 ) प्राधान्य :** गुंतवणूक, उत्पादन आणि वाटणी मध्ये जगतीक साहस ज्या-त्या प्रदेशाच्या विशेष बाबतीना प्राधान्य देतात. प्रत्येक देशांची धार्मिक, सामाजिक, आर्थिक आणि व्यवहारलक्षी मान्यता वेगळी असते आणि अशा बाबी लक्षात ठेवून जागतीक साहस ज्या-त्या देशात स्वत:ची धंदाकीय प्रवृत्ती विस्तारत असतो.

**( 3 ) आकार आणि विक्री :** जागतीक साहसांचा आकार आणि विक्री विशाल असते. बऱ्याचवेळा काही लहान देशांच्या एकूण राष्ट्रीय आवक पेक्षा सुद्धा वैश्विक साहसांच्या विक्रीची आवक जास्त असते.

**( 4 ) आर्थिक समृद्धी :** आर्थिक बाबतीत वैश्विक साहस समृद्ध असतात. काही वेळा ने खूपच कमी नफ्याने अथवा आवश्यक असेल तर नुकसान करुन सुद्धा बाजाराचा विकास करु शकतात. खूप मजबूत आर्थिक पाठबळ असल्याने जागतीक साहस खूप मोठ्या पायावर उत्पादन आणि विक्रीचे आयोजन करु शकतात.

**( 5 ) राजकीय वर्चस्व :** जागतीक साहसांचा खूप मजबूत आर्थिक समृद्धीमुळे त्याचे राजकीय वर्चस्व सुद्धा जास्त असते. ते बऱ्याच वेळा स्वत:ला अनुकूल असेल तशा आर्थिक नीतीला सुद्धा ज्या-त्या देशाच्याराजकिय नेत्याद्वारे गोठवू शकतात.

**( 6 ) प्रामाणिकता :** जागतीक साहस जगाच्या खूप साऱ्या देशात एकासोबत धंदा करीत असतात तरी सुद्धा काहीवेळा ते ज्या-त्या देशाचे प्रामाणिक राहत नाही, परंतु स्वत:च्या मूलभूत देशाला जास्त प्रामाणिक राहत असतात.

**( 7 ) आर्थिक रीतीने समृद्ध देशात उगम :** जागतीक साहसांचा उगम मोठ्या प्रमाणात आर्थिक रीतीने विकसीत देशात झाला असेल तेव्हा त्यांची धंदाकीय प्रवृत्ती मोठ्या प्रमाणात विकासशील आणि अल्पविकसीत देशात करीत असतात.

**( 8 ) संशोधन आणि विकासासाठी जास्त खर्च :** जागतीक साहस संशोधन आणि विकासासाठी खूप जास्त खर्च करीत असतात आणि स्वत:च्या ज्ञानात वाढ करीत असतात. ते त्यांच्या आवकचा काही भाग संशोधन आणि विकासासाठी खर्चुन नवीन वस्तू, सेवा आणि आधुनीक टेक्नोलॉजीचा सतत विकास करीत असतात. परिणामी भांडवल प्रदान उत्पादन पद्धती अमलात आणू शकतात.

**( 9 ) जीवनशैलीत बदल :** जागतीक साहस स्वत:चे उत्पादन अथवा सेवेच्या विकासासाठी आवश्यकते प्रमाणे ज्या त्या देशाच्या लोकांच्या जीवनशैलीत बदल आणतात. अशा बदलाची सुरुवात मूलभूत गरजे पासून करीत असतात.

**भारत आणि वैश्विक साहस :** 1991 पूर्वी भारतात जागतीक उद्योगांचा प्रवेश मंदगतीचा होता. उदारीकरणाची नीती अमलात आल्यानंतर जागतीक उद्योगांचा प्रवेश आणि प्रसार जलद झाला. वैश्विक उद्योगांना आंतरराष्ट्रीय कंपनी किंवा बहुराष्ट्रीय कंपनी म्हणून सुद्धा ओळखण्यात येतात. अशा कंपन्यांची यादी बनवून ती यादी दोन पद्धतीचे होऊ शकते. दुसऱ्या देशातुन भारतात येऊन धंदा करणारे जागतीक उद्योग जसे की कोका कोला, पेप्सी, मॅकडोनाल्ड, नोकीया, सोनी, जनरल मोटर्स ही यादी बरीच लांबी होऊ शकते असे आहे. सध्या खूप भारतीय मुळच्या कंपन्या इतर देशात जाऊन व्यवसाय करीत आहे. जसे की इन्फोसीस, रिलायन्स, मारुती, वीप्रो, ओ.एन.जी.सी., टाटा स्टील, ऐशियन पेन्ट्स ही यादी सुद्धा खूप लांब होऊ शकते. भारतात बरेच औद्योगिक गृह आता स्वत:चा धंदा विदेशाच्या बाजारात सुद्धा विकसीत करीत आहे. हे उद्योग अथवा कंपन्या जगाच्या बऱ्याच देशात वस्तू अथवा सेवा पुरवित असतात. जागतीक उद्योगांच्या विक्री आणि आवक राष्ट्रीय कंपन्यापेक्षा जास्त असतो. अशाप्रकारे जागतीक उद्योग संपूर्ण जगाच्या अर्थव्यवस्थेवर स्वत:चे मोठ्या प्रमाणात भांडवल चांगली पत आणि आधुनिक टेक्नोलॉजीच्या कारणाने परिणामकारक साबीत होत आहेत.

### 7.4 संयुक्त उद्योग ( साहस )

**7.4.1 अर्थ :** धंदाकीय एकम स्वत:च्या एकमेकांच्या हितांच्या रक्षणांसाठी जुळले तर त्यास संयुक्त साहस म्हणतात. अशा रीतीने जुळणारे एकम खाजगी, सरकारी मालकीच्या अथवा जागतीक साहस असू शकतात असे साहस दिर्घकाळासाठी असतात. कोणत्याही आकार असणारे एकम त्यांच्या समान उद्देशांना पूर्ण करण्यासाठी आणि एकमेकांच्या हितांच्या रक्षणासाठी जुळत असतात. संयुक्त साहस दोन्ही पक्षांच्या आवश्यकतेप्रमाणे ठेवू शकतात. जर संयुक्त साहस दोन वेगवेगळ्या देशाच्या धंदाकीय एकमांत होत असेल तर दोन्ही देशाच्या सरकारने नक्की केलेल्या कायदयाचे पालन अति आवश्यक असते. संयुक्त साहस हे दोन धंदाकीय एकम मधील साधन संपत्तीचा जास्तीत जास्त उपयोग करुन त्यांच्या निपुणतेची उपयोग करीत असते आणि धंद्याचे जोखीम घेऊन नफ्यांची वाटणी करीत असतात.

संयुक्त साहस सुरु करण्याचा उद्देश धंद्याचा विस्तार, नवीन उत्पादनाचा विकास अथवा नवीन बाजाराचा विस्तार करण्याचा असतो. आजच्या काळात बहुतांशी औद्योगिक साहस दुसऱ्या औद्योगीक साहसा बरोबर व्यूहात्मक जुळत असतात. अशी जुळणी औद्योगिक साहस स्वत:च्या पूरक अथवा अतिरिक्त शक्तीच्या उपयोगासाठी, वितरणाच्या मार्गच्या विकासासाठी, औद्योगीक प्रक्रिये साठी अथवा आर्थिक बाबतसाठी करीत असतात. भारतात संयुक्त साहसासाठी कोणत्याही वेगळा कायदा नाही. भारतात नोंदलेली कंपनी स्थानीक मानली जाते. आजच्या काळात बहुतांशी संयुक्त साहस यशस्वी रितीने भारतात स्वत:ची कामगीरी करीत आहेत. जर कोणत्याही संयुक्त साहसात विदेशी भागीदार असेल अथवा बिनभारतीय असेल तर भारत सरकारची मंजूरी आवश्यक असते. अशी मंजूरी रिजर्व बँक ऑफ इन्डिया अथवा विदेशी गुंतवणुक वृद्धी निगम (Foreign Investment Promotion Board) द्वारा परिस्थितीला अनुसरुन मिळत असते.

**7.4.2 लक्षणे :**

**( 1 ) दोन्ही पक्षकांरासाठी फायदेकारक :** संयुक्त साहस दोन्ही पक्षकारांना फायदेकारक असते. ते त्याच्यामुळे एकदुसऱ्याना पुरक ठरतात.

**( 2 ) जास्त साधन संपत्ती आणि क्षमता :** दोन्ही पक्षकार संयुक्त साहसांद्वारे जुळतात तेव्हा दोन्ही पक्षकार स्वत:ची साधनसपत्ती आणि क्षमतेचा फायदा एक-दुसऱ्यांना देतात, सामान्यपणे दोन्ही पक्षकारांची संयुक्त साधनसंपत्ती आणि क्षमता त्यांचा जास्त चांगली धंदाकीय संधी देत असतात.

**( 3 ) नवीन टेक्नोलॉजी :** संयुक्त साहसाद्वारे जास्त चांगल्या टेक्नोलॉजीचे आदानप्रदान शक्य झाले आहे. जास्त चांगल्या टेक्नोलॉजीमुळे जास्त गुणवत्तेच्या वस्तूंचे उत्पादन शक्य झाले आहे. समय, शक्ती आणि टेक्नोलॉजीच्या उपयोगाने कार्यक्षमता आणि परिणामकारकतेत वाढ झाली आहे.

**( 4 ) नवीन बाजाराचा विकास :** एका देशात असलेले धंदाकीय एकम जेव्हा दुसऱ्या देशाच्या धंदाकीय एकमा बरोबर संयुक्त साहस द्वारे जुळते तेव्हा नवीन बाजाराचा विकास करणे शक्य होते. उदा. भारताच्या कोणत्याही कंपनी बरोबर विदेशी कंपनी संयुक्त साहसाने जुळली तर भारताच्या बाजारात प्रवेशाचा मार्ग विदेशी कंपन्यांसाठी उघडत असतो. बऱ्याच कंपन्या स्वत:च्या देशाच्या बाजारात जास्तीत जास्त विक्री पर्यत पोहचल्यानंतर विदेशाच्या बाजारात संयुक्त साहसाद्वारे प्रवेश मिळवून त्यांचा विकास सतत चालू ठेवत असतात.

**( 5 ) शोध-संशोधन :** संयुक्त साहसाद्वारे नवीन आणि सर्जनात्मक उत्पादने बाजारात ठेवण्यात येतात. विदेशी भागीदार बऱ्याच वेळा त्यांचे नवीन विचार आणि चांगल्या टेक्नोलॉजीचा फायदा संयुक्त साहसा द्वारे पुरवित असतात.

**( 6 ) कमी उत्पादन खर्च :** आधुनिक टेक्नोलॉजीच्या उपयोगामुळे आणि मोठ्या प्रमाणावरील उत्पादनामुळे वस्तूंचा उत्पादन खर्च कमी येतो. कमी उत्पादन खर्चामुळे विक्री किमत कमी राहते. आणि वस्तूंच्या मागणीत वाढ करीत असते.

**( 7 ) धंदाकीय पतमध्ये वाढ :** दोन वेगवेगळे धंदाकीय एकम संयुक्त साहस द्वारे जुळत असतात. दोन्ही धंदादारी एकमांची स्वत: स्वत:च्या पतचा फायदा संयुक्त साहसाला मिळतो. बऱ्याच वेळा संयुक्त साहसाचा एक भागीदार स्वत:च्या धंदाकीय पतचा उपयोग संयुक्त साहसाला करु देत असतो. जशी कोणतीही विदेशी कंपनी संयुक्त साहसाच्या त्याच्या भारतीय भागीदाराला स्वत:च्या ब्रान्डचा उपयोग करण्याची परवानगी देत असते.

### 7.5 जाहीर-खाजगी भागीदारी (Public–Private Partnership-PPP)

**7.5.1 अर्थ :** जाहीर-खाजगी भागीदारी ही काळाच्या मागणीमुळे निर्माण झालेली नवीन व्यवस्था आहे. भारत सरकारने 1991 पासून भारतात जागतीकीकरणाचा स्वीकार केला आणि सर्व उत्पादन-सेवा जी आंतरराष्ट्रीय बाजारात मिळणारी वस्तू भारतीय बाजारात उपलब्ध झाली. परंतु त्यासाठीचे आवश्यक स्वरुप तयार करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर गुंतवणूकीची आवश्यकता निर्माण झाली. उदाहरण म्हणून हवाई सेवेसाठी एअरपोर्टचे विस्तृतीकरण आणि त्यांना लागणाऱ्या इतर सेवा अत्यंत जरुरी असतात. नवीन आणि आधुनिक कार साठी चांगले रोड (रस्ते) असणे अत्यंत जरुरी आहे. या मूलभूत विकासासाठी खूप मोठी गुंतवणूक सरकार साठी अल्पमुदतीत करणे अशक्य होते. खाजगीक्षेत्र अशी गुंतवणूक करण्यास समक्ष होते, परंतु कायमी धोरणाने असे स्वरुप खाजगीक्षेत्राला देण्यात हुकूमशाहीच्या दुषणांचा प्रश्न होता. तेव्हा एक नवीन व्यवस्था स्विकारण्यात आली त्यानुसार सरकार अशा स्वरुपासाठीची जमीन देते, विकास करण्यासाठीचे गुंतवणूक खाजगीक्षेत्र करेल त्याच्या बदल्यात सरकार खाजगी क्षेत्राला निश्चित वर्षाच्या कालावधी साठी त्या स्वरुपांचा ज्यांना फायदा होणार आहे त्यांच्याकडून निश्चित रक्कम फी म्हणून वसुलण्याचा अधिकार देणार. निश्चित कालावधी पुर्ण होईल तो पर्यत अशा स्वरुपाच्या जपणूकीचे कार्य सुद्धा खाजगीक्षेत्राला ठेवण्याचे असते आणि त्यानंतर असे स्वरुप खाजगीक्षेत्र सरकारला सोपवणूक करुन देतील नंतर त्या स्वरुपांची जपणूकचे काम सरकारचे राहील. उदा. अहमदाबाद-वडोदराला जोडणारा एक्सप्रेस-वे.

### 7.6 जाहीर उपयोगिता (Public Utility)

**7.6.1 अर्थ :** शहर आणि गावाच्या विकासामुळे नागरीक सुविधांची आवश्यकता सतत वाढत जात आहे. आधुनीक नागरीक जीवनात काही सेवा आणि सुविधा अनिवार्य बनत आहेत. अशा आवश्यकता असणाऱ्या सेवा आणि सुविधा कार्यक्षम रीतीने सतत पुर्ण करण्यासाठी व्यवस्थातंत्राला जाहीर उपयोगिता म्हणून ओळखण्यात येत असते. जाहीर उपयोगितेचे एकम पाणी पूरवठा, इलेक्ट्रीसिटी (विद्युत), शहरी प्रवासासाठी वाहने, संदेशव्यवहार, गॅस, गटर वगैरे सारख्या प्राथमिक सुविधा पूरवित असतात. अशा सेवांच्या गुणवत्तेत कमी झाल्यास हे जाहीर जीवनावर परिणाम करीत असतात. त्यामुळे जाहीर उपयोगितेच्या एकमाना हुकूमशाही देण्यात येत असते आणि त्यावर नियंत्रण ठेवण्यात येते.

जाहीर उपयोगिता सेवा प्रत्येक नागरिकाला नियमीत रीतीने जास्त कार्यक्षमतेने कमी खर्चात आणि जवळच्या ठिकाणांने प्राप्त होत असते. कोणत्याही जातीच्या भेदभावाशिवाय नियमीत ही सेवा पुरविण्यात येत असतात.

खाजगीकरणाच्या विचारप्रवाह प्रमाणे आता या क्षेत्रात सुद्धा स्पर्धा स्वीकार्य झाली आहे. कायदयात सुधार करुन या क्षेत्रांत सुद्धा स्पर्धा पहावयास मिळते. टेलिफोन सेवा जाहीर उपयोगी सेवा मानली जाते. कायदयाद्वारे सुरुवातीस सरकारने स्वत:च्या एका वेगळ्या खात्याद्वारे इजाराची (उद्योगांची) स्थापना केली. आता याच कायदयात बदल करुन एकापेक्षा जास्त एकम ती सेवा पुरवित आहे. तरी स्पर्धा स्वीकारल्या नंतर तिच्यावर सरकारी नियंत्रण असते आणि असे एकम जाहीर जनतेला वास्तविकतेत अपेक्षित सेवा पुरवितात आणि ग्राहकाचे शोषण करणार नाहीत त्यावर सतत लक्ष ठेवत असतात.

ग्राम पंचायत, तालुका पंचायत, जिल्ला पंचायत, नगरपालिका, महानगरपालिका द्वारे त्यांचे संचालन होत असते. राज्यकक्षांवर वाहन व्यवहार, तार-टपाल, टेलिफोन सारख्या सेवा केन्द्र सरकार संचालीत विभाग, कंपनी अथवा निगम द्वारा पुरवली जातात. गुजरात राज्य मार्ग वाहनव्यवहार निगम गुजरात राज्यात प्रवाश्यांची वाहतूक बस द्वारे करीत असते.

अशाप्रकारे जाहीर उपयोगितेचा उद्देश जीवनावश्यक आणि जीवन जगण्यात जास्त सरळता राहील अशा सेवा देण्याचा आहे. आणि या सेवांमुळे जनजीवन सरळ बनत असते.

**या प्रकरणात तुम्ही काय शिकलात ?**

**जाहीर क्षेत्रांच्या साहसाचा अर्थ :** ज्या एकमांची मालकी, संचालन आणि नियंत्रण सरकारे द्वारे करण्यात येत असेल त्यांना जाहीर साहस म्हणतात.

**लक्षणे :** (1) मूलभूत उद्योगांची स्थापना (2) हुकूमशाहीची समाप्ती (3) संतुलित प्रादेशीक औद्योगीक विकास (4) समाजकल्याणाचा उद्देश (5) नफ्यांचे कमी धोरण (6) राष्ट्रहितांची सुरक्षा (7) रोजगारांच्या संधीची निर्मिती (8) देशांच्या आर्थिक विकासात वाढ (9) सामाजिक आणि आर्थिक न्याय (10) आदर्श वेतन आणि सुविधा.

**जाहीर क्षेत्रांची स्वरुपे :**

**(I) विभागीय संचालन : लक्षणे :** (1) भांडलवाची विभागणी (2) हिशोबाची जपणूक (3) कर्मचाऱ्याची नियुक्ती (4) सहकारी संचालन आणि नियंत्रण (5) उत्तरदायित्व

**(II) जाहीर निगम : लक्षणे :** (1) स्थापना (2) मालकी (3) सरकारद्वारा भांडवल (4) वेगळे (स्वतंत्र) अस्तित्व (5) संचालनात स्वातंत्र्य (6) कर्मचारी नियम (7) संचालक मंडळाद्वारे संचालन (8) लोकसभा-विधानसभेला जबाबदार

**(III) सरकारी कंपनी : लक्षणे :** (1) स्थापना (2) स्वतंत्र अस्तित्व (3) भांडवल (4) वहीवट (5) कर्मचाऱ्यांयाची नियुक्ती (6) सभासंदाची नियुक्ती (7) ऑडीटरची नियुक्ती (8) भांडवल मिळविण्याची व्यवस्था (9) नीतिविषयक निर्णय.

**जाहीर साहसांच्या स्वरुपाची तुलना :** (1) स्थापना (2) कायदाकीय रीतीने अस्तित्व (3) कोणत्या क्षेत्रांसाठी अनुकूल ? (4) भांडवलाची प्राप्ती (5) कार्यशील भांडवल (6) जबाबदारी (7) संचालनात स्वातंत्र्य (8) कर्मचारी (9) संचालन (10) नियंत्रण

**जाहीर साहसांची बदलत जाणारी भूमिका :**

**खाजगीक्षेत्रांचा अर्थ :** जेव्हा धंद्याचे संचालन कोणताही एक व्यक्ती अथवा व्यक्तीच्या समूहाद्वारे नफ्यांच्या उद्देशांसाठी करीत असतात त्यांना खाजगीक्षेत्र म्हणतात.

**लक्षणे :** (1) सर्वात जुने स्वरुप (2) अर्थव्यवस्थेत मोठा भाग (3) आवश्यकतेप्रमाणे बदल (4) नफ्याला प्राथमिकता आणि सामाजिक जबाबदारीचा स्विकार (5) जगाच्या सर्वच देशात अस्तित्व (6) बहुराष्ट्रीय कंपन्यांचा समावेश (7) रोजगारांची निर्मिती

**जाहीरक्षेत्र आणि खाजगीक्षेत्रांमधील फरक :** (1) मालकी (2) नियंत्रण (3) मुख्य उद्देश (4) नफाखोरी (5) स्वरुपे/प्रकार

**जागतीक साहसांचे प्रकार :** (1) आंतरराष्ट्रीय साहस (2) बहुराष्ट्रीय साहस (3) ट्रान्सनॅशनल साहस

**जागतीक साहसांची लक्षणे :** (1) एकापेक्षा जास्त देशात धंदा (2) प्राधान्य (3) आकार आणि विक्री (4) आर्थिक समृद्धी (5) राजकीय वर्चस्व (6) वफादारी (7) आर्थिक रीतीने समृद्ध देशात उगम (8) संशोधन आणि विकासासाठी जास्त खर्च (9) जीवनशैलीत बदल

**भारत आणि जागतीक साहस :**

**संयुक्त साहसाचा अर्थ :** धंदाकीय एकम एकमेकांच्या हितांच्या रक्षणासाठी जुळतात त्यांना संयुक्त साहस म्हणतात.

**लक्षणे :** (1) दोन्ही पक्षकारासाठी फायदेकारक (2) जास्त साधन-संपत्ती आणि क्षमता (3) नवीन टेक्नोलॉजी (4) नवीन बाजाराचा विकास (5) शोध-संशोधन (6) कमी उत्पादन खर्च (7) धंदाकीय पत मध्ये वाढ

**जाहीर-खाजगी भागीदारीचा अर्थ :** या स्वरुपांच्या विकासासाठी जरुरी जमीन सरकार देते, विकासासाठीची गुंतवणूक खाजगीक्षेत्र करतात त्यांच्या बदल्यात खाजगीक्षेत्राला निश्चित वर्षापर्यत स्वरुपांच्या लाभ घेणाऱ्या कडून फी मिळत असते आणि स्वरुपांची जपणूकीचे काम सुद्धा खाजगीक्षेत्र करीत असते. निश्चित कालावधी पुर्ण होताच या स्वरुप सरकारला सोपण्यात येते आणि त्यांची जपणूकी कार्य नंतर सरकार करते.

**जाहीर उपयोगितेचा अर्थ :** अनिवार्य आवश्यक सेवा आणि सुविधा कार्यक्रम रीतीने खूप कमी खर्चात पुरविणाऱ्या व्यवस्थातंत्राला जाहीर उपयोगिता म्हणतात.

## स्वाध्याय

**1. खालील प्रश्नांचे उत्तर योग्य विकल्प निवडून लिहा :**

(1) खालीलपैकी कोणते स्वरुप जाहीरक्षेत्रांचे नाही ?

(A) विभागीय संचालन (B) वैयक्तिक मालकी (C) जाहीर निगम (D) सरकारी कंपनी

(2) खालीलपैकी कोणत्या स्वरुपाच्या कर्मचाऱ्यांना सरकारी कर्मचाऱ्याचे नियम लागू पडतात ?

(A) विभागीय संचालन (B) जाहीर निगम (C) सरकारी कंपनी (D) खाजगी कंपनी

(3) कोणते धंदाकीय स्वरुप सर्वात जुने मानले जाते ?

(A) जाहीर साहस (B) खाजगी साहस (C) जागतीक साहस (D) जाहीर-खाजगी साहस

(4) खाजगी जागतीक साहसांसाठी खालीलपैकी कोणती माहीती खोटी आहे?

(A) आंतरराष्ट्रीय धोरणावर मोठ्या प्रमाणात कार्यरत असते.

(B) आकार आणि विक्री विशाल असते.

(C) लोकसभा अथवा विधानसभेचे सरळ नियंत्रण असते.

(D) मजबूत आर्थिक समृद्धीमुळे राजकीय वर्चस्व जास्त असते.

(5) जाहीर-खाजगी भागीदारीसाठी खालीलपैकी कोणती माहीती खोटी आहे ?

(A) जरुरी जमीन सरकारकडून त्यांना स्वत:हा खरेदी करावी लागते.

(B) निश्चित काळापर्यंत लाभार्थीकडून फी वसुल करण्यात येते.

(C) मूलभूत सेवेची निर्मिती स्वत:च्या गुंतवणूकीने करीत असतात.

(D) निश्चित काळानंतर त्यांनी केलेले स्वरुप सरकारला सुप्रत करावयाचे असते.

**उत्तर :** (1) (B) (2) (A) (3) (B) (4) (C) (5) (A)

**2. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा :**

(1) जाहिर क्षेत्र म्हणजे काय ?

(2) जाहीरक्षेत्रांच्या तीन स्वरुपांची नावे सांगा.

(3) सरकारी कंपनीत सरकारी भांडवलाचे प्रमाण कमीत कमी किती असते ?

(4) सरकारी कंपनीत शेअर कोणाच्या नावाने धारण करण्यात येतात ?

(5) धंदाकीय एकमांचे सर्वात जुने स्वरुप कोणते आहे ?

(6) जागतिक साहसांचा अर्थ सांगा.

(7) जाहीर-खाजगी भागीदारी म्हणजे काय ?

**3. खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा :**

(1) धंदाकीय व्यवस्थेच्या विविध स्वरुपांची फक्त यादी बनवा.

(2) जाहीर क्षेत्रद्वारे संतुलीत प्रादेशीक विकास कशारीतीने होऊ शकतो ?

(3) विभागीय संचालन म्हणजे काय ? उदाहरणासह स्पष्ट करा.

(4) ''खाजगी साहसांचे एकमात्र ध्येय नफा मिळविण्याचे असते.'' - चर्चा करा.

(5) खाजगी साहसांचे अर्थव्यवस्थेत महत्त्व सांगा.

(6) जागतीक साहसांचे भारतीय अर्थव्यवस्थेत काय महत्त्व आहे ?

**4. खालील प्रश्नांची मुद्दासर उत्तरे लिहा :**

(1) विभागीय संचालन म्हणजे काय ? त्यांची लक्षणे सांगा.

(2) जाहीर निगमचा अर्थ सांगून त्यांची लक्षणे वर्णवा.

(3) सरकारी कंपनीची व्याख्या सांगुन तिच्या लक्षणांविषयी टीप लिहा.

(4) जाहीर साहसांची बदलत-जाणारी भूमिका विषयी सांगा.

(5) जाहीरक्षेत्र आणि खाजगीक्षेत्राच्या फरकांचे मुद्दे सांगा.

(6) जागतीक साहसांची लक्षणे सांगा.

**5. खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा :**

(1) जाहीर क्षेत्रची लक्षणे सविस्तर सांगा.

(2) जाहीर साहसांच्या स्वरुपांची तुलना करा.

(3) खाजगी साहसांचा अर्थ सांगून त्यांच्या लक्षणांविषयी टीप तयार करा.

(4) संयुक्त साहसचा अर्थ आणि लक्षणे विस्तारपूर्वक समजवा.

(5) जाहीर उपयोगिता म्हणजे काय ? त्यांची लक्षणे विषयी टीप लिहा.

(6) ''जाहीर-खाजगी भागीदारी हे काळाच्या मागणीमुळे निर्माण झालेली व्यवस्था आहे.'' - समजवा.

**पारिभाषिक शब्द**

| | | |
|---|---|---|
| जाहीरक्षेत्र | : | Public Sector |
| सरकारी विभाग | : | Government Department |
| नियंत्रक आणि महालेखा परिक्षक | : | CAG - Comptroller and Auditor General |
| जाहीर निगम | : | Public Corporation |
| प्रतिनियुक्ती | : | Deputation |
| संचालक मंडळ | : | Board of Director |
| संयुक्त साहस | : | Government Company |
| | : | Joint Sector |
| जाहीर-खाजगी भागीदारी | : | Public-Private Partnership (PPP) |
| जाहीर उपयोगिता | : | Public Utility |

●

# 8 धंदाकीय भांडवलाची प्राप्तिस्थाने (Sources of Business Finance)

**या प्रकरणात तुम्ही काय शिकणार ?**


8.1 धंदाकीय भांडवलाचा विचार
8.1.1 धंदाकीय भांडवलाची गरज
8.1.2 धंदाकीय एकमात भांडवलाचे महत्त्व
8.2 मालकीचे भांडवल
8.2.1 इक्विटी शेअर
8.2.1.1 अर्थ
8.2.1.2 लक्षणे
8.2.1.3 प्रकार
(A) सामान्य इक्विटी शेअर्स
(B) स्वेट इक्विटी शेअर्स
(C) अन्य इक्विटी शेअर्स
8.2.2 प्रेफरन्स शेअर्स
8.2.2.1 अर्थ
8.2.2.2 लक्षणे
8.2.2.3 प्रेफरन्स शेअर्सचे प्रकार
8.2.3 इक्विटी शेअर्स आणि प्रेफरन्स शेअर्स मधील फरक
8.2.4 बाजूला ठेवलेला नफा/नफ्याची धंद्यात पुनर्गुंतवणूक
8.2.4.1 फायदा
8.2.4.2 मर्यादा
8.3 उधारीचे भांडवल
8.3.1 डिबेंचर
8.3.1.1 लक्षणे
8.3.1.2 प्रकार
(1) सुरक्षित डिबेंचर
(2) रुपांतरणीय डिबेंचर
(3) बिन रुपांतरणीय डिबेंचर
8.3.2 बॉन्ड
8.3.3 जाहीर ठेवी
8.3.3.1 फायदे
8.3.3.2 मर्यादा
8.3.4 आर्थिक संस्थेद्वारे कर्ज
8.3.4.1 कार्य
8.3.5 व्यापारी बँक
8.3.5.1 लोन (कर्ज)
8.3.5.2 कॅशक्रेडिट
8.3.5.3 ओवरड्राफ्ट
8.3.6 व्यापारी प्रत
8.3.7 आंतर कंपनी ठेवी
8.3.8 मालकीचे भांडवल आणि उधारीचे भांडवल मधील फरक


**प्रस्तावना**

औद्योगिक क्रांती दरम्यान विज्ञान आणि तांत्रीक क्षेत्रात अनेक शोध लागले. उत्पादन क्षेत्रात यांत्रीकीकरण अमलात आले. त्यामुळे एकमाचा आकार वाढला. प्रत्येक कार्यासाठी विविध तज्ञांची आवश्यकता निर्माण झाली. त्यामुळे एकमात विशिष्टीकरण जरुरी बनले आणि विपूल प्रमाणात उत्पादन करणे शक्य झाले. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर भांडवल गुंतवणूक अनिवार्य झाले. कुठल्याही एका व्यक्तीद्वारे अथवा व्यक्तीच्या समूहाद्वारे अशीही भांडवलाची जोखीम करणे अशक्य बनले परिणामी धंदाकीय व्यवस्थेचे कंपनी स्वरुप अस्तित्वात आले. त्याचबरोबर कंपनी स्वरुपाचा विकास झाल्याने भांडवलाची विविध प्राप्तिस्थाने अस्तित्वात आली.

## 8.1 धंदाकीय भांडवलाचा विचार

नावाच्या दृष्टीने भांडवल शब्द मर्यादीत अर्थात वापरला जातो. ज्यामध्ये भांडवल म्हणजे धंद्याच्या मालकांने व्यवस्थेत गुंतवलेली रक्कम, माल अथवा मिलकतीला भांडवल म्हणून ओळखण्यात येते. परंतु वाणिज्यात भांडवल शब्द व्यापक अर्थात

वापरला जातो. धंद्याच्या मालकाने धंद्यात स्वत:हा गुंतवलेल्या रक्कमे शिवाय विविध प्राप्तीस्थानातुन उधारीने घेतलेल्या रक्कमेचा सुद्धा भांडवलात समावेश होत असतो. सामान्यपणे ''भांडवल म्हणजे धंद्याची आर्थिक गरज पुर्ण करण्यासाठी उभे करण्यात आलेले भांडवल.''

**8.1.1 धंदाकीय भांडवलाची आवश्यकता :** धंदाकीय एकमाच्या प्रत्येक प्रवृत्तीला परिणामकारक रीतीने पुर्ण करण्यासाठी भांडवल अत्यंत आवश्यक आहे. भांडवलची आवश्यकता नक्की करणारी परीबले खालिल प्रमाणे आहेत.

**( 1 ) धंद्याच्या स्थापनेसाठी :** धंदाकीय एकमाची स्थापना करण्यासाठी लागणारा विविध खर्च ज्यामध्ये एकमाची प्राथमिक आणि विस्तृत तपासासाठी आणि नोंदणीचे प्रमाणपत्र सारखे दस्तावेज तयार करण्यासाठी, कायदाकीय तज्ञांची फी, नोंदणी फी वगैरेचा खर्च करऱ्यासाठी भांडवलाची आवश्यकता पडते.

**( 2 ) स्थिर मालमत्ता खरेदीसाठी :** धंदाकीय एकमात दिर्घकाळासाठी ज्या मालमत्ते मध्ये गुतवंणूक करण्यात येते त्यांना स्थिर मिलकती असे म्हणतात. अशा मालमत्तामध्ये सतत फेरबदल शक्य होत नाही. स्थिर मिलकत जसे की, जमीन, इमारत, यंत्रे, वाहन वगैरे साठी मोठ्या प्रमाणात दिर्घकाळाच्या भांडवलाची आवश्यकता असते.

**( 3 ) कार्यशील भांडवलासाठी :** दैनदिंन प्रवृत्ती सरळतने चालत राहील त्यासाठी धंद्यात कार्यशील भांडवल आवश्यक असते. जसेकी, कच्चामाल खरीदण्यासाठी, तसेच मालाच्या स्टॉकमध्ये गुंतवणूक वगैरेसाठी कार्यशील भांडवलाची आवश्यकता पडते.

**( 4 ) धंद्याचे आधुनिकीकरण आणि विस्तरणासाठी :** नवीन शोध संशोधन झाल्याने धंदाकीय एकमात आधुनिकीकरण विस्तार आणि उत्पादनाची नवीन टेक्नोलॉजी घेण्यासाठी मोठ्या प्रमाणात भांडवलाची आवश्यकता पडते.

**( 5 ) आकस्मिक आवश्यकतेसाठी :** धंदाकीय एकमात अनेक आंतरीक अथवा बाह्य घटक परिणाम करीत असतात. त्यामुळे भांडवलाची आकस्मिक आवश्यकता निर्माण होते. उदा. कर्मचाऱ्याचा संप, सरकारी नितीमध्ये अनपेक्षीत बदल, व्यापार चक्र, नैसर्गीक आपत्ती वगैरे घटकांचा सामना करण्यासाठी आकस्मिक भांडवलाची आवश्यकता निर्माण होते.

**8.1.2 धंदाकीय एकमात भांडवलाचे महत्त्व :**

भांडवल हे एक असा पक्ष आहे की ज्यांच्या आसपास सर्वच आर्थिक प्रवृत्ती फिरत असतात. धंदाकीय भांडवलाला मानव शरीरातील रक्ता सोबत तुलना करु शकतो. मानवशरीरात रक्ताचे जितके महत्त्व असते, तितकेच महत्त्व धंदाकीय एकमात भांडवलाची असते. धंदाकीय एकमाची सर्वच प्रवृत्ती वेळेवर चालविण्यासाठी योग्य आर्थिक व्यवस्था अनिवार्य असते. भांडवलाशिवाय धंदाकीय व्यवहार शक्य नाही. भांडवलाचा साठा मर्यादीत आहे आणि त्यांचा वैकल्पिक उपयोग अनेक आहे. त्यासाठीच भांडवलाचा विचारपूर्वक कार्यक्षम आणि जास्तीत जास्त उपयोग केला पाहीजे.

धंद्यात भांडवलाच्या टंचाईमुळे मुळे खूप समस्यांचा सामना करावा लागतो. उदा. घेणेकऱ्याच्या चुकवणीमध्ये उशिर झाल्यास धंदाकीय एकमाची प्रत धोक्यात येते. काहीवेळा नफाकारक गुतवंणणूकीची उज्जवल संधी निघून जाते. नगद मोबल्याचा लाभ जाऊ द्यावा लागतो, कच्चा मालाची खरेदी वेळेवर करु शकत नाही वगैरे त्यासाठी पुरत्या प्रमाणात भांडवल असणे अत्यंत गरजेचे असते.

**8.2 मालकीचे भांडवल (Owner's Funds)**

**मालकीचे भांडवल**

- इक्विटी शेअर्स
  - सामान्य इक्विटी शेअर्स
  - स्वेट इक्विटी शेअर्स
  - अन्य इक्विटी शेअर्स
- प्रेफरन्स शेअर्स
  - 20 वर्षापूर्वी परत करु शकतील असे प्रेफरन्स शेअर्स
  - 20 वर्षानंतर परत करु शकतील असे प्रेफरन्स शेअर्स
- बाजूला ठेवलेला नफा अथवा नफ्याचे धंद्यात पुनगुतवंणूक

**8.2.1 इक्विटी शेअर्स :**

**8.2.1.1 अर्थ :** ज्या शेअर्सला डिविडन्ड मिळविण्याचा तसेच भांडवल परत मिळविण्याचा अधिकार सर्वात शेवटी मिळत असतो त्यास इक्विटी शेअर्स म्हणतात.

**8.2.1.2 लक्षणे :**

**( 1 ) खरे मालक :** या प्रकारच्या शेअर्सधारकांना कंपनीचे खरे मालक अथवा वफादार साथीदार म्हणतात. कारण की ते प्रेफरन्स शेअर्स धारकांपेक्षा जास्त जोखीम घेतात.

**( 2 ) मताधिकार :** सामान्य इक्विटी शेअरधारकांना सभेत प्रत्येक शेअर्सनुसार मत देण्याचा अधिकार असतो.

**( 3 ) डिविडन्ड :** या प्रकारच्या शेअरधारकांना मिळणारा डिविडन्ड आणि डिविडन्डचा दर अनिश्चित असतो.

**( 4 ) नफ्यासोबत संबंध :** या प्रकारच्या शेअरधारकांना मिळणारा डिविडन्डचा नफ्यासोबत संबंध असतो. नफ्याच्या कमी-जास्तीच्या प्रमाणानुसार डिविडन्डच्या दरात वधघट होत असते.

**( 5 ) सामान्य सभा :** कंपनीच्या सामान्य सभेत हजर राहण्याचा, मतदान करण्याचा तसेच संचालकांना निवडण्याचा अधिकार या शेअरधारकांनी मिळत असतो.

**( 6 ) भांडवल परत :** सामान्यरीतीने हे शेअर्स भांडवल कंपनीच्या अस्तित्वा दरम्यान परत करण्यात येत नाही.

**( 7 ) विसर्जन :** कंपनीच्या विसर्जनाच्या वेळी प्रेफरन्स शेअरधारकांना भांडवल परत केल्यानंतर जर रक्कम शिल्लक राहिली तर या शेरधारकांना भांडवल परत करण्यात येते.

**( 8 ) पात्रतेचे शेअर्स :** कंपनीच्या निवडलेला संचालक होण्यासाठी जर आवेदनपत्रात तरतूद करण्यात आली असेल आणि संचालकांनी संमती दिली असेल तर या शेअर्सला पात्रतेचे शेअर्स म्हणून समजण्यात येते.

**( 9 ) भांडवलाचा फायदा/लाभ :** या शेअरधारकांना वेगवेगळ्या प्रकारचा लाभ मिळत असतो. हक्काचे शेअर्स, बोनस शेअर्स, शेअर्सचा बाजारभाव वाढल्याचा फायदा, वगैरे भांडवल लाभ म्हणतात.

**( 10 ) शेअर्स नोंदणी :** मान्य शेअर्स बाजारात या प्रकारच्या शेअर्सची नोंदणी करण्यात आली आहे. त्यामुळे या प्रकारच्या शेअरची खरेदी विक्री बाजारभावाने मुक्त रीतीने करु शकत असतो.

**8.2.1.3 इक्विटी शेअर्सचे प्रकार :**

**( 1 ) सामान्य इक्विटी शेअर्स :** हा शेअर्स कंपनीसाठी खूपच महत्त्वाचा आहे. शेअर भांडवल मिळविणाऱ्या प्रत्येक कंपनीला इक्विटी शेअर्स बाहेर पाडणे सक्तीचे असते. इक्विटी शेअरधारकच कंपनीचे खरे मालक आहेत. हे शेअरधारकच कंपनीच्या धंद्याचे खरे जोखीम घेतात कारण की या शेअर्स वर डिविडन्ड मिळणे आणि मिळेल तरी डिविडन्डचा दर अनिश्चित असतो. शिवाय कंपनी तोट्यात गेली अथवा विसर्जन करण्यात येते तेव्हा मालमत्तेच्या विक्रीतून आलेल्या रक्कमेतून कर्जाची चुकवणी केल्यानंतर त्यांना सर्वात शेवटी भांडवल परत मिळत असते. प्रवर्तक अल्पमुदतीचे, मध्यम मुदतीचे आणि दिर्घ मुदतीच्या भांडवलाच्या आवश्यकेतला, लक्षात ठेवून स्वत:चे भांडवल उभे करण्यासाठी हे शेअर्स बाहेर पाडत असते. कंपनी मोठ्यापायावर भांडवल मिळविण्यासाठी त्याच्या भांडवलाचा लहान-लहान भागात विभाजीन करुन टाकते. या प्रत्येक भागाला शेअर म्हणतात. हे शेअर खरेदी करणाऱ्याला शेअरधारक म्हणतात.

**(2) स्वेट इक्विटी शेअर्स (Sweat Equity Share) :** कंपनी त्यांच्या संचालक आणि कंपनीत काम करणारी विशिष्ट ज्ञान असणाऱ्या व्यक्तिंना तसेच कर्मचाऱ्याना अथवा रोकड शिवायच्या अवेजमुळे जे शेअर्स देते त्यांना स्वेट इक्विटी शेअर्स म्हणतात.

**(3) अन्य इक्विटी शेअर्स :** अन्य इक्विटी शेअर्स दोन प्रकारचे असतात.

(i) मताधिकारसह इक्विटी शेअर्स

(ii) डिविडन्डच्या संबंधात वेगवेगळ्या अधिकारसह मताधिकार असणारे इक्विटी शेअर्स.

**8.2.2 प्रेफरन्स शेअर्स :**

**8.2.2.1 अर्थ :** ज्या शेअर्स वर कंपनीच्या नफ्यातून डिविडन्ड मिळविण्याचा प्रथम अधिकार असेल तसेच जेव्हा कंपनीचे विसर्जन होते तेव्हा भांडवल परत मिळविण्याचा प्रथम अधिकार असतो त्यांना प्रेफरन्स अथवा पसंतीचे शेअर्स म्हणतात.

**8.2.2.2 लक्षणे :**

**( 1 ) डिविडन्ड :** प्रेफरन्स शेअरधारकांना निश्चित दराने डिविडन्ड मिळविण्याचा प्रथम अधिकार असतो.

**( 2 ) मताधिकार :** प्रेफरन्स शेअरधारकांना फक्त त्यांच्या हितांसोबत जुळलेल्या बाबतीच मत देण्याचा अधिकार असतो.

**( 3 ) पसंती :** स्थिर, निश्चित आवक आणि भांडवलाची सुरक्षा इच्छिणारे गुंतवणूकार या प्रकारेचे शेअर्स खरेदी करणे पसंद करतात.

**( 4 ) बाजारभाव :** या शेअर्सची किंमत प्रमाणात स्थिर राहत असते. जेव्हा व्याजाच्या दराच्या प्रमाणात बदल होते तेव्हाच त्यांच्या बाजार किंमतीत बदल होत असतो.

**( 5 ) जोखमचे प्रमाण :** या प्रकारच्या शेअर्समध्ये इक्विटी शेअर्सधारकांपेक्षा भांडवल परत मिळविण्याचा प्रथम हक्क असल्याने जोखमचे प्रमाण कमी असते.

**( 6 ) भांडवल परत :** जेव्हा कंपनीचे विसर्जन होते तेव्हा सर्वच जबाबदारीची चुकवणी केल्यानंतर इक्विटी शेअर्सधारकां पेक्षा आधी भांडवल परत मिळविण्याचा अधिकार असतो.

**8.2.2.3 प्रेफरन्स ( पसंदी ) शेअर्सचे प्रकार :**

(1) 20 वर्षापूर्वी परत करु शकतील असे पसंती शेअर्स

(2) 20 वर्षानंतर परत करु शकतील असे पसंती शेअर्स

**8.2.3 इक्विटी शेअर्स आणि पसंतीचे शेअर्स मधील फरक :**

| अनुक्रम नंबर | मुद्दा | इक्विटी शेअर्स | प्रेफरन्स ( पसंती ) शेअर्स |
|---|---|---|---|
| (1) | अनिवार्य | प्रत्येक कंपनीला या प्रकारचा शेअर्स बाहेर पाडणे अनिवार्य असते. | प्रत्येक कंपनीला या प्रकारच्या शेअर्स बाहेर पाडणे अनिवार्य नाही. |
| (2) | डिविडन्डचा दर | डिविडन्डचा दर अनिश्चित असतो. | डिविडन्डचा दर निश्चित असतो. |
| (3) | अधिकार | कंपनीच्या सभेत हजर राहण्याचा मत देण्याचा, संचालकांना निवडण्याचा अधिकार असतो. | फक्त त्यांच्या हितांशी संबंधित बाबतीत मत देण्याचा अधिकार असतो. |
| (4) | जोखीम | जोखीमचे प्रमाण जास्त असते. | जोखीमचे प्रमाण कमी असते. |
| (5) | गुंतवणूकदार | जोखीम घेण्यासाठी आणि शेअर्समध्ये सट्टा करण्यासाठी इच्छूक गुंतवणूकदार हा शेअर जास्त पसंत करीत असतात. | निश्चित आवक आणि भांडवलाची सुरक्षा इच्छिणारे गुंतवणूकदार हे शेअर जास्त पसंत करीत असतात. |
| (6) | बाजारभाव | या शेअर्सच्या बाजारभाव कमी जास्त होतो. | या शेअर्सची किंमत प्रमाणात स्थिर राहते. बाजार किंमतीत कमी-जास्त होत नाही. |
| (7) | भांडवलात वाढ | या प्रकारच्या शेअर्समध्ये हक्काचे शेअर्स, बोनस शेअर्स मुळे भांडवलात वाढ होत असते. | भांडवलात वाढ होत नाही. |

**8.2.4 बाजूला ठेवलेला नफा (Retained Earning) अथवा नफ्याचे धंद्यात पुनर्गुंतवणूक (Ploughing back of Profit) :**

**अर्थ :** कंपनीला स्वत:च्या समृद्धीच्या काळात जेव्हा जास्त नफा होतो तेव्हा सर्वच नफा डिविडन्ड स्वरुप वाटण्याच्या बदल्यात या नफ्याचा काही भाग राखीव स्वरुपात धंद्यात ठेवत असते. धंद्याची भविष्यात निर्माण होणाऱ्या जबाबदाऱ्या पुर्ण करण्यासाठी या बाजूला ठेवलेल्या नफ्याचे धंद्यात पुन:गुंतवणूक करण्यात येते. त्याला नफ्याचे पुन:गुंतवणूक म्हणतात.

**8.2.4.1 फायदे :**

**( 1 ) मंदीच्या काळात उपयोगी :** बाजारात होणाऱ्या नकारात्मक बदल तसेच मंदीच्या काळात आलेल्या समस्यांचा सामना करण्यासाठी हे प्राप्तीस्थान खूपच उपयोगी आहे.

**( 2 ) भविष्यातील योजनांच्या अमलीकरणासाठी उपयोगी :** धंदाकीय एकमाचा विकास, विस्तरण आणि आधुनिकीकरण सारख्या भविष्यातील योजना अमल करण्यासाठी आणि भांडवल मिळविण्यासाठी बाह्य प्राप्तीस्थानावर आधार ठेवावा लागत नाही.

**( 3 ) नवीन मालमत्ता खरीदण्यासाठी उपयोगी :** मालमत्तेच्या अंदाजीत आयुष्याच्या शेवटी नवीन मालमत्ता खरेदी करण्यासाठी बाजूला ठेवलेल्या नफ्याचा उपयोग करु शकतो.

**( 4 ) स्थिर डिविडन्ड नीती :** कंपनी काहीवेळा स्थिर डिविडन्डची निती अंमलात आणते तेव्हा बाजूला ठेवलेला नफा उपयोगी होतो.

**( 5 ) बोज मुक्त मालमत्ता :** बाजूला ठेवलेल्या नफा कंपनीचे मालकी भांडवल असल्याने मालमत्तेवर कोणताही बोजा उभा करावा लागत नाही.

**( 6 ) उधारीचे भांडवल परत करु शकतात :** बाजूला ठेवलेला नफा उधारीवर घेतलेले भांडवल परत करण्यासाठी उपयोगी असते.

**( 7 ) भांडवल समस्येत घट :** बाजूला ठेवलेल्या नफ्यामुळे धंदाकीय एकमाला भांडवल मिळविण्यासाठी बाह्य प्राप्तीस्थानावर आधार ठेवावा लागत नाही अथवा भांडवल मिळविण्यासाठी खर्च करावा लागत नाही. त्यामुळे भांडवल समस्येत घट होते.

**( 8 ) मालकीचे भांडवल :** नफ्याचे पुन:गुंतवणूक हे मालकीचे भांडवल असल्याने व्याज चुकवावे लागत नाही.

**8.2.4.2 मर्यादा :**

**( 1 ) हुकूमशाहीला प्रोत्साहन :** जास्त होणाऱ्या नफ्याचे पुन:गुंतवणूक हूकूमशाहीला प्रोत्साहन देते.

**( 2 ) सट्टाखोरीला उत्तेजन :** बऱ्याच वेळा धंद्याचे संचालक कमी डिविडन्ड देऊन जास्तीचा नफा राखीव भांडवल म्हणून ठेवतात. त्यामुळे शेअरचा बाजारभाव कमी होतो. या वेळी संचालक शेअर खरेदी करुन घेतात. आणि भविष्यात जास्त डिविडन्ड जाहीर करुन शेअर्सचा बाजारभाव जास्त होईल तेव्हा जास्त भावात शेअरची विक्री करुन व्यक्तिगत लाभ मिळवित असतात.

**( 3 ) आर्थिकरीतीने कमकुवत आणि नवीन कंपन्यासाठी अडचणी :** आर्थिक रितीने कमकुवत आणि नव्याने स्थापन होणाऱ्या कंपन्यासाठी नफ्याचे पुन:गुंतवणूक करणे शक्य नाही.

**( 4 ) लहान गुंतवणूंकदारासाठी फायदेकारक नाही :** लहान, गुंतवणूंकदार जास्त डिविडन्डच्या अपेक्षेने धंदाकीय एकमात गुंतवणूक करीत असतात. परंतु संचालक आवश्यकतेपेक्षा जास्त नफ्याचे पुन:गुंतवणूक करीत असल्याने लहान गुंतवणूकदाराना पुर्ण डिविडन्ड मिळत नाही.

**8.3 उधारीचे भांडवल :**

**8.3.1 डिबेंचर :** कंपनीला जास्तीच्या भांडवलाची गरज निर्माण होत असेल तर ते उधारीचे भांडवल मिळविण्यासाठी डिबेंचर बाहेर पाडत असते. डिबेंचर (निधी) हे कंपनीचे देणे आहे. डिबेंचर खरीदणार डिबेंचरधारक कंपनीचे घेणेकरी आहेत. डिबेंचरधारकांना पूर्वी पासून नक्की केलेल्या दराने आणि निश्चित वेळी व्याज चुकविण्यात येत असते आणि नक्की केलेल्या मुदतीच्या शेवटी रक्कम परत करण्यात येते अथवा अटीप्रमाणे शेअर्स मध्ये रुपांतर होते. कंपनीच्या दिर्घमुदतीच्या आणि मध्यम मुदतीच्या भांडवलाची गरज पूर्ण करण्यासाठी हे महत्त्वाचे प्राप्तीस्थान आहे. डिबेंचर जेव्हा बाहेर पाडण्यात येते तेव्हा डिबेंचर धारकांच्या हितांचे रक्षण करण्यासाठी ट्रस्टीची नेमणूंक करण्यात येते. जे डिबेंचरधारकांच्या हितांचे रक्षण ट्रस्ट डिड अनुसार करीत असते.

**8.3.1.1 लक्षणे :**

**( 1 ) कंपनीचे घेणेकरी :** डिबेंचर हे कंपनीचे देणे असल्याने डिबेंचर धारक कंपनीचे घेणेकरी असतात.

**( 2 ) निश्चितदराने व्याज :** डिबेंचर धारकांना आधीच नक्की केलेल्या दराने आणि वेळेवर व्याज चुकविण्यात येते.

**( 3 ) मालमत्तेवर बोज :** डिबेंचर धारकांच्या रक्कमेच्या सुरक्षितते साठी कंपनीच्या मालमत्तेवर तरंगता बोजा उभा करण्यात येत असतो. म्हणजे की कंपनी या मालमत्तेचा उपयोग करु शकते.

**( 4 ) आवश्यकता :** दिर्घमुदतीच्या तसेच मध्यम मुदतीच्या भांडवलाची आवश्यकता पुर्ण करण्यासाठी उपयोगी साधन आहे.

**( 5 ) शेअर बाजारात नोंदणी :** ज्या डिबेंचरची शेअर्स बाजारात नोंदणी केलेली असेल त्यांची खरेदी-विक्री होऊ शकत असते.

**( 6 ) रक्कम परत :** डिबेंचरची रक्कम नक्की केलेल्या मुदतीच्या शेवटी एकूण रक्कमेसह अथवा करारानुसार हप्त्याद्वारे परत करु शकतो.

**( 7 ) चुकवणीत प्रथम पसंती :** डिबेंचर हे कंपनीचे देणे असल्याने कंपनीच्या विसर्जनाच्या वेळी त्राहीत देण्याबरोबर चुकवणी करण्यात येते.

**8.3.1.2 डिबेंचरचे प्रकार (Types of Debentures) :**

(1) सुरक्षित डिबेंचर (तारण असणारी) (Secured Debentures)

(2) रुपांतरणीय डिबेंचर (Convertible Debentures)

(3) बिन रुपांतरणीय (Non-Convertible Debentures)

**( 1 ) सुरक्षित डिबेंचर :** ज्या डिबेंचरच्या एकूण रकमेच्या मोबदल्यात कंपनीची स्वत:ची काही मालमत्ता तारण ठेवली असेल तर अशा डिबेंचरला सुरक्षित (तारण असणारी) डिबेंचर म्हणतात. गहाण ठेवलेली या मालमत्तेचा उपयोग कंपनी करु शकते म्हणजे की त्याच्यावर तरंगता बोजा निर्माण करण्यात येतो.

**( 2 ) रुपांतरणीय डिबेंचर :** ज्या डिबेंचरचे निश्चित वेळी अटीनुसार शेअरमध्ये संपूर्ण अथवा अंशत: रुपांतर होऊ शकते त्याला रुपांतरणीय डिबेंचर म्हणतात. जर कंपनीच्या नियमनपत्रात तरतूद केली असेल तर अशा डिबेंचरला निश्चित वेळेनंतर निश्चित किंमतीने डिबेंचरच्या बदल्यात नक्की केलेले शेअर देण्यात येतात.

**( 3 ) बिन रुपांतरणीय डिबेंचर :** अशा डिबेंचरचे इक्विटी शेअर्समध्ये रुपांतर करण्यात येत नाही आणि त्यांना निश्चित कालावधीनंतर आणि अटीनुसार डिबेंचरची रक्कम परत करण्यात येते.

**8.3.2 बॉन्ड :** बॉन्ड हे कंपनीची दिर्घ मुदतीच्या भांडवलासाठीची गरज पुर्ण करण्याचे महत्त्वाचे प्राप्तीस्थान आहे. बॉन्ड हे कंपनीसाठी उधारीचे भांडवल असते. कंपनीचे देणे आहे आणि बॉन्ड धारक हे कंपनीचे घेणेकरी आहेत. त्यांना निश्चित दराने आणि नियमीत वेळी व्याज देण्यात येत असते.

बॉन्डची मूळ किंमत सामान्यरीतीने डिबेंचर पेक्षा जास्त असते. ते मोठ्या प्रमाणात सरकार, म्युनिसिपल कोर्पोरेशन तसेच कंपनी द्वारे बाहेर पाडण्यात येतात. बॉन्ड ज्या नावाने बाहेर पाडण्यात आला असेल त्या नावाने ओळखण्यात येतो. उदा. सरदार सरोवर बॉन्ड.

बॉन्ड निश्चित मुदतीसाठी असतो. सरकार अथवा कंपन्याना मोठ्या योजना हाती घेत असेल तेव्हा मोठ्या रक्कमेची दिर्घमुदतीची गरज पुर्ण करण्यासाठी बॉन्ड जास्त अनुकूल असते.

**8.3.3 जाहीर ठेवी (Public Deposites) :** कंपनी स्वत:ची अल्पमुदतीच्या कार्यशील भांडवलाची गरज पुर्ण करण्यासाठी जाहेर जनतेकडून ठेवी स्वीकारत असते त्यांना जाहीर ठेवी म्हणतात. हे कंपनीसाठी उधारीचे भांडवल तसेच देणे आहे आणि ठेवी मध्ये पैसे गुतविणारे गुंतवणुकदार हे कंपनीचे घेणेकरी असतात. त्यांची मुदत सहा महीन्यापासून ते तीन वर्षापर्यत असू शकते. ठेवीदाराना कंपनी निश्चित दराने व्याज देत असते. जे मासिक, त्रिमासिक, अर्धवार्षिक अथवा वार्षिक सुद्धा असू शकते अथवा मुदतपूर्ण झाल्यानंतर मुद्दल तसेच व्याज सुद्धा सोबत देण्यात येते. कंपनीकायदा 2013च्या तरतूदीनुसार बँकिंग आणि नॉन-बँकिंग फायन्यास कंपनी शिवाय जाहीर ठेवी जनता कडून स्विकारु शकत नाही.

**8.3.3.1 फायदा :**

**( 1 ) भांडवल मिळविण्यासाठी सरळ :** प्रतिष्ठीत आणि नफा करणारी कंपन्यांना सरळतने भांडवल मिळून जाते.

**( 2 ) भांडवल मिळविण्यास कमी खर्च :** भांडवल प्राप्तीच्या अन्य साधनांपेक्षा जाहीर ठेवी कमी खर्चाने आणि कमी वेळेत मिळवु शकतो.

**( 3 ) मालमत्ता बोजाशिवाय :** जाहीर ठेवीद्वारे भांडवल मिळविण्याच्या वेळी कंपनीला मालमत्ता तारण ठेवावी लागत नाही त्यामुळे भविष्यात ही मालमत्ता तारण ठेवून जास्तीचे उधारीचे भांडवल मिळवू शकतात.

**( 4 ) व्याज हा खर्च आहे :** जाहीर ठेवी वर चुकविण्यात येणारे व्याज हे कंपनीसाठी खर्च आहे त्यामुळे आयकरात खर्च म्हणून राहत (सूट) मिळते. त्यामुळे कंपनीला आयकर कमी भरावा लागतो.

**( 5 ) कार्यशील भांडवल म्हणून उपयोग :** कंपनी स्वत:ची अल्पमुदतीच्या भांडवलाची गरज पूर्ण करण्यासाठी जाहीर ठेवी द्वारे भांडवल मिळवून कार्यशील भांडवलाची आवश्यकता पूर्ण करु शकतो.

**8.3.3.2 मर्यादा :**

**( 1 ) अनिश्चितता :** जाहिर ठेवी द्वारे भांडवल मिळविण्यात अनिश्चितता असते. कारण की गुंतवणुकदाराचा प्रतिभाव पूर्वी पासून जाणू शकत नाही.

**( 2 ) गुतवंणुकदारांना जोखीम :** जाहीर ठेवी असुरक्षित देणे मानले जाते. त्यामुळे रक्कम गुंतवणुक करणाऱ्यासाठी जोखीम राहते.

**( 3 ) सुखाच्या वेळेतील साथी :** जाहीर ठेवी या कंपनीच्या सानुकूल आणि सुखाचे साथीदार आहेत कारण जेव्हा कंपनीची आर्थिक परिस्थिती बिगडते अथवा कंपनीविषयी बाजारात खोटी अफवा पसरली तर त्या परिस्थितीत गुंतवणूकदार आपल्या ठेवी मुदत पुर्ण होण्याच्या आत मिळविण्यासाठी प्रयत्न करतात ही गर्दी कंपनीच्या आर्थिक संकटात वाढ करते म्हणून त्यांना सुखाचे साथीदार असे म्हणतात.

**( 4 ) नवीन आणि कमजोर कंपन्यासाठी मुश्केल :** नवीन आणि आर्थिकरीतीने कमजोर कंपन्यामध्ये गुंतवणूकदाराना सुरुवातीस विश्वास होत नाही त्यासाठी गुंतवणूकदार अशा कंपनीत ठेवी ठेवून जोखीम घेण्यात तयार होत नाही.

**8.3.4 आर्थिक संस्थेद्वारा कर्ज (Loan from Financial Institutions) :** विज्ञान आणि टेक्नॉलॉजीच्या क्षेत्रात परिवर्तन झाल्याने उद्योग-धंद्याचा विकास वाढला त्यामुळे त्यांची दिर्घमुदतीच्या भांडवलाची आवश्यकता सुद्धा वाढली. वैयक्तिक गुंतवणूकदार आणि व्यापारी बँक ही आवश्यकता पूर्ण करु शकत नाही. त्यामुळे दिर्घमुदतीच्या भांडवलाच्या गरजेला पूर्ण करण्यासाठी देशात विशिष्ट आर्थिक संस्थांची गरज निर्माण झाली.

भारतात स्वातंत्र्यानंतर पंचवार्षिक योजना सुरु झाल्याने औद्योगिक विकासावर भार देण्यात आला. जाहीर क्षेत्रात तसेच खाजगी क्षेत्रात निर्माण होणाऱ्या उद्योगाना दिर्घमुदतीचे भांडवल मिळेल या उद्देशाने भारत सरकार द्वारा आर्थिक संस्थेची स्थापना करण्यात आली. त्याचबरोबर लहान आणि मध्यम आकाराच्या एकमाला आर्थिक मदत मिळेल त्या उद्देशाने राज्य भांडवल निगमांची सुद्धा स्थापना करण्यात आली.

दिर्घमुदतीचे उधारीचे भांडवल देणाऱ्या मुख्य आर्थिक संस्था खालील प्रमाणे आहेत :

(1) भारतीय औद्योगिक भांडवल निगम (IFCI - Industrial Finance Corporation of India).

(2) भारतीय औद्योगिक विकास बँक (IDBI - Industrial Development Bank of India).

(3) भारतीय औद्योगिक प्रत आणि गुंतवणूक निगम (ICICI - Industrial Credit and Investment Corporation of India).

(4) गुजरात राज्य आर्थिक निगम (GSFC - Gujarat State Finance Corporation).

(5) गुजरात औद्योगिक गुंतवणूक निगम (GIIC - Gujarat Industrial Investment Corporation).

**8.3.4.1 कार्य :**

**( 1 ) शेअरची खरेदी करुन भांडवल देतात :** आर्थिक संस्था कंपनीच्या स्थापनेच्या वेळी तसेच आधुनिकीकरण अथवा विस्तरणाच्या वेळी बाहेर पाडलेले शेअरची खरेदी करुन मदत करतात. तसेच बांयधरी देऊन मदत करतात.

**( 2 ) लोन देऊन भांडवल पूरवितात :** आर्थिक संस्था धंदाकीय एकमांना दिर्घमुदतीचे तारण घेऊन कर्ज पुरवितात. शिवाय काहीवेळा विशिष्ट परिस्थितीत आवश्यकता असेल तर धंदाकीय मालमत्ते शिवाय व्यक्तिगत मालमत्ता सुद्धा तारणात घेण्यात येते.

**( 3 ) तांत्रीक ( टेकनिकल ) सेवेची सरळ चुकवणी द्वारे मदत :** धंदाकीय एकमांना बऱ्याच वेळा टेकनिकल आणि तंज्ञाच्या सेवा मिळविण्यासाठी जास्त रक्कमेचा खर्च करावा लागतो. त्यासाठी कंपनीला सेवा उपलब्ध करुन देतात आणि त्याविषयीची चुकवणी आर्थिक संस्था सरळ सरळ कंपनीच्या वतीने ज्या-त्या टेकनिशियन कंपनीला करतात.

**( 4 ) बांयधरी पूर्ण करणे :** धंदाकीय एकमाचा जामीन बनुन अन्य आर्थिक संस्थांना सुरक्षीततेची खात्री देत असते. सामान्यपणे परोक्ष अथवा अप्रत्यक्षरीतीने कंपन्यांना भांडवल मिळविण्यात मदत करती असते.

**( 5 ) अन्य सेवा :** आर्थिक संस्था कंपनीच्या स्थापनेत मदत, बाजार संशोधन, विदेशी बाजाराची माहीती सारख्या सेवा सुद्धा देत असते.

**8.3.5 व्यापारी बँक :** अल्पमुदतीचे कार्यशील भांडवल देण्यात व्यापारी बँकेचे स्थान खूप महत्त्वाचे आहे. देशाचे व्यापारी आणि उद्योग स्वत:ची कार्यशील भांडवलाची आवश्यकता पुर्ण करण्यात बहुतांशी व्यापारी बँकावर आधार ठेवतात. जाहिर जनतेकडून स्विकारलेल्या ठेवींना व्यापारी बँक धंदाकीय एकमाना कर्ज देतात. ज्यांची मुख्यत्वे तीन पद्धती आहे : (1) लोन (2) कॅशक्रेडीट (3) ओवरड्राफ्ट

**8.3.5.1 लोन :** व्यापारी बँका लोन द्वारे धंदाकीय संस्थांना भांडवल देतात. जे बँकच्या नीतिनियमानुसार असतात. त्यासाठी धंदाकीय एकमाची आर्थिक गरज, रक्कम परत करण्याची क्षमता मागच्या वर्षाचा हिशोब तसेच धंद्याची नफाकारकता वगैरची योग्य तपासणी करुन लोन देतात. लोन (कर्ज) देण्याच्या वेळी धंदाकीय एकमांची मालमत्ता गहाण ठेवतात. मंजूर झालेल्या रक्कमेवर नक्की केलेल्या दराने व्याज द्यावे लागते. कर्जाची रक्कम नक्की केलेल्या हप्त्यात अथवा एकाच वेळी परत करु शकतात.

**8.3.5.2 कॅशक्रेडीट (C.C.) :** बँक व्यापारी किंवा उद्योगांना धंदाकीय आवश्यकतेसाठी मालस्टॉक अथवा व्यक्तिगत मालमत्तेच्या जामीनगीरीवर जी रक्कम मंजुर करते तिला कॅशक्रेडीट म्हणतात.

धंदाकीय एकम जितक्या प्रमाणात जितक्या वेळेसाठी या भांडवला (रक्कमेचा) चा उपयोग करील तितक्या प्रमाणात नक्की केलेल्या दराने व्याज चुकवावे लागते.

**8.3.5.3 ओवरड्राफ्ट (O.D.) :** बँक व्यापारी अथवा धंदाकीय संस्थांना चालू खात्यात शिल्लक असेल त्यापेक्षा नक्की केलेल्या मर्यादित जास्त रक्कम काढण्याची सुविधा देते त्यास बँक ओवरड्राफ्ट असे म्हणतात.

व्यापारी अथवा धंदादारी संस्था स्वत:ची व्यक्तिगत पत अथवा जामीनगीरी वर ओवरड्राफ्ट मिळवु शकते. धंदादारी एकमाला जितक्या प्रमाणात जितक्या कालावधीसाठी या रक्कमेचा उपयोग केला असेल तितक्या प्रमाणात नक्की केलेल्या दराने व्याज दयावे लागते.

**8.3.6 व्यापारी पत (Trade Credit) अथवा धंद्याचे घेणेकरी :** धंदाकीय एकमाला कच्चामालाची, तयार मालाची अथवा अन्य साधनसामग्रीची आवश्यकता असते. अशा परिस्थितीत उत्पादक अथवा व्यापाऱ्यांकडून निश्चित कालावधीच्या पतवर खरेदी करुन कार्यशील भांडवल निर्माण करीत असतात. सामान्यपणे घेणेकरी सरळरीतीने भांडवल देत नाही परंतु माल अथवा सेवा पत (उधारी) वर देऊन अप्रत्यक्ष रीतीने भांडवलाची आवश्यकता पुर्ण करतात.

**8.3.7 आंतर कंपनी ठेवी (Inter Corporate Deposites) :** सामान्यरीतीने एक कंपनी जेव्हा दुसऱ्या कंपनीला भांडवलाची आवश्यकता असेल तेव्हा ठेवी स्वरुपात जी रक्कम देते तिला आंतर कंपनी ठेवी म्हणतात. मोठ्या प्रमाणात असे व्यवहार शासक कंपनी आणि गौण कंपनी मध्ये आणि एकाच समूहा द्वारा संचालीत वेगवेगळ्या कंपन्यांमध्ये निर्माण होतो. व्याजाचा दर आणि मुदत करारा द्वारे नक्की होत असते. अन्य प्राप्तीस्थाना पेक्षा सरळतने भांडवल मिळत असते.

**8.3.8 मालकीची भांडवल आणि उधारीचे भांडवल मधील फरक :**

| अनुक्रम नंबर | फरकाचे मुद्दे | मालकीची भांडवल | उधारीचे भांडवल |
|---|---|---|---|
| (1) | अर्थ | शेअर धारकांद्वारे गुंतविण्यात येणाऱ्या रक्कमेला मालकीचे भांडवल म्हणतात. | भांडवलाच्या अन्य प्राप्ती स्थानाकडून उधारीच्या भांडवलाचे धंद्यात गुंतवणूक करतात त्यांना उधारीचे भांडवल म्हणतात. |
| (2) | प्राप्तीस्थान | इक्विटी शेअर, नफ्याची पुन:गुंतवणूक घसारा भांडवल, राखीव द्वारा मिळवुं शकतो. | डिबेंचर, व्यापारी बँक, आर्थिक संस्था द्वारे मिळवुं शकतात. |
| (3) | वळतर | मालकीच्या भांडवलावर वळतर म्हणून डिविडन्ड मिळत असतो. | उधारीच्या भांडवलावर वळतर म्हणून निश्चित दराने व्याज देण्यात येते. |
| (4) | वळतरचा दर | मालकीच्या भांडवलात वळतरचा दर अनिश्चित असतो. | उधारीच्या भांडवलावर वळतरचा दर निश्चित असतो. |
| (5) | भांडवल परत | मालकची भांडवल सर्वात शेवटी परत करतात. | उधारीचे भांडवल मालकीच्या भांडवलापेक्षा आधी परत करतात. |

**या प्रकरणात तुम्ही काय शिकलात ?**

**(1) धंदाकीय भांडवलाचा विचार :** हिशोबी नावाच्या दृष्टीने भांडवल म्हणजे धंद्याच्या मालकांनी धंद्यात गुंतविलेली नगद (रक्कम), माल अथवा मालमत्ता, वाणिज्यच्या दृष्टीने धंद्याच्या मालिक धंद्यात स्वत: गुंतवविलेल्या रक्कमे शिवाय विविध प्राप्तीस्थानांतून उधारीने घेतलेल्या रक्कमेचा सुद्धा समावेश भांडवलात होत असतो.

**भांडवलाच्या आवश्यकता नक्की करणारे घटक :** (1) धंद्याच्या स्थापनेसाठी (2) स्थिर मालमत्तेच्या खरेदीसाठी (3) कार्यशील भांडवलासाठी (4) धंद्याचे आधुनिकीकरण आणि विस्तरणासाठी (5) आकस्मिक आवश्यकते -साठी.

**भांडवलाचे महत्त्व :** भांडवल हा एका असा पक्ष आहे की ज्यांच्या आसपास सर्वच आर्थिक प्रवृत्ती फिरत असतात. धंदाकीय भांडवलाला मानवशरीराच्या रक्तासोबत तुलना केली जाते. भांडवलाच्या अछत मुळे खूप समस्यांचा सामना करावा लागतो.

**(2) मालकीचे भांडवल :**

**इक्विटी शेअर :** अर्थ : ज्या शेअरला डिविडन्ड मिळविण्याचा तसेच भांडवल परत मिळविण्याचा हक्क सर्वात शेवटी मिळत असतो त्याला इक्विटी शेअर म्हणतात.

**लक्षणे :** (1) खरे मालक (2) मत देण्याचा अधिकार (3) डिविडन्डचा दर (4) नफ्यासोबत संबंध (5) सामान्य सभा (6) भांडवल परत (7) विसर्जन (8) पात्रतेचे शेअर (9) भांडवलाचा फायदा (10) शेअरची नोंदणी

**इक्विटी शेअरचे प्रकार :** (A) सामान्य इक्विटी शेअर्स (B) स्वेट इक्विटी शेअर्स (C) अन्य इक्विटी शेअर्स

**(A) सामान्य इक्विटी शेअर्स :** खूपज महत्त्वाचा शेअर्स असतो. शेअर बाहेर पाडून भांडवल मिळविणाऱ्या प्रत्येक कंपनीला शेअर बाहेर पाडणे अनिवार्य आहे. कंपनीचे खरे मालक असतात, खरे जोखीम उठवितात. डिविडन्डचा दर अनिश्चित असतो. सर्वात शेवटी भांडवल परत मिळत असते.

**(B) स्वेट इक्विटी शेअर्स :** कंपनी तिच्या संचालक आणि तिच्या विशिष्ट ज्ञान असणाऱ्या व्यक्तींना मोबदल्याने अथवा रोकड शिवायच्या अवेजने जे शेअर देण्यात येतात त्यांना स्वेट इक्विटी शेअर्स म्हणतात.

**(C) अन्य इक्विटी शेअर्स :** या शेअर्सचे दोन प्रकार असतात.

(1) मताधिकारसह इक्विटी शेअर्स (2) डिविडन्डच्या संबंधीत वेगवेगळ्या अधिकारा सोबत मताधिकार असणारे इक्विटी शेअर्स.

**प्रेफरन्स ( पसंती ) शेअर :** ज्या शेअर वर कंपनीच्या नफ्यातून डिविडन्ड मिळविण्याचा प्रथम अधिकार असेल तसेच जेव्हा कंपनीचे विसर्जन होते तेव्हा भांडवल परत मिळविण्याचा प्रथम अधिकार असेल त्यांना प्रेफरन्स (पसंदी) चे शेअर म्हणतात.

**लक्षणे :** (1) डिविडन्ड मिळविण्याचा प्रथम अधिकार (2) फक्त हितांसोबत जुळलेल्या बाबतीतच मताधिकार (3) स्थिर, निश्चित आवक, भांडवलाची सुरक्षितता इच्छिणारे गुंतवणूकदार जास्त पसंत करीत असतात. (4) बाजारभाव प्रमाणात स्थिर राहते (5) जोखीमचे प्रमाण कमी असते (6) इक्विटी शेअर्स धारकांपेक्षा प्रथम भांडवल परत मिळत असते.

**प्रेफरन्स शेअर्सचे प्रकार :** (1) 20 वर्षा पूर्वी परत करु शकतील असे प्रेफरन्स शेअर्स (2) 20 वर्षा नंतर परत करु शकतील असे प्रेफरन्स शेअर्स

**इक्विटी शेअर्स आणि प्रेफरन्स शेअर्स मधील फरक :**

**मुद्दा :** (1) अनिवार्य (2) डिविडन्डचा दर (3) अधीकार (4) जोखीम (5) गुंतवणूकदार (6) बाजारभाव (7) भांडवलात वाढ

**बाजूला ठेवलेला नफा अथवा नफ्याचे धंद्यात पुनःगुंतवणूक :**

**अर्थ :** कंपनी सर्वच नफा डिविडन्ड स्वरुप विभागण्याच्या बदल्यात त्यांचा काही भाग राखीव स्वरुपात ठेवण्यात येतो. भविष्यात आवश्यकता उभी होईल तेव्हा या बाजूला ठेवलेल्या नफ्याचे धंद्यात पुनःगुंतवणूक करण्यात येतो.

**फायदा :** (1) मंदीच्या काळात उपयोगी (2) भावी योजनांच्या अमलीकरणाच्या उपयोगासाठी (3) नवीन मालमत्ता खरेदी करण्यासाठी (4) स्थिर डिविडन्ड नीती (5) मालमत्ता बोजा मुक्त (6) उधारीचे भांडवल (7) भांडवलाच्या समस्येत घट (8) मालकीचे भांडवल

**मर्यादा :** (1) हुकमशाहीला प्रोत्साहन (2) सट्टा खोरीला उत्तेजन (3) आर्थिक रीतीने कमजोर आणि नवीन कंपन्यांसाठी मुश्केल (4) लहान गुंतवणूकदारांना फायदेकारक नाही.

**( 3 ) उधारीचे भांडवल :**

**डिबेंचर :** जास्तीचे भांडवल मिळविण्यासाठी बाहेर पाडत असते. कंपनीचे देणे आहे डिबेंचर खरेदी करणाऱ्याना डिबेंचरधारक म्हणतात. ते कंपनीचे घेणेकरी आहेत. नक्की केलेल्या दराने आणि निश्चित वेळी व्याज चुकविण्यात येते. मुदतीच्या शेवटी अटीनुसार रक्कम परत करण्यात येते. दिर्घमुदतीचे तसेच मध्यम मुदतीच्या भांडवलाच्या आवश्यकतेसाठी महत्त्वाचे प्राप्तीस्थान.

**लक्षणे :** (1) कंपनीचे घेणेकरी (2) निश्चितदराने व्याज (3) मालमत्तेवर बोज (4) आवश्यकता (5) शेअरबाजारात नोंदणी (6) रक्कम परत (7) चुकवणीमध्ये प्रथम पसंती.

**डिबेंचरचे प्रकार :**

**( 1 ) सुरक्षित डिबेंचर :** कंपनीने स्वतःची मालमत्ता तारण ठेवून भांडवल मिळविले असेल त्या डिबेंचरांना सुरक्षित डिबेंचर म्हणतात.

**( 2 ) रुपांतरणीय डिबेंचर :** असा डिबेंचरचे निश्चित काळानंतर अटीनुसार शेअर्स मध्ये रुपांतर होऊ शकते.

**(3) बिन रुपांतरणीय डिबेंचर :** अशा डिंचरचे शेअर्स मध्ये रुपांतर करण्यात येत नाही, रक्कम परत करण्यात येत असते.

**बॉन्ड :** दिर्घमुदतीच्या भांडवलाची गरज पूर्ण करण्यासाठी, कंपनीसाठी उधारीचे भांडवल आहे. कंपनीचे देणे आहे. बॉन्ड धारकांना कंपनीचे घेणेकरी म्हणतात. त्यांना निश्चित दराने आणि नियत वेळेला व्याज देण्यात येते. बॉन्ड ज्या नावाने बाहेर पाडले असतील त्याच नावाने ओळखले जातात. उदा. सरदार सरोवर बॉन्ड.

ते सरकार, म्युनिसिपल कोर्पोरेशन तसेच कंपनी द्वारे बाहेर पाडण्यात येतात. दिर्घमुदतीच्या योजना हाती घेण्यासाठी बॉन्ड जास्त उपयोगी असतात.

**जाहीर ठेवी :** कंपनीची अल्पमुदतीची कार्यशील भांडवलाची आवश्यकता पुर्ण करण्यासाठी जाहिर जनतेकडून ठेवी स्विकारत असते. ते उधारीचे भांडवल तसेच देणे आहे. गुंतवणूकदार कंपनीचे घेणेकरी आहेत. मुदत सहा महीन्यापासून तीन वर्षापर्यत असते. नक्की केलेल्या दराने आणि अटीप्रमाणे व्याज देण्यात येते. मुदत पूर्ण झाल्यानंतर अटीप्रमाणे रक्कम परत करण्यात येतात.

**फायदा :** (1) भांडवल मिळविण्यासाठी (2) भांडवल मिळविण्याचा खर्च कमी (3) मालमत्ता बोज मुक्त (4) व्याज हा खर्च आहे (5) कार्यशील भांडवल म्हणून उपयोग.

**मर्यादा :** (1) अनिश्चितता (2) गुंतवणूकदारांना जोखीम (3) सुखांच्या काळातील साथीदार (4) नवीन आणि आर्थिकरीतीने कमजोर कंपन्यासाठी मुश्केल.

**आर्थिक संस्थेद्वारे कर्ज/लोन :** जाहीर क्षेत्रात तसेच खाजगी क्षेत्रात व्यापार उद्योगांच्या दिर्घमुदतीच्या भांडवलाची आवश्यकता पूर्ण करण्यासाठी आर्थिक संस्थेची स्थापना करण्यात आली. असा संस्था केन्द्रसरकार तसेच राज्य सरकार द्वारा स्थापण्यात आली. उदा. (1) भारतीय औद्योगीक भांडवल निगम (IFCI) (2) भारतीय औद्योगीक विकास बँक (IDBI) (3) भारतीय औद्योगीक पत आणि गुंतवणूक निगम (ICICI) (4) गुजरात राज्य भांडवल निगम (GSFC) (5) गुजरात औद्योगीक गुंतवणूक (GIIC).

**कार्य :** (1) शेअर्स खरेदी करुन भांडवल देते. (2) कर्ज देऊन भांडवल पूर्ण करते. (3) टेकनिकल सेवेची सरळ चुकवणीद्वारे मदत. (4) बांयधरी पुर्ण पाडते. (5) अन्य सेवा.

**व्यापारी बँक :** अल्पमुदतीच कार्यशील भांडवल पूर्ण करते. जाहीर जनतेकडून स्विकारलेल्या ठेवींना या बँका धंदाकीय एकमात तीन रीतीने भांडवल करतात : (1) लोन (कर्ज) (2) कॅशक्रेडीट (3) ओवरड्राफ्ट.

**(1) लोन (कर्ज) :** बॅकेच्या नीती-नियमानुसार धंदाकीय एकमांची योग्य तपासणी करुन कर्ज देत असते. मालमत्ता गहाण ठेवावी लागते. मंजूर झालेली कर्जाच्या रक्कमेवर नक्की केलेल्या दराने व्याज द्यावे लागते. नक्की केलेल्या अटीप्रमाणे लोन परत करावे लागते.

**(2) कॅशक्रेडिट :** बँक धंदाकीय एकमाच्या माल स्टॉक अथवा व्यक्तिगत मालमत्तेच्या जामीनगीरी वर जी रक्कम मंजूर करेल तिला कॅशक्रेडीट म्हणतात.

**(3) ओवरड्राफ्ट :** बँक धंदाकीय एकमांच्या चालू खात्यात शिल्लक असलेल्या रक्कमेपेक्षा नक्की केलेल्या मर्यादेत जास्त रक्कम काढण्याची सुविधा देते त्यास बँक ओवरड्राफ्ट म्हणतात.

**आंतरकंपनी ठेवी :** एक कंपनी जेव्हा दुसऱ्या कंपनीला भांडवलाची आवश्यकता असेल तेव्हा ठेवी स्वरुपात जी रक्कम देते त्यांना आंतर कंपनी ठेवी म्हणतात. असे व्यवहार शासक कंपनी आणि गौण कंपनी मध्ये होतो. व्याजाचा दर आणि मुदत करारद्वारा नक्की होतो.

**मालकीचे भांडवल आणि उधारीचे भांडवल मधील फरक :**

**मुद्दा :** (1) अर्थ (2) प्राप्तीस्थान (3) वळतर (4) वळतरचा दर (5) भांडवल परत

**व्यापारीपत :** उत्पादक अथवा व्यापारी काही काळासाठी पतवर कच्चामाल, तयार माल अथवा अन्य साधन सामग्रीची खरेदी करुन अल्पमुदती साठी कार्यशील भांडवल निर्माण करीत असते. त्यांना व्यापारी पत म्हणतात.

## स्वाध्याय

**1. खालील प्रश्नांचे उत्तर योग्य विकल्प निवडून लिहा :**

(1) मालकीच्या भांडवलाच्या संदर्भात खालील पैकी कोणते भांडवल योग्य नाही.

(A) सामान्य इक्विटी शेअर्स (B) स्वेट इक्वीटी शेअर्स

(C) प्रेफरन्स शेअर्स (D) डिबेंचर

(2) कंपनीचे खरे मालक कोणाला म्हणतात ?

(A) इक्विटी शेअरधारक (B) प्रेफरन्स शेअर धारक (C) डिबेंचर धारक (D) बॉन्ड धारक

(3) कंपनीच्या संचालकांना कोणते शेअर मोबदल्याने अथवा नगदच्या अवेज शिवाय देऊ शकतात ?

(A) सामान्य इक्विटी शेअर्स (B) स्वेट इक्विटी शेअर्स

(C) बोनस शेअर्स (D) हक्काचे शेअर्स

(4) कंपनीच्या नफ्यातून डिविडन्ड मिळविण्यासाठी सर्वप्रथम कोण हक्कदार आहे ?

(A) प्रेफरन्स शेअर धारक (B) डिबेंचर धारक (C) इक्विटी शेअर धारक (D) घेणेकरी

(5) कंपनीच्या विसर्जनाच्या वेळी सर्वप्रथम कोणाला भांडवल परत मिळते ?

(A) प्रेफरन्स शेअर धारकांना (B) सामान्य इक्विटी धारकांना

(C) स्थापकांना (D) डिबेंचर धारकांना

(6) कंपनीची कायमी मालमत्तेमध्ये गुंतलेल्या भांडवलाला कोणते भांडवल म्हणून ओळखण्यात येते ?

(A) कार्यशील भांडवल (B) अल्पमुदतीचे भांडवल (C) अस्थिर भांडवल (D) स्थिर भांडवल

(7) डिबेंचर धारक कंपनीसाठी काय म्हटले जातात ?

(A) मालक (B) देणेकरी (C) घेणेकरी (D) प्रवर्तक

(8) धंदाकीय एकमासाठी दिर्घमुदतीच्या भांडवलाची आवश्यकता पुर्ण करण्यासाठीचे आंतरीक प्राप्तीस्थान....

(A) सामान्य इक्विटी शेअर्स (B) प्रेफरन्स शेअर्स

(C) जाहीर ठेवी (D) नफ्याचे पुन:गुंतवणूक

(9) कोणत्या कंपन्या नफ्यांचे पुन:गुंतवणूक करु शकतात ?

(A) नवीन स्थापणारी कंपनी (B) चालू कंपनी

(C) आर्थिक रीतीने सद्धर कंपनी (D) नुकसान करणारी कंपनी

(10) सरकार दिर्घमुदतीच्या योजना हाती घेण्यासाठी कशा रीतीने भांडवल मिळवित असते ?

(A) सामान्य इक्विटी शेअर्सद्वारे (B) बॉन्ड द्वारे

(C) डिबेंचर द्वारे (D) जाहीर ठेवी द्वारे

(11) अल्पमुदतीसाठी कार्यशील भांडवल मिळविण्याचे योग्य प्राप्तिस्थान....

(A) प्रेफरन्स शेअर्स (B) बॉन्ड (C) आर्थिक संस्था (D) व्यापारी पत

**उत्तर :** (1) (D) (2) (A) (3) (B) (4) (A) (5) (D) (6) (D) (7) (C) (8) (D) (9) (C) (10) (B) (11) (D)

**2. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा :**

(1) धंद्याचे खरे मालक कोणते शेअरधारक असतात ?

(2) कंपनीच्या नफ्यातून सर्वात प्रथम डिविडन्ड मिळविण्याचा अधिकार कोणाला असतो ?

(3) उधारीच्या भांडवलाचे प्राप्तीस्थाने सांगा.

(4) रुपांतरणीय डिबेंचर म्हणजे काय ?

(5) खालील संज्ञा समजवा :

(1) IFCI, (2) IDBI, (3) ICICI, (4) GSFC, (5) GIIC.

(6) व्यापारी बँकेच्या धिराणाच्या (कर्ज) मुख्य तीन पद्धती सांगा.

**3. खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा :**

(1) वाणिज्याच्या दृष्टीने भांडवलाचा विचार सांगा ?

(2) सामान्य इक्विटी शेअरला जोखीम शेअर का म्हणतात ?

(3) स्वेट इक्विटी शेअर कोणाला म्हणतात ?

(4) प्रेफरन्स शेअरला पसंतीचा शेअर का म्हणतात ?

(5) प्रेफरन्स शेअरचे प्रकार सांगा.

(6) बॉन्ड आणि जाहीर ठेवी मधील मुख्य फरक काय आहे ?

(7) तरंगता बोज म्हणजे काय ?

**4. खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा :**

(1) सामान्य इक्विटी शेअर्सचे फायदे आणि मर्यादा सांगा.

(2) इक्विटी शेअर्स आणि प्रेफरन्स शेअर्स यातील फरक समजवा.

(3) व्यापारी बँकची धिराण (कर्ज) पद्धती समजवा.

(4) मालकीचे भांडवल आणि उसणे भांडवल यातील फरक समजवा.

(5) टीपा लिहा :

(A) बॉन्ड, (B) व्यापारी पत, (C) आंतर-कंपनी ठेवी

(6) जाहीर ठेवींना सुखाच्या काळातील साथीदार म्हणतात ? विधान समजवा.

(7) नफ्याचे पुन:गुंतवणूक सर्वच कंपन्यासाठी शक्य नाही. - समजवा.

**5. खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा :**

(1) भांडवलाची आवश्यकता नक्की करणारे घटक समजवा.

(2) शेअरचा अर्थ सांगून सामान्य इक्विटी शेअरची लक्षणे समजवा.

(3) प्रेफरन्स शेअरचा अर्थ देऊन त्यांची लक्षणे समजवा.

(4) डिबेंचरचा अर्थ देऊन त्यांच्या प्रकाराची माहिती द्या.

(5) नफ्यांची पुन:गुंतवणूक म्हणजे काय ? त्याचे फायदा आणि मर्यादा सांगा.

(6) जाहीर ठेवी म्हणजे काय ? त्याचे फायदे आणि मर्यादा समजवा.

(7) आर्थिक संस्थेचे कार्य समजवा.

**पारिभाषीक शब्द**

| | | |
|---|---|---|
| भांडवल | : | Capital |
| मालमत्ता | : | Asset |
| शेअर भांडवल | : | Share Capital |
| स्थिर भांडवल | : | Fixed Capital |
| कार्यशील भांडवल (चालू भांडवल) | : | Working Capital |
| सामान्य इक्विटी शेअर्स | : | Ordinary Equity Share |
| स्वेट इक्विटी शेअर्स | : | Sweat Equity Share |

| | | |
|---|---|---|
| प्रेफरन्स शेअर्स | : | Preference Share |
| प्रवर्तक | : | Promotors |
| तरतूदी | : | Provision |
| मालकीचे भांडवल | : | Owner's Fund |
| नियमनपत्र | : | Articles of Association |
| सामान्य सभा | : | General Meeting |
| आवेदनपत्र | : | Memorandum of Association |
| ठराव | : | Resolution |
| करार | : | Agreement |
| वटाव | : | Discount |
| बांयधरी (हमीपत्र) | : | Underwriting |
| विसर्जन | : | Liquidation |
| भांडवल वाढ | : | Capital Growth |
| गुंतवणूकदार | : | Investors |
| शेअरधारक | : | Share Holder |
| डिविडन्ड | : | Dividend |
| उधारीचे भांडवल | : | Borrowed Fund |
| डिबेंचर | : | Debenture |
| सुरक्षित डिबेंचर | : | Secured Debenture |
| रुपांतरणीय डिबेंचर | : | Convertible Debenture |
| बिन-रुपांतरणीय डिबेंचर | : | Non-Convertible Debenture |
| अंशतः रुपांतरणीय डिबेंचर | : | Partial Convertible Debenture |
| संपूर्ण रुपांतरणीय डिबेंचर | : | Fully Convertible Debenture |
| बॉन्ड | : | Bond |
| जाहीर ठेवी | : | Public Deposites |
| आर्थिक संस्था | : | Financial Institutions |
| व्यापारी बँक | : | Commercial Bank |
| लोन | : | Loan |
| कॅशक्रेडिट | : | Cash Credit |
| ओवरड्राफ्ट | : | Overdraft |
| व्यापारी पत | : | Trade Credit |
| आंतर कंपनी ठेवी | : | Inter Corporate Deposites |

●

# 9 आंतरीक व्यापार (Internal Trade)

**या प्रकरणात तुम्ही काय शिकणार ?**


9.1 आंतरीक व्यापार
- 9.1.1 अर्थ
- 9.1.2 व्यापारी प्रवृत्तीचे वर्गीकरण
- 9.1.3 घाऊक व्यापार (जथ्थाबंध)
  - 9.1.3.1 अर्थ
  - 9.1.3.2 घाऊक व्यापाराची सेवा
    - (A) घाऊक व्यापाऱ्याची उत्पादकाला सेवा
    - (B) घाऊक व्यापाऱ्याची किरकोळ व्यापाऱ्याला सेवा

9.2 किरकोळ व्यापार
- 9.2.1 अर्थ
- 9.2.2 किरकोळ व्यापाऱ्याची सेवा
  - 9.2.2.1 किरकोळ व्यापाऱ्याची घाऊक व्यापारी आणि उत्पादकाला सेवा
- 9.2.3 फायदे
- 9.2.4 मर्यादा
- 9.2.5 प्रकार
  - 9.2.5.1 फिरते दुकाने (व्यापारी)
    - (A) फेरीवाले
    - (B) कामचलाऊ व्यापारी
    - (C) निश्चित दिवसाचे व्यापारी
    - (D) गल्ली बोळातील व्यापारी/विक्रेते
  - 9.2.5.2 स्थायी दुकाने
    - (1) मोठ्या पायावरील किरकोळ व्यापारी
    - (A) खाती (विभाग) असणारी दुकाने - लक्षणे
    - (B) साखळी दुकाने - लक्षणे
    - (C) टपाल व्यवहार दुकाने
    - (D) फ्रेन्चाईज
    - (E) सुपर मार्केट
    - (F) शॉपींग मॉल
  - 9.2.5.3 विक्रिच्या अन्य पद्धती
    - (A) स्वयं संचालीत विक्री यंत्र
    - (B) टेलि मार्केटिंग
      - (i) टेलिफोनिक मार्केटिंग
      - (ii) टेलिव्हीजन मार्केटिंग
    - (C) इन्टरनेट मार्केटिंग

9.3 व्यापाराचे पारिभाषीक शब्द
- (i) कॅश ऑन डिलिवरी (COD)
- (ii) फ्रि ऑन डिलिवरी (FOB)
- (iii) मालाची समस्या, वीमा, आणि दुकान भाडे (CIF)
- (iv) भूलचुक देणे-घेणे (E&OE)

9.4 खाती असणारी दुकान आणि साखळी दुकानांमधील फरक

9.5 छूटक व्यापारी आणि घाऊक व्यापारी मधील फरक


**प्रस्तावना**


व्यापार म्हणजे वस्तू किंवा सेवेच्या बदल्यात वस्तू, सेवा अथवा पैश्यांचा विनिमय. व्यापाराचा हेतू ग्राहकांना वस्तू किंवा सेवा देऊन नफा मिळविण्याचा असतो. जर असे व्यवहार देशाच्या भौगोलिक सीमेच्या आत वेगवेगळ्या विस्तारात, प्रदेशात अथवा राज्यामध्ये होत असतील तर त्याला आंतरिक व्यापार म्हणतात. देशात नैसर्गिक साधन-संपत्तीच्या असमान वितरणाने समग्र देशात विविध प्रकारचे उत्पादन शक्य नाही त्यामुळे उत्पादक देशात वेगवेगळ्या विस्तारात पसरलेल्या ग्राहकांपर्यंत स्वत:चे उत्पादन पोहचवत असतो. त्याला आंतरीक व्यापार म्हणतात.

## 9.1 आंतरीक व्यापार

**9.1.1 अर्थ (Meaning) :** देशांच्या भौगोलीक सीमेच्या आत होणारा व्यापार म्हणजे आंतरीक व्यापार.


आंतरिक व्यापारात ज्या-त्या देशांचे चलन, मोजमाप, व्यापार पद्धती तसेच कायदाकीय बाबत समान असतात. आंतरिक व्यापारात मालाची अदलाबदल (हेरफेर) सरळ असल्याने समय (वेळा) कमी लागतो आणि जोखीम असते. तसेच खरीदणार आणि विक्रेता मध्ये संपर्क सरळते होऊ शकतो.

**9.1.2 व्यापारी प्रवृत्तीचे वर्गीकरण :**




**9.1.3 घाऊक व्यापार (Wholesale Trade) :**

**9.1.3.1 अर्थ :** ज्या व्यापारामध्ये व्यापारी उत्पादकाकडून मोठ्या साठ्यात माल खरेदी करतो आणि किरकोळ व्यापाऱ्याला आवश्यकतेनुसार लहान साठ्यात मालाची विक्री करीत असतो तर त्यांला घाऊक (जथ्थाबंध) व्यापार म्हणतात. सामान्यपणे घाऊक व्यापार हा उत्पादक आणि किरकोळ व्यापारी यांना जोडणारी कडी आहे.




**9.1.3.2 घाऊक व्यापारीची सेवा (Services of Wholesaler) :**

**(A) घाऊक व्यापाऱ्याच्या उत्पादकासाठीच्या सेवा :**

**(1) मोठ्या प्रमाणात ऑर्डर :** घाऊक व्यापारी अनेक किरकोळ व्यापाऱ्याकडून ऑर्डर मिळवून उत्पादकाला मोठ्या प्रमाणात ऑर्डर देत असतो.

**(2) बाजाराची माहिती :** घाऊक व्यापारी अनेक किरकोळ व्यापाऱ्याकडून ग्राहकांच्या वस्तूची मागणी, अभिरूची, पसंती, फॅशन वगैरे माहिती मिळवून उत्पादकापर्यंत पोहचवत असतो. त्यामुळे उत्पादक बाजाराची वर्तमान परिस्थितिने माहितगार होत असतो आणि काही वेळा मालाच्या संदर्भात् आवश्यकतेनुसार बदल सुचवित असतो.

**(3) मालाचा संग्रह करण्यापासून मुक्ती :** घाऊक व्यापारी उत्पादकाकडून मोठ्या प्रमाणात माल खरेदी करून घेतो आणि स्वत:च्या संग्रह करीत असतो त्यासाठी उत्पादकाला मालाचा संग्रह करावा लागत नाही.

**(4) विक्रीच्या काळजीतून मुक्तता :** घाऊक व्यापारी उत्पादका जवळून मोठ्या प्रमाणात माल खरेदी करून घेतो. त्यामुळे उत्पादकाला लहान साठ्यात अथवा प्रमाणात मालाच्या विक्रीतून मुक्ती मिळत असते.

**(5) भांडवलाची सूट :** घाऊक व्यापारी उत्पादकाकडून खरेदी करण्याआधी बऱ्याच वेळा आधीच पैसे चुकवित असतो. त्यामुळे उत्पादकाला भांडवलाची सूट राहते.

**(6) जोखीम पासून मुक्ती :** घाऊक व्यापारी उत्पादकाकडून मालाची खरेदी करून गोदामात संग्रह करीत असल्याने मालात घट, बिगाड, मालाचा नाश वगैरे जोखीम पासून मुक्त राहतो.

**(B) घाऊक व्यापाऱ्याची किरकोळ व्यापाऱ्याला सेवा (Services of Wholesaler to Retailer) :**

**(1) आवश्यकतेनुसार माल :** घाऊक व्यापारी किरकोळ व्यापाऱ्याला जेव्हा पाहीजे तेव्हा पुरत्या प्रमाणात माल उपलब्ध करीत असतो. त्यामुळे किरकोळ व्यापाऱ्याला मालाचा संग्रह करावा लागत नाही.

**(2) पतवर माल :** घाऊक व्यापारी किरकोळ व्यापाऱ्याला पतवर मालाची विक्री करीत असतो. त्यामुळे तो कमी भांडवलात जास्त व्यापार करू शकतो.

**(3) जाहीरातीच्या खर्चात कमी :** घाऊक व्यापाऱ्याने केलेल्या जाहीराती आणि विक्री वाढीच्या प्रयत्नचा फायदा किरकोळ व्यापाऱ्याला मिळत असतो त्यासाठी किरकोळ व्यापाऱ्याच्या जाहीरातीच्या खर्चात घट होत असते.

**(4) तक्रारीचा निकाल :** किरकोळ व्यापारी ग्राहकांकडून मिळालेल्या माला-विषयी तक्रारी घाऊक व्यापाऱ्या मार्फत उत्पादकां पर्यंत पोहचवून त्यांचा जलद निकाल करण्यात मदतरूप होत असतो.

**(5) जोखीमेतून मुक्ती :** घाऊक व्यापारी मालाचा संग्रह करीत असल्याने मालात घट, बिगाड, मालाचे नुकसान भावातील वध-घट सारख्या जोखीमेतून किरकोळ व्यापाऱ्याला मुक्ती मिळते.

**(6) मार्गदर्शन :** घाऊक व्यापारी स्वत:चे ज्ञान आणि अनुभवाचा फायदा किरकोळ व्यापाऱ्याला देत असतो. विशेष करून मालाचा भाव, त्याचा उपयोग आणि विक्री विषयी मार्गदर्शन देत असतो.

## 9.2 किरकोळ व्यापारी

**9.2.1 अर्थ :** ज्या व्यापारात घाऊक व्यापारी अथवा उत्पादकांकडून किरकोळ अथवा मोठ्या प्रमाणात माल खरेदी करून ग्राहकांच्या आवश्यकते प्रमाणे मालाची विक्री करीत असतो त्यास किरकोळ व्यापार म्हणतात. किरकोळ व्यापार ग्राहकां सोबत प्रत्यक्ष संपर्कात राहत असल्याने त्यांच्या गरजांना समजत असतो. परिणामी तो ग्राहकांना उत्तम सेवा देण्याचा प्रयत्न करीत असतो. सामान्यपणे किरकोळ व्यापारी माल विस्तरणाच्या मार्गात घाऊक व्यापारी आणि ग्राहक मध्ये साखळी समान आहे.

### 9.2.2 किरकोळ व्यापाराच्या सेवा :

#### 9.2.2.1 किरकोळ व्यापाऱ्याची घाऊक व्यापारी आणि उत्पादकाला सेवा :

**(1) बाजाराविषयी माहिती :** किरकोळ व्यापारी ग्राहकांसोबत प्रत्यक्ष संपर्कात असल्याने ग्राहकांच्या वस्तूची मागणी, आवड, अभिरूची वगैरे बाबती समजत असतो. त्यामुळे ही माहिती घाऊक व्यापाऱ्याद्वारे उत्पादकांपर्यंत पोहचवत असतो.

**(2) जाहीरातीत मदतरूप :** किरकोळ व्यापारी उत्पादक तसेच घाऊक व्यापाऱ्याचे बोर्ड, पत्रके, नमूना वगैरे स्वत:च्या दुकानावर लावून त्यांची जाहीरात करीत असतो.

**(3) पत पात्रतेत वाढ :** किरकोळ व्यापारी चांगली गुणवत्ता आणि वाजवी भावाने माल देत असल्याने घाऊक व्यापारी अथवा उत्पादकांचा माल खरेदी करून ग्राहकांना विक्री करीत असतो. परिणामी बाजारात त्यांच्या पत पात्रतेत वाढ होत असते.

### 9.2.3 फायदे :

**(1) पसंतीची संधी :** किरकोळ व्यापात ग्राहकांच्या आवश्यकते प्रमाणे अनेक उत्पादकांच्या विविध वस्तू ठेवत असतो. त्यामुळे ग्राहकाना वस्तूची पसंती करण्याची संधी मिळत असते.

**(2) घरपोच माल देण्याची सेवा (Home Delivery) :** किरकोळ व्यापारात काही वेळा ग्राहकांच्या गरजे प्रमाणे घरपोच माल देण्याची सेवा देऊन त्याचा वेळ वाचविण्यात येतो.

**(3) ग्राहकांच्या तक्रारीचे निवारण :** किरकोळ व्यापारात व्यापारी ग्राहकांकडून माला विषयी तक्रारी मिळवून घाऊक व्यापारी अथवा उत्पादका पर्यंत पोहचवून त्यांचा जलद निवारण करण्यास मदतरूप होत असतो.

**(4) ग्राहकांना उधारीवर (पत) विक्री :** किरकोळ व्यापारात व्यापारी ग्राहकांच्या प्रत्यक्ष संपर्कात राहत असल्याने त्यांच्या आर्थिक स्थिती विषयी माहीतगार असतो. त्यामुळे त्यानुसार गरजे प्रमाणे उधारीवर मालाची विक्री करीत असतो.

**(5) विक्री नंतरच्या सेवा :** किरकोळ व्यापारात ग्राहकांना मालाच्या विक्री नंतरच्या सेवा जसे की संभारकाम, नुकसान झालेल्या माल परत घेणे अथवा बदली करून देणे वगैरे सारख्या सेवा देत असतो.

**(6) खरेदीच्या निर्णयात मदतरूप :** किरकोळ व्यापारात वस्तूंचे परिणामकारक निदर्शन करून त्यांची उपयोगिता, गुणवत्ता, किंमत वगैरेची माहिती देत असतो त्यामुळे ग्राहकांना वस्तूच्या खरेदीचा निर्णय घेण्यात उपयोगी होतो.

**(7) मालाचा संग्रह करण्यातून मुक्ती :** किरकोळ व्यापारात ग्राहकाला पाहिजे तेव्हा गरजे प्रमाणेचा माल देत असल्याने ग्राहकांना मालाचा संग्रह करण्यातून मुक्ती मिळते.

**(8) ग्राहकांना मार्गदर्शन :** किरकोळ व्यापारात व्यापारी ग्राहकांना वस्तूविषयी मार्गदर्शन देत असतो. भविष्यात वस्तूचा भाव, वस्तूचा पूरवठा आणि वस्तूच्या वापरण्याची पद्धत वगैरे विषयी मार्गदर्शन देत असतो.

**9.2.4 मर्यादा :**

**(1) जास्त भांडवल गुंतवणूक :** किरकोळ व्यापारात व्यापारी ग्राहकांना वस्तूच्या पसंतीची संधी देत असतो. त्यासाठी त्याला अनेक उत्पादकाच्या विविध वस्तू ठेवाव्या लागतात. त्यामुळे त्यास जास्त भांडवलाची गुंतववणूक करावी लागते.

**(2) नाशवंत वस्तू खराब होण्याची भिंती :** काहीवेळा नाशवंत वस्तू जसेकी फळ, भाजीपाला, दुध, दुधांच्या वस्तू सारख्या वस्तू विक्री शिवाय पडून राहतात. तेव्हा खराब होण्याची शक्यता असते. ते नुकसान किरकोळ व्यापाऱ्याला सहन करावे लागते.

**(3) वस्तू अप्रचलित होण्याची भिंती/जोखीम :** काहीवेळा ग्राहकांची पसंती, रुची, फैशन अथवा टेकनॉलॉजी बदलून जाते त्यामुळे त्यावस्तू अप्रचलित बनतात. तेव्हा त्याचा निकाल करण्यासाठी वस्तूच्या मूळ किंमती पेक्षा कमी किमंतीला विक्री करावी लागते.

**(4) नुकसान, घट अथवा भावात कमी-जास्तीचे जोखीम :** किरकोळ व्यापारी वस्तूंचा नुकसान, मालात घट अथवा वस्तूंच्या भावात होणारी वाढ-घटीचे जोखीम उठवित असतो.

**(5) पूर्वग्रह :** किरकोळ व्यापारात व्यापारी काहीवेळा उत्पादक अथवा त्यांच्या उत्पादना विषयी पूर्वग्रह असल्याने त्या उत्पादनाच्या मालाची विक्री करीत नाही.

**9.2.5 प्रकार :**

**किरकोळ व्यापाराचे प्रकार**

- फिरते दुकान
  - फेरीवाल व्यापारी
  - कामचलावू व्यापारी
  - निश्चित दिवसांचे व्यापारी (मेळा, निश्चित वाराचा बाजार)
  - गल्ली/पोळमधील विक्रेते
- स्थायी दुकान
  - मोठ्या पायावरील किरकोळ व्यापारी
    - खाती असणारी दुकाने
    - साखळी दुकाने
    - टपाल व्यवहार दुकाने
    - फेन्चाईस
    - सुपर मार्केट
    - शॉपिंग मॉल
  - लहान पायावरील किरकोळ व्यापारी
- अन्य पद्धती
  - स्वयंसंचालीत विक्री यंत्र
  - टेलि मार्केटिंग
  - इन्टरनेट मार्केटिंग

**9.2.5.1 फिरते दुकाने ( व्यापारी ) :**

**( 1 ) फेरीवाले :** फेरीवाले माल घेऊन ग्राहकांना वेगवेगळ्या ठिकाणी जसेकी घर, रेल्वे स्टेशन, बस स्टेशन वगैरे सारख्या जाहीर स्थळांवर माल विक्री करीत असतात. सामान्यरीती वर्तमानपत्र भाजीपाला, फळ तसेच घरात वापरल्या जाणाऱ्या वस्तूंची विक्री करीत असतात. असे फेरीवाले दुकाना पेक्षा माल स्वस्त किंमतीला देतात. कारण त्याच्या मूळ किंमती आणि अन्य खर्च कमी असतो.

**( 2 ) कामचलाऊ व्यापारी :** निश्चित विशिष्ट प्रसंग, उत्सव, निश्चित मोसम दरम्यान निश्चित वस्तूंची विक्री करतात. त्याना कामचलाऊ व्यापारी म्हणतात. उदा. मेळ्यात मालाची विक्री करणारे व्यापारी, मकरसंक्रांतीच्या वेळी (उत्तरायण) पतंग-दोरा विक्रेते, दिवाळीत फटाके विक्री करणारे तसेच विविध ऋतूमध्ये रेईनकोट, छत्री, गरम कपडे विक्री करणारे व्यापारी.

**( 3 ) निश्चित दिवसाचे व्यापारी :** कित्येक शहरात, नगरात अथवा गावात आठवड्याच्या अथवा महिन्यांच्या निश्चित दिवशी आणि निश्चित जागेवर असा बाजार भरला जातो. त्यामध्ये खूप सर्व विक्रेते अनेक प्रकारची वस्तू विक्रीसाठी आणतात. असा बाजार संपूर्ण दिवस चालत असतो. त्यांना निश्चित दिवसांचा बाजार अथवा मेळा म्हणतात.

**( 4 ) गल्ली/पोळ मधील विक्रेते :** गल्ली विक्रेता ग्राहकाना जीवनआवश्यक वस्तू फूटपाथ वर विक्री करीत असतात आणि त्यांच्या आजूबाजूला राहणाऱ्या गल्ली, पोळ अथवा सोसायटी ग्राहक त्या वस्तूंची खरेदी करतात. उदा. भाजीपाला, फळ विक्रेते.

**9.2.5.2 स्थायी दुकाने :**

**( 1 ) मोठ्या पायावरील किरकोळ व्यापारी :**

**(A) विविध विभाग ( खाती ) असणारी दुकाने :** खाते असणाऱ्या दुकानात मोठ्या पायावर किरकोळ विक्री होत असते. त्यामध्ये अनेक प्रकारची वस्तू एकाच ठिकाणी उपलब्ध असतात. अशा दुकानात प्रत्येक प्रकारच्या वस्तूंच्या विक्रीसाठी वेगळे खाते किंवा विभाग असतो त्यासाठी तिला खाती असणारी दुकाने म्हणतात.

अशा दुकानांची मालीकी आणि संचालन एकाच व्यक्तिच्या हातात असते. या प्रकारच्या दुकानातुन बहुतांशी जीवन-उपयोगीतेच्या चिजवस्तू पासून चैनीच्या वस्तू ग्राहक खरेदी करु शकतो.

**लक्षणे :**

**( 1 ) मोठ्या पायावर विक्री :** खाती असणाऱ्या दुकानात विविध प्रकारच्या वस्तूंचे मोठ्या पायावर किरकोळ विक्री होत असते.

**( 2 ) वेगवेगळ्या वस्तूंसाठी वेगवेगळे विभाग :** खाती असणाऱ्या दुकानात प्रत्येक प्रकारच्या वस्तूंच्या विक्रीसाठी वेगवेगळे विभाग असतात.

**( 3 ) मालक आणि संचालन :** खाती असणाऱ्या दुकान मालक आणि संचालन एकाच व्यक्तिच्या हातात असते.

**( 4 ) शहरी विस्तारात :** अशी दुकाने विशेष करुन शहरात आलेली असतात.

**( 5 ) कर्मचाऱ्याना तालीम ( प्रशिक्षण ) :** खाती असणाऱ्या दुकानांच्या कर्मचाऱ्यांना ग्राहकां सोबत योग्य वर्तन आणि विक्रीवाढी साठी विशिष्ट तालीम देण्यात येते.

**( 6 ) जास्त खर्च :** खाती असणाऱ्या दुकानात मूलभूत सुविधा निर्माण करणे आणि त्यांना टिकवण्यासाठी जास्त खर्च होतो.

**( 7 ) ग्राहकांना सुविधा :** खाती असणाऱ्या दुकानात ग्राहकांसाठी मनोरंजन रेस्टोरंट, वाई-फाई सारख्या सुविधा देण्यात येतात.

**( 8 ) मार्गदर्शन :** खााती असणाऱ्या दुकानात कर्मचारी ग्राहकांचे स्वागत करतात. वस्तूंचे निदर्शन करुन, सल्ला-सूचना देऊन ग्राहकांना वस्तूच्या पसंतीसाठी मार्गदर्शन देतात.

**(B) साखळी दुकाने (Chain Stores) :** साखळी दुकाने मोठ्या पायावर किरकोळ विक्री करीत असतात. अशी दुकाने एकाच मालकाद्वारे वेगवेगळ्या जागेवर अथवा शहरात सुरु करण्यात येतात. सामान्यरीतीने अश्या दुकानात एकाच, वर्गाच्या जीवनावश्यक मर्यादीत वस्तूंची विक्री होते आणि प्रत्येक दुकाना बाहेरची सजावट एकसारखी असते.

**लक्षणे :**

**( 1 ) एकच मालक :** साखळी दुकानाचे मालक एकच व्यक्ती असतो.

**( 2 ) एकसारखी सजावट :** अशा दुकानांची सजावट एकसारखी असते.

**( 3 ) कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण :** धंदाकीय एकमांची नीती, ग्राहकां सोबत वर्तन वगैरत समानता पाहावयास मिळते. या साठी कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात येते.

**( 4 ) केन्द्रित संचालन :** साखळी दुकानांचे संचालन एकाच ठिकाणावरुन म्हणजे मुख्य ऑफिसातून होत असते.

**( 5 ) समान ओळख :** साखळी दुकानांची बाह्य सजावट तसेच कर्मचाऱ्याचा गणवेश एक सारखा असल्याने समान ओळख प्रस्थापित होते.

**(C) टपाल व्यवहार दुकाने (Mail Order Shops) :** ग्राहकांना त्याच्या पत्त्यावर टपाल द्वारा सुचिपत्र पाठवून त्यांच्याकडून ऑर्डर मिळविली जाते. त्यानंतर वस्तूंची ऑर्डर सुद्धा टपाल द्वारेच करण्यात येते आणि वस्तूंचे पैसे वस्तू देण्याच्या वेळीच टपाल द्वारे वसुलण्यात येते. त्याना टपाल व्यवहार म्हणतात.

देशातील दुरदुरच्या प्रदेशात राहणाऱ्या प्रत्येक वर्गाच्या ग्राहकांना घरपोच माल पोहचवण्यात येतो. अशी दुकाने बहुतांशी वजनात हलके, टिकाऊ आणि किंमती वस्तूची विक्री करीत असतात. थोडक्यात अशी दुकाने ऑर्डर घेण्यापासून पैसे घेण्यापर्यतचे सर्वच प्रवृत्ती टपाल द्वारेच करीत असतात.

**(D) फ्रेन्चाईज (Franchies) :** कोणताही निश्चित ट्रेडमार्क अथवा ब्रान्ड धारण करणाऱ्या कंपन्यांशी करार करुन त्याच कंपनीची वस्तू अथवा सेवा विक्री अथवा वस्तू बनवून विकण्याचा विशेषाधिकार देण्यात येतो त्याला फ्रेन्चाईस (Franchies) म्हणतात.

या प्रकारची दुकाने मोठ्या प्रमाणावर किरकोळ विक्री करीत असतात. त्यांची धंदा करण्याची पद्धती, वस्तूंची गुणवत्ता, दुकानांची सजावट मुळ कंपनी (Parent Company) सारखीच असते.

सामान्यरीतीने ज्या वस्तूंचे उत्पादन करुन विक्री करायची असेल तर मुळ कंपनी कच्चामाल पुरविते. याविषयी सतत निरिक्षण करुन सुधारालक्षी मार्गदर्शन देतात. मूळ कंपनी स्वत:चा ट्रेडमार्क अथवा ब्रान्डचा उपयोग करण्याची सुट देत असते. त्यांच्या बदल्यात विक्री करणाऱ्याकडून नक्की केलेल्या दराने विक्रीवर रॉयल्टी मिळवित असतात.

मूळ कंपनी असा अधिकार घेणार धंद्याकीय एकमांच्या कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देतात. काही अल्पोहारगृह, कम्प्युटरची प्रशिक्षण देणारी केन्द्र या पद्धतीने ग्राहकांना वस्तु अथवा सेवा पूरवितात. मूळ कंपनी जाहीरात करीत असल्याने फ्रेन्चाईस घेणाऱ्याला जाहीरातीचा खर्च कमी करावा लागतो.

**(E) सुपर मार्केट (Super Market) :** सुपर मार्केट मोठ्या पायावर किरकोळ विक्री करणारी दुकान आहे. त्यामध्ये विक्री होणाऱ्या वस्तू प्रतिष्ठीत कंपनी अथवा उत्पादका जवळून मोठ्या प्रमाणात खरीदी करुन ग्राहकांना वाजवी भावाने वस्तूंची विक्री करीत असतात. या प्रकारचे स्टोर्स लहान दुकानदाराना सुद्धा आकर्षीत करतात. सुपर मार्केट मध्ये सर्व प्रकारच्या जीवन-आवश्यकतेच्या वस्तूची विक्री करण्यात येते. देशाच्या विविध मोठ्या शहरात अथवा नगरात सुपर मार्केट आलेले आहे बांधकामाच्या दृष्टीने त्यांचा आकार विशाल असतो.

**(F) शॉपींग माल (Shoping Mall) :** आधुनीक काळात खाती असणाऱ्या दुकानात जे परिवर्तन आले. शॉपींग माल म्हणून विकास झाला आहे. शॉपींग मॉलचे बांधकाम सुपर मार्केट पेक्षा विशाल असते. त्यात लहान-मोठी अनेक दुकाने एकाच मालकाद्वारे अथवा एकापेक्षा जास्त मालकाद्वारे सुरु करण्यात येतात.

शॉपींग मॉलमध्ये ग्राहकांना विविध प्रकारच्या ब्रान्डेड जीवन अत्यावश्यक तसेच चैनीच्या वस्तू एका ठिकाणी मिळत असतात. येथे विविध प्रकारची विक्री अभिरुची सुविधा देऊन ग्राहकांना आकर्षित करण्याचा प्रयत्न करण्यात येतो. विविध उत्पादकांची एकसारखी उत्पादनांमध्ये स्पर्धा हे मॉलचे विशिष्ट लक्षण आहे. त्यामुळे ग्राहकांना पसंतीची विशाल संधी मिळून राहते. शॉपिंग मॉल मध्ये ग्राहकांसाठी आधुनिक सुविधा जसेकी नास्तागृह लहान मुलांसाठी मनोरंजन विभाग, वाय-फाय, सिनेमागृह वगैरे असतात.

**9.2.5.3 विक्रीच्या अन्य पद्धती :**

**(A) स्वयंचलित विक्रीयंत्र (Automatic Vending Machine) :** हे एक प्रकारचे स्वयंसंचालीत वस्तूचे विक्री करणारे यंत्र आहे. ज्याद्वारे वस्तूची किरकोळ विक्री होत असते. या यंत्रात पूर्वी पासूनच वस्तू गोठविण्यात येतात. जसेकी वर्तमानपत्र, थंडपेय, कॉफी ऑईस्क्रीम वगैरे वस्तू खरीदण्यासाठी ग्राहक चलनी सिक्का यंत्रात टाकावा लागतो. प्रत्येक वस्तूसाठी किती सिक्के यंत्रात टाकावा ते यंत्राच्या बाजूला दर्शविले असते. यंत्रात सिक्का टाकताच आवश्यक वस्तू यंत्रातून बाहेर येत असते.

या प्रकारची यंत्रे चोवीस तास (24 × 7) सतत सेवा देत असतात. स्वयंचलित यंत्रामुळे सेल्समॅनचा पगार प्रशिक्षण वगैरे खर्च कमी होतो. या प्रकारचे यंत्र सध्या शॉपिंग मॉल विमानतळ, रेल्वे स्टेशन सारख्या जाहीर स्थळावर पाहावयास मिळतात. या प्रकारच्या यंत्राचा शोध ग्रीक इंजिनियर आणि गणितशास्त्री ॲलेकझॉन्ड्रीया हीरो (Alexandria Hero) ने केली होती.

**(B) टेलिमार्केटिंग :** टेलिमार्केटिंगला दोन भाग विभागण्यात येते.

**(1) टेलिफोनिक मार्केटिंग :** या पद्धतीन संभवित ग्राहकांना टेलिफोन अथवा मोबाईल द्वारे संपर्क करुन उत्पादीत वस्तू अथवा सेवेविषयी माहीती देण्यात येते. त्यानंतर रस असणाऱ्या ग्राहकांचा टेलिफोन अथवा मोबाईल द्वारा वेळ घेऊन त्यांच्या अनुकूल वेळी आणि स्थळी प्रत्यक्ष मुलाकात घेऊन माहीती पुरविण्यात येतात. विक्री करण्याच्या या पद्धतीला टेलिफोनिक मार्केटिंग म्हणतात.

या पद्धती लोन, कर्ज, विमा सेवा, क्रेडिट कार्ड, वगैरेसाठी उपयोगी असतात. मध्यस्थी नसल्याने वाजवी भावाने वस्तू अथवा सेवा मिळून राहते आणि ग्राहकांचा वेळ वाचतो.

**(2) टेलिव्हिजन मार्केटिंग :** या पद्धतीत टेलिव्हिजन द्वारा ग्राहकांना विविध वस्तूचे जीवंत निदर्शन करुन वस्तू अथवा सेवेची माहीती देऊन ग्राहकांना आकर्षीत करण्यात येतो. त्याचबरोबर वस्तू अथवा सेवेच्या खरेदीसाठी ग्राहकाना फोन नंबर अथवा वेबसाईटचे नाव देण्यात येते. ग्राहक त्याप्रमाणे संपर्क करुन ऑर्डर देत असतो. ग्राहकाच्या घरी वस्तू पोहचविण्यात येते. या पद्धती द्वारे घरवापराशच्या वस्तू तसेच चैनीच्या आणि सुख समृद्धीच्या वस्तूच्या विक्री करण्यात येते. या वस्तूंच्या रक्कमेची चुकवणी दोन पद्धतीने होऊ शकते.

(1) क्रेडिट/डेबिट कार्ड द्वारा आधीपासून चुकवणी करु शकतो.

(2) वस्तू जेव्हा घरी देण्यात येते तेव्हा रोकड स्वरुपात चुकवणी करु शकतात.

मध्यस्थी नसल्याने वाजबी भावाने वस्तू मिळून राहते आणि ग्राहकांचा वेळ वाचत असतो.

**(C) इन्टरनेट मार्केटिंग :** उत्पादक स्वत:च्या वस्तूंची जाहीरात इन्टरनेटच्या वेगवगेळ्या माध्यम जसे की इमेल, पोर्टेल, ब्राऊझर वर ठेवत असतात. काहीवेळा, त्यांची स्वत:ची वेबसाईट सुद्धा असते. उदा. फ्लीपकार्ट, स्नेपडील, अमेझॉन डॉट कॉम वगैरे.

ग्राहक अशा जाहीराती पाहुन स्पर्धकांच्या वस्तू बरोबर तुलना करुन वस्तू विषयी स्वत:ची पसंदी करीत असतात. आणि इन्टरनेट द्वारेच ऑर्डर देत असतात. आणि त्यांच्या रक्कमेची चुकवणी ऑन लाईन अथवा कॅश ऑन डिलिवरीने करीत असतात.

वर्तमान काळात ग्राहक इन्टरनेटच्या माध्यमाकडे जास्त झुकला आहे कारण मधील मध्यस्थी, शो-रुम खर्च वगैरे नसल्याने वस्तू स्थानिक बाजाराच्या तुलनेने स्वस्त भावात मिळत असते. त्याचबरोबर ग्राहकांना विक्री नंतरच्या सेवा सुद्धा मिळत असतात.

**9.3 व्यापारातील पारिभाषिक शब्द :**

**(1) कॅश ऑन डिलिवरी : COD (Cash on Delivery) :** जेव्हा उत्पादक आणि विक्रेता ग्राहकांला मालाची डिलिवरी देतो तेव्हा रोकड स्वरुपात रक्कम चुकविण्यात येते त्याला कॅश ऑन डिलिवरी म्हणतात.

**(2) फ्री ऑन बोर्ड : FOB (Free on Board) :** निर्यातदार आयातदारांच्या बंदरापर्यंत माल पोहचविण्यासाठी जे खर्च सहन करीत असतो त्याला फ्रि ऑन बोर्ड म्हणतात.

**(3) मालाची किंमत, विमा आणि दुकान भाडे : CIF (Cost, Insurance and Freight) :** ज्या भरणांच्या मध्ये मालाची किंमत, विमा आणि वाहन खर्च टाकण्यात येतो त्याला CIF भरणां असे म्हणतात.

**(4) भूलचुक देणे-घेणे : E&OE (Errors and Ommissions Excepted) :** सामान्यरीतीने भरण्यात चुकभूल देणे घेणे लिहीण्यात येत असते. त्यांचा अर्थ असा होतो की आर्थिक गणतरी मध्ये कोणत्याही प्रकारची भूलचुक असेल तर पहोच देणाऱ्यासाठी ते स्वीकार्य बनते.

### 9.4 खाती असणारी दुकान आणि साखळी दुकानांमधील फरक

| अनुक्रम नंबर | मुद्दा | खाती (विभाग) असणारी दुकाने | साखळी दुकाने |
|---|---|---|---|
| (1) | उद्देश | ग्राहकांना अनेक प्रकारच्या वस्तू एकाच ठिकाणी उपलब्ध करण्यात येतात. | विविध स्थळावर ग्राहकांपर्यंत वस्तू पाठविण्यात येतात. |
| (2) | विक्री पद्धती | मालाची विक्री एकाच ठिकाणी वेगवेगळ्या विभागात होत असते. | मालाची विक्री विविध स्थळावर शाखा द्वारा होत असते. |
| (3) | जोखीम | विक्रीची प्रवृत्ती एकाच ठिकाणी होत असल्याने जोखीम जास्त असते. | विक्रीची प्रवृत्ती विविध ठिकाणी शाखा-द्वारे होत असल्याने जोखीमचे प्रमाण कमी असते. |
| (4) | मालाची विक्री | मालाची विक्री रोकड द्वारे अथवा हप्ता खरेदी पद्धतीद्वारे होते. | मालाची विक्री रोकड स्वरूपात होते. |
| (5) | ग्राहकांना पसंतीची संधी | खाती असणाऱ्या दुकानात अनेक प्रकारच्या वस्तूंची विक्री होत असल्याने ग्राहकांना वस्तूची पसंदीची विशाल संधी मिळते. | साखळी दुकानात एकच वर्गाच्या मर्यादीत वस्तूंची विक्री होत असल्याने पसंतीची संधी कमी मिळत असते. |

### 9.5 किरकोळ व्यापारी आणि धाऊक व्यापारी मधील फरक

| अनुक्रम नंबर | फरकाचे मुद्दे | किरकोळ व्यापारी | घाऊक व्यापारी |
|---|---|---|---|
| (1) | भांडवल गुंतवणूक | धंद्यासाठी भांडवल गुंतवणूक कमी लागते. | धंद्यासाठी भांडवल गुंतवणूक जास्त पाहीजे. |
| (2) | खरेदी-विक्री | लहान अथवा मोठ्या साठ्यात मालाची खरेदी करुन आवश्यकतेनुसार ग्राहकांना किरकोळ विक्री करती असते. | मोठ्या प्रमाणात मालाची खरेदी करुन किरकोळ व्यापाऱ्यांना लहान साठयात मालाची विक्री करीत असतात. |
| (3) | वितरण साखळी | ग्राहक आणि घाऊक व्यापारी मधील वितरणाची साखळी समान आहे. | किरकोळ व्यापारी आणि उत्पादक मधील वितरणाच्या साखळी समान आहे. |
| (4) | वस्तूंची विक्री | अनेक उत्पादक अथवा घाऊक व्यापाऱ्याचा विविध वस्तूंचे विक्री करीत असतात. | मर्यादीत उत्पादकांच्या विविध वस्तूंचे करीत असतात. |
| (5) | व्यापाऱ्याची संख्या | किरकोळ व्यापाऱ्यांची संख्या प्रमाणात जास्त असते. | घाऊक व्यापाऱ्याची संख्या प्रमाणात कमी असते. |

## या प्रकरणात तुम्ही काय शिकलात ?

**आंतरीक व्यापाराचा अर्थ :** देशाच्या भौगोलीक सीमेच्या आत होणारा व्यापार म्हणजे आंतरीक व्यापार.

**घाऊक व्यापार :** धाऊक व्यापारात व्यापारी उत्पादकांकडून मोठ्या प्रमाणात माल खरेदी करतात आणि किरकोळ व्यापाऱ्यांना आवश्यकते प्रमाणे लहान प्रमाणात मालाची विक्री करीत असतात त्यांला घाऊक व्यापार म्हणतात.

**घाऊक व्यापाऱ्याची उत्पादकाला सेवा :** (1) मोठ्या प्रमाणात ऑर्डर (2) बाजाराची माहिती (3) मालाच्या संग्रहातून मुक्ती (4) तक्रारीचा निकाल (5) जोखीम पासून मुक्ती (6) मार्गदर्शन

**किरकोळ व्यापार : अर्थ :** ज्या व्यापारात घाऊक व्यापारी अथवा उत्पादका कडून किरकोळ अथवा मोठ्या प्रमाणात माल खरेदी करुन ग्राहकाला आवश्यकते प्रमाणे मालाची विक्री करीत असतो त्याला किरकोळ म्हणतात.

**किरकोळ व्यापाऱ्याची सेवा :**

**किरकोळ व्यापारीच्या घाऊक व्यापारी आणि उत्पादकाला सेवा :** (1) बाजाराविषयी माहीती (2) जाहीरातीत मदतरुप (3) उधारीच्या पत मध्ये वाढ

**फायदे :** (1) ग्राहकाना पसंतीची संधी (2) घरपोच माल पुरविण्याची सेवा देत असतात. (3) ग्राहकांच्या तक्रारीचे निवारण (4) ग्राहकाना उधारीवर विक्री (5) विक्री नंतरच्या सेवा (6) खरेदीच्या निर्णयात मदतरुप (7) मालाच्या संग्रह करण्यापासून मुक्ती (8) ग्राहकाना मार्गदर्शन

**मर्यादा :** (1) जास्त भांडवल गुंतवणूक (2) नाशवंत वस्तू खराब होण्याची भिंती (3) वस्तू अप्रचलित होण्याची भिंती (4) नुकसान, घट अथवा भावा कमी होण्याची भिंती (5) पूर्वग्रह

**प्रकार :**

**(A) फिरती दुकाने :** (1) फेरीवाले (2) कामचलाऊ व्यापारी (3) निश्चित दिवसाचे व्यापारी (4) गल्लीतील विक्रेते

**(B) स्थायी दुकाने :**

**मोठ्या पायावरील किरकोळ व्यापारी :**

**(1) खाती असणारी दुकाने :**

**लक्षणे :** (1) मोठ्या पायावर विक्री (2) वेगळ्या वस्तूसाठी वेगळे विभाग (3) मालक आणि संचालन (4) शहरी विस्तारात (5) जास्त खर्च (6) ग्राहकांना सुविधा (7) ग्राहकांना मार्गदर्शन

**(2) साखळी दुकाने :**

**लक्षणे :** (1) एकच मालक (2) बाह्य सजावट एक सारखी (3) कर्मचाऱ्याना प्रशिक्षण (4) केद्रिंय संचालन (5) समान ओळख प्रस्थापित

**(3) टपाल व्यवहार दुकाने :**

**(4) फ्रेन्चाईज :**

**(5) सुपर मार्केट :**

**(6) शॉपिंग मॉल :**

**(C) विक्रीच्या अन्य पद्धती :**

(1) स्वयंचलित विक्री यंत्रे

(2) टेलि मार्केटिंग : (i) टेलिफोनिक मार्केटिंग (ii) टेलिव्हिजन मार्केटिंग :

(3) इन्टरनेट मार्केटिंग :

## स्वाध्याय

**1. खालील प्रश्नांचे उत्तर योग्य विकल्प पसंद करुन लिहा :**

(1) घाऊक व्यापारी आणि ग्राहकां मधील साखळी म्हणजे .....

(A) उत्पादक (B) दलाल (C) किरकोळ व्यापारी (D) ग्राहक

(2) उत्पादक आणि किरकोळ व्यापारी मधील साखळी म्हणजे .....

(A) ग्राहक (B) घाऊक व्यापारी (C) किरकोळ व्यापारी (D) दलाल

(3) माल वितरणाच्या मार्गात प्रथम मध्यस्थी कोण आहे ?

(A) धाऊक व्यापारी (B) उत्पादक (C) किरकोळ व्यापारी (D) ग्राहक

(4) ग्राहकां बरोबर प्रत्यक्ष संपर्क असणारा व्यापारी म्हणजे .....

(A) दलाल (B) घाऊक व्यापारी (C) उत्पादक (D) किरकोळ व्यापारी

(5) कोणत्या प्रकारच्या दुकानामध्ये मध्यस्थी नसतो ?

(A) खाती असणारी दुकाने (B) टपाल व्यवहार दुकान

(C) साखळी दुकान (D) घाऊक व्यापाऱ्याची दुकान

(6) टपाल व्यवहार दुकाने कशा वस्तूसाठी अनुकूल नाही ?

(A) किमंती (B) वजनात हलकी (C) नाशवंत (D) टिकाऊ

(7) एकाच ठिकाणी विविध प्रकारच्या वस्तू मिळतात त्यांना कोणत्या प्रकारची दुकान म्हणतात ?

(A) फेन्चाईस (B) साखळी दुकान (C) टपाल व्यवहार दुकान (D) शॉपिंग मॉल

(8) कोणताही निश्चित ब्रान्ड किंवा ट्रेडमार्क असणाऱ्या कंपनी सोबत करार करुन त्याच कंपनीच्या वस्तू विक्री करण्याची अथवा बनवून विकण्याची दुकान म्हणजे .....

(A) सुपर मार्केट (B) फ्रेन्चाईस (C) शॉपिंग माल (D) साखळी दुकान

(9) टेलिमार्केटिंग द्वारे ग्राहकाना कशासाठी वाजवी भावाने वस्तू अथवा सेवा पूरवू शकतात ?

(A) ग्राहक मोठ्या संख्येत असल्याने (B) सेवेचा उद्देश असल्याने

(C) घाऊक विक्री होत असल्याने (D) मध्यस्थी नसल्याने

**उत्तर :** (1) (C) (2) (B) (3) (A) (4) (D) (5) (B) (6) (C) (7) (D) (8) (B) (9) (D)

**2. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा :**

(1) अंतरिक व्यापाराचा अर्थ सांगा.

(2) मोठ्या पायावरील किरकोळ व्यापाराच्या दुकानाचे प्रकार सांगा.

(3) टपाल व्यवहार दुकानात कशा प्रकारचा माल विक्री करणे अनुकूल असते ?

(4) टेलिमार्केटिंग कशा वस्तू अथवा सेवाच्या विक्रीसाठी उपयोगी असतात ?

(5) स्वयं संचालीत विक्री यंत्राचा शोध कोणी लावला ?

**3. खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा :**

(1) खाती असणारी दुकाने ग्राहकांचा वेळ आणि श्रम वाचवतो. - समजवा.

(2) फिरत्या दुकानाचे विविध प्रकार सांगा.

(3) टपाल व्यवहार दुकानात बूडीत कर्जाची शक्यता नाही. का ?

(4) घाऊक व्यापारी हे उत्पादक आणि किरकोळ व्यापारी मधील कडी समान आहे. समजवा.

(5) किरकोळ व्यापारी कोणत्या प्रकारचे जोखीम उठवित असतात ?

(6) टेलिव्हिजन मार्केटिंगमध्ये रक्कमेची चुकवणी कशारीतीने करु शकतात ?

**4. खालील प्रश्नांची मुद्देसूद उत्तर लिहा :**

(1) फरक सांगा :

(i) खाती असणारी दुकान आणि साखळी दुकान (ii) किरकोळ व्यापारी आणि घाऊक व्यापारी

(2) टिपा लिहा :

(i) टपाल व्यवहार दुकाने

(ii) फ्रेन्चाईस

(iii) सुपर मार्केट

(iv) शॉपींग मॉल

(v) स्वयंचलित विक्री यंत्रे

**5. खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा :**

(1) घाऊक व्यापाराचा अर्थ देऊन उत्पादकाला मिळणारी सेवा समजवा.

(2) किरकोळ व्यापाराचा अर्थ देऊन त्याच्या घाऊक व्यापारी आणि उत्पादकांच्या सेवा समजवा.

(3) किरकोळ व्यापाराचे फायदे आणि मर्यादा समजवा.

(4) खाती असणारी दुकान कोणाला म्हणतात ? त्यांची लक्षणे सांगा.

(5) साखळी दुकान कोणाला म्हणतात ? त्यांची लक्षणे सांगा.

(6) टेलिमार्केटिंग आणि इन्टरनेट मार्केटिंग विषयी समजवा.

**पारिभाषीक शब्द**

| | | |
|---|---|---|
| घाऊक व्यापार | : | Wholesale Trade |
| किरकोळ व्यापार | : | Retail Trade |
| फिरती दुकाने | : | Mobile Shops |
| खाती असणारी दुकाने | : | Departmental Stores |
| साखळी दुकान | : | Chain Stores |
| टपाल व्यवहार दुकान | : | Mail Order Shops |
| फ्रेन्चाईस | : | Franchies |
| मूळ कंपनी | : | Parent Company |
| सुपर मार्केट | : | Super Market |
| शॉपिंग मॉल | : | Shoping Mall |
| स्वयं संचालीत विक्री यंत्रे | : | Automatic Vending Machine |
| टेलिमार्केटिंग | : | Tele Marketing |
| टेलिफोनिक मार्केटिंग | : | Telephonic Marketing |
| टेलिव्हिजन मार्केटिंग | : | Television Marketing |
| सूचिपत्र | : | Catalogue |
| इन्टरनेट मार्केटिंग | : | Internet Marketing |
| वरदी | : | Order |
| भरतियुं | : | Invoice |
| मालाची सोंपणी | : | Delivery of Goods |
| ट्रेडमार्क | : | Trademark |
| ब्रान्ड | : | Brand |
| कॅश ऑन डिलिवरी | : | Cash on Delivery |
| फ्रि ऑन बोर्ड | : | Free on Board |
| मालाची किंमत वीमा आणि दुकानभाडे | : | Cost, Insurance and Freight |
| भूलचुक देणेघेणे | : | Errors and Ommissions Excepted |

●

# 10 आंतरराष्ट्रीय व्यापार (International Trade)

**या प्रकरणात तुम्ही काय शिकणार ?**

10.1 आंतरराष्ट्रीय व्यापाराचा अर्थ
10.2 महत्त्व
10.3 निर्यात व्यापारसाठीचे प्रोत्साहने
10.4 आयात प्रक्रिया/विधी
10.5 निर्यात प्रक्रिया/विधी
10.6 विश्व व्यापारी संघठन (WTO)ची भूमिका
10.7 आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या समस्या

**प्रस्तावना**

जगातील वेगवेगळ्या देशात नैसर्गीक साधनसंपत्तीची विभागणी असमान रीतीने झालेली आहे. परिणामी लोकांना स्वत:च्या गरजापूर्ण करण्यासाठी दुसऱ्या देशावर आधार ठेवावा लागतो. एकाच देशात काही वस्तूंचे उत्पादन करणे शक्य होत नाही अथवा आवश्यकते पेक्षा कमी होत असेल आणि दुसऱ्या देशाकडे त्याविषयी अनुकूलता असेल तर त्या वस्तू दुसऱ्या देशाकडून आंतरराष्ट्रीय व्यापार द्वारे मिळवू शकत असतात. या शिवाय काही वस्तू ज्या देशात कमी साधन, कमी मजुरी आणि कमी खर्चात चांगल्या गुणवत्तेची बनत असेल असे असेल त्या वस्तू देशात बनवुन वेगवेगळ्या देशात पाठवून एक-दुसऱ्याच्या आवश्यक वस्तूंची अदलाबदल करण्यात आली तर जगाच्या साधनसंपत्तीचा उत्पादन कार्यात चांगला उपयोग करु शकतो. विकसीत देशाकडे उद्योग असेल आणि अल्पविकसीत देशाकडे कच्चामाल असेल तर त्या दोन्ही मधील व्यापार अनिवार्य बनतो. आंतरराष्ट्रीय व्यापाराशिवाय जगाची कल्पना होऊ शकत नाही आंतराराष्ट्रीय व्यापार ही प्राचीन व्यवस्था आहे.

**10.1 आंतरराष्ट्रीय व्यापाराचा अर्थ**

जेव्हा कोणत्याही एका देशातील लोक आणि संस्था दुसऱ्या देशांच्या लोक आणि संस्थे बरोबर व्यापार करीत असतात त्या व्यापारी प्रवृत्तीला आंतरराष्ट्रीय व्यापार अथवा विदेश व्यापार म्हणतात.

**थॉममसच्या मताप्रमाणे ''एका देशांच्या उत्पादनांचा दुसऱ्या देशा बरोबर विनिमय म्हणजे विदेश व्यापार.''**

**10.2 महत्त्व**

**( 1 ) श्रम विभाजन आणि विशिष्टीकरणाच फायदा :** जगातील वेगवेगळ्या देशामध्ये नैसर्गीक साधनसंपत्तीचे असमान विभागणी झालेली असल्याने देशांच्या आवश्यकतेच्या सर्वच वस्तू उत्पन्न होत नाही. ज्या देशात ज्या वस्तूंचे उत्पादन अनुकूल असेल त्या वस्तू कमी खर्चाने सरळताने उत्पादन करुन अन्य देशात निर्यात करु शकतात आणि देशाच्या आवश्यक वस्तू विदेशातुन आयात करु शकतात. आंतरराष्ट्रीय व्यापारामुळे आयातकार देश आणि निर्यातकार देशाला श्रम विभाजन आणि विशिष्टीकरणाचा फायदा मिळत असतो.

**( 2 ) अल्पविकसीत देशांचा विकास :** आंतरराष्ट्रीय व्यापारामुळे विदेश टेक्नॉलॉजी, आधुनिक संचालकीय ज्ञान, संशोधन, विदेशी भांडवल वगैरेची आयात करु शकतात. अल्पविकसीत देश इतर देशांबरोबर सहयोगाचा करार करुन उद्योग-धंदा स्थापन करून देशाचा विकास शक्य बनवित असतात.

**( 3 ) साधनसंपत्तीचा जास्तीत जास्त उपयोग :** जगातील वेगवेगळ्या देशांच्या साधनसंपत्तीचा जास्तीत जास्त उपयोग आंतरराष्ट्रीय व्यापारमुळे शक्य झाला आहे. प्रत्येक देश स्वत:च्या आवश्यकते प्रमाणे टेकनॉलॉजी यंत्रे आणि मानवश्रमाची आयात करुन स्वत:च्या साधनांचा जास्तीत जास्त उपयोग शक्य बनवित असतात. विविध देशात राहणारे लोक त्यांच्या देशाच्या नैसर्गीक संपत्तीचा उपयोग त्यांच्या पसंती प्रमाणे करुन उत्पादन वाढवित असतात आणि जास्तीच्या उत्पादनांची निर्यात करीत असतात.

**( 4 ) सहाय्यक सेवांचा विकास :** आंतरराष्ट्रीय व्यापारामुळे आयात आणि निर्यात व्यापार होत असल्याने वाणिज्य विषयक सहाय्यक सेवा जसे की बँक, वीमा, कोठार, संदेशव्यवहार, वाहनव्यवहार, दलाल वगैरे सेवांचा विकास होत असतो.

**( 5 ) किंमत स्थिर ठेवणे :** आंतरराष्ट्रीय व्यापाराद्वारा देशात ज्या वस्तूंची जास्त कमी भासत असेल त्यांची निर्यात करुन

कमी होत जाणाऱ्या किमंतीला अटकवू शकतात. आणि त्याचरीतीने ज्या वस्तूंची कमी असेल त्यांची आयात करुन वाढत जाणाऱ्या भावाला अटकवुं शकतात. अशारीतीने आंतरराष्ट्रीय व्यापारा द्वारे किंमतीत स्थिरता ठेवता येते.

**( 6 ) उच्च जीवन धोरण :** आंतरराष्ट्रीय व्यापारात वेगवेगळ्या देशांमध्ये होणारी स्पर्धा पहावयास मिळत असते. स्पर्धेत टिकून राहण्यासाठी उत्पादक स्वत:च्या वस्तूची किंमत कमी असेल आणि गुणवत्ता चांगली राहील त्यासाठी प्रयत्न करीत असतात. चांगल्या गुणवत्तेच्या वस्तू कमी किंमतीला मिळाल्याने लोकांच्या जीवनधोरणात सुधार होत असते.

**( 7 ) संस्कृती, फॅशन आणि ज्ञानाचा विनिमय :** आंतरराष्ट्रीय व्यापारामुळे विविध देश एक दुसऱ्यांच्या संपर्कात येतात एक दुसऱ्या विषयी माहीती प्राप्त करतात. आणि एकदुसऱ्याची संस्कृती समजतात, त्यामुळे दिर्घकाळ पर्यत आंतरराष्ट्रीय सुमेळ आणि संवाद करु शकतात. अशाप्रकारे वेगवेगळ्या देशामध्ये संस्कृती, फॅशन आणि ज्ञानाचा विनिमय होत असतो.

**( 8 ) आपत्तीत मददरुप :** दुष्काळ, भूकंप, रोगराई, चक्रियवादळ वगैरे सारख्या नैसर्गीक अथवा मानव निर्मीत आपत्तीवेळी वस्तूंचा पुरवठा कमी होत असतो, तेव्हा आंतरराष्ट्रीय व्यापाराचे महत्त्व विशेष असते. भारता सारख्या देशात मोठ्या प्रमाणात शेती पर्जन्यावर अवलंबून असते. जर पुरा त्या प्रमाणात पर्जन्य पडले नाही तर शेती निष्फळ जात असते. अशावेळी विदेशातून धान्याची आयात करुन दुष्काळ सारख्या नैसर्गिक आपत्तीच्या सामना करु शकत असतो.

**( 9 ) विश्व एक बाजार :** औद्योगिक रीतीने विकसीत आणि समृद्ध राष्ट्र उच्च टेक्नॉलॉजीच्या उपयोग करुन मोठ्या प्रमाणावर उत्पादन करीत असतात. या उत्पादना विक्री करण्यासाठी सतत नवीन बाजार शोधण्यासाठी प्रयत्न करीत असतात आणि त्यासाठी देशाची सीमा ओलांडत असतात. परिणामी आंतरराष्ट्रीय बाजाराचा विकास होत असतो. अशाप्रकारे जगाच्या बहुतांशी देश आंतरराष्ट्रीय बाजारात प्रवेश घेतात. त्यामुळे विश्व एक बाजार बनत असते.

### 10.3 निर्यात व्यापारासाठीचे प्रोत्साहने

देशात आवश्यक आणि अनिवार्य वस्तूंच्या मागणी समोर पूरवठा टिकवून ठेवणे, देशाच्या सुरक्षेसाठी तसेच आर्थिक विकासासाठी आयात करावी लागत असते. आयाती वस्तू आणि सेवांची चुकवणी परकीय चलनाद्वारे करावी लागते. परकिय चलन प्राप्त करण्यासाठी आणि अर्थकारणात स्थिरता त्याचप्रमाणे सुरक्षिततेसाठी निर्यात करावी लागते त्यामुळे परकीय चलन प्राप्त होत असते. या परिस्थितीत प्रत्येक देशात निर्यातीला प्रोत्साहन देत असतो. देशात उत्पादित होणाऱ्या वस्तू विदेशी आयातकारांना स्वस्त व उच्च गुणवत्ता असणारी आणि मागणी केल्याबरोबर प्राप्त होईल त्यासाठी जी काही प्रोत्साहने निर्यातकराला देण्यात येतात त्यांना निर्यात प्रोत्साहने म्हणतात. निर्यात प्रोत्साहन देण्याची जबाबदारी सरकारची असते. हि प्रोत्साहने सरकारची असल्याने त्याची माध्यमे सुद्धा सरकारी असतात.

**निर्यात प्रोत्साहनांची विविध माध्यम**

↓

- व्यापारी संधी
- भांडवल आणि आर्थिक उत्तेजनात सुट
- संकलित आणि सुग्रथित आर्थिक प्रोत्साहन
- आर्थिक सवलत आणि सेवा
- बिनआर्थिक सुविधा
- विशिष्ट आर्थिक विस्तार
- निर्यात प्रक्रिया विस्तार

**( 1 ) व्यापारी संधी :** व्यापारी संधीच्या माध्यमाद्वारे निर्यात प्रोत्साहन देण्यात येत असते. राजकीय दृष्टीने एकदुसऱ्याला अनुकूल असेल तशा देशाच्या राजकारणी या माध्यमाद्वारे व्यापारी संधी करीत असतात. या व्यापारी संधीनुसार कोणत्याही एक अथवा एकापेक्षा जास्त देश इतर कोणत्याही एका अथवा जास्त देशांच्या वस्तूं आणि सेवांची आयात करतील अथवा त्यांना प्राधान्य देतील असा करार करीत असतात.

**( 2 ) भांडवल आणि आर्थिक उत्तेजनात सूट :** भांडवल आणि आर्थिक उत्तेजनात सूटच्या माध्यमाद्वारे निर्यात प्रोत्साहन पूरविण्यात येत असते. या माध्यमांचा खूपच मोठ्या प्रमाणात आणि दिर्घकाळापासून उपयोग होत आहे. या योजनेनुसार–

(a) निर्यातकाराला नक्की केलेल्या दराने सरळ सूट (वळतर) देणे.

(b) निर्यातपात्र वस्तूवरच्या विक्रीवर आणि आबकारी कर न घेणे अथवा कमी घेणे.

(c) निर्यातीच्या आवकला संपूर्ण अथवा अंशत: आकरातून मुक्ती देणे.

(d) निर्यातीच्या वस्तूंचा कच्चामाल, अन्य साधने आणि विद्युत स्वस्त भावाने देणे सारख्या उत्तेजन, पुरस्कार देण्यात येत असते.

**( 3 ) संकलित आणि सुग्रथित आर्थिक प्रोत्साहने :** या योजनेत नक्की केलेली रक्कमेची अथवा नक्की केलेल्या वस्तूंची निर्यात करण्यात आली तर त्यांच्या मोबदल्यात मिळालेले विदेशी परकीय चलनाच्या नक्की केलेल्या प्रमाणात आयात करण्याचा अधिकार देण्यात येतो. निर्यात खात्री देण्याच्या मोबदल्यात.

(a) कमी दराने जमीन प्राप्त करुन त्यावर निर्यातपात्र वस्तूंचे उत्पादन करणे.

(b) कारखाना स्थापन करण्याचा फायदा.

(c) कर आणि अन्य नियंत्रणातून मुक्त अशा मुक्त व्यापार प्रवेशात कारखाना निर्माण करण्याच्या बदल्यात सर्वच अथवा नक्की केलेल्या प्रमाणात वस्तूंची निर्मिती करणे वगैरे सारखे प्रोत्साहन पुरविण्यात येत असतात.

**( 4 ) आर्थिक सवलत आणि सेवा :** आर्थिक सवलती आणि सेवांच्या माध्यमाद्वारे निर्यात प्रोत्साहन देण्यात येते. जसेकी,

(a) निर्यातकार वस्तूंची रवानगी ज्या दिवशी करतो त्याच दिवशी बिलाचे पैसे मिळतील अशी व्यवस्था करावी.

(b) परकीय चलनांच्या दरात बदला समोर रक्षण देणे.

(c) आयातकाराला सरळतने माल प्राप्त होईल तशी व्यवस्था करणे.

(d) आयातकाराची आर्थिक समृद्धी तपासून त्याच्या जामीन म्हणूनची सेवा पूर्ण करणे वगैरचा समावेश आर्थिक सवलती आणि सेवांच्या माध्यमात होत असतो.

**( 5 ) बिन आर्थिक सुविधा :** निर्यात काराला सरळ आर्थिक मदत करण्याच्या मोबदल्यात बिन आर्थिक सोयी द्वारे सुद्धा प्रोत्साहन देण्यात येते. जसेकी,

(a) निर्यातीसाठी आवश्यक माहिती पूरविणे.

(b) निर्यात पात्र वस्तूंच्या उत्पादनासाठी प्रशिक्षित माणसे तयार करणे त्यांना प्रशिक्षण आणि तालीम देण्याची व्यवस्था करणे.

(c) निर्यातकारा मध्ये स्पर्धेचे आयोजन करुन सर्वात जास्त निर्यात करणाऱ्याचा बहुमान करणे.

(d) निर्यात बाजाराची माहीती देणे.

(e) निर्यात वस्तूंचे उत्पादन करणाऱ्या कारखान्यात संप आणि ताळेबंदीला गैरकायदेशीर जाहीर करणे वगैरे सारखे अनेक बिन आर्थिक निर्यात प्रोत्साहने देण्यात येतात.

**( 6 ) विशिष्ट आर्थिक विस्तार : SEZ (Special Economic Zone) :** विशिष्ट आर्थिक विस्तार विषयीचा कायदा लोकसभेद्वारा 2005 मध्ये पसार करण्यात आला होता आणि 10 फेब्रुवारी 2006 पासून तो अमलात आला आहे.

विशिष्ट आर्थिक विस्तार हा एक असा भौगोलीक विस्तार असतो की ज्यात आर्थिक कायदा देशात असणाऱ्या अन्य कायदयापेक्षा जास्त उद्धार असतो. विशिष्ट आर्थिक विस्ताराच्या श्रेणी मध्ये अनेक विशिष्ट विस्ताराच समावेश करण्यात येतो. ज्यामध्ये,

(a) निर्यात प्रोसेसिंग विस्तार (b) मुक्त व्यापार विस्तार (c) मुक्त बंदर (d) औद्योगीक वसाहतीचा समावेश होत असतो. ज्याचा मुख्य उद्देश प्रत्यक्ष स्थानिक आणि विदेशी भांडवल गुंतवणूकीला आकर्षीत करण्याचा असतो.

विशिष्ट आर्थिक विस्तारात औद्योगीक चीजवस्तूंची निर्यात वाढीसाठी आवश्यक प्रोत्साहने जसे की....कस्टम ड्युटी, केद्रिंय आबकारी कर, सेवा कर, केन्द्रीय आयकर, तसेच सिक्योरिटी ट्रान्सेक्शन टॅक्स मधून मुक्ती देण्यात येते. स्थानिक आणि विदेशी भांडवल गुंतवणूकदारानां आकर्षीत करण्यासाठी उत्तेजन देणे तसेच या विस्तारातील मूलभूत सोयींचा विकास करणे वगैरे सारखे प्रोत्साहन देण्यात येतात.

**(7) निर्यात प्रक्रिया विस्तार : EPZ (Export Processing Zone) :** भारत सरकारने निर्यात व्यापारासाठीच्या प्रोत्साहनासाठी देशाच्या वेगवेगळ्या विस्तारात निर्यात-प्रक्रिया विस्ताराची स्थापना केली आहे. निर्यातवाढी द्वारे मोठ्याप्रमाणात परकीय चलन मिळविण्यासाठीचा हा प्रयत्न आहे. निर्यात प्रक्रिया विस्तार आणि मुक्त व्यापार विस्तार परस्परांना पर्याय आहे. भारत सरकारने जाहीर केलेल्या नितीनुसार कंडला, सान्ताकुंझ (मुंबई), फाल्टा, नोयडा, कोचीन, चेन्नई, विशाखापट्टनम, द्वारका जवळ कोसीन्द्रा तसेच भरुच जवळ दहेज अशा विविध ठिकाणी मुक्त व्यापार विस्तार (Free Trade Zone) स्थापण्यात आले आहेत.

निर्यात प्रोत्साहनासाठी मुक्त व्यापार विस्तारात आबकारी कर, देशांच्या आत आणि परदेशां सोबतच्या आर्थिक व्यवहारा वरील नियम आणि मजूराना लागणारे कित्येक कायदयांचे नियम कडक नसतात. अशा विस्तारात उद्योग चालविण्यासाठी प्राथमिक सुविधा जसेकी विद्युत, पाणी, संदेशव्यवहारांची सुविधा, उच्च गुणवत्तेचा कच्चा मालाच्या पूरवठा सतत प्राप्त होईल अशी खात्री देण्यात येत असते.

निर्यात प्रक्रियेच्या विस्तारात सरकार निर्यातकाराना निर्याती विषयी आधुनिक आणि विविध माहीती देत असते. विदेशात विविध वस्तूंच्या बाजाराची स्थिती, निर्यातीसाठी राजकीय परिस्थिती, वाहनांच्या येण्या-जाण्याची सुविधा वगैरेची माहीती देण्यात येत असते.

### 10.4 आयातविधी (Import Procedure)

आंतरराष्ट्रीय व्यापार म्हणजे आयात आणि निर्यातीचा व्यापार. भारतातून विदेशात माल पाठविण्यात आला तर ती भारतासाठी निर्यात केली म्हणतात, जेव्हा विदेशातुन भारतात माल आला तर भारतासाठी आयात केली म्हणतात. आयात आणि निर्यात व्यापाराचा विधी वेगवेगळा असतो. वेगवेगळ्या देशात आयातविधी सुद्धा वेगवेगळी असते. भारतात मालाची आयात करण्यासाठीची विधी खालीलप्रमाणे आहे.

**(1) आयात परवाना मिळविणे :** सरकारने बाहेर पाडलेल्या आवश्यक चीजवस्तू आणि सेवांच्या यादीतून वस्तूंची आयात करायची असेल तर सामान्य परवाना (OGL - Open General Licence) मिळवावा लागतो. जे खूपच सरळ आहे. या यादी शिवायच्या वस्तूंची आयात करायची असेल तर आयातकाराला आयात व्यापार नियामकाला अर्ज करावा लागतो. अर्जात आयातकारांचे नाव, पत्ता, मालाची संपूर्ण माहीती, आयाकारांची आर्थिक स्थिती, माल कोणात्या देशातुन आयात करणार आहे त्या देशांचे नाव वगैरे दर्शविण्यात येत असते. अर्जाची माहीती तपासताना अधिकाऱ्याला संतोष झाला तर आयात परवाना देत असतो. आयात करण्यासाठी जर क्वोटा पद्धती (Quota System) अंमलात असेल तर आयातकाराला निश्चित क्वोटा प्रमाणपत्र सुद्धा देण्यात येत असते.

**(2) परकीय चलन मिळविण्याची व्यवस्था करणे :** विदेशातून मालाची आयात करायची असेल तेव्हा चुकवणी विदेशी परकीय चलनात करायची असते. विदेशी परकीय चलनांवर रिजर्व बँक ऑफ इन्डियाचे नियंत्रण असते. रिजर्व बँक ऑफ इन्डियाला अर्ज करण्यापूर्वी ज्या बँकेने परकीय चलनाचा व्यापार करण्याची परवानगी दिली असेल त्या बँकेला अर्ज करावा लागत असतो. आयात परवान्यांच्या आधारे बँक आयात करांच्या अर्ज पत्रकांवर शेरा करून देत असते. त्यानंतर रिजर्व बँक परकीय चलन मंजूर करीत असते. अर्ज पत्रकात वर्तमान चलनदर प्रमाणे कोणत्या देशांचे चलन पाहीजे ते अमेरिकन डॉलर मध्ये दर्शवावे लागते.

**(3) ऑर्डर देणे :** आयात परवाना आणि परकीय चलनांची कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर आयातकार, निर्यातकार देशाच्या वेगवेगळ्या उत्पादक आणि निर्यात द्वारा कडून मालाची माहीती, किंमत तसेच अन्य अर्थाची माहीती मिळवित असतो. जे उत्पादक अथवा निर्यातकायच्या अटी अनुकूल असतील त्यांना ऑर्डर देण्यात येतो. आयातकार मालाच्या आयाती विषयीचा जो ऑर्डर देतात. त्यांना ''इन्डेन्ट'' म्हणतात. इन्डेन्ट मध्ये मालाचा तपशील, किंमत, पॉकिंग, वीमा, ट्रान्सपोर्ट कंपनीचे नाव वगैरे बाबतची स्पष्टता करण्यात आली असते.

**(4) पत पत्र पाठवणे (L/C - Letter of Credit) :** पत पत्र म्हणजे आयातकारच्या वतीने निर्यातकाराला पैसे चुकविण्याची खात्री देणारा दस्तावेज निर्यातकार आयातकारांची आर्थिक सद्धरता जाणून घेण्यासाठी पत पत्र मांगत असतो. आयातकाराने स्वत:च्या बँकेकडून पत पत्र मिळवून निर्यातकाराला पाठवावे लागते. पत पत्र मिळाले म्हणजे निर्यातकाराला पैसे मिळत्तील अशी खात्री असते..

**(5) दस्तावेज मिळविणे :** निर्यातकार मालाच्या निर्यात विषयीचे आवश्यक सर्वच दस्तावेज स्वत:च्या बँके मार्फत

आयातकाराला पाठवीत असतो. साान्य रीतीने बँक मार्फत हूंडीचा स्विकार समोरील दस्तावेज (D/A - Document against Acceptance) अथवा पैश्यांच्या चुकवणी समोर दस्तावेज (D/P - Documents against Payment) पाठवित असतो. जे आयातकार सोडवित असतो.

**( 6 ) माल प्राप्तीचा ऑर्डर मिळविणे** : आयातकाराला मिळवेल्या दस्तावेजात विल ऑफ लेडिंग हा मालाची मालकी दर्शविणारा दस्तावेज आहे. या दस्तावेजावर निर्यातकाराला शेरा देऊन आयातकाराला मालाची मालकी सुप्रत करण्यात येते हा दस्तावेज जहाज कंपनीच्या कार्यालयात सादर करावयाचा असतो. जहाजाद्वारे येणाऱ्या मालाच ताबा जहाज कंपनी जवळ असतो. जर आयातकाराला भाडे भरावयाचा असेल तर भाडे भरल्यानंतर विल ऑफ लॅडिंगवर जहाज कंपनी शेरा मारून जहाजाच्या कप्तानाला आयातकाराला माल देण्याचा आदेश देण्यात येतो. ज्याच्या आधारे आयातकार माल सोडवू शकत असतो.

**( 7 ) आयात जकातीची चुकवणी** : विदेशातुन मागविण्यात आलेल्या मालावर आयात कराला जकात भरावी लागते. जो पर्यंत आयात जकात भरणार नाही अथवा जकात मूक्तीचे प्रमाणपत्र मिळत नाही तो पर्यंत आयाती मालाला बंदराच्या बाहेर घेऊन जाऊ देण्यात येत नाही. एलचीचा लिफाफा (Conshlat Invoice) आणि उत्पत्तीच्या प्रमाणपत्राच्या आधारावर जर कमी जकात भरावयाची असेल तर त्यासाठी बिल ऑफ अेन्ट्री नावाचे पत्रक तयार करावे लागत असते. या पत्रकात जहाजांचे नाव, विदेशात ज्या बंदरातून माल चढविण्यात आला असेल त्या बंदरांचे नाव निर्यातकारांचे नाव, पत्ता, आयात काराचे नाव, पत्ता आणि मालाची संपूर्ण माहिती दर्शविण्यात येत असते. या पत्रकांच्या माहितीच्या आधारे जकात नक्की करण्यात येत असते नक्की केलेली जकात भरल्यानंतर जकात अधिकारी बिल ऑफ अेन्ट्री वर ती माहिती देणारा शेरा मारून त्या आयातकाराला देत असतो. जकात न भरलेल्या मालाची बाँन्डेड गोदामात ठेवण्यात येते.

**( 8 ) बंदरावरील ( डॉक चार्ज )** : खर्च चुकवणे : आयातकार हवाईमार्ग, जमीन मार्ग अथवा समुद्री मार्गा पैकी ज्या मार्गाने माल मागविला असेल त्या स्थळांवर वाहन येते तेव्हा त्या स्थळांचा उपयोग केल्याबद्दल जो खर्च चुकववावा लागतो त्याला 'डॉक चार्जिस' म्हणून ओळखण्यात येत असतो. 'डॉक चार्जिस मध्ये ज्या-त्या जागेवरील साधने, सुविधा तसेच वाहनावरील माल उतारून आयातकार मालाचा ताबा मिळवील तोपर्यंतच्या सर्व खर्चाचा समावेश होत असतो. बंदरावरील खर्च भरल्यानंतर जी रसीद देण्यात येते तिला 'डॉक रसीद' म्हणतात.

**( 9 ) मालाचा ताबा मिळविणे** : आयातकाराने करावयाची सर्व कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर मालाचा ताबा मिळवित असतो. मालाच्या ताबा निश्चित कालावधीत बान्डेड कोठारा मधून न्यावा (हलवावा) लागतो. जर तो माल निश्चित कालावधीत नेण्यात आला नाही तर बॉन्डेड कोठारा जास्त दिवस उपयोगात घेण्यासाठी भाड्याचा खर्च द्यावा लागतो ज्याला डॅमरेज असे म्हणतात.

### 10.5 निर्यात विधी (Export Procedure)

जेव्हा एका देशांचा व्यापारी दुसऱ्या देशांच्या व्यापाऱ्याला माल पाठवतो तेव्हा त्याला अन्य देशात मालाची निर्यात केली म्हणतात. वेगवेगल्या देशात निर्यात विधी वेगवेगळी असते. भारतातून माल निर्यात करण्याचा विधी खालीलप्रमाणे आहे :

**( 1 ) मालाचा ऑर्डर प्राप्त करणे** : आयातकार द्वारे निर्यातकाराला मालाचा ऑर्डर देण्यात येत असतो. ऑर्डर मध्ये मालाचा तपशील, साठा, नक्की झालेली किंमत, पॅकिंगचे स्वरूप, माल खाना करण्याची तारीख, विम्यांची तारीख, ज्या वाहनव्यवहाराच्या सेवे द्वारे माल पाठवायचा असेल, त्याची माहीती, बिलांची चुकवणीची पद्धत तसेच नक्की झालेल्या अटी वगैरे बाबत दर्शविण्यात येत असते. ऑर्डर मिळविण्यपूर्वी निर्यातकार आयातकारांची आर्थिक सद्धरता, पत आणि आनुवांशिक बाबती विषयी माहीती मिळवून घेत असतो.

**( 2 ) निर्यात परवाना मिळविणे** : आयात-निर्यात नियंत्रणाच्या कायदयानुसार-ज्या वस्तू येत असतील त्या वस्तूची निर्यात करण्यासाठी निर्यात परवाना मिळवावा लागत असतो. या शिवायच्या अन्य वस्तुंची निर्यात मुक्त रीतीने होत असते. परंतु यासाठी सुद्धा सामान्य परवाना मिळवावा लागतो. परवाना मिळविण्यासाठी सरकारच्या व्यापार विभागाने निर्धारीत केलेल्या अर्ज पत्रकात अर्ज करावयाचा असतो. अर्जात निर्यातकाराची स्पष्ट ओळख, निर्यातीचा तपशील आणि त्याचप्रमाणे आयकर आणि अन्य करांची नियमितपणे चुकवणी करण्याविषयी खात्री देणे आवश्यक असते. जे धंधेवाईक नियमीतपणे निर्यात करीत असतात त्यांना स्थापित निर्यातकार म्हणून ओळखण्यात येते.

**( 3 ) माल एकत्रीत करणे :** निर्यातकाराला परवाना मिळाला म्हणजे आयात काराच्या ऑर्डर प्रमाणे माल एकत्रीत करीत असतो. निर्यातकार जर उत्पादक असेल तर ऑर्डर प्रमाणे मालाचे उत्पादन करीत असतो आणि जर व्यापारी असेल तर ऑर्डर प्रमाणे माल एकत्रीत करीत असतो.

**( 4 ) परकीय चलन ( हूंडणावळ ) बाबतची कामगीरी :** 1991 नंतरच्या आर्थिक सुधारणापासून विदेशी परकीयचलना विषयीची नियंत्रणे बरीच सौम्य झाली आहेत. निर्यातकाराला त्यांच्या बिलाची रक्कम आयातकाराला त्याच्यांच चलनामध्ये अथवा अमेरीकन डॉलर मध्ये करीत असतात. परकीय चलनाच्या गतीविधीवर रिजर्व बँक तसेच तिच्या तर्फे नेमलेल्या अन्य बँक आणि संस्था नियंत्रण ठेवत असतात. यामुळे निर्यातकारांना आयातकारा कडून मिळण्यापात्र परकिय चलन स्वत:च्या देशाच्या चलनात रुपांतर करण्यासाठी रिजर्व बँक ऑफ इन्डियाला अर्ज करावा लागतो. या अर्जात स्वत:ला किती परकीय चलन मिळणार आहे वगैर विषयीची संपूर्ण माहीती कळवावी लागते. या अर्जाची एक नकल निर्यातकार स्वत:च्या ज्या बँक अथवा संस्थाद्वारे व्यवहार करीत असेल त्यांना द्यावी लागते.

**( 5 ) पत पत्र (Letter of Credit) मिळविणे :** मालाची निर्यात करण्यापूर्वी निर्यातकार स्वत:च्या बिलांची रक्कमेच्या सुरक्षितेसाठी आयातकारांची आर्थिक सद्धरता तपासत असतो. त्यासाठी निर्यातकार आयातकाराला पत्र लिहून त्यांच्या बँके कडून पत पत्र मागवित असतो. काहीवेळा निर्यातकारांची बँक यासाठी स्वत:च्या विदेशात असलेल्या शाखेला ही कामगीरी देत असते अथवा अन्य माध्यमाद्वारे आयातकारांची पत विश्वासपात्र आहे त्याविषयीचे प्रमाणपत्र मिळवून देत असते. त्यास 'पत पत्र' म्हणून ओळखण्यात येत असते.

**( 6 ) शिपिंग ऑर्डर मिळविणे :** मालाची निर्यात समुद्र मार्गाने करायची असेल तर निर्यातकाराला जहाज कंपनीचा संपर्क करावा लागतो. जी कंपनी नक्की केलेल्या तारखेला माल पोहचविण्याची तयारी दाखविते त्यांना माल घेऊन जाण्याविषयी अर्ज करण्यात येत असतो. या अर्जात मालाचा तपशील जसे की मालाचा साठा, वजन, आकार, माल पाठवायची तारीख, किंमत वगैरे दर्शविण्यात येत असतो. थोडक्यात शिपिंग ऑर्डर म्हणजे स्वत:च्या जहाजाच्या कप्तानाला त्यात दर्शविलेल्या मालाचा स्वीकार करण्याचा जहाज कंपनीला केलेला आदेश निर्यातकाराने मोठ्या साठ्यात मालाची निर्यात करायची असेल तेव्हा पुर्ण जहाज भाड्याने तर ठेवू शकतात त्यांचा 'चार्टर' म्हणतात. जहाज कंपनी आणि निर्यातदार मध्ये पुर्ण जहाज भाड्याने ठेवण्याविषयी जो करार होत असतो त्याला 'चार्टर पार्टीकरार' म्हणतात.

**( 7 ) जकातची चुकवणी :** प्रत्येक निर्यातदराला जकातची चुकवणी करावी लागते. जर जकात भरायची नसेल तरी त्या विषयीचा जाहीर निर्धारीत पत्रकात निर्यातदाराने भरुन जकातमुक्त असल्याने प्रमाणपत्र जकात अधिकाऱ्याकडून घ्यावे लागते. जर माल जकातपात्र असेल तर निर्यातदाराला शिपिंग बिल तयार करायचे असते. ज्यामध्ये आयातकारांचे नाव, पत्ता, मालाची किंमत, साठा, वजन, माल ज्या बंदरावर उतरविणार असेल त्या बंदरांचे नाव, जहाज तसेच जहाज कंपनीचे नाव वगैरे माहीती दर्शावी लागते. मालाच्या किंमती, साठा वगैरच्या आधारे जकात अधिकारी जकातची आकारणी करीत असतात. जकात अधिकारी शिपिंग बिल आणि आवश्यक असेल तर मालाची स्वत: तपास करुन जकात नक्की करीत असतात. निर्यातकाराने जकातची रक्कम भरली म्हणजे माल बंदरावरुन घेऊन जाण्याची परवानगी मिळत असते.

**( 8 ) मालाचे पॅकिंग आणि मार्किंग करणे :** आंतरराष्ट्रीय व्यापारात मालाच्या पॅकिंगचे खूपज महत्त्व आहे. माल लांब अंतरावर घेऊन जाण्याचा असल्याने वाहतूकी दरम्यान नुकसान होणार नाही, बाष्पामुळे खराब होणार नाही, त्यारीतीने पॅकिंग केले पाहिजे. काहीवेळा जहाज कंपन्यां भाडे नक्की करतांना सुद्धा मालाच्या पॅकिंगचा आकार लक्षांत ठेवतात. जर आयातकारांने ऑर्डरमध्ये पॅकिंग विषयी विशेष सूचना दिली असेल तर त्या प्रमाणेचे पॅकिंग केले पाहिजे पॅकिंगच्या वर मालाला लागणाऱ्या महत्त्वाच्या माहितीचे मार्किग सुद्धा जरुरी असते. ज्यामध्ये आयातकारांचे नाव, पत्ता, निर्यातदाराचे नाव आणि पत्ता, माल ज्या बंदरावर उतरणार आहे त्या बंदराचे नाव, मालाचे वजन वगैरे माहिती दर्शविण्यात येत असते.

**( 9 ) मालाचा वीमा घेणे :** समुद्र मार्गीने निर्यात करायची असेल तेव्हा समुद्र जोखीम जसे की समुद्र तुफान, हवामानामुळे मालाचे होणारे नुकसान, समुद्रमार्गी होणाऱ्या मालाची लूट वगैर पासून मालाला होणारे नुकसानासमोर आर्थिक मोबदला मिळविण्यासाठी वीमा द्यावा लागतो. वीमा कंपनी बरोबर या विषयीचा करार करण्यात येत असतो. वीमाकंपनी जी प्रिमियम नक्की करेल ती भरल्यावर निर्यात काराला 'कवर नोट' देण्यात येत असते. वीमा पॉलिसी तयार झाली म्हणजे कवर नोटच्या मोबदल्यात वीमाकंपनी पॉलिसी देत असते.

**( 10 ) कार्टिंग ऑर्डर मिळविणे :** कार्टिंग ऑर्डर म्हणजे जहाज वर माल चढविण्यासाठीची परवानगी. कार्टिंग ऑर्डर मिळविण्यासाठीच्या बंदरातून माल निर्यात करायचा असेल त्याच्या सत्ताधिकाऱ्यांना निर्यातकाराला अर्ज करावा लागलो. या अर्जात शिपिंग बिलात दर्शविलेली सर्व माहीती शिवाय जकात भरल्यांची माहीती दर्शविण्यात येत असते. निर्यातकार बंदर वरील खर्च सारख्या अथवा मालाच्या वाहतूकीचा खर्च आणि जहाजावर माल चढविण्याचा खर्च वगैरे भरल्यानंतर निर्यातकाराला कार्टिंग ऑर्डर देण्यात येते.

**( 11 ) कप्तान अथवा प्रतिनिधी ( मेट्स )ची पावती (Mate Receipt) :** कार्टिंग ऑर्डरच्या आधारे माल जहाजावर चढविण्यात येतो. जहाजाच्या कप्तानाला प्रतिनिधी मेट्स म्हणून ओळखतात. शिपिंग बिलाप्रमाणे माल आहे की नाही ते मेट तपासून घेत असतो. जेव्हा जहाजावर माल चढविण्यात येतो. तेव्हा जहाजाचा कप्तान अथवा त्याचा प्रतिनीधी कडून माल स्वीकारल्या विषयी जी पावती देण्यात येत असते तिला साथीदाराची रसीद (पावती) म्हणतात. जहाजाचा कप्तान मालाच्या पॅकिंगची खात्री करीत असतो. जर मालाचे पॅकिंग योग्य नसेल तर वाहतूकीसाठी पण योग्य नसेल तर त्यांची नोंद रसीद मध्ये करण्यात येत असते. अशा नोंद केलेल्या रसीदला खामीयुक्त रसीद (Foul Receipt) अथवा डर्टी चीट म्हणून ओळखण्यात येत असते. जर सर्वच बाबत योग्य असेल तर स्वच्छ रसीद देण्यात येते. जर साथीदाराची रसीद खामीयुक्त असेल तर त्याचा अर्थ हा होतो की जहाजात चढविण्यात आलेला मालाच्या ऑर्डरमध्ये दर्शविल्या प्रमाणे पॅकिंग नाही आणि मालाच्या वाहतूकी दरम्यान जर नुकसान झाले तर त्यासाठी जहाजी कंपनी जबाबदार राहणार नाही.

**( 12 ) बिल ऑफ लॅडिंग मिळविणे (Bill of Lading) :** कप्तान अथवा साथीदारांची रसीद ही माल जहाजात चढविण्या विषयीची पोचपावती असते. ते माल घेऊन जाण्या विषयीचा करार नाही. निर्यात काराला मिळालेली कप्तानाची रसीद जहाजी कंपनीत रजू केल्याने जहाजी कंपनी द्वारा बिल ऑफ लेडिंग निर्यात काराला देण्यात येत असते. बिल ऑफ लेडिंग हे निर्यातकार आणि जहाजी कंपनी मधील करार आहे. ज्याद्वारे कंपनी एका बंदरातून दुसऱ्या बंदरापर्यंत माल पाठवून देण्याची खात्री देणारा दस्तावेज आहे. या दस्तावेजात निर्यातकाराचे नाव, जहाजांचे नाव, भाडे, मालाचा तपशील, मालाचा साठा, किंमत, वजन, ज्या स्थळाहून माल घेऊन जाण्याचा असेल त्या बंदराचे नाव, वाहतूकीच्या अटी वगैरे दर्शविण्यात येत असते. बिल ऑफ लेडिंग हा महत्त्वाचा दस्तावेज आहे. त्यांच्या तीन नकला बनविण्यात येतात. एक जहाजी कंपनी ठेवते, दुसऱ्या दोन नकलां निर्यातकाराला पाठविण्यात येतात. त्यापैकी एक नकल निर्यातकार आयातकाराला पाठवित असतो. ज्याच्या आधारे आयातकार माल सोडवत असतो.

**( 13 ) उत्पत्तीचे प्रमाणपत्र (Certificate of Origin) :** माल कोणत्या देशात उत्पन्न झाला आहे ते दर्शविणाऱ्या प्रमाणपत्राला उत्पत्तीचे प्रमाणपत्र म्हणतात. वेगवगेळ्या देशामध्ये झालेल्या करारानुसार जो-तो देश आयात वर सवलत देत असतो. या करारानुसार सवलत मिळविण्यासाठी सुचित माल कोणत्या देशात उत्पन्न झालेला आहे त्या विषयीच्या प्रमाणपत्राची आवश्यकता पडत असते. असे प्रमाणपत्र व्यापारी मंडळ, चेम्बर ऑफ कॉमर्स अथवा सरकारकडून मिळवूं शकतात.

**( 14 ) व्यापारी अेलचीचा लिफाफा (Consular Invoice) :** निर्यात केलेला माल आयातकाराच्या देशात पोहचतो म्हणजे त्याच्यावर जकात भरावी लागत असते. जकात चुकवणी सरळ बनविण्यासाठी व्यापारी अेलची ची लिफाफा (कवर) हा महत्त्वाचा दस्तावेज आहे. आयातकार देशाचा अेलची निर्यातकार देशात असतो. त्याच्याकडून निर्यातकार मालाच्या किंमती विषयी जे प्रमाणपत्र मिळवित असतो त्याला व्यापारी अेलची लिफाफा (Consular Invoice) म्हणतात. ज्यामध्ये मालाचा साठा आणि किंमत सारखी बाबत दर्शविण्यात येत असते, त्याच्या आधारे जकात वसूल करण्यात येत असते.

**( 15 ) दस्तावेज पाठविणे :** निर्यातकार स्वत:च्या बँक मार्फत आयातकाराला कवर, वीमा पॉलीसी अथवा कवरनोट, बिल ऑफ लेडिंग, मालाच्या उत्पत्तीचे प्रमाणपत्र, व्यापारी अेलची लिफाला तसेच पेपर वगैरे महत्त्वाचे दस्तावेज आयात कराच्या बॅकेला पाठवीत असतो

**( 16 ) पैश्यांची वसूली :** निर्यातकार मालाच्या वसूलीसाठी बँकेला सूचना देत असतात. यादीत दर्शविलेली रक्कम वसूल करण्यासाठी निर्यातकार आयातकारावर हुंडी लिहीत असतो. हुंडी स्वीकार D/A समोरची असेल अथवा चुकवणी D/P समोरील असू शकते. जर स्विकार समोरील हुंडी असेल तर त्या निर्यातकाराची बँक ही हुंडी आयातकारा समोर रजू करुन त्याचा आयातकार द्वारे स्विकार होणाऱ्या माल विषयी आवश्यक दस्तावेज देतात परंतु जर हुंडी नाणे चुकवणी समोरील असेल तर हुंडीची रक्कम संपूर्ण चुकविण्यानंतर बँक दस्तावेज देत असते. स्विकार समोरील हुंडीच्या नाण्यांची मुदत पुर्ण होणाऱ्या तारखेला बँक वसूल करुन निर्यातकाराला पाठवून देत असते. जेव्हा चुकवणी समोरील हुंडीचे नाणे निर्यातकाराला पाठवून देण्यात येत असतात.

### 10.6 आंतरराष्ट्रीय व्यापार संधीकरार आणि विश्व व्यापार संगठनाची भूमिका

दुसऱ्या विश्वयुद्धानंतर आंतरराष्ट्रीय क्षेत्राच्या राजकीय समीकरणात बदल झाले. युद्धात गुंतलेले देश आर्थिक रीतीने उध्वस्त झाले. नवीन राजकीय परिस्थितीत विश्व समूदायाला व्यापारात आणि अन्य क्षेत्रांत सहयोग साधण्यासाठी एका संगठनाची आवश्यकता निर्माण झाली. ज्यामुळे आंतरराष्ट्रीय व्यापार संधी करार (GATT) ची सुरुवात झाली. प्रत्येक देश स्वत:च्या आवश्यकतेप्रमाणे नाकाबंदी निर्माण केली पण त्यामुळे पाहिजे तसा विकास करु शकले नाही. परिणामी उदारीकरणाची आवश्यकता निर्माण झाली आणि विश्व-व्यापार संगठन (WTO) ची सुरवात झाली.

**( 1 ) विश्व व्यापार संगठन : WTO (World Trade Organisation) :** विश्व व्यापार संगठनाचे कार्य आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या संबंधाचे संचालन करणे आहे. त्यामुळे समग्र विश्व एकच व्यापार मंच निर्माण होईल आणि वैश्विककराणाचा मार्ग आणि व्याप वाढेल. या संगठनाला समर्थन देण्यासाठी जगाच्या 104 देशांनी हस्ताक्षर केले आहेत. 1995 च्या 1 जानेवारी पासून या संगठनांने त्याची विधिसर कार्यवाही सुरु केली. भारत या संगठनाचा सुरुवाती पासूनच सभासद आहे. विश्व व्यापार संगठनाची कार्यवाही आणि वहीवटी व्यवस्थेमुळे सेवाक्षेत्राचा जलद विकास झाला आहे. वीमा, बॅंकिंग तसेच वाहनव्यवहार क्षेत्रात विविध देशांमधील सीमा रेषा पुसल्या जाऊन आणि समग्र विश्व एक गाव (Global Village) बनून गेले आहे. विश्व बाजार विश्व व्यापार संगठनामुळे विकसीत झाले आहे. या संगठनामुळे शेती, उद्योग आणि स्वास्थ विषयक सोयीच्या उत्पादनात वाढ करुन निर्यातीना जास्त वेग मिळण्याची शक्यता वाढली आहे. शिक्षण क्षेत्रांत विदेशाच्या युनिवर्सिटीनी भारतात येण्याची संधी मिळाली आहे. अमेरीका, कॅनडा आणि ऑस्ट्रेलिया सारख्या विविध देशांच्या युनिव्हर्सिटीने गुजरात सहीत भारताच्या विविध राज्यांनी त्यांच्या कॅम्पसचे आयोजन केले आहे.

**( 2 ) आंतरराष्ट्रीय व्यापार संधी करार : GATT (General Agreement on Trade and Tariff) :** भारत सरकारने स्वत:च्या देशाच्या उद्योग-धंद्याला विदेशी प्रवाहा सोबत जोडण्यासाठी विविध देशांसोबत करार केले आहेत त्यांना आंतरराष्ट्रीय संधी करार म्हणतात.

1948 मध्ये जिनेव्हा येथे 23 देशांमध्ये हा करार करण्यात आला होता. या करारानुसार मूलभूत उद्देश आंतरराष्ट्रीय व्यापाराला मुक्त व्यापाराच्या दिशेत घेऊन जाण्याशिवाय आंतरराष्ट्रीय व्यापारात वाढ करुन प्रादेशीक श्रम विभाजनाला उत्तेजन देण्याचा आहे. आंतरराष्ट्रीय व्यापार संधी करार हा वैश्वीकीकरणाला अनुरुप मुक्त व्यापारनीती आहे. शासन व्यवस्था सुद्धा अनुकूल आहे आणि भौतीक सुविधा सुद्धा जलदगतीने विस्तारत जात आहे. व्यापार जगात नवीन प्रवाह विविध स्वरुपात आकार घेत आहेत.

### 10.7 आंतरराष्ट्रीय व्यापारांच्या समस्या

जगाच्या वेगवेगळ्या देशांमध्ये होणारा व्यापार म्हणजे आंतरराष्ट्रीय व्यापार. आंतरराष्ट्रीय व्यापारात वेगवेगळ्या देशांचे विविध नियंत्रण असतात. ज्यांना आंतरराष्ट्रीय व्यापारांच्या समस्या म्हणून ओळखण्यात येतात त्या खालीलप्रमाणे आहेत.

**( 1 ) चलनांची समस्या :** वेगवेगळ्या देशांचे विविध चलन असल्याने व्यवहारांच्या निकालात मुश्केली राहते. आयातकार आणि निर्यातकार जवळ विविध परकीय चलनाविषयी आवश्यक माहीती नसल्याने समस्या राहते.

**( 2 ) भाषेची विविधता :** जगाच्या प्रत्येक देशांची भाषा वेगवेगळी असल्याने भाषे विषयी समस्या नडते. पण इग्रंजी भाषा ही समस्या बहुतांशी दुर करीत असते. तरीसुद्धा आज सुद्धा मागासलेल्या देशांसोबत व्यापारात ही समस्या येत असते.

**( 3 ) अंतराची समस्या :** आंतरराष्ट्रीय व्यापारान दोन देशांमधील अंतर जास्त असल्याने संदेशव्यवहार आणि मालसामानाची वाहतूक करण्यासाठी खूप वेळ जात असतो.

**( 4 ) प्रतिबंध आणि नियंत्रण :** आंतरराष्ट्रीय व्यापारात वेगवेगळे देश स्वत:च्या राजकीय नीती आणि आर्थिक नीती प्रमाणे अनेक प्रकारचे नियंत्रण ठेवत असतात. सरकारच्या जास्त असणाऱ्या नियंत्रणामुळे आंतरराष्ट्रीय व्यापार अटकत असतो.

**( 5 ) जोखीम :** मोठ्या प्रमाणाचा आंतरराष्ट्रीय व्यापार समुद्री मार्गाने होत असल्याने समुद्री मार्गे मालाला हवामानामुळे नुकसान, माल डुबूण जाणे, समुद्री लुटारू द्वारे लूट वगैरे सारखे जोखीम असते.

**( 6 ) कायदयात फरक :** वेगवेगळ्या देशांच्या व्यापाराला लागणारे कायदे वेगवेगळे असतात. ते सरळतेने समजण्याची समस्या असते.

**( 7 ) व्यापारी संपर्काचा अभाव :** आंतरराष्ट्रीय व्यापारात व्यापारी संपर्क कमी असतो. दोन देशांमधील अंतर जास्त असेल तेव्हा व्यापारी एक दुसऱ्या पासून तदन अपरिचीत असतात. आयातकार आणि निर्यातकार व्यापारी मधील परस्पर सरळ संपर्क नसल्याने पैश्यांच्या चुकवणी विषयी समस्या असते.

**( 8 ) मोज-मापाची समस्या :** काही वेळा वेगवेगळ्या देशांच्या मोज-माप वेगवेगळे असल्याने मोज-मापा विषयी समस्या पाहवयास मिळत असते.

**आंतरीक आणि आंतरराष्ट्रीय व्यापार मधील फरक**

| अनुक्रम नंबर | फरकांचे मुद्दे | आंतरिक व्यापार | आंतरराष्ट्रीय व्यापार |
|---|---|---|---|
| (1) | अर्थ | देशांच्या भौगोलिक सीमेच्या आत होणारा व्यापार म्हणजे आंतरीक व्यापार.<br>उदा. गुजरातचा भारताच्या इतर राज्यासोबत होणारा व्यापार. | देशांच्या भौगोलिक सीमेच्या बाहेर होणारा व्यापार म्हणजे आंतराराष्ट्रीय व्यापार.<br>उदा. भारताचा जगातील इतर देशांबरोबर होणारा व्यापार. |
| (2) | चलन | संपूर्ण देशात एकच चलन असल्याने पैश्यांची चुकवणी आणि हिशोबात अडचणी येत नाही. | वेगवेगळ्या देशात चलन वेगवेगळे असल्याने पैश्यांची चुकवणी आणि हिशोबात अडचणी येतात. |
| (3) | कायदा | व्यापारासाठीचा कायदा संपूर्ण देशात सारखाच असतो. | वेगवेगळ्या देशात व्यापारासाठीचे कायदे वेगवेगळे असतात. |
| (4) | भाषेची समस्या | आंतरीक व्यापारात भाषेची अडचण येत नाही. | आंतरराष्ट्रीय व्यापारात भाषेची अडचण येत असते. |
| (5) | सरकारी नियंत्रण | आंतरीक व्यापारात सरकारी नियंत्रण कमी असतात. | आंतरराष्ट्रीय व्यापारात सरकारी नियंत्रण जास्त असतात. |
| (6) | जोखीमचे प्रमाण | जोखमचे प्रमाण कमी असते. | जोखीमचे प्रमाण जास्त असते. |
| (7) | अंतर | एका देशा पूरते कार्यक्षेत्र सिमित असल्याने अंतर कमी असते. | वेगवेगळ्या देशात कार्यक्षेत्र विस्तृत असल्याने अंतर जास्त असते. |
| (8) | वीमा | वीमा घेणे अनिवार्य नाही. | वीमा घेणे अनिवार्य असते. |
| (9) | जकात चुकवणी | जकातची चुकवणी सरळ असते आणि जकात दर कमी असतो. | जकातची विधी कठीन असते आणि जकातचा दर जास्त असतो. |
| (10) | बाजार | बाजार मर्यादीत असतो. | बाजार विस्तृत असतो. |

**या प्रकरणात तुम्ही काय शिकलात ?**

**आंतरराष्ट्रीय व्यापाराचा अर्थ :** जेव्हा एका देशाच्या व्यक्ती आणि संस्था दुसऱ्या देशाच्या व्यक्ती आणि संस्थे बरोबर व्यापार करतात तेव्हा त्या व्यापारी प्रवृत्तीला आंतरराष्ट्रीय व्यापार म्हणतात.

**महत्त्व :** (1) श्रम विभाजन आणि विशिष्टीकरणाचा फायदा, (2) अल्पविकसीत देशांचा विकास, (3) साधन संपत्तीचा जास्तीत जास्त उपयोग, (4) सहायक सेवांचा विकास, (5) किंमत स्थिर ठेवणे, (6) उंच जीवन धोरण (7) संस्कृती फॅशन आणि ज्ञानाचा विनिमय, (8) आपत्तीत मदतरूप, (9) विश्व एक बाजार.

**निर्यात व्यापारासाठीचे प्रोत्साहन :** विदेशी निर्यातकारांना स्वस्त, उंच गुणवत्तेची आणि मागेल तेव्हा मिळून राहील अशा वस्तू साठी जे काही प्रोत्साहने देण्यात येतात त्यांना निर्यात प्रोत्साहने म्हणतात. निर्यात प्रोत्साहन विविध माध्यमा द्वारे पुरविण्यात येत असते. जसे की (1) व्यापारी संधी, (2) भांडवल आणि आर्थिक उत्तेजनात सूट, (3) संकलित आणि सुग्रथित आर्थिक प्रोत्साहन, (4) बिन आर्थिक सोयी, (5)आर्थिक सोयी आणि सेवा, (6) विशिष्ट आर्थिक विस्तार, (7) निर्यात प्रक्रिया विस्तार.

**आयातविधी :** विदेशातून भारतात माल मागविण्यात येतो तेव्हा आयात केली म्हणतात. आयात करणार व्यक्तीला आयातकार म्हणतात. मालाची आयात करण्याच्या विधिला आयातविधी म्हणतात. (1) आयात परवाना मिळविणे, (2) परकीय चलत मिळविण्याची व्यवस्था करणे, (3) ऑर्डर ठेवणे, (4) पत पत्र पाठवणे, (5) योग्य दस्तावेज मिळविणे, (6) माल प्राप्तीच्या ऑर्डर मिळविणे (7) आयात जकात भरणे, (8) डॉक चार्जची चुकवणी करणे (9) मालाचा ताबा मिळविणे.

**निर्यातविधी :** भारतातून विदेशात माल पाठवण्याची व्यवस्थेला निर्यात केली म्हणतात. निर्यात करणाऱ्याला निर्यातकार म्हणतात. निर्यातकार मालाची निर्यात करण्यासाठी खालील विधि करीत असतात.

(1) ऑर्डर मिळविणे, (2) निर्यात परवाना मिळविणे, (3) माल एकत्रीत करणे, (4) परकिय चलनाविषयी कामगीरी, (5) पत पत्र मिळविणे, (6) शिपिंग ऑर्डर मिळविणे, (7) जकातविधी, (8) मालाचे पॅकिंग आणि मार्किंग करणे, (9) मालाचा विमा घेणे, (10) कार्टिंग ऑर्डर मिळविणे, (11) कप्तान अथवा प्रतिनिधीची रसीद, (12) बिल ऑफ लॅडिंग मिळविणे, (13) उत्पत्तीचे प्रमाणपत्र, (14) व्यापारी अेलची चा लिफाफा (Invoice) (15) दस्तावेज पाठवणे, (16) पैश्यांची वसूली करणे.

**विश्व व्यापार संगठन आणि आंतरराष्ट्रीय व्यापार संधी करार :** संपूर्ण विश्वाचा एकच व्यापार मंच उभा होईल आणि वैश्विकीकरणाचा मार्ग आणि व्याप वाढेल त्यासाठी विश्वव्यापार संगठन 104 देशांच्या हस्तांक्षरा द्वारे अमली झाले आहे. त्यामुळे संपूर्ण विश्व एक गाव बनले आहे. GATT भारत सरकारने स्वत:च्या उद्योग धंदाला विदेशी प्रवाहासोबत जोडण्यासाठी विविध देशां बरोबर करार केले आहे त्यांना आंतरराष्ट्रीय संधी करार म्हणतात.

**आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या समस्या :** (1) चलनांची समस्या (2) भाषेची विविधता (3) अंतराची समस्या (4) प्रतिबंध आणि नियंत्रण (5) जोखीम (6) कायदयात फरक (7) व्यापारी संपर्काचा अभाव (8) मोप-मापाची समस्या.

**आंतरीक आणि आंतरराष्ट्रीय व्यापारातील फरक :** अर्थ - चलन - कायदा - भाषेची समस्या - सरकारी नियंत्रण - जोखीमचे प्रमाण - अंतर - वीमा - जकातची चुकवणी.

**स्वाध्याय**

**1. खालील प्रश्नांचे उत्तर योग्य विकल्प निवडून लिहा :**

(1) एका देशांचा अन्य देशाबरोबरचा व्यापार म्हणजे काय ?

(A) स्थानिक व्यापार (B) प्रादेशीक व्यापार (C) राष्ट्रीय व्यापार (D) आंतरराष्ट्रीय व्यापार

(2) आयातकार ऑर्डर मध्ये जी माहीती दर्शवीत असतो त्या पत्राला कोणत्या नावाने ओळखण्यात येत असते ?

(A) Input (B) OGL (C) L/C (D) Indent

(3) कोणत्या व्यापाराने परकिय चलन प्राप्त होत असते ?

(A) निर्यात व्यापार (B) आयात व्यापार (C) आंतरीक व्यापार (D) प्रादेशीक व्यापार

(4) निर्यात काराला बिल ऑफ लॅडिंग कोण देत असतो ?

(A) वीमा कंपनी (B) जहाजी कंपनी (C) जहाजाचा कप्तान (D) बँक

(5) माल ज्या देशात उत्पन्न झाला असेल ते दर्शविणाऱ्या प्रमाणपत्राला काय म्हणतात ?

(A) व्यापारी अेलचीचे कवर (B) उत्पत्तीचे प्रमाणपत्र

(C) शिपिंग ऑर्डर (D) पत पत्र

(6) शिपिंग ऑर्डर कोण देत असते ?

(A) जहाजाचा कप्तान (B) जहाजी कंपनी (C) जहाजांचा मालक (D) मध्यस्थ/रिजर्व बँक

(7) भारतात परकिय चलनांवर कोणत्या बँकेचे नियंत्रण असते ?

(A) स्थानिक बँक (B) व्यापारी बँक (C) रिजर्व बँक (D) कृषी बँक

(8) मालाची पॅकिंग बरोबर झाली नसेल तर जहाजाचा कप्तान निर्यातकारांला कोणती रसीद देन असतो ?

(A) खामीयुक्त रसीद (B) स्वच्छ रसीद (C) अपूर्ण रसीद (D) फाटलेली रसीद

(9) खालीलपैकी कोणत्या माध्यमाद्वारे निर्यात प्रोत्साहन देण्यात येत असते ?

(A) विश्व बँकेच्या (B) व्यापारी बँकेच्या (C) व्यापारी संधी (D) व्यापाऱ्यांच्या

(10) बँक निर्यात कारायचा सुचने प्रमाणे आयातकारकडून विलाच्या रक्कमेच्या चुकवणी समोर आयातकार जो दस्तावेज देतो त्याला कोणत्या नावाने ओळखण्यात येत असतो ?

(A) D/A (B) D/P (C) OGL (D) LOC

(11) जहाजी कंपनी आणि निर्यातकार मध्ये पूर्ण जहाज भाड्याने ठेवण्यासाठी जो करार होतो त्याला कोणत्या नावाने ओळखण्यात येत असते ?

(A) इन्डेन्ड करार (B) शाखेचा करार (C) चार्टर पार्टी करार (D) निर्यात करार

**उत्तर :** (1) (D) (2) (D) (3) (A) (4) (B) (5) (B) (6) (B) (7) (C) (8) (A) (9) (C) (10) (B) (11) (C)

**2. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा :**

(1) विदेशी व्यापाराचा अर्थ सांगा ?

(2) आयात म्हणजे काय ?

(3) निर्यात म्हणजे काय ?

(4) संज्ञा समजवा :

OGL, WTO, GATT, SEZ, EPZ, D/A, D/P.

**3. खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा :**

(1) बिल ऑफ लॅडिंग म्हणजे काय ?

(2) व्यापारी अेलचीचा लिफाफा (कवर) म्हणजे काय ?

(3) विदेश व्यापारात उत्पत्तीच्या प्रमाणपत्राची कशासाठी आवश्यकता असते ?

(4) कप्तान सोबतची पावती म्हणजे काय ?

(5) चार्टर पार्टी करार म्हणजे काय ?

(6) शिपिंग ऑर्डर म्हणजे काय ?

**4. खालील प्रश्नांची मुद्देसूद उत्तर लिहा :**

(1) निर्यात व्यापारासाठीचे विविध प्रोत्साहनांची थोडक्यात समज द्या.

(2) आंतरराष्ट्रीय व्यापारात विश्वव्यापार संगठन (WTO) ची भुमिका समजवा.

(3) आंतरराष्ट्रीय व्यापारात आंतरराष्ट्रीय व्यापार संधीकरार (GATT) ची टिप लिहा.

(4) 'जहाजांचा कप्तान काही वेळा खामीयुक्त रसीद देत असतो' विधान समजवा.

(5) 'विश्व एक गाव' विधानांची यथार्थता समजवा.

**5. खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा :**

(1) आंतरराष्ट्रीय व्यापाराचे महत्त्व सांगा ?

(2) आयातविधी वर्णवा.

(3) निर्यात विधीच्या टप्प्यांची समजूती लिहा.

(4) आंतरराष्ट्रीय व्यापाराची समस्याचे वर्णन करा.

(5) आंतरीक आणि आंतरराष्ट्रीय व्यापाराचा फरक सांगा.

## पारिभाषिक शब्द

| | | |
|---|---|---|
| पतपत्र | : | Letter of Credit |
| डॉकचार्ज | : | Dock Charge |
| डॅमरेज | : | Demurrage |
| शिपिंग ऑर्डर | : | Shipping Order |
| चार्टर पार्टी करार | : | Charter Party Contract |
| कार्टिंग ऑर्डर | : | Carting Order |
| साथीची रसीद | : | Mate Receipt |
| SEZ | : | Special Economic Zone |
| EPZ | : | Export Processing Zone |
| OGL | : | Open General Licence |
| L/C | : | Letter of Credit |
| D/A | : | Documents against Acceptance |
| D/P | : | Documents against Payment |
| WTO | : | World Trade Organisation |
| GATT | : | General Agreement on Trade and Tariff |
| FTD | : | Free Trade Zone |

•

# 11 धंद्याची सामाजिक जबाबदारी (Social Responsibility of Business)

**या प्रकरणात तुम्ही काय शिकणार ?**

11.1 धंद्याच्या सामाजिक जबाबदारीचा अर्थ
    11.1.1 सामाजिक जबाबदारीची व्याख्या
11.2 धंद्यासोबत हित असणाऱ्या समूहा विषयी सामाजिक जबाबदारी
    11.2.1 मालकांविषयी धंद्याची सामाजिक जबाबदारी
    11.2.2 गुंतवणूकदारा विषयी धंद्याची सामाजिक जबाबदारी
    11.2.3 कर्मचाऱ्याविषयी धंद्याची सामाजिक जबाबदारी
    11.2.4 ग्राहकां विषयी धंद्याची सामाजिक जबाबदारी
    11.2.5 पूरवठा पूरविणाऱ्याविषयी धंद्याची सामाजिक जबाबदारी
    11.2.6 सरकार विषयी धंद्याची सामाजिक जबाबदारी
    11.2.7 समाजाविषयी धंद्याची सामाजिक जबाबदारी
11.3 धंदाकीय एकम आणि पर्यावरणाची जपणूक
11.4 धंदाकीय नितीमत्ता
    11.4.1 धंदाकीय नितिमत्तेची तत्वे

**प्रस्तावाना**

धंदा ही आर्थिक प्रवृत्ती आहे, जी नफा कमाविण्याच्या उद्देशाने करण्यात येत असते. तरी सुद्धा आपण कित्येक धंदाकीय एकमाना विविध प्रवृत्तीत कार्य करताना पाहत असतो. धंदाकीय एकम द्वारा करण्यात येणाऱ्या काही प्रवृत्ती धंद्याला सरळ रीतीने नफा कमविण्यात मदतरुप होत नाही. तरी सुद्धा एकमांद्वारा या प्रवृत्ती करण्यात येत असतात. उदाहरण म्हणून काही धंदाकीय एकमाद्वारे जाहीर बगीच्याचे निर्माण करण्यात येत असते आणि/अथवा त्यांच्या जपणूक सुद्धा करण्यात येत असते. तर कित्येक धंदाकीय एकम त्यांच्या उत्पादनाची गुणवत्ता वाढविण्या साठी संशोधन करुन योगदान देत असतात. धंदाकीय एकम त्याच्या कर्मचारी आणि कुंटूबांना राहण्यासाठी निवास आणि आरोग्य विषयक सुविधा देताना पाहावयास मिळतात. तर काही धंदाकीय एकम गरीब रुग्णांचा इलाज कमी खर्चाने अथवा विनामूल्य तबीबी इलाज आणि औषधे पुरविण्याची प्रवृत्ती करीत असतात. धंदाकीय एकमाद्वारे राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर खेळ अथवा सांस्कृतिक स्पर्धेत आर्थिक मदत देऊन या प्रवृत्तीना पूरस्कृत करण्यात येत असते. धंदाकीय एकमांच्या या सर्व प्रवृत्तीमध्ये सामाजिक जबाबदारीचा विचार राहीलेला असतो.

## 11.1 धंद्याच्या सामाजिक जबाबदारीचा अर्थ

धंदा हा समाजांचे अविभाज्य अंग आहे. कोणत्याही धंदाकीय प्रवृत्तीला समाजापासून भिन्न पाहू शकत नाही. समाजाच्या वेगवेगळ्या वर्गाला धंद्याच्या विकासात हिस्सा दिलेला असतो. धंदा जी आवक मिळवीत असतो ती आवक सुद्धा वेगवेगळ्या वर्गातूनच येत असते. त्यामुळे कोणत्याही धंदाकीय एकमांने स्वत: मिळविलेला फायदा अथवा आवक मधून काही भाग समाज उपयोगी कार्यात प्रदान करणे ही त्या एकमाची जबाबदारी बनते. कोणताही धंदाकीय एकम हा फायदा समाजाला द्यावा अथवा न द्यावा अथवा किती प्रमाणात द्यावा ते सामान्यरीतीने स्वत: नक्की करायचे असते. सामान्यपणे सामाजिक जबाबदारी ही धंद्याची नैतीक जबाबदारी आहे.


कंपनीलक्षी सामाजिक जबाबदारीचा अर्थ यु.अेस.अे. मध्ये 1963 मध्ये अेच.आर. बोबेन च्या संशोधनपत्रा द्वारे सौप्रथम रजू करण्यात आला. तेव्हापासून आजपर्यत कंपनीलक्षी सामाजिक जबाबदारीचा अर्थ चर्चेचे केन्द्र बनले आहे. टिकाऊ विकासासाठीची विश्व व्यापार परिषदच्या माहितीप्रमाणे कंपनीच्या आर्थिक विकासा साठीची, कर्मचारी आणि त्याच्या कुटुंबाच्या जीवन धोरणाची गुणवत्तेच्या वाढीसाठी, स्थानिक समूदाय आणि समाजाविषयीची नैतीक प्रतिबद्धता म्हणजे कंपनीलक्षी सामाजिक जबाबदारी होय.

विस्तृत रीतीने पाहण्यात आले तर कंपनीची सर्व सामाजिक जबाबदारी आणि संलग्न हित धारकांच्या संदर्भात करण्यात आलेली नीती, कार्यक्रम आणि प्रकल्पाचे संकलन आहे जे या हितधारकांच्या विषयीची जबाबदारी अंतर्गत कंपनीचे निर्णय

घेण्यासाठी कर्तव्य करीत असतात. सामान्यरीतीने सामाजिक जबाबदारी ही स्वैच्छिक आणि पर्यायी विचार आहे. परंतु नवीन कंपनी कायदा-2013 प्रमाणे त्याला अनिवार्य स्वरुप देण्यात आले आहे. त्यामुळे कंपनी स्वरुपांच्या एकमांसाठी आजच्याकाळात सामाजिक जबाबदारी अनिवार्य मानली जास्ते.

कंपनी कायदा-2013 च्या कलम 135 नुसार 1 एप्रिल, 2014 पासून ज्या कंपनीचा वार्षिक टर्नेओवर (विक्री) ₹. 1000 करोड पेक्षा जास्त असेल अथवा ज्यांचे सरळ (स्वच्छ) किंमत ₹. 500 करोड पेक्षा जास्त असेल अथवा कोणत्याही एका आर्थिक वर्षाचा नफा ₹. 5 करोड पेक्षा जास्त असेल तशा कंपनीला अनिवार्य कंपनीलक्षी सामाजिक जबाबदारी लागू पडेल. असा कंपन्यांना त्यांच्या आर्थिक वर्षाच्या पूर्वीच्या तीन वर्षाच्या सरासरी नफ्याच्या कमीत कमी 2 % सामाजिक जबाबदारीच्या प्रवृत्तीसाठी खर्च करावा लागेल अथवा खर्च न करण्या मागील कारणांचा अहवाल दर्शवावा लागेल.

अशा प्रकारे, नवीन कंपनी कायदानुसार ज्या कंपन्यांना सामाजिक जबाबदारीची तरतूद लागू पडत असते, त्यांना तीन पेक्षा जास्त संचालक मंडळाच्या सभासंदाची सामाजिक जबाबदारी समिती बनविणे अनिवार्य असते. या कायदयाद्वारे कायदा मंत्रालय कंपन्यांना सामाजिक नागरीक होण्यावर भर देत असते.




### 11.1.1 सामाजिक जबाबदारीची व्याख्या :


कोणत्याही धंदाकीय एकमांचा उगम आणि विकास समाजाची वेगवेगळ्या अंगे आणि संस्था ज्या सेवा आणि योगदान दिलेले असते, त्यांचे उत्तरदायित्वाच्या रुपाने समाजाविषयी ऋण परत करण्याचे जे कर्तव्य उद्‌भवत होत असतात, त्यांना धंद्याची सामाजिक जबाबदारी म्हणतात. धंद्याच्या सामाजिक जबाबदारीला मुख्यत्वे चार स्तरात विभागणी करु शकतात.

(1) आर्थिक जबाबदारी (2) कायदाकीय जबाबदारी (3) नैतीक जबाबदारी (4) पसंती प्रमाणे जबाबदारी

## 11.2 धंद्यासोबत हित असणाऱ्या समूहाविषयी सामाजिक जबाबदारी

सामान्यरीती धंदाकीय एकम हा एक स्वतंत्र एकम आहे, जो आर्थिक प्रवृत्ती करुन विकास करीत असतो. कोणतेही धंदाकीय एकम समाजाच्या विविध वर्ग अथवा समूहाच्या योगदाना शिवाय आपोआप विकास करु शकत नाही. समाजाचे विविध वर्ग, समूह अथवा संस्था वेगवेगळ्या हितांसाठी धंदाकीय एकमा सोबत जुळलेले असतात. त्या प्रत्येकाला हित समूह म्हणण्यात येत असते.

धंदाकीय एकमांसोबत जुळलेल्या विविध हित समूहांना खालीलप्रमाणे दोन भागात विभागण्यात येऊ शकते :



**आंतरीक हित समूह :** जे हित समूह धंदाकीय एकमाच्या संचालना बरोबर प्रत्यक्षरीतीने जुळलेले असेल आणि एकमाचा च भाग असेल त्यांना आंतरीक हित समूह म्हणतात.

**बाह्य हित समूह :** जे हीत समूह धंदाकीय एकमाच्या संचालना बरोबर अप्रत्यक्षरीतीने जुळलेले असतात त्यांना बाह्य हित समूह म्हणतात.

**11.2.1 मालकांविषयी धंद्याची सामाजिक जबाबदारी :** दुसऱ्या विश्व युद्धानंतर भारतात औद्योगीक विकासाच्या युगाची सुरुवात झाली त्याच बरोबर धंदा अथवा उद्योगांच्या आकारात आणि प्रकारात अकल्पनीय बदल झाले. त्या परिणामाने भांडवलाच्या आवश्यकतेत वाढ झाली, जे व्यक्तिगत अथवा भागीदारी द्वारा पुर्ण होऊ शकणारी नसल्याने कंपनी स्वरुप स्वीकारण्यात आले. या स्वरुपात खरे मालक म्हणजे शेअर होल्डर आणि संचालक असे दोन वेगळे अस्तित्वात आले त्यामुळे कंपनीची सामाजिक जबाबदारी खऱ्या मालकाविषयी निर्माण होत असते. ती खालील प्रमाणे आहे

**( 1 ) निर्णय प्रक्रियेत भागीदारी :** शेअरधारक कंपनीचे मालक असतात. त्यामुळे कोणताही नीतीविषयक निर्णय घेतांना त्याना विश्वासा घेणे आवश्यक असते. निर्णय बनविण्याच्या प्रक्रियेत त्यांना सहभागी बनविण्यासाठी ते कंपनीची सामाजिक जबाबदारी बनते.

**( 2 ) भांडवलाची सुरक्षितता आणि वृद्धी :** संचालकांनी स्वत:चा व्यक्तिगत स्वार्थाला बाजूला ठेवून स्वत:च्या कुशळतचे उपयोग शेअर धांरकाच्या भांडवलाच्या सुरक्षिततेसाठी आणि मूल्यात वाढ करण्यासाठी करणे ही कंपनीच्या मालकांविषयी सामाजिक जबाबदारी बनते.

**( 3 ) मालकांच्या हितांचे रक्षण :** मालकांचे हित नेहमी भांडवलाची सुरक्षितता मूल्यात वाढ आणि कंपनीच्या विकासात पहायवास मिळते. कंपनीचे दिर्घमुदतीचे अस्तित्व देश, समाज आणि मालकांसाठी इच्छनीय आहेत. त्यामुळे मालकांच्या या दिर्घमूदतीच्या हीतांचे रक्षण करणे ही संचालंकांची सामाजिक जबाबदारी बनते.

**( 4 ) विकासात प्राधान्य :** जेव्हा एकमाच्या विकासाच्या योजना ठेवण्यात असेल तर त्या मूळ मालकाकडून जास्त भांडवल मिळविण्यास प्राधान्य दिले पाहीजे आणि त्यांना आवश्यकते प्रमाणे हक्कांचे शेअर ऑफर करणे ही सामाजिक जबाबदारी बनते.

**11.2.2 गुंतवणूक द्वारा धंद्याची सामाजिक जबाबदारी :** एकमाच्या आकाराच्या वाढी बरोबर भांडवलांची आवश्यकता निर्माण होत असते. जी गुंतवणूकदार लोन, प्रेफरन्स शेअर अथवा डिबेंचर सारख्या स्वरुपात देत असतात. एकमांची गुंतवणूकदारां विषयी जबाबदारी खालीलप्रमाणे आहे :

**( 1 ) मोबदल्याची वेळेवर चुकवणी :** गुंतवणूकदारांना एकमांत नाण्यांची गुंतवणूक उच्च नियमित आणि व्याजाची मोबदल्याच्या अपेक्षेने केलेली असते. त्यांना नियमित मोबदला चुकविण्याची एकमाची सामजीक जबाबदारी बनत असते.

**( 2 ) आवश्यक माहिती पूरविणे :** गुंतवणूकदारांना एकमाची वर्तमान स्थिती आणि भविष्यातील आयोजनांची माहिती पूरविणे.

**( 3 ) गुंतवणूकीच्या मूल्यात वाढ :** एकमाच्या आर्थिक परिणामांच्या आधारे गुंतवणूकीचे बाजार मूल्य नक्की होत असते. गुंतवणूकदारांच्या गुंतवणूक मूल्यात वाढ होईल त्याप्रमाणे एकमांचे आर्थिक निर्णय घेतले पाहीजे.

**( 4 ) नाण्यांची सुरक्षा :** गुंतवणूकदारांना एकमाच्या संचालकांच्या कार्यक्षमतेवर विश्वास ठेवून पैश्यांची गुंतवणूक केलेली असते. त्यांच्या पैश्यांचा योग्य उपयोग आणि सुरक्षेची सामाजिक जबाबदारी बनत असते. ज्यामुळे भविष्यात जेव्हा एकमाला भांडवलाची आवश्यकता निर्माण होईल तेव्हा सहज रीतीने भांडवलाची प्राप्ती होऊ शकत असते.

**( 5 ) सुचनांचे स्वागत/आवकार्य :** भांडवलाची गुंतवणूक करणार गुंतवणूकदार सामान्य रीतीने बाजाराच्या वर्तमान परिस्थितीशी परिचीत असल्याने त्यांच्या सूचनांचे स्वागत केले पाहीजे.

**11.2.3 कर्मचारी विषयी धंद्याची सामाजिक जबाबदारी :** कोणत्याही एकमाला कामगीरी करण्यासाठी कर्मचाऱ्याची आवश्यकता असते. एकम कार्यदक्ष कर्मचाऱ्या शिवाय ध्येय सिद्ध पूर्ण करु शकत नाही असे म्हणजे अतिशायोक्ती होणार नाही. त्यामुळे कर्मचाऱ्याच्या हितांची जपणूक आणि त्यांची काळजी घेणे हे प्रत्येक धंदाकीय एकमांची मुख्य सामाजिक जबाबदारी बनते.

**(1) कर्मचाऱ्याच्या जीवनधोरणाची जपवणूक :** कर्मचाऱ्याचा कार्य करण्याचा मुख्य उद्देश वेतन मिळविण्याचा असतो. हे वेतन योग्य प्रमाणात मिळत नसेल तर कर्मचाऱ्याच्या मनात असंतोष निर्माण होतो. त्याशिवाय त्यांना मिळणारे वेतन वेळेवर मिळत असेल ही सुद्धा पाहणे कंपनीची जबाबदारी असते. सामान्यपणे कर्मचाऱ्याचे शोषण न करणे आणि त्यांना योग्य आणि समयसर वेतन दिले पाहिजे.

**(2) कामगीरी साठी योग्य वातावरण आणि सुविधा पूरविणे :** कोणत्याही एकमाला कार्यक्षम ठेवण्यासाठी योग्य वातावरण खूपच महत्त्वाचा भाग बजावितो. धंदाकीय एकमात सकारात्मक वातावरण असेल, कर्मचारी संबंधाचा योग्य रीतीने विकास झाला असेल ते पाहणे एकमांची सामाजिक जबाबदारी असते. एकम विविध सुविधा द्वारे हे वातावरण पूरवू शकत असते. उदा. कॅंटिन सुविधा पुरविणे, वाहन व्यवहार तसेच एकमात स्वच्छता आणि हवा-प्रकाश. शक्य तसेल तर वातानुकूलित सुविधा तसेच स्त्री कर्मचाऱ्याना वेगळी/स्वतंत्र व्यवस्था पुरविणे.

**(3) कर्मचाऱ्यांना सामाजिक सुरक्षितता पुरविणे :** कर्मचाऱ्याला योग्य वेळी, योग्य वेतन शिवाय प्रॉविडंट फंड, पेन्शन, आजाराची रजा, जीवन, आरोग्य विषयक सुरक्षा आणि समूह वीमा योजना सारख्या सुविधा दिल्या पाहिजे.

**(4) कर्मचारी संगठनाला मान्यता देणे :** कर्मचारी संगठीत रुपाने स्वत:ची रजुआत संचालक मंडळा समोर ठेवू शकतील त्यासाठी ते कर्मचारी संगठनाची रचना करीत असतात. या संगठनाची मान्यता त्यांना संचालका कडून द्यावी लागते. कर्मचारी संगठन हे समग्र एकमाच्या कर्मचाऱ्याचे प्रतिनिधित्व करीत असतात. एकम कर्मचारी संगठनाच्या योग्य मागण्या स्वीकारुन कर्मचाऱ्याचा उत्साह वाढवू शकतात.

**(5) उच्च संचालकांची समाधानकारक दिशा :** कर्मचारी एकमाचे हात-पाय समान असतात ते स्वत:च्या कार्यात कार्यक्षम राहतील तशी कोणत्याही एकमांची अपेक्षा असते. समोरील बाजूने कर्मचारी सुद्धा स्वत:च्या हितांच्या विविध प्रश्नांसाठी व्यक्तिगत अथवा संगठनाद्वारे रजुवात करताना पहावयास मिळतात. या रजुआतला योग्य वेळी लक्षात घेऊन समाधानकारी दिशा ठेवल्याने एकमांचे आणि कर्मचाऱ्यांच्या हितांची जपणूक होते आणि एकमात कौटुंबिक वातावरणाची निर्मिती होते.

**(6) अभिप्रेरण :** तुम्ही तुमच्या कर्मचाऱ्याच्या कामाचे तास खरीदी करु शकतात. परंतु त्यांची पसंत/आवड जिकांवी लागते. कोणत्याही एकमात कर्मचाऱ्याचा उत्साह सतत प्रोत्साहना शिवाय टिकून राहू शकत नाही. त्यामुळे कर्मचाऱ्याचा उत्साह वाढविण्यासाठी इजाफा (Increment), पदोन्नती, पुरस्कार वगैरे दिले पाहीजे, ज्यातून कर्मचाऱ्यामध्ये आत्मगौरवाची भावना दृढ होत असते. उदा. एकमाच्या मालकांद्वारे कर्मचारी आणि त्यांच्या परिवारासोबत प्रवासात जाऊन कर्मचाऱ्याना प्रोत्साहीत करणे, कर्मचाऱ्याना जास्त संशोधन अथवा नवीन कार्यपद्धती साठी पुरस्कृत करणे वगैरे.

**(7) अन्य जबाबदारी :** एकमाच्या निर्णयात कर्मचाऱ्याची भागीदारी, कर्मचाऱ्याच्या निर्णयाने माहीतगार करणे आणि आवश्यक माहीती उपलब्ध होवू शकते त्यांची तरतूद करणे, नोकरीच्या अटी नियुक्ती पूर्वीच नक्की करणे, कर्मचाऱ्याच्या मुलांसाठी शिक्षणाची व्यवस्था करणे, तसेच एकच परिवाराच्या कर्मचाऱ्यांना वेळेचे आयोजन करुन देणे वगैरे जबाबदारी एकमाने निभावली पाहिजे.

**11.2.4 ग्राहकांविषयी धंद्याची सामाजिक जबाबादारी :** ग्राहकांशिवाय कोणत्याही धंदाकीय एकमांच्या अस्तित्वाची कल्पना करणे कठीन आहे. ग्राहक हा कोणत्याही एकमाच्या अस्तित्वात केंद्रस्थानी आहे, म्हणूच त्याला बाजाराचा राजा म्हणतात.

**(1) योग्य गुणवत्तेच्या चीजवस्तू अथवा सेवांची विक्री :** एकमाद्वारे ग्राहकांना ज्या काही वस्तू अथवा सेवांची विक्री करण्यात येते त्यात योग्य गुणवत्तेची जपणूक त्या ग्राहकाविषयी सामाजिक जबाबदारी मानली जाते. एकमाद्वारे विकण्यात येणाऱ्या वस्तू योग्य पॅकिंग, वजन, तसेच भेसळ शिवायची आणि ग्रांहकाच्या आवश्यकतेला पूर्ण करेल अशी असेल हे एकमाचे कर्तव्य आहे.

**(2) योग्य किंमत :** योग्य किमंत म्हणजे अशी किमंत ज्यामध्ये ग्राहकाला योग्य संतोष आणि उत्पादकाला योग्य नफा मिळेल. आजच्या या स्पर्धात्मक काळात एकमाला टिकून राहण्यासाठी योग्य नफा आवश्यक आहेच, त्यांच बरोबरच सामाजिक जबाबदारीच्या भागाच्या रुपात सुद्धा ग्राहकांकडून जास्त किंमत घेऊ नये.

**( 3 ) बाजारात पूरवठ्याचे सातत्य टिकवणे :** काहीवेळा ग्राहकांकडून जास्त किंमत वसूल करण्यासाठी मालाची कृत्रिम अछत निर्माण करण्यात येत असते. बाजारात पुरवठ्याचे सातत्य टिकवून अछत होऊ देऊ नये ही एकमांची सामाजिक जबाबदारी असते.

**( 4 ) गैरमार्गाला नेणारी जाहीरात न देणे :** काही एकम त्याचे उत्पादन अथवा सेवेमुळे होणाऱ्या फायदयांची अतिशायोक्ती असलेली जाहीरात देतात. काही ग्राहक या जाहीरातीला आकर्षीत होऊन ज्या त्या चिजवस्तू अथवा सेवा खरीदण्यासाठी प्रेरीत होतात. शेवटी घेतल्यानंतर जाहीरातीत दर्शविल्याप्रमाणे इच्छित फायदा होत नसल्याने फसवणूक झाल्याचा अनुभव होतो. त्यामुळे अशा भ्रामक जाहीराती देऊ नये.

**( 5 ) विक्री नंतरच्या सेवा :** ग्राहकाला वस्तू अथवा सेवेची विक्री केल्यानंतर एकमाची जबाबदारी पूर्ण होत नाही वास्तविकेत जबाबदारीची सुरूवात होत असते. चीजवस्तू अथवा सेवाविषयी ग्राहकाला निवारण्यासाठी जवळच सेवा केंद्राची प्राप्ती आणि ग्राहकाला वस्तू पसंत नसेल तर परत करण्याचे स्वातंत्र्य, ग्राहकांचा कायदाकीय अधिकार आहे आणि एकमाची सामाजिक जबाबदारी बनते. जे एकम स्वैच्छिक रीतीने त्याचा स्वीकार करतात त्या एकमांच्या सामाजिक प्रतिष्ठेत वाढ होत असते, अन्यथा वर्तमानात कायदयाद्वारे करावी लागते तेव्हा एकमाच्या सामाजिक आणि धंदादारी प्रतिष्ठेत घट होत असते.

**11.2.5 पुरवठा पुरविणाऱ्याविषयी धंद्याची सामाजिक जबाबदारी :** कोणत्याही धंदाकीय एकमाची सफळतेचा आधार सतत आणि गुणवत्तायुक्त पुरवठ्यावर असतो. पुरवठा भौतीक सामग्रीचा असेल अथवा सेवेचा सुद्धा असू शकतो. एकमाच्या यशात मुख्य भूमिका निभावणाऱ्या बाह्य घटकात पुरवठा करणाऱ्याविषयी एकमाची सामाजिक जबाबदारी आवश्यक आहे.

**( 1 ) पुरवठाविषयी पूर्वीपासून माहिती :** पुरवठा पुरविणाऱ्याला आकस्मीक कारणा शिवाय पूर्वीपासून एकमांच्या मागणी संदर्भात माहीतगार केल्याने पुरवठयाची कटोकती निर्माण होत नाही. परिणामी उत्पादनात सातत्य राहत असते आणि एकमांच्या प्रतिष्ठेत सुद्धा वाढ होत असते.

**( 2 ) गुणवत्ता आणि कौशल्याची स्पष्टता :** एकमाला स्वत:चा कच्चामाल आणि सेवा पुरविणाऱ्रा बरोबर स्वत:च्या आवश्यकतेप्रमाणे गुणवत्ता आणि कौशल्याची पूर्वीपासून स्पष्टता केली पाहिजे ज्यामुळे पुरवठयाचे सातत्य टिकून राहते.

**( 3 ) वेळेवर चुकवणी :** कच्चामाल आणि कामदाराचा पुरवठा करणाऱ्याना नक्की केलेल्या अटी प्रमाणे पैश्यांची चुकवणी वेळेवर केली पाहिजे.

**11.2.6 सरकार विषयी धंद्याची सामाजिक जबाबदारी :** धंदाकीय एकमाला आर्थिक प्रवृत्ती साठी सरकार द्वारा तयार केलेल्या कायदयाप्रमाणे संचालन करायचे असते.

**( 1 ) कायदयाचे पालन करणे :** सरकार द्वारे प्रस्थापित केलेल्या कायदयाचे योग्य रीतीने पालन करण्याची जबाबदारी बनते.

**( 2 ) सरकारच्या कार्यक्रमाच्या अमलात भागीदारी :** सरकारा द्वारा वेळोवेळी देशांच्या प्रगती आणि विकासासाठी अनेक विविध कार्यक्रम राबविण्यात येत असतात. ज्या कार्यक्रमात भाग घेणे अथवा लोकांपर्यत हे कार्यक्रम पोहचतील अशा लोक भागीदारीत एकमाने सहभागी झाले पाहीजे. उदा. सरकारद्वारे स्वच्छ भारत, अभियान अमलात आणले. त्यानंतर काही एकमांनी स्वच्छता कार्यक्रमा मध्ये सहभागी झालेले आहेत.

**( 3 ) प्रमाणीकपणे कर भरणे :** कोणत्याही एकमाला सरकार द्वारा वेळोवळी आकारण्यात येणारे सर्व कर प्रमाणीकपणे भरले पाहिजे.

**( 4 ) औद्योगीक नीतीच्या अमलात मदतरुप घेणे :** सरकार देशांच्या आवश्यकतेला लक्षात घेऊन औद्योगीक नितीचे निर्माण करीत असते. या औद्योगीक नीतीच्या अमलात मदतरुप होणे ही एकमांची सामाजिक जबाबदारी बनते.

**11.2.7 समाजाविषयी धंद्याची सामाजिक जबाबदारी :** संचालन शास्त्री पीटर अेफ. ड्रफर म्हणतो की कोणत्याही धंदाकीय एकमाचे संचालन अशा रीतीने केले पाहीजे की ज्यामध्ये एकम आणि समाजांच्या विविध वर्गाच्या हितां मध्ये समतोल राहील एकमाला संचालन करताना समाजाच्या आर्थिक आणि सामाजिक हित सांभाळली पाहीजे.

**( 1 ) पर्यावरणाचे जतन करणे :** एकमाने उत्पादन प्रक्रियेची पसंती अशी केली पाहिजे की ज्यामुळे प्रदुषण कमी पसरुन पर्यावरणाचे जतन होत राहील.

**( 2 ) राष्ट्रीय विकासाच्या कार्यात सहभाग :** देशांचा विकास हा व्यक्ती आणि एकमाच्या विकासाचा संयुक्त परिणाम एकम स्वत:च्या आर्थिक साधनांचा जास्तीत जास्त उपयोगाद्वारे राष्ट्रीय विकासात सहभाग दिला पाहिजे.

**(3) संशोधनाला महत्त्व देणे :** देशांचा विकास औद्योगिक संशोधनाचे योगदान असते. विकसीत देशांचे एकम स्वत:च्या नफ्याचा काही भाग संशोधन कार्या द्वारे एकमाला आंतरराष्ट्रीय स्पर्धेत प्रथम ठेवण्यासाठी करीत असतात. त्यामुळे एकम संशोधन कार्याला महत्त्व देऊन समाजाच्या गरजे प्रमाणे वस्तू अथवा सेवेचे उत्पादन केले पाहिजे.

**(4) आणि-बाणी अथवा आपत्तीच्या काळात जबाबदारी निभावणे :** नैसर्गीक आपत्तीच्या परिस्थितीत एकमाला सरकारी आणि अर्ध सरकारी तंत्राबरोबर ताल मिळवून सामाजिक जबाबदारी निभावली पाहिजे.

**(5) सामाजिक-सांस्कृतीक वारश्यांचे संवर्धन :** एकमाने स्वत:च्या वस्तू अथवा सेवेद्वारा देशांच्या सामाजिक आणि सांस्कृतीक मूल्यांचे संवर्धन होत राहील त्यांची काळजी ठेवली पाहिजे. प्रचार आणि प्रसाराच्या अशी माध्यम आणि विचार उपयोगात घेतले पाहिजे की जे सांस्कृतीक मूल्याना अटकविणारे नसावे. उदा. जाहीरातीत अश्लीलता अथवा रंगभेद सारख्या विचारांचे निरुपण नाही केले पाहिजे.

**(6) समाज उत्थानमध्ये सहभागी :** कोणत्याही समाजाचा विकास सामाजिक समानते शिवाय शक्य नाही. सामाजिक समानता प्रत्येक वर्गाला योग्य संधीची प्राप्ती द्वारा मिळत असते. एकमाला समाजाच्या कमजोर वर्गाला योग्य संधी देऊन विकासात मदत रुप झाले पाहीजे.

**(7) रोजगारांच्या संधीचे निर्माण करणे :** एकमाला विकास करुन रोजगारीच्या संधीची निर्मिती केली पाहीजे. राष्ट्रीय विकास दर अथवा राष्ट्रीय समानता रोजगारीच्या संधी द्वारे सिद्ध करु शकतात.

**(8) मानव अधिकारांची जपणूक :** प्राकृतिक आणि बंधारणीय मानवी अधिकारांची एकमाने जपणूक करावी ही त्याच्या सामाजिक जबाबदारीचा भाग असतो.

### 11.3 धंदाकीय एकम आणि पर्यावरणाची जपणूक

विश्व जेव्हा ग्लोबल वार्मिंग सारख्या अति विकट प्रश्नांचा सामना करीत आहेत आणि त्यांच्या समोर मोठ्या धैर्याने निर्णय घेत आहेत, तेव्हा धंदाकीय एकमाला त्यात भागीदारी केल्याशिवाय राहीले पाहीजे नाही. पर्यावरणाच्या संदर्भात सरकारद्वारे घडविण्यात आलेल्या धोरणांचे पालन करुन स्वत:चा धंदा करणे ही सामाजिक जबाबदारी असते. सामाजिक जबाबदारीच्या भाग धंदाकीय एकमाला पर्यावरणाच्या जपणूकीने वेगवेगळ्या चार क्षेत्राला लक्ष ठेवून स्वत:चा व्यापार केला पाहीजे.

**(1) जमीन आणि जंगलाची (वृक्ष) जपवणूक :** एकमाच्या स्थापनेसाठी जमीनीची आवश्यकता असते. या जमीनीसाठी शक्य आहे की वृक्ष कापण्याची आवश्यकता पडत असेल तर तितक्या प्रमाणात वृक्षरोपण करुन नवीन वृक्ष लावण्याची सामाजिक जबाबदारी निर्माण होते. त्याच बरोबर एकमाचा कचरा आणि केमीकलचा निकालाद्वारे जवळपासच्या सुपीक जमीनीच्या उत्पादकतेवर परिणाम होणार नाही ते पाहण्याची एकमांची जबाबदारी बनते. अन्यथा एकमाचा सामाजिक बहिष्कार सारखे अंतीम निर्णय घेतांना सुद्धा समाज घाबरत नाही.

**(2) हवा आणि विविध वायूची जपवणूक :** एकमाच्या उत्पादन प्रक्रिये दरम्यान दुषित घन, प्रवाही आणि वायू कचऱ्याच्या निकालाची व्यवस्था हवेच्या प्रदुषणात वाढ करणार नाही त्या रीतीने व्यवस्था गोठवली पाहीजे. बऱ्याच एकमाद्वारे विषारी ग्रॅस गळतीच्या परिणामाने मानवहानी आणि मुलांमध्ये शारीरीक अपंगत्व भूतकाळात झालेले आहेत. समाजाच्या सामान्य आरोग्याची जपवणूक एकमाच्या सामाजिक जबाबदारीचा भाग आहे.

**(3) जलसंपत्तीची जपवणूक :** उत्पादन प्रक्रिये दरम्यान दुषित घन आणि प्रवाही कचऱ्याच्या निकालाची अशी व्यवस्था केली पाहीजे की ज्यामुळे बाह्य आणि भूगर्भ जल स्रोत प्रदुषित होणार नाही त्यांची काळजी घेतली पाहीजे.

**(4) ध्वनी प्रदुषणाला अटकविणे :** उत्पादन प्रवृत्तीत उपयोगात घेण्यात यंत्रांची गोठवणी आणि कारखान्याचे बांधकाम असे केले पाहिजे ज्यामुळे ध्वनीचे प्रदुषण कमी होईल.

### 11.4 धंदाकीय नितिमत्ता

वर्तणूंक आणि चारित्र्य विषयीच्या सर्व स्वीकृत सिद्धांत आणि प्रमाणभूत धोरणांचा समूह म्हणजे धंदाकीय नितिमत्ता. धंदाकीय नितिमत्तेत अशा सिद्धांत आणि धोरणांची चर्चा आणि अमल करण्यात येत असतो की जो एकमाच्या वेगवेगळ्या व्यक्ती मधील संबंधात खरे काय आणि खोटे काय ते नक्की करुन आणि त्यांना अमलात ठेवतात. उदा. फसवणूक करु नये, रिश्वत घेऊ-देऊ नये वगैरे.

नीतीशास्त्राच्या नियमाच्या सिद्धांत आणि कायदाकीय नियमाच्या मध्ये मुख्य फरक हा असतो की नीतीशास्त्राच्या सिद्धांताच्या सत्तेद्वारा अमल करु शकत नाही, जेव्हा कायदाकीय नियमांना हे शक्य होत असते. जर धंदादारी एकम समाजात नीतीमत्तेच्या

धोरणांचे योग्य रीतीने पालन करेल तर अनिवार्य स्वरुपात कायदाकीय रुपात अमल करावयाची आवश्यकता उभी होत नाही. समाज सुद्धा ह्या प्रत्येक धंदाकीय एकमाकडून अपेक्षा ठेवत असतो की तो नीतीमत्तेने प्रवृत्ती करेल.

धंदाकीय नितीमत्तेचा भंग मोठ्याप्रमाणात स्पर्धेत अथवा जेव्हा धंदादारी जलद आणि जास्त नफा मिळावा इच्छीत असते तेव्हा होत असतो. परंतु सामान्य निरिक्षण असे असते की ज्या एकमा द्वारे नितिमत्तेच्या धोरण टिकवून प्रवृत्ती करण्यात येत असते, त्याचे अस्तित्व दिर्घमुदती पर्यंत टिकून राहत असते आणि चांगला आर्थिक विकास सुद्धा साध्य करु शकत असतता.

**11.4.1 धंदाकीय नितिमत्तेची तत्वे :** नीतिमत्तापूर्ण वर्तणूंक ही धंदा आणि समाज दोन्ही साठी चांगली बाबत आहे. एकमाच्या दैनंदिन व्यवहारात मूल्य आणि नितीमत्तेचे तत्व असेल तरच संपूर्ण एकमात योग्य वातावरण निर्माण होऊ शकते.

**( 1 ) उच्च संचालक मंडळाची प्रतिबद्धता :** नीतीमत्तायुक्त वर्तणूंकीला यशस्वी बनविण्यासाठी संचालकांची भूमिका निर्णायक ठरत असते. आणि त्यांच्या परिणाम प्राप्त करण्यासाठी एकमाच्या मुख्य अधिकाऱ्यांना सदैव कटिबद्ध राहणे आवश्यक असते. मूल्यांना पूर्ण करण्यासाठी त्यांना स्वत:च्या नेतागीरी द्वारे संपुर्ण एकमाच्या वर्तणूकीला प्रेरीत केले पाहीजे.

**( 2 ) मार्गदर्शक नियमांचे प्रकाशन :** एकमाच्या नीतीमत्तायुक्त व्यवहारासाठी एकमात कर्मचाऱ्याना मार्गदर्शन पुरविण्यासाठी संचालकांनी लेखित स्वरुपात मार्गदिर्शका प्रकाशीत केली पाहिजे. ज्यामुळे वेगवेगळ्या परिस्थितीत कर्मचाऱ्याना व्यवहारा संबंधीत प्रेरणा आणि मार्गदर्शन मिळत राहील.

**( 3 ) आधारभूत रचना करणे :** एकमा द्वारे घेण्यात आलेले निर्णय एकमाच्या नितीमत्तेच्या सिद्धांता अनुकरण असते. त्यांची खात्री करण्यासाठी त्याच्या अमलीकरणासाठीची योग्य आधारभूत रचना केली पाहीजे.

**( 4 ) निर्णयात भागीदारी :** निर्णयात कर्मचाऱ्याच्या सहभाग नीतीमत्तेला यशस्वी बनवित असतो.

**( 5 ) परिणामाचे मूल्यांकन :** सामान्यरीते नितीमत्ता हे गुणात्मक बाबत असल्याने तो प्रत्यक्ष विचार बनतो. त्यामुळे नितीमत्तेची धोरणे एकमात किती टक्के सादर झाले आहेत ते एकमा सोबत जुळलेल्या वेगवेगळ्या वर्गाच्या प्रतिसादा द्वारे माहीत करु शकतात.

**या प्रकरणात तुम्ही काय शिकलात ?**

**कंपनीलक्षी सामाजिक जबाबदारी :** कंपनीच्या आर्थिक विकासासाठी कर्मचारी आणि त्याच्या परिवारासाठीच्या जीवन धोरणाच्या गुणवत्तेत वाढ करण्यासाठी स्थानिक समुदाय आणि समाज विषयी नैतीक प्रतिबद्धता म्हणजे कंपनीलक्षी सामाजिक जबाबदारी.

**सामाजिक जबाबदारीची व्याख्या :** कोणत्याही धंदाकीय एकमाचा उगम आणि विकासात समाजाच्या वेगवेगळी अंगे आणि संस्थानी जी सेवा आणि योगदान दिलेले असेल त्यांच्या उतरदायित्वाच्या रुपाने धंद्याची समाजाविषयी ऋण देण्याचे जे कर्तव्य उदभवते त्याला धंद्याची सामाजिक जबाबदारी म्हणतात.

**धंद्या बरोबर हीत असणाऱ्या समूहाविषयी सामाजिक जबाबदारी :**

**मालकाविषयी धंद्याची सामाजिक जबाबदारी :** (1) निर्णत प्रक्रियेत भागीदारी (2) भांडवलांची सुरक्षितता आणि वाढ (3) हीतांचे रक्षण (4) विकासात प्राधान्य

**गुंतवणुकदार विषयी धंद्याची सामाजिक जबाबदारी :** (1) मोबदल्याची वेळेवर चुकवणी (2) गुंतवणुकदारांना माहीती पूरविणे (3) गुंतवणूकदारांच्या गुंतवणूकीच्या मूल्यात वाढ (4) भांडवलांची सुरक्षा (5) सुचनांचे स्वागत/आवकार्य

**कर्मचारी विषयी धंद्याची सामाजिक जबाबदारी :** (1) कर्मचाऱ्याच्या जीवनधोरणांची जपणूक (2) कामगीरीसाठी योग्य वातावरण आणि सुविधा पुरविणे (3) कर्मचाऱ्याना सामाजिक सुरक्षितता पुरविणे (4) कर्मचारी संगठनाला मान्यता देणे (5) उच्च संचालकांचे समाधानकारी दिशा (6) कर्मचाऱ्याना अभिप्रेरण (7) अन्य जबाबदारी

**ग्राहक विषयी धंद्याची सामाजिक जबाबदारी :** (1) कायदयाचे पालन करणे (2) प्रामाणीकपणे कर भरणे (3) सरकारच्या कार्यक्रमाच्या राबविण्यात भागीदार (4) औद्योगिक नीतिच्या अमलात मदतरुप होणे

**समाज विषयी धंद्याची सामाजिक जबाबदारी :** (1) पर्यावरणाचे जतन करणे (2) राष्ट्रीय विकासाच्या कार्यात सहभागी होणे (3) संशोधनाला महत्त्व देणे (4) आणिबाणी अथवा आपत्तीच्या काळात जबाबदारी निभावणे (5) सामाजिक–सांस्कृतिक वारश्यांचे संवर्धन (6) समाज उत्थानात सहभागी (7) रोजगारांच्या संधी निर्माण करणे (8) मानव हक्कांची जपवणूक

**धंदाकीय एकम आणि पर्यावरणाची जपवणूक :** सामाजिक जबाबदारीच्या भाग स्वरुपात धंदाकीय एकमाला पर्यावरणाची जपवणूक वेगवेगळ्या चार क्षेत्राला लक्षात ठेवून स्वत:चा व्यापार केला पाहिजे.

(1) जमीन आणि जंगलाची जपवणूक (2) जलसंपत्तीची जपणूक (3) हवा आणि विविध वायूची जपणूक (4) ध्वनी प्रदूषणाला अटकविणे.

**धंदाकीय नितीमत्ता :** वर्तणूक आणि चारित्र्य विषयीच्या सर्व स्वीकृत सिद्धांत आणि प्रमाणभूत धोरणांचा समूह म्हणजे धंदाकीय नितीमत्ता.

**धंदाकीय नितीमत्तेची तत्वे :** नीतीमत्तापूर्ण वर्तणूंक ही धंदा आणि समाज दोन्ही साठी चांगली बाबत आहे. एकमाच्या दैनदिंनच्या व्यवहारात मूल्य आणि नितीमत्तेची तत्व असेल तरच संपूर्ण एकमात योग्य वातावरण निर्माण होऊ शकते. धंद्यात नितिमत्तेचे काही तत्त्वे खालीलप्रमाणे आहेत.

(1) उच्च संचालक मंडळाची प्रतिबद्धता (2) मार्गदर्शक नियमांचे प्रकाशन (3) मूलभूत रचना करणे (4) निर्णयात भागीदारी (5) परिणामांचे मूल्यांकन.

## स्वाध्याय

**1. खालील प्रश्नांच्या उत्तरांचा योग्य विकल्प पसंद करुन लिहा :**

(1) कंपनी कायदा-2013 च्या तूरतूदी प्रमाणे खालील कंपनीसाठी सामाजिक जबाबदारी निभावणे कायदयाद्वारे अनिवार्य झाले आहे ?

(A) ज्या कंपनीचा वार्षिक टर्नओवर (उलाढाल) ₹ 5 करोड असेल

(B) ज्या कंपनीची वार्षिक उलाढाल ₹ 50 करोड असेल

(C) ज्या कंपनीची वार्षिक उलाढाल ₹ 500 करोड असेल

(D) ज्या कंपनीची वार्षिक उलाढाल ₹ 1000 करोड असेल

(2) कंपनी कायदा-2013 च्या तरतूदी प्रमाणे कंपनीला सामाजिक जबाबदारीसाठी खर्च करणे अनिवार्य आहे ?

(A) सरासरी वार्षिक नफ्याच्या कमीत कमी 2 % (B) सरासरी वार्षिक नफ्याच्या कमीत कमी 5 %

(C) सरासरी वार्षिक नफ्याच्या जास्तीत जास्त 2 % (D) सरासरी वार्षिक नफ्याच्या जास्तीत जास्त 5 %

(3) कंपनीत बाह्यहित समूहात समावेश होणारा हित समूह पसंत करा.

(A) कर्मचारी (B) गुंतवणूकदार (C) मालक (D) ग्राहक

(4) धंद्याची सामाजिक जबाबदारी म्हणजे....

(A) समाजाचे धंद्याविषयी उत्तरदायित्व (B) ग्राहंकाचे समाजविषयी उत्तरदायित्व

(C) धंद्याचे समाजविषयी उत्तरदायित्व (D) समाजाचे ग्राहकांविषयी उत्तरदायित्व

(5) धंद्याची सामाजिक जबाबदारी किती हित समूहा विषयी असते ?

(A) पांच (B) सहा (C) सात (D) आठ

(6) सामाजिक जबाबदारीच्या संदर्भात बाजाराचा राजा कोणाला म्हणतात ?

(A) गुंतवणूकदार (B) ग्राहक (C) मालक (D) कर्मचारी

(7) अश्लील अथवा भेदभाव सारख्या विचाराचे जाहीरातीत निरुपण करु नये ही धंद्याची .......... जबाबदारी आहे.

(A) राजकीय (B) धार्मिक

(C) आर्थिक (D) सामाजिक

(8) धंदाकीय नितीमत्तेचा अमल कशा रीतीने होत असतो ?

(A) कंपनीकायदया प्रमाणे (B) भागीदारी कायदयाप्रमाणे

(C) स्वैच्छिक रीतीने (D) सहकारी मंडळीच्या कायदया प्रमाणे

(9) मानवाच्या नैतीक व्यवहारांचे अर्थघटन करणारे शास्त्र म्हणजे....

(A) समाजशास्त्र (B) मानसशास्त्र (C) राज्यशास्त्र (D) नीतीशास्त्र

(10) सामाजिक जबाबदारीचा विचार कंपनीकायदा -2013 च्या कोणत्या कलम प्रमाणे अनिवार्य बनविण्यात आला आहे ?
(A) 135 (B) 143 (C) 153 (D) 137

**उत्तर :** (1) (D) (2) (A) (3) (D) (4) (C) (5) (C) (6) (B) (7) (D) (8) (C) (9) (D) (10) (A)

**2. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा :**

(1) सामाजिक जबाबदारीचा अर्थ सांगा ?
(2) शून्य प्रदुषणवाले वातावरण निर्माण करणे ही कोणती जबाबदारी म्हणतात ?
(3) योग्य किंमत म्हणजे काय ?
(4) नितीमत्तेचा अर्थ सांगा.
(5) पर्यावरणाचे जतन करणे ही कोणती जबाबदारी म्हणतात ?

**3. खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा :**

(1) वेळेवर आणि योग्य वेतन ही एकमांची सामाजिक जबाबदारी बनत असते. - समजवा.
(2) ग्राहंकाच्या हितांचे रक्षण एकमांच्या प्रतिष्ठेत वाढ करीत असते. - समजवा.
(3) धंदयाच्या नित्तिमत्तेत कोणत्या तत्वांचा समावेश होतो ?

**4. खालील प्रश्नांची मुद्देसूद उत्तरे लिहा :**

(1) धंदाकीय एकमाला पर्यावरण संदर्भात कोणकोणत्या क्षेत्रांत कर्तव्य बजावली पाहीजे ते मुदेसूद समजवा.
(2) धंदाकीय एकम सामाजिक जबाबदारी निभावून प्रतिष्ठेत वाढ करू शकत असते ? विधान समजवा.
(3) कर्मचारी विषयी सामाजिक जबाबदारी एकमातून असंतोष दुर करती असते. - विधान समजवा.
(4) धंदाकीय नीतीमत्तेचा कायदाद्वारे अमल शक्य नाही. - विधान समजवा.
(5) धंद्याच्या मालक विषयी सामाजिक जबाबदारी समजवा.
(6) धंद्याच्या समाज विषयी सामाजिक जबाबदारी समजवा.
(7) नितिमत्ता आणि कायदा यातील फरक समजवा.

**5. खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा :**

(1) धंद्याची आंतरीक जबाबदारी सविस्तर समजवा.
(2) धंदाकीय एकमांची बाह्य सामाजिक जबाबदारीचा अर्थ सविस्तर वर्णवा.

**पारिभाषिक शब्द**

| | | |
|---|---|---|
| US | : | United States of America |
| टिकाऊ विकासासाठीची विश्व व्यापार परिषद | : | World Business Council for Sustainable Development |
| एकूण विक्री, विक्री उलाढाल | : | Turnover |
| शेअरधआरक | : | Shareholders |
| उधार | : | Loan |
| पसंतीचे शेअर | : | Preference Share |
| डिबेंचर | : | Debenture |
| उपहारगृह | : | Canteen |

• • •

## प्रोजेक्ट कार्य (Project Work)

1. व्यापाऱ्याच्या सहाय्यक सेवा जसे की, बँकिंग, विमा, गोठाऊन, वाहनव्यवहार, माहिती संचाराच्या सेवा पूरविणाऱ्या पांच कंपन्याच्या नावाची यादी तयार करून कोणत्याही एकाचा अहवाल तयार करा.
2. आपल्या विस्तारात कार्यरत पांच वेगवेगळ्या सहकारी मंडळीच्या नावाची यादी तयार करून त्यापैकी कोणत्याही एकाच्या प्रवृत्तीची तपशिलवार महवाल तयार करा.
3. विविध प्रकारच्या जाहीर क्षेत्राचे साहस : वैश्विक साहस, संयुक्त साहस आणि जाहीर खाजगी भागीदारी प्रत्येकाच्या पांच एकमाच्या नावाची यादी तयार करा त्यापैकी कोणत्याही एकाची धंदाकीय प्रवृत्ती विषयी विस्तृत अहवाल तयार करा.
4. तुमच्या जवळच्या कोणत्याही एका बँकेची भेट घेऊन बचत खाते उघडण्याविषयी माहिती एकत्रीत करून त्याविषयी आवश्यक दस्तावेज मिळवून अहवाल तयार करा.
5. जीवन विमा निगम अथवा कोणत्याही एक खाजगी विमा कंपनी द्वारे देण्यात येणाऱ्या वेगवेगळ्या विमा पॉलीसी विषयी विस्तृत अहवाल तयार करा.
6. कोणत्याही एक स्थानिक व्यापार किंवा धंदाकीय एकम पसंत करून त्या`कमाला कोणत्या प्रकारच्या जोखमाचा सामना करावा लागतो ते शोधून ते एकम कशारीतीने निवारण करीत असते त्याची सविस्तर नोंद तयार करा.
7. कोणत्याही एका भागीदारी पेढीचा काल्पनिक भागीदारी करारनामा तयार करा.

   [नं. 1 ते 7 पैकी कोणताही एक प्रोजेक्ट तयार करा.]

8. कोणतीही एक पेढी अथवा कंपनी पसंद करून तिच्या द्वारे सामाजीक जवाबदारी पूर्ण करण्यासाठी घेतलेल्या निर्णया विषयी अहवाल तयार करा.
9. आपल्या पसंतीच्या कोणत्याही एका कंपनीचा वार्षिक अहवाल मिळवून त्या कंपनीच्या भांडवलाच्या प्रापतीस्थाना विषयी नोंद लिहा.
10. तुमच्या विस्तारात आलेल्या स्थायी दुकानाना तुम्ही शिकलेल्या प्रकारा प्रमाणे वर्गीकरण करा.
11. गुजरात सरकार द्वारे निर्यातवाढी साठी देण्यात येणाऱ्या प्रोत्साहनाविषयी नोंद लिहा.
12. तुमच्या पसंतीच्या कोणत्याही एका सरथेद्वारे होणाऱ्या इन्टरनेट मार्केटिंग वर अहवाल तयार करा.
13. लहान पायावरील धंदाकीय एकमाची भेट घेऊन धंद्यात येणाऱ्या समस्येवर अहवाल तयार करा.

   [नं. 8 ते 13 पैकी कोणताही एक प्रोजेक्ट तयार करा.]

• • •